मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/३९८/०२

श्री. ललित सालेकर
१२४/एम महादेव शनवार                                        तक्रारकर्ता
गोलफा देवी मार्ग, वरळी,व्हिलेज,
मुंबई ४०००३०

जन माहिती अधिकारी तथा सहकारी संस्था                              उत्तरवादी
सहकार आयुक्त तथा निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय,
सेंट्रल बिल्डिंग पुणे ४११०११

-विवेचन-

श्री.ललित सालेकर,मुंबई यांनी दि.२९.११.२००७ रोजीच्या तक्रार अर्जानुसार अपिलीय अधिकारी तथा अति.सहकार आयुक्त निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यपध्दतीबाबत तक्रार केलेली आहे. या तक्रारीची चौकशी करण्यांत यावी असे दि.११ जानेवारी २००८ रोजी सहकार आयुक्त यांना कळविण्यांत आले.

सदर तक्रारीची सुनावणी दिनांक ६.१०.२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळी तक्रारकर्ते अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी, सहकारी आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

अर्जदाराने केलेल्या तक्रारीच्या संदर्भात पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे :-

श्री.शैलेश शहा यांनी त्यांच्या दि.२९.११.२००७ च्या पत्रान्व्ये केलेल्या तक्रारीनुसार श्री.ललित सालेकर यांचा माहिती अधिकारी अधिनियम २००५ अंतर्गतचा अपील अर्ज श्री.श्रीकांत जठार, अपर निबंधक, सहकारी संस्था म.रा.पुणे यांच्याकडून सदरचे अपील काढुन सुनावणीकरिता श्री.काशीकर, अपर निबंधक (वसुल व नियोजन)यांच्याकडे हस्तांतरण केल्याबाबत या कार्यालयाचे दि.४.१२.२००७ च्या पत्रान्वये कळविण्यांत आले होते व त्यानुसार दि.२२.१.२००८ रोजी सुनावणी ठेवण्यांत आली होती व सदर सुनावणीच्या अनुषंगाने या कार्यालयाचे दि.२५.०१.२००८ च्या आदेशान्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये दाखल झालेल्या अपीलावर आदेश निर्गमित करण्यांत आलेले आहेत. सदर आदेशामध्ये अपीलकार यांना हवी असलेली माहिती उत्तरवादी यांनी उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले असल्याने अपीलकार यांचे अपील निकाली काढण्याबाबतचे कळविण्यांत आले आहे. त्यावर या कार्यालयाचे दि.२.४.२००८ च्या पत्रान्वये दि.२१.२.२००८ च्या शैलेश शहा यांच्या पत्राची पत्र पाठवून वसई जनता सहकारी बॅकेला तात्काळ कार्यवाही करण्याबाबत कळविण्यांत आलेले आहे. त्यानंतर या कार्यालयाचे

दि.१८.९.२००८ च्या पत्रान्वये श्री.शैलेश शहा यांचे कर्जखाते एक रक्कमी कर्ज परतफेड योजनंतर्गत श्री.शहा यांनी कंपनी बंद असल्याने ते विलफुल डिफॉल्टर नसल्याचे दिसून येते. सबब त्यांनी आपल्या बँकेकडे एक रक्कमी कर्ज परतफेड योजनेतंर्गत अर्ज केलेला असल्यामुळे सदर अर्जावर शासन निर्णयान्वये दिलेल्या निर्देशानुसार आणि इतर एक रक्कमी कर्ज परतफेड योजनेबाबत अर्जावर आपल्या बॅकेने घेतलेल्या निर्णयानुसार या प्रकरणी बॅक स्तरावर कार्यवाही करण्यांत यावी असे या कार्यालयाकडून कळविण्यांत आलेले आहे. त्या अनुषंगाने पुन्हा या कार्यालयाचे दि.३०.३.२००९ ९.६.२००९ या पत्रानेसुध्दा बॅकेला कार्यवाही करण्यांबाबत निर्देश देण्यांत आलेले आहेत.

मुलतः सदरची तक्रार तत्कालिन अपिलीय अधिकारी श्री.जठार यांचे विरुध्द केली असल्याने सहकार आयुक्त यांनी या प्रकरणाची सुनावणी अन्य अधिका-याकडे दिलेली होती त्याप्रमाणे त्यांचे माहिती अर्ज निकाली काढण्यांत आलेले आहेत त्याविरुध्द कोणतेही अपील प्रलंबित नाही. श्री.जठार हे सन २००८ मध्ये सेवानिवृत्त होऊन मयत झालेले आहेत. सबब सदरचा तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यांत यावा अशी शिफारस करण्यांत येत आहे.

सदर तक्रार श्री.जठार यांचेविरुध्दची असून केलेल्या तक्रारीनुसार कार्यवाही करण्यांत आलेली आहे व श्री.जठार हे सेवानिवुत्त होऊन मयत झालेले आहेत. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)<br>
दिनांकः ७.१०.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार**

**तक्रार क्रमांक २००९/३९९/०२**

**श्री. संजीवकुमार दादा**
**व्दारा महावीर भ.चाकोने** **तक्रारकर्ता**
**प्लॉट नं.२, यशवंत सह.गृहनिर्माण संस्था**
**जयसिंगपूर ता.शिरोळे जि.कोल्हापूर ४१६ १०१**

**जन माहिती अधिकारी तथा सहकारी संस्था** **उत्तरवादी**
**सहकार आयुक्त तथा निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय,**
**सेंट्रल बिल्डिंग पुणे ४११०११**

**-विवेचन-**

दि.४.४.२००७रोजीच्या अर्जाने श्री.संजिवकुमार दादा,ठाणे यांनी आयोगाने दिलेल्या दि.८.२.२००७ रोजीच्या आदेशाचे पालन झालेले नाही अशी तक्रार केलेली आहे. या बाबतचे स्पष्टीकरण दि.११ जानेवारी २००८ रोजीच्या पत्राने संचालक,तंत्रशिक्षण विभाग, यांचेकडून मागविलेले होते ते देण्यांत आलेले आहे. सदर तक्रारीची सुनावणी दि.६.१०.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी तक्रारकर्ते अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. सुनावणीच्यावेळी पुढीलप्रमाणे निवेदन दिलेले आहे :-

अर्जदार श्री.संजीव दादा ठाणे यांनी केलेला अर्ज हा दि.४.४.२००७ रोजीचा आहे. आपल्या आदेशानुसार या कार्यालयाचे दि.११.६.२००७ च्या पत्रानुसार मा.अध्यक्ष डॉ.जे.जे.मगदूम चॅरिटेबल ट्रस्ट,जयसिंगपूर यांना माहिती देण्याविषयी कळविण्यांत आलेले होते. तसेच संचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,पुणे यांना देखील या कार्यालयाच्या दि.१८.३.२००८ च्या पत्रानुसार डॉ.जे.जे.मगदूम पॉलिटेक्निक, जयसिंगपूर या संस्थेने अटी व शर्तीचे पालन केले आहे. याबाबत चौकशी करुन अर्जदारास माहिती देण्याविषयी कळविण्यांत आले होते व याची प्रत देखील आपल्याला देण्यांत आलेली होती. त्यानंतर सहसंचालक विभागीय कार्यालय,पुणे यांनी सदर चौकशी करुन माहिती या कार्यालयाला कळविलेली होती ती माहिती अर्जदाराला या कार्यालयाच्या दि.२०.१२.२००८ च्या पत्रान्वये देण्यांत आलेली आहे.

चौकशी करुन माहिती द्यावयाची असल्यामुळे अर्जदारास अंतिमत: माहिती देण्यास वेळ लागला असेही जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तक्रारकर्ते अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे मत समजून घेता आले नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: ७.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००९/१६८/०२

श्री. तरुण जमनादास घीया
प्लॅट नं.२०३ बि.न.११स्टारशिप सह.गृ.संस्था तक्रारकर्ता
अंधेरी विस्तारीत लिंक रोड,
ओशिवरा पो.स्टेशन समोर, ओशिवरा,
अंधेरी पश्चिम मुंबई ४०००५३

अपिलीय अधिकारी तथा मुद्रांक अधिक्षक मुख्यालय
प्रधान मुद्रांक कार्यालय,शहिद भगतसिंग मार्ग,
केंद्रिय ग्रंथालय आवार मुंबई ४०० ००१

जन माहिती अधिकारी तथा मुद्रांकजिल्हाधिकारी अंमलबजावणी-१ उत्तरवादी
प्रधान मुद्रांक कार्यालय,शहिद भगतसिंग मार्ग,
केंद्रिय ग्रंथालय आवार मुंबई ४०० ००१

-विवेचन-

सदर तक्रारीची सुनावणी दि.७.१०.२००९ रोजी ठेवण्यांत आली होती व त्या अगोदरच दि.५.१०.२००९ रोजी तक्रारकर्ता यांना त्यांना हवी असलेली माहिती प्राप्त झालेली असल्यामुळे तक्रार मागे घेत असल्याचे लेखी पत्र सादर केलेले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

तक्रार निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः ७.१०.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४८२१/०२

श्रीमती अंजली अय्यर ------- अपिलार्थी
सार्वजनिक बांधकाम कार्यालयाजवळ,
शिवडी फास्ट टॅक कोर्टासमोर,
झवेरिया बुर्डर रोड, शिवडी मुंबई १५

विरूध्द

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त ------- उत्तरवादी**
**झोन-९ पश्चिम नियंत्रण कक्ष,**
**कार्टर रोड, बांद्रा पश्चिम मुंबई ४०००५०**

**जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त**
**झोन-९ पश्चिम नियंत्रण कक्ष,**
**कार्टर रोड, बांद्रा पश्चिम मुंबई ४०००५०**

**-- विवेचन --**

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : दि. २.५.२००९
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : **दि.२७.५.२००९**
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. :दि.८.५.२००९
प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. :दि.२.६.२००९
द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक :दि.१.७.२००९
**सुनावणीचा दिनांक : ७.१०.२००९**
**अपिलार्थी** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**अपिलीय अधिकारी** : अनुपस्थित

**विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल : बी.के.सी. पोलिस ठाणे, मुंबई यांचेमार्फत श्री.शब्बीर अब्दुल लतीफ काझी, पोलिस उप निरिक्षक, यांनीम.उच्च न्यायालय. रिट याचिका क्र.२७६/०८ मध्ये दि.२०.२.२००९ रोजी दाखल केलेल्या शपथपत्राच्या संदर्भात.**
**जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर : अर्जदारास दि.२७.५.२००९ रोजी माहिती देण्यांत आली आहे.**
**प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती दिली आहे.**

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : अर्जदाराची मागणी ४८ तासात माहिती मिळावी अशी जरी असली तरी तशी वस्तुस्थिती नाही. अर्जदारास माहितीच्या सामान्य अर्जाप्रमाणे मुदतीत माहिती पुरविण्यांत आलेली आहे. सदर माहिती दि.२७.५.२००९रोजी अब्दुल रजाक नुर मोहमद अन्सारी यांनी माहिती मिळाल्याची स्वाक्षरी केलेली आहे. मात्र याबाबतचा उल्लेख अपिल अर्जात कुठेही केलेला नाही. दिलेली माहिती ही ॲफिडेव्हिडमध्ये जे मुद्दे मांडलेले आहे त्या मुद्याच्या पृष्ठर्थ कारणमीमांसा व ॲफिडेव्हिडच्या संदर्भात असलेली कागदपत्रे देण्यांत आलेली आहेत असे दिसून येते. सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

**अपिल अमान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: ७.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेले तक्रार

तक्रार क्रमांक २००८/२०८/०१
तक्रार क्रमांक २००९/३३४/०१
अपिल क्रमांक.२००८/३८६८

श्री. दिपक एल. फुरिया
ए-१०५ श्रीयोग को.ऑ.हॉ.सोसायटी — तक्रारकर्ता
जयराज नगर वजीरा नाका,
बोरीवली पश्चिम मुंबई ४०००९१

जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (३)पश्चिम उपनगरे मंबई
गृहनिर्माण भवन, तळमजला, कक्ष क्रमांक ६९,
बांद्रा पूर्व मुंबई ४०० ०५१

-विवेचन-

वरील दोन तक्रारी व अपिलावरील आदेशानुसार माहिती विलंबाने दिली याबद्दल कलम २० अन्वये शास्ती कां करण्यांत येऊ नये याबाबतचा खुलासा आयोगाच्या दि.२४.२.२००९ रोजीच्या आदेशाने जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा मागविण्यांत आला होता.

जन माहिती अधिकारी यांनी दि.७.१०.२००९ रोजी आयोगाच्या कार्यालयात उपस्थित राहून पुढीलप्रमाणे खुलासा केलेला आहे :-

श्री.दिपक फुरिया यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आपणाकडे सादर केलेल्या अपिलाच्या अनुषंगाने दि.२६.२.२००९ रोजी घेण्यांत आलेल्या सुनावणीच्या वेळी आपण दिलेल्या आदेशानुसार श्रीयोग को.ऑपञ. हौसिंग सोसायटी लि. या संस्थ्ञेची दप्तराची तपासणी घेऊन दि.१.३.२००९ राजीच्या तपासणी अहवाल संस्थेस पुर्तत्ेसाठी संस्थेकडे पाठविण्यांत आलेला आहे. त्याची प्रत अर्जदार यांना पाठविण्यांत आलेली आहे. सदर बाबत या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल दि.२६.२.२००९ व दि.१६.३.२००९ च्या पत्रान्वये सादर केलेला आहे.

त्याचप्रमाणे अर्जदार श्री.दिपक फुरिया यांनी सुध्दा त्यांच्या दि.५.१०.२००९ रोजीच्या पत्राने दिलेल्या माहितीने समाधान व्यक्त केलेले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

आदेश

जन माहिती अधिकारी यांनी दिलेला खुलासा मान्य करण्यांत येत आहे व सदर प्रकरण बंद करण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः ७.१०.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४८३२/०२

**श्री.अर्जूनलाल एम.छाब्रिया** **------- अपिलार्थी**
**बेले व्हिस्टा, प्लॅट नं.१५,**
**३ रा मजला, तलाव व एल.आय.सी.ऑफिसमोर,**
**एस.व्ही.रोड,वांद्रे पश्चिम मुंबई ५०**

विरूध्द

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.आयुक्त ------- उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**के/पश्चिम विभाग इमारत, २ रा मजला,**
**पालिराम पथ, अंधेरी पश्चिम मुंबई ४०००५८**

**जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिकारी (आरोग्य)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**के/पश्चिम विभाग इमारत २ रा मजला,**
**पालिराम पथ, अंधेरी पश्चिम**
**मुंबई ४०० ०५८**

**-- विवेचन --**

| | |
|---|---|
| माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक | : दि. १५.४.२००९ |
| जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : | **दि.१२.५.२००९** |
| प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. | :दि.२४.४.२००९ |
| प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. | :दि.१२.०५.२००९ |
| द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक | :दि.२९.६.२००९ |

**सुनावणीचा दिनांक : ७.१०.२००९**
**अपिलार्थी :** उपस्थित
**जन माहिती अधिकारी :** उपस्थित
**अपिलीय अधिकारी :** अनुपस्थित

**विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल : के/पश्चिम विभाग इमारतीच्या तळ मजल्यावरील कॅंटीनबाबतच्या विविध प्रकारच्या माहितीची परवाने इ. विचारणा केली आहे.**
**जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर : अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.५.२००९ रोजी उत्तर दिले.**

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे असलेली माहिती दिली असल्याने अपील निकाली काढण्यांत आले.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : अर्जदाराच्या प्रतिनिधी नस्तीचे अवलोकन करुन ७६८ पृष्ठांची माहिती प्राप्त करुन घेतलेली आहे व त्यावेळेला आता माहिती मिळाल्यामुळे अपिल मागेही घेत आहे असे लिहून दिलेले आहे. अर्जदाराने नस्तीची तपासणी करुन ७६८ पृष्ठांची माहिती शुल्क भरुन प्राप्त करुन घेतलेली आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

**-आदेश-**

**अपिल अमान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः १६.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४८३३/०२

**श्री.अर्जूनलाल एम.छाब्रिया** ------- अपिलार्थी
**बेले व्हिस्टा, प्लॅट नं.१५,**
**३ रा मजला, तलाव व एल.आय.सी.ऑफिसमोर,**
**एस.व्ही.रोड,वांद्रे पश्चिम मुंबई ५०**

विरूध्द

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त** ------- उत्तरवादी
**उत्तर नियंत्रण कक्ष,**
**ठाकूर व्हिलेज कांदिवली,मुंबई**

**जन माहिती अधिकारी तथा पोलिस उपायुक्त परिमंडळ-१२**
**शैलेद्र नगर दहिसर पूर्व,मुंबई ४०००६८**

**-- विवेचन --**

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : दि. २६.३.२००९
जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : **दुस-या पोलिस स्टेशनशी संबंधीत माहिती दिली नाही.**
प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. :दि.२३.४.२००९
प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. :दि.०९.०६.२००९
द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक :दि.२९.६.२००९
**सुनावणीचा दिनांक : १५.१०.२००९**
**अपिलार्थी :** उपस्थित
**जन माहिती अधिकारी :** उपस्थित
**अपिलीय अधिकारी :** अनुपस्थित

**विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल : ॲड छाब्रिया यांनी त्यांचे अशील श्रीमती झरीना युसूफ नूर मोहम्मद यांनी त्यांचे पती व इतर यांचेविरुध्द कौटूंबिक हिंसाचार इ. कारणासाठी दाखल केलेल्या तक्रारीवर करण्यांत आलेल्या काग्रवाहीबाबतची माहिती विचारली आहे.**
**जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर : जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर आढळत नाही.**
**प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :जन माहिती अधिकरी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिी अपिलार्थी यांना दि.२३.४.२००९ रोजी दिली आहे. प्रथम अपिलावरील सुनावणीसाठी अनेकवेळा बोलावूनही अपिलार्थी श्री.छाब्रिया हे उपस्थित राहिले नाही म्हणून अपील निकाली काढण्यांत आले.**

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :अर्जदाराने ज्या माहितीची मागणी अपिलाव्दारे केलेली आहे ती गोरेगांव पोलिस स्टेशन यांच्याकडे नसून ती ओशिवरा पोलिस स्टेशनकडे आहे, असे संबंधित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनधी यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले. तरी सदर माहिती ओशिवरा पोलिस स्टेशनकडून प्राप्त करुन घेऊन ती अर्जदारास १२ दिवसांत पुरविण्यांत यावी असे सुनावणीच्या वेळी निर्देश देण्यांत आलेत. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: १६.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४८२९/०२

**श्रीमती रेखा जितेंद्र गाला** ------- अपिलार्थी
**मनसुख भिखा पटेल चाळ,**
**काजुपाडा बोरीवली पूर्व**
**मुंबई ४०० ०६६**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा तहसिलदार** ------- उत्तरवादी
**तहसिलदार कार्यालय, पालघर,**
**ता.पालघर जि.ठाणे**

**जन माहिती अधिकारी तथा खजिना अव्वल कारकून**
**तहसिलदार कार्यालय,पालघर,**
**ता.पालघर जि.ठाणे**

**-- विवेचन --**

| | |
|---|---|
| माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक | : दि. २१.८.२००९ |
| जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : | : दि.२५.९.२००८ |
| प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. | :दि.१८.१२.२००९ |
| प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. | :दि.१९.१.२००९ |
| द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक | :दि.१.७.२००९ |

**सुनावणीचा दिनांक** : २९.१०.२००९
**अपिलार्थी** : उपस्थित
**जन माहिती अधिकारी** : उपस्थित
**अपिलीय अधिकारी** : उपस्थित

**विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल : मौजे बिरवाडी ता.पालघर येथील सर्व्हे नं.१९ हिस्से क्र.२३ व दि.१५/६ १९/१ यांचे सातबारा उतारे व फेरफार मिळणेबाबत इ.माहितीची विचारणा केली आहे.**

**जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर : सर्व्हे नं. १४ १५/६ व १९/१ चा सातबाराचा उतारा व फेरफार इ. च्या नकला तयारकेल्या आहेत. फी भरुन सदर नकला उपलब्ध करुन घ्याव्यात असे कळविण्यांत आले.**

**प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश : शासकिय माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती प्रथम दर्शनी योग्य असून मुदतीत दिलेली माहिती दिलेली आहे. सबब अपिलकार यांचे अपील अमान्य**

करण्यांत येत आहे.अपिलकार यांनी मागितलेली माहिती त्यांना यापूर्वीच देण्यांत आलेली असल्याने त्यांचा अपील अर्ज फेटाळण्यांत येत आहे इ. बाबी आदेशात नमूद केल्या आहेत.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : एकत्रिकरणाचा उतारा सुध्दा सुनावणीच्या वेळी आणला होता व तसेच इतर रेकॉर्डहि पाहणीसाठी आणले होते ते अर्जदाराने पाहिले.

**-आदेश-**

**दि.३०.१०.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता अर्जदार तहसिल कार्यालयात जातील. त्यांना रेकॉर्डमधील हव्या त्या प्रती देण्यांत याव्यात.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: २९.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४९२६/०२

श्री.अजितकुमार पंजाबी ------- अपिलार्थी
व्दारा- रमजान भटार चाळ,
चाळ नं. २६३/५डॉ.आंबेडकर चौक, तक्यावार्ड,
कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता ------- उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षण खाते,
एफ/साऊथ विभाग, परेल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
मुंबई ४०० ०१२

जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता
बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षण खाते,
एफ/साऊथ विभाग, परेल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
मुंबई ४०० ०१२

-- विवेचन --

अपिलाचा दिनांक ७.९.२००९
सुनावणीचा दिनांक ३०.१०.२००९
अपिलार्थी, अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी उपस्थित.

दि.६.७.२००९ रोजीच्या प्रथम अपिलाच्या आदेशात अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास हवी असलेली माहिती १५ दिवसाचे आत देण्यांत यावी असे आदेश दिलेली होते व त्याप्रमाणे अर्जदारास दि.१३.७.२००९ रोजी माहिती देण्यांत आलेली आहे.

मात्र सुनावणीच्या वेळेला अर्जदाराने दिलेल्या माहितीने समाधान झालेले नाही असे सांगितले तेव्हा दोन्ही पक्षाशी चर्चा करुन दि.१०.११.२००९ रोजी अर्जदार जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जातील व अर्जदाराच्या अर्जातील माहितीच्या अनुषंगिक कागदपत्रे जन माहिती अधिकारी तयार ठेवतील व अर्जदाराने त्यांची तपासणी करुन त्यांना हव्या असलेल्या कागदपत्राच्या प्रती शुल्क भरुन प्राप्त करुन घेतील असे ठरविण्यांत आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३०.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.११११/०२

श्री.प्रशांत राजाभाऊ जाधव ------- अपिलार्थी
३, आशाराज, सुदरशाम रो.हाऊस,तुलसी आय हॉस्पीटल मागे
हॅपी होम कॉलनी, व्दारका नासिक ४२२०११

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपायुक्त -----उत्तरवादी
शरणपूर रोड, नासिक जिल्हा नासिक

जन माहिती अधिकारी तथा
पोलिस आयुक्त कार्यालय, नासिक
शरणपूर रोड, नासिक जिल्हा नासिक

■ विवेचन

अपिलार्थी श्री.प्रशांत जाधव यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनमय २००५ मधील कलम १९ (३)मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलाथी अनुपस्थित होते.

अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७.१०.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

पोलिस आयुक्त कार्यालय,नाशिक या कार्यालयाचे असलेले कार्य, अधिकार कर्तव्य, रचना कार्यपध्दती व कार्यवाही याची संपूर्ण सविस्तर लेखी माहिती व नागरिकांची सनद पुस्तिका मिळणेबाबत मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपिलकारास मागणी केलेली माहिती www.nasik.police.com या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेणेबाबत कळविले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन प्रथम अपिलीय अधिका-

याकडे अपील दाखल केले. प्रथम  अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलकारास मागणीप्रमाणे माहिती दि.१५.१२.२००८ च्या पत्रान्वये पुरविली आहे. नागरिकांची सनद शासकीय मुद्रणालयाकडून घेणेबाबत कळविले आहे असे जन माहिती अधिका-यांनी प्रतिपादन केले. परंतू वेबसाईट बंद असल्यामुळे अपीलकारास माहिती मिळाली नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांचे आत अपीलकारास (**Hard copy**) माहिती द्यावी.

**-आदेश-**

**अपिल मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३०.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१०८६/०२

श्री.प.मा.गायकवाड सेवानिवृत्त ---अपिलार्थी
स्व.निरीक्षक, २३० साने गुरुजी नगर,
नांदगांव, नासिक

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी -----उत्तरवादी
नांदगांव न.पा.जि.नासिक

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक लेखापाल
नांदगांव न.पा.जि.नासिक

■ विवेचन

अपिलार्थी श्री.प.मा.गायकवाड यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनमय २००५ मधील कलम १९ (३)मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.६.३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलाथी अनुपस्थित होते.

अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.६.१२.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

निवृत्तीवेतन/उपदान रक्कमा, सन १९७१ चे अवार्ड रक्कमाबाबत सर्व आदेश रद्द झाल्याचे शासन वरिष्ठ यांच्या आदेशाच्या प्रती, न.पा.टिप्पणी, शेरे, मंजूरी इत्यादि कागदपत्राच्या प्रतीची मागणी केली होती. अपीलकारास ि.१.११.१९९९ पासून निवृत्ती वेतन लागू करण्यांत आले होते. परंतू अपीलकाराच्या मागणीनुसार एम.सी.एस.आर. नुसार १००टक्के निवृत्तीवेतन व त्यावर नियमानुसार असलेला महागाई भत्ता तसेच नियमानुसार असलेले उपदान मंजूर करण्यांत येत असून सदरची दुरुस्तीही अपीलकार सेवानिवृत झालेल्या दिनांकापासून लागू राहिल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास कळविले.

यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दि.२९.१२.२००८ रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले नाहीत माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपिलकाराने माहिती कार्यालयात समक्ष उपस्थित राहून प्राप्त करुन घेणार असल्याचे माहितीस्तव अधिकारातील अर्जात नमूद केलेले आहे. त्यानुसार जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत वेळोवेळी कळविले असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी प्रतिपादन केले. निवृत्ती वेतनाबाबत आदेशाच्या प्रती अपीलकारास देण्यांत आल्या आहेत. उर्वरीत माहितीकरिता अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून माहिती प्राप्त घ्यावी. अपीलकार कार्यालयात हजर झाल्यानंतर जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास १० दिवसाचे आत माहिती द्यावी.

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३०.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४९२३/०२

मानद सचिव, ---अपिलार्थी
सिल्व्हर कोर्ट को.हौ.सोसायटी,
एम.जी.रोड, घाटकोपर पूर्व
मुंबई ४०००७७

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा -----उत्तरवादी
सार्व.न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई धर्मादाय आयुक्त भवन,
२ रा मजला ८३ डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी
मुंबई

जन माहिती अधिकारी तथा
सार्व.न्यास नोंदणी कार्यालय,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई धर्मादाय आयुक्त भवन,
२ रा मजला ८३ डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी
मुंबई

विवेचन

अपिलाचा दिनांक २९ ऑगस्ट २००९
सुनावणीचा दिनांक ३१ ऑक्टोबर २००९
अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.२३ जुलै २००९ रोजीच्या आदेशाने अर्जदारास माहिती देण्यांत यावी असे निर्देश दिले होते. त्यानुसार अर्जदारास दि.२८.७.२००९ रोजी माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसून आले. अपिलार्थी यांचे म्हणणे असे की, त्यांना त्या नस्तीची पाहणी करावयाची आहे. दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यांत आले की, या नस्तीची पाहणी दि.१६ नोव्हेंबर २००९ रोजी सकाळी ११.०० वाजता अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जाऊन करतील व त्यांनी निवड

केलेल्या अतिरिक्त कागदपत्राच्या प्रती त्यांना देण्यांत याव्यात. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३१.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४९३४/०२

श्री.बाळा शिवाजी वाघमारे ---अपिलार्थी
रु.नं.४१४,ट्रांझिट कॅप,शास्त्री नगर म्युनि.मार्केट प्लॉट,
वांद्रा पूर्व मुंबई ४०००५१

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. आयुक्त -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग,
प्लॉटनं.१३७ टीपीएस **V** प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ पूर्व मुंबई -४०००५५

जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग,
प्लॉटनं.१३७ टीपीएस **V** प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ पूर्व मुंबई ४०००५५

विवेचन

अपिलाचा दिनांक ३० ऑगस्ट २००९
सुनावणीचा दिनांक ३१ ऑक्टोबर २००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

या अर्जदाराने बांद्रा येथील प्लॉट नं.१३७ सीटीएस नं.६२९ पार्ट, सर्व्हे ३४१ पार्ट व तेथे असलेल्या परिश्रम को.ऑप हौ.सो. शास्त्री नगर म्यु.व्यापारी सेवा संघ यांच्या झोपडपट्टी पुर्नवसन प्रकल्पातील दि.३.३.२००४ रोजीच्या अनेक्चर-२ व दि.७.१.२००५ चे अनेक्चर-२ या संदर्भात असलेल्या सर्व नस्त्या व डॉक्युमेंटची तपासणी करावयाची होती.

अर्जदारास पूर्णपणे डॉक्युमेंट पहावयास मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, संबंधित नस्तीचा शोध चालू आहे तो ५-६ दिवसात पूर्ण होईल. तेव्हा सर्व सबंधितांशी चर्चा करुन दि.१०.११.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व कागदपत्रे तपासणीसाठी तयार ठेवण्यांत यावेत व अर्जदारानी त्यातील आवश्यक कागदपत्राच्या प्रती देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३१.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४९३५/०२
आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४९३६/०२

सुधाकर निटेकर ---अपिलार्थी
शॉप नंञ ४० शास्त्री नगर म्युनि. मार्केट
वांद्रा पूर्व मुंबई मुंबई ४०००५१

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहा. आयुक्त -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग,
प्लॉटनं.१३७ टीपीएस V प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ पूर्व मुंबई -४०००५५

जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/पूर्व विभाग,
प्लॉटनं.१३७ टीपीएस V प्रभात कॉलनी,
सांताक्रुझ पूर्व मुंबई ४०००५५

विवेचन

अपिलाचा दिनांक ३० ऑगस्ट २००९
सुनावणीचा दिनांक ३१ ऑक्टोबर २००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

या अर्जदाराने बांद्रा येथील प्लॉट नं.१३७ सीटीएस नं.६२९ पार्ट, सर्व्हे ३४१ पार्ट व तेथे असलेल्या परिश्रम को.ऑप हौ.सो. शास्त्री नगर म्यु.व्यापारी सेवा संघ यांच्या झोपडपट्टी पुर्नवसन प्रकल्पातील दि.३.३.२००४ रोजीच्या अनेक्चर-२ व दि.७.१.२००५ चे अनेक्चर-२ या संदर्भात असलेल्या सर्व नस्त्या व डॉक्युमेंटची तपासणी करावयाची होती.

अर्जदारास पूर्णपणे डॉक्युमेंट पहावयास मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की, संबंधित नस्तीचा शोध चालू आहे तो ५-६ दिवसात पूर्ण होईल. तेव्हा सर्व सबंधितांशी चर्चा करुन दि.१०.११.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता सर्व कागदपत्रे तपासणीसाठी तयार ठेवण्यांत यावेत व अर्जदारानी त्यातील आवश्यक कागदपत्राच्या प्रती देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांक: ३१.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४९३७/०२

प्राणलाल पी.राठोड ---अपिलार्थी
आर-८५ सी/२,महाविर नगर,
शंकर लेन.एस.व्ही.रोड,
कांदिवली पश्चिम मुंबई ४०००७६

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त -----उत्तरवादी
परिमंडळ १२ शैलेंद्र नगर,
दहिसर पूर्व मुंबई ६८

जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त
परिमंडळ १२ शैलेंद्र नगर,
दहिसर पूर्व मुंबई ६८

विवेचन

अपिलाचा दिनांक ३० ऑगस्ट २००९

सुनावणीचा दिनांक ३१ ऑक्टोबर २००९

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित.

अर्जदारास त्यांनी कांदिवली पोलिस स्टेशन येथे दि.४.२.१९९५ रोजी जी तक्रार केलेली होती त्यावेळी दि.१५.६.१९९५ रोजी जो जवाब घेण्यांत आला होता त्याची प्रत पाहिजे होती. २००५ साला पर्यतच्या अभिलेख्याची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावली असल्यामुळे अर्जदारास हवी असणारी माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले व प्रथम अधिकारी अधिकारी यांनी त्यांचा हाच निर्णय कायम ठेवला. इतक्या दिर्घ कालावधीनंतर पेपर हे नियमानुसार नष्ट करण्यांत आले असतील तर त्याची प्रत देता येऊ शकत नाही हे मान्य करावे लागेल.

**-आदेश-**

**अपिल अमान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३१.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.४१३९/०२

आनंद रामचंद्र सावंत, ---अपिलार्थी
आनंद रामचंद्र सावंत,
बी.डी.डी.पोलस वसाहत, इमारत क्र.२
खोली नं.३४, ना.म.जोशी मार्ग पोलिस
ठाणेसमोर, मुंबई.

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त -----उत्तरवादी
परिमंडळ.९ हिल रोड बांद्रा पश्चिम मुंबई ४०००५०

जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलिस आयुक्त
परिमंडळ.९ हिल रोड बांद्रा पश्चिम मुंबई ४०००५०

विवेचन

अपिलाचा दिनांक २४ ऑगस्ट २००९

सुनावणीचा दिनांक ३१ ऑक्टोबर २००९

अपिलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलाथी यांनी त्यांचे दि.२९.११.२००८ रोजीच्या अर्जानुसार दौलत नगर पोलिस स्टेशन यांच्या हद्दीतील सहाय्यक पोलिस आयुक्त, डी.एन.नगर, यांच्या पथकाने घातलेल्या धाडीच्या अनुषंगाने जवळपास २५ मुद्दयावर माहिती विचारली होती. त्याबाबतच्या कागदपत्राचे अवलोकन केले असता अर्जदारास माहिती देण्यांत आलेली आहे. अर्जदाराकडे न्यायालयाच्या निर्णयाची प्रत असल्याचे दिसून आले. रेकॉर्डप्रमाणे माहिती देण्यांत आल्याचे दिसून आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

**अपिल अमान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३१.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१०९३/०२

श्री.अनीस अहमद मोहम्म्द युनूस ------- अपिलार्थी
रा.नयाइस्लामपुरा, मालेगांव जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सचिव -----उत्तरवादी
एम.जे.प्रायमरी स्कूल, मालेगांव जि.नाशिक

**जन माहिती अधिकारी तथा** (श्री.जाकिद हुसैन बशीरुद्दीन)
**एम.जे.प्रायमरी स्कूल, मालेगांव जि.नाशिक**

■ विवेचन

अपिलार्थी श्री.अनीस अहमद मोहम्म्द युनूस यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनिमय २००५ मधील कलम १९ (३)मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.१२.२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलाथी अनुपस्थित होते.

अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१२.९.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

अपीलकाराच्या कु.शोएबा सय्यद अनीस अहमद या मुलींकडून फी च्या नावाने वसूल करण्यांत आलेल्या रक्कमेबाबत अनुषंगिक एकूण ७ मुद्दयांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही माहिती दिली नाही यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

राज्यात केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनिमय २००५ ची काटेकारपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तत्कालीन जन माहिती अधिका-यानी

अपीलकारास माहिती दिली नसल्याची बाब विद्यमान जन माहिती अधिका-यांनी आयोगास व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी निदर्शनास आणून दिले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, विद्यमान जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आत माहिती द्यावी. अपीलकारास भूतपूर्व जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही म्हणून त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमातील कलम २० अन्वये दंडात्मक कारवाई का करण्यांत येऊ नये याबाबत आयोगाकडे तक्रारीत जन माहिती अधिकारी यांनी स्वत: उपस्थित राहून लेखी खुलासा २४ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.०० वाजता आयोगाचे कार्यालयात सादर करावा. सदर आदेश तत्कालीन जन माहिती अधिका-यांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**-आदेश-**

**अपिल मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३१.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१०१०/०२

श्री.फिरोज बादशाह,
६६ गुरुवार वार्ड,मालेगांव ------- अपिलार्थी

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी -----उत्तरवादी
जि.प.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी
जि.प.नासिक

■ विवेचन

अपिलार्थी श्री.फिरोज बादशाह, यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनमय २००५ मधील कलम १९ (३)मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.८.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलाथी अनुपस्थित होते.

अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२९.४.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

शेख उस्मान हायस्कूल, मालेगांव वाषिक तपासणी २००८ बाबत अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दि.९.७.२००८ रोजी दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोागकडे व्दितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास दि.२२.८.२००८ च्या पत्रानुसार माहिती दिली. माहिती देण्यापूर्वीच २ दिवस अगोदर अपीलकाराने आयोगाकडे व्दितीय

अपील केले असल्याची बाब जन माहिती अधिका-यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. यावरुन अपीलकारास माहिती पुरविण्यांत आली असल्याचे दिसून येते.

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३१.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१००४/०२

श्री.मोहमद सलीम मोहमद अकबर ----- अपिलार्थी
मालेगांव घर नं.१३४, गल्ली नं.३ नयापुरा
अरवा चोक

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता -----उत्तरवादी
मालेगांव शहर नि ग्रामीण विभाग

जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता
मालेगांव शहर नि ग्रामीण विभाग

■ विवेचन

अपिलार्थी श्री.मोहमद सलीम मोहमद अकबर यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनिमय २००५ मधील कलम १९ (३)मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.५.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलाथी अनुपस्थित होते.

अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२८.२.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

अब्दुल करीम मोहंमद हनीफ याविज ग्राहकातर्फे दि.२४.४.२००७, दि.२५.६.२००७ रोजी शहरी उपविभ्ज्ञाग क्र.१ यांचे अंतर्गत असलेले ग्राह सुविधा केंद्रामध्ये तसेच दि.१२.७.२००७ रोजी कार्यकारी अभियंता कार्यालयात दाखल अर्जावरुन काय कार्यवाही झाली यासंबंधीच्या कागदपत्राच्या छायाप्रतीची मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. अपीलकारास प्रत्येक मुद्यावर १५ दिवसांचे आत माहिती द्यावी असे प्रथम अपीलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना आदेश दिले.

परंतू त्यानंतरही जन माहिती अधिका-यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकारास प्रत्यक्ष भेटी दि.१७.४.२००८ रोजी माहिती दिली आहे. अपीलकाराचे विद्युत बिलाबाबत शंका निरसन केले. त्यामुळे त्यांचे समाधान झाले असल्याची बाब जन माहिती अधिकारी /प्रथम अपिलीय अधिकारी यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी आयोगासमोर प्रतिपादन केले. अपीलकार सुनावणीकरिता अनुपस्थित होते.सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३१.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.१०३१/०२

श्री. राजेंद्र पोपटराव पाटील — अपिलार्थी
वरदायनी अपार्टमेंट हिरावाडी
पंचवटी,नाशिक, जि.नाशिक

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य ----- उत्तरवादी
भोसला मिलिटरी स्कूल, नासिक

जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक
भोसला मिलिटरी स्कूल, नासिक

■ विवेचन

अपिलार्थी श्री.राजेंद्र पोपटराव पाटील यांनी केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनिमय २००५ मधील कलम १९ (३)मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.३.१०.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आली. सुनावणीकरिता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलाथी अनुपस्थित होते.

अपिलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१०.७.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

भोसला मिलिटरी कॉलेज वेतन विषयी व फॉर्म नं.अे बाब अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन प्रथम अपिलीय अधिका-याकडे दि.१३.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यनंतर अंशतः माहिती दिली. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

मागणी क्र.१ ची माहिती पूर्णतः देण्यांत आली आहे. मागणी क्र.२ ची माहिती उपलब्ध न झाल्याने दिलेली नाही. सदर कागदपत्र फार जुनी असल्याने उपलब्ध

झालेली नाही. फॉर्म क्र.१६ हे नाशिक आयकर कार्यालयात मागणी करुन अपीलकारास पुरविण्याचा प्रयत्न करतो असे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलकावरील सुनावणीवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आत अपीलकारास माहिती पुरवावी.

**-आदेश-**

**अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३१.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.११२३/०२**

**श्री. पंडीतराव माधवराव गायकवाड** **अपिलार्थी**
**२३० साने गुरुजी नगर मु.पो.ता.नांदगांव**
**जि.नाशिक ४२३१०६**

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी ----- उत्तरवादी
नं.प.नांदगांव जि.नाशिक

जन माहिती अधिकारी तथा
लेखा विभाग न.प.नांदगांव जि.नाशिक

■ विवेचन

**अपिलाचा दि.४.३.२००९**

**सुनावणीचा दि.२७.१०.२००९**

**अपिलार्थी गैरहजर व प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी हजर.**

**अपिलार्थीनी दि.११.११.२००८ च्या अर्जान्वये सन २००८ वर्षातील माहितीची मागा केली. अपिलार्थीना खालील माहिती हवी होती.**

१. **अपिलार्थीची ज्या आदेशान्वये पेन्शन बंद व कार्यालयीन टिप्पणीच्या झेरॉक्स प्रती.**
२. **त्यांच्या दि.२६.९.२००८ च्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशिल व संबंधित कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती.**

**परंतू उपरोक्त माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि.१७.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावरील आदेश न झाल्याने त्यांनी आयोगाकडे दि.४.३.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की, अपिलार्थीनी दि.१९.११.२००८ रोजी माहिती दिली आहे. यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती दिल्यानंतर सुध्दा अपिलार्थी अर्ज करतात त्यांनी कार्यालयात येऊन त्यांना हवी असलेली माहिती घेऊन जावी या कामी कार्यालयाचे संपूर्ण सहकार्य राहील. अर्जदारास संपूर्ण महिती दिल्याचे दिसून आहे.**

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ३१.१०.२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.११२८/०२

**श्री. अन्सारी मो.रमजान मो.मक्की,** अपिलार्थी
**११२, मो.मक्की मंजिल. राजानगर,**
**मालेगांव ता.मालेगांव.जि.नाशिक ४२३ २०३**

विरुध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याध्यापक ----- उत्तरवादी
मालेगांव म.न.पा.स्कूल. बोर्ड, मालेगांव

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी
मालेगांव म.न.पा.स्कूल. बोर्ड, मालेगांव

**■ विवेचन**

**अपिलाचा दि.१.१.२००९**
**सुनावणीचा दि.२७.१०.२००९**
**अपिलार्थी,प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी हजर.**
**अपिलार्थींनी दि.१३.१०.२००८ च्या अर्जान्वये खालील माहितीची मागणी केली.**

१. **Certified copies of seneority list of sardr Primaary school from १९९० to २००५**
२. **Certified copies of proposals for B.Ed. scale of pay submitted to school committee**
३. **Certified copies of marksheets and Certified copies of the teachers.**

**यावर दि.१२.११.२००८ रोजी अपिलार्थींना असे कळविण्यांत आले की, माहितीच्या शुल्कापोटी रु.३००/- अदा करण्यांत यावे. यानुसार अपिलार्थींनी रु.३००/- चा धनादेश शाळेकडे पाठविला. परंतू तो स्विकारण्यांत आला नाही. यास्तव त्यांनी दि.२४.११.२००८ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर निर्णय न झाल्याने त्यांनी आयोगाकडे दि.१.१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले.**

**व्दितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की, सुनावणीच्या तारखेपर्यंत अपिलार्थींना माहिती पुरविण्यांत आलेली नाही. यास्तव**

असे निर्देश देण्यांत येतात की, जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाच्या दिनांकापासून ८ दिवसांच्या आत अपीलार्थींना माहिती पुरवावी.

**-आदेश-**

**अपिल निकाली काढण्यांत येत आहे.**

**मुंबई** **(डॉ. सुरेश वि.जोशी)**
**दिनांकः ३१.१०.२००९** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार .

क्रमांक-मु.मा.आ/२२८११/तक्रार क्रमांक ३८३/०८/०१

श्री. मोहम्मद हसीम शेख -----तक्रारदार
६६, शौकत मंझील, ३३ वा मार्ग,
खार (पश्चिम) मुंबई ४०० ०५२.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता -----उत्तरवादी
(इमारत व कारखाने)
एच/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

---*विवेचन*---

दि. २२/२/२००७ रोजीच्या पत्रानुसार माहिती घेण्यास उपस्थित राहिलो असता माहिती मिळाली नाही म्हणून तक्रारदारानी दि. १५/५/२००७ रोजी आयोगाकडे तक्रार केलेली होती. या तक्रारीच्या बाबतीत आयोगाने मागविलेला अहवाल न मिळाल्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी दि. ६/१०/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस तक्रारकर्ते अनुपस्थित , जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळैला असे निवेदन करण्यात आले की, तक्रारदारांस कागदपत्रे घेऊन जाण्यास बोलाविले होते पण ते न आल्यामुळे दि. २९/३/२००८ रोजीच्या पत्राने त्यांना रजिस्टर्ड पोष्टाने आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती पाठविण्यांत आलेल्या आहेत. तक्रारदार स्वतः उपस्थित नसल्यामुळे त्यांचे याबाबतचे म्हणणे समजून घेता आले नाही.

----*आदेश*----

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. ६ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार .

क्रमांक-मु.मा.आ/२८१८४/तक्रार क्रमांक३९० /०९/०१

श्री. आनंद मोदी -----तक्रारदार
माणेकलाल मॅन्शन, किग्ज सर्कल,
माटुंगा, मुंबई -- ४०० ०१९.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का) -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ/ नॉर्थ वॉर्ड,
माटुंगा , ९६ भाऊ दाजी मार्ग, मुंबई ४०० ०१९.

*---विवेचन---*

श्रीयुत आनंद मोदी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या दि. १६/१०/२००७ रोजीच्या माहिती अर्जाबाबत विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यामुळे आयोगाकडे दि. ३०/११/२००७ रोजी तक्रार केलेली होती. या तक्रारीच्या बाबतीत आयोगाने मागविलेला अहवाल प्राप्त न झाल्यामुळे या प्रकरणाची सुनावणी दि. ६/१०/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस तक्रारदार अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला असे निवेदन देण्यांत आले की, तक्रारदारांच्या मुळ अर्जाप्रमाणे ते व्यक्तिशः येऊन माहिती घेऊन जाणार होते व त्यांनी दि. १२/११/२००७ रोजी त्यांची माहिती तयार आहे ती घेऊन जावे असे कळविण्यांत आले होते. मात्र ते माहिती घेऊन न गेल्यामुळे सदर माहिती आयोगाचा अहवाल मागविण्याचे पत्र आल्यानंतर दि. २२/१/२००८ रोजी टपालाद्वारे पाठविण्यांत आली आहे व त्याच्या छायांकित प्रती जोडण्यात आल्या आहेत. तक्रारदार स्वतः उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही.

*----आदेश---*

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. ६ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार .**

**क्रमांक-मु.मा.आ/२२४४२/तक्रार क्रमांक३९२ /०९/०१**

**श्री. प्रभुदास तोडानी -----तक्रारदार**
**१९६/७, व्ही.व्ही. भुवन, शांती उद्यानाच्या समोर,**
**सायन (पूर्व) मुंबई ४०० ०२२.**

**विरुध्द**

**१. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक (दुकाने व संस्था) ----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, एन/ उत्तर वॉर्ड,**
**माटुंगा , ९६ भाऊ दाजी मार्ग, मुंबई ४०० ०१९.**

***---विवेचन---***

श्रीयुत प्रभुदास तोडानी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या दि. २३/८/२००७ रोजीच्या माहिती अर्जाबाबत अपूर्ण माहिती दिल्यामुळे आयोगाकडे दि. २४/१०/२००७ रोजी तक्रार केलेली होती. सदर प्रकरणी तक्रारदारांनी मागितलेली संपूर्ण माहिती देऊन तसा अहवाल आयोगास सादर करण्यासंबंधी दि. ३१ डिसेंबर, २००७ रोजीच्या पत्राने जन माहिती अधिकारी यांना कळविले होते. सदर प्रकरणाची सुनावणी दि. ६/१०/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेस तक्रारदार अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

तक्रारदारांस जी माहिती पाहिजे होती ती त्यांना उत्तर हो किंवा नाही या विवक्षित स्वरुपात पाहिजे होते व त्यांना तशी माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसून आले. तक्रारदार स्वत: उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही.

***----आदेश---***

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**दिनांक. ६ ऑक्टोंबर, २००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार .**

**क्रमांक-मु.मा.आ/२७९९३/तक्रार क्रमांक ३५७ /०७/०१**

**श्रीमती सुनिता बापु पाटील -----तक्रारदार**
**रामचंद्र आशिर्वाद देवी चौक,**
**शास्त्रीनगर, डोंबिवली (पश्चिम)**
**ठाणे.**

**विरुध्द**

**१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक ----उत्तरवादी**
**सावित्रीबाई फुले विद्यानिकेतन हायस्कूल,**
**यशवंत नगर, वसंतराव नाईक मार्ग,**
**चेंबूर, मुंबई ४०० ०७१.**

***---विवेचन---***

श्रीमती. पाटील यांच्या दि. १२/७/२००७ रोजीच्या माहिती अर्जावर दि. १/९/२००७ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध आहे व ती शाळेतून प्राप्त करुन घ्यावी असे कळविण्यांत आले. मात्र तक्रारदारांस माहिती मिळत नाही अशी तक्रार त्यांनी केलेली होती.

याउलट जन माहिती अधिकारी यांनी दि. २४/१२/२००७ रोजी अहवाल पाठविला त्यानुसार सर्व माहिती उपलब्ध आहे व श्रीमती पाटील यांनी शाळेतून संपर्क साधून शाळेकडून माहिती स्वीकारावी असे शाळेच्या जन माहिती अधिका-यांचे म्हणणे आहे.

शाळा व श्रीमती पाटील या दोघांनीहि त्यांच्या शाळेतील सेवेबाबतीत प्रकरण शाळा प्राधिकरणाकडे प्रलंबित आहे असेहि कळविले होते.

वरील तक्रारीची सुनावणी दि. ६/१०/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला तक्रारदार श्रीमती पाटील उपस्थित होत्या. शाळेतर्फे कोणीहि उपस्थित नव्हते.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, तक्रारदारांना ज्या प्रकरणासाठी माहिती पाहिजे होती त्या प्रकरणात शाळा प्राधिकरणाने अंतिम निर्णय हा श्रीमती पाटील यांच्या बाजूने दिलेला आहे. तसेच त्यानंतर शाळा ही नियमबाहय पध्दतीने चालविण्यात येते या कारणावरुन या शाळेची मान्यताहि नुकतीच शासनाने रद्द केलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश----***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ६ ऑक्टोंबर, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार .

क्रमांक-मु.मा.आ/२९९२३/तक्रार क्रमांक ५११/०७/०१

श्री. प्रमोद शंकर थळी -----तक्रारदार
प्रमोदानंद प्रतिष्ठान, शापारिआ इमारत,
१ ला मजला, कामाबाग समोर,
७४, राजा राममोहन रॉय मार्ग, चर्नी रोड (पूर्व)
मुंबई - ४०० ००४.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक ----उत्तरवादी
राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर
शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई - ४०० ००१.
२. जन माहिती अधिकारी तथा उप अधीक्षक
राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर
शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई - ४०० ००१.

***---विवेचन---***

तक्रारदार श्रीयुत प्रमोद थळी यांनी दि. २६/२/२००८ रोजी अपील व तक्रार केली होती त्याची सुनावणी दि. ६/१०/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला तक्रारदार , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

तक्रारदारांच्या मुद्दयांबाबतीत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

" वरील विषयाच्या संदर्भीय पत्र क्रमांक नुसार अहवाल सादर करण्यात येतो की, श्री. प्रमोद शंकर थळी यांच्या अर्जात कुठल्याहि प्रकारची माहिती मागितली गेली नसून तक्रार

वजा सूचना करण्यात आलेली आहे. यासंदर्भात अर्जदारास सुनावणी देवून माहिती देण्यात आली आहे. परवाना कक्ष मंजूर करताना ७५ मिटर अंतराच्या आत धार्मिक व शैक्षणिक संस्था असू नये या नियमात न्याय संस्थेचाही समावेश असायला हवा असे श्री. प्रमोद थळी यांनी अर्जात म्हटले आहे. अनुज्ञप्ती मंजूर करतांना नियमानुसार ७५ मिटर च्या आत धार्मिक/ शैक्षणिक नोंदणीकृत संस्था असू नयेत या नियमात न्याय संस्थेचा समावेश करणे ही धोरणात्मक बाब असून तो या कार्यालयाच्या अखत्यारित येत नाही. नियमात सुधारणा करणे ही बाब शासनाच्या अधिकारात येत असल्याने त्यांचा अर्ज शासनाकडे पुढील कारवाईसाठी पाठविण्यात आला आहे. अर्जदाराच्या दि. २/६/२००७ च्या अर्जानुसार माहिती देण्यात आली आहे. तसेच प्रथम सुनावणी देखिल कळविण्यात आले आहे. अर्जदाराच्या दिनांक २९/१०/२००७ रोजी केलेल्या अर्जास देखिल माहिती देण्यात आलेली आहे. "

तक्रारदारांच्या सूचनेच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय आवश्यक असल्याने त्याची माहिती या घटकेला मिळू शकत नाही ही वस्तुस्थिती तक्रारदार यांनी मान्य केली.

***----आदेश----***

अपील व तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ६ ऑक्टोंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ९६३/०२**

**श्री. गोविंद पर्वतराव मोरे -----अपीलार्थी**
**रेश पर्व, आनंद नगर, नव वसाहत,**
**सोयगांव, ता. मालेगांव (नाशिक)**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष -----उत्तरवादी**
**नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ,**
**ता. मालेगांव, जि. नाशिक - ४२३ १०४.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सेक्रेटरी**
**नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ,**
**ता. मालेगांव, जि. नाशिक - ४२३ १०४.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. गोविंद पर्वतराव मोरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०/१०/२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जळगांव येथे दि. ३१/७/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. नरेंद्र वाजपेयी, लिपीक हे उपस्थित होते व अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. ६/८/२००७ रोजी अर्ज करुन एकूण दहा मुद्दयांबाबत माहिती मागितली होती.

मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी अपिलीय अधिका-यांकडे कलम १९(१) अन्वये रजिस्टर्ड ए.डी.मार्फत अपील केले होते. तथापि ते त्यांनी न स्वीकारता अपीलार्थीस परत आले. अशा प्रकारे दोन्ही उत्तरवादयांकडून माहिती न मिळाल्याने अपीलार्थी यांनी कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १०/१०/२००७ रोजी द्वितीय अपील सादर केले.

दि. ३१/७/२००९ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हे उपस्थित नव्हते. त्यांनी प्रतिनिधीमार्फत जो लेखी जबाब सादर केला आहे त्यामध्ये अपीलार्थी यांच्या माहिती अर्जास अनुसरुन त्यांना जा.क्र. १२/०७-०८ दि. ८/८/२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी अगोदरच कळविले असल्याचे नमूद केलेले आहे.

माहिती अर्जाद्वारे खादी गोष्ट का केली किंवा का केली नाही याबाबत खुलासा मागणे माहितीच्या अधिकारात येत नाही हया जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या म्हणण्याशी आयोग सहमत आहे. मात्र प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्राप्त झ ाालेले प्रथम अपील न स्वीकारता अपीलार्थीस परत पाठविणे ही त्यांची कृती नक्कीच नियमास धरुन नाही. तरी याची गंभीर नोंद आयोग घेत आहे याची जाणीव प्रथम अपिलिय अधिकारी यांनी ठेवावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अगोदर पाठविलेल्या उपरोक्त दि. ८/८/२००७ च्या पत्राची प्रत अपीलार्थीस मिळाली नसल्याने पुन्हा तात्काळ पाठवावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ८ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४३१५१ /अपील क्रमांक ४६६७ /०२**

**श्रीमती विनिता अशोक कामटे -----अपीलार्थी**
**१४, रक्षक सोसायटी,**
**पिंपळे- निलाख, पुणे - ४११ ०२७.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (अभियान) -----उत्तरवादी**
**पोलीस आयुक्त कार्यालय इमारत,**
**तळमजला, क्रॉफर्ड मार्केट समोर,**
**डी.एन.रोड, मुंबई ४०० ००१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (समन्वय)**
**पोलीस आयुक्त कार्यालय इमारत,**
**तळमजला, क्रॉफर्ड मार्केट समोर,**
**डी.एन.रोड, मुंबई ४०० ००१.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्रीमती विनिता अशोक कामटे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २१/८/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलाची सुनावणी प्रथमतः दि. १७/९/२००९ रोजी आयोजित केलेली होती. तथापि कांही अपरिहार्य कारणामुळे सदर सुनावणी रद्द करुन दि. १९/९/२००९ रोजी आयोजित करण्यात आली. सुनावणीचे वेळी अपीलार्थी श्रीमती. विनिता अशोक कामटे उपस्थित होत्या. तसेच श्री. मनोहर जे.भोईर,

पोलीस उपायुक्त (अभियान ) तथा प्रथम अपिलीय अधिकारी आणि श्री. केशव बाबूराव शिंदे, सहायक पोलीस आयुक्त तथा जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

श्रीमती विनिता अशोक कामटे अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकाराखाली जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (समन्वय ) पोलीस आयुक्तालय, मुंबई यांच्याकडे दि. २६/११/२००८ रोजी मुंबईमध्ये झालेल्या आतंकवादी हल्ल्यासंदर्भात मुख्य नियंत्रण कक्षाचे वरिष्ठ अधिकारी आणि शहीद झालेले वरिष्ठ अधिकारी यांच्यामध्ये झ ाालेल्या संभाषणाच्या अनुषंगाने एकूण चार मुद्दयांची माहिती मिळण्यासाठी दि. ४/३/२००९ रोजी माहिती अर्ज केला होता. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. पुंडलिक बोदडे यांनी अपीलार्थी यांचा माहिती अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ (ज) (इंग्रजी कलम 8 (h) ) नुसार फेटाळून मागविण्यात आलेली माहिती पुरविणे शक्य होत नाही असे दि. ८/४/२००९ च्या पत्र जा.क्र. ४९१/माहिती अधिकार-०५/०९ अन्वये कळविले.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलार्थी यांनी दि. २९/४/२००९ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त (अभियान) यांजकडे प्रथम अपील दाखल केले. सदर प्रकरणी दि. १४ मे, २००९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. तथापि, त्यावर अपीलार्थीकडून सुनावणीची तारीख पुढे ढकलण्याबाबत विनंती प्राप्त झाल्यामुळे पुढील सुनावणीची तारीख २२ मे, २००९ रोजी देण्यात आली होती. सदर सुनावणीच्या वेळी अपीलार्थी यांच्या वतीने श्रीमती. मोहिते -डेरे (ॲड्व्होकेट) आणि श्री श्रीकांत गावंड (ॲड्व्होकेट) यांनी बाजू मांडली. त्यानंतर श्री. एस.एम.साब्दे, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (अभियान) यांनी दि. २५ मे, २००९ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले :-

" सदर प्रकरणामध्ये अटक आरोपी विरुध्द दोषोरापपत्र दाखल झालेले असून रितसर न्यायालयीन प्रक्रिया चालू झालेली आहे आणि अर्जदारांना मागणी केलेली माहिती आज त्यांना देवू केली तर पुढील तपास किंवा अटक यामध्ये अडथळा होईल किंवा होण्याची

शक्यता आहे असे सकारण दिसून येत नाही. म्हणून अर्जदार यांनी उपस्थित केलेले मुद्दे योग्य आहेत असे आमचे मत आहे. तथापि त्यांनी मागणी केलेली माहिती म्हणजेच :--

१. **Main Control Room (Call logs-written transcripts & audio)**
२. **Written transcripts & audio of conversation between East control region AND south control region & main control**
३. **Written transcripts & audio conversation of mobile walkie Talkic sets of Motorola & Erricson belonging to Ashok Kamte which was seized on २७/११/२००८ from Pydhonie Police Jeep**
४. **Written transcripts & audio of conversation between walkie Talkie belonging to Jaywant Patil (East Region) with any region (East Region,South Region/Main Control Room)**

विषय :-

**CALL LOG RECORDS (Wireless) Written transcripts and Audio**

कालावधी :-

**26/11/2008 from 9.00 A.M to 27/11/2008 till 12 Noon.**

उपरोक्त माहितीच्या प्रती देण्याऐवजी त्यांना यामध्ये असलेला लेखी दस्ताऐवज प्रत्यक्ष पाहण्याची आणि संभाषण प्रत्यक्ष ऐकण्याची संधी देण्यात यावी.

अर्जदार यांनी श्री. बोदाडे, सहायक पोलीस आयुक्त व शासकीय माहिती अधिकारी यांच्याशी संपर्क साधून वेळ आणि तारीख मागणी करुन त्याप्रमाणे हजर राहून वरील गोष्टीची पूर्तता करावी. "

सदर आदेशाने समाधान न झाल्याने अपीलार्थी श्रीमती विनिता अशोक कामटे यांनी दि. २१/८/२००९ रोजी आयोगासमोर द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलात अपीलार्थींनी प्रामुख्याने पुढीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केलेले आहेत :-

१.	प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दि. २५ मे, २००९ च्या आदेशामध्ये सुधारणा करुन उत्तरवादी क्र. १ व २ यांना दि. ४/३/२००९ च्या माहिती अर्जात मागणी केलेली माहिती देण्याबाबत आदेश व्हावेत.

२.	तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केवळ सहपोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांच्या आदेशानुसार अपीलार्थीचा माहिती अर्ज फेटाळलेला आहे. श्री. राकेश मारिया, सहपोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई हे आतंकवादी घटनेच्या प्रसंगी मुख्य नियंत्रण कक्षाचे प्रभारी अधिकारी होते. त्यांना श्री. अशोक कामटे , श्री.हेमंत करकरे व इत.र शहीद अधिकारी हे कोणत्या ठिकाणी हजर होते याबाबतची इत्यंभूत माहिती होती. शहीद अधिकारी यांनी श्री.राकेश मारिया, सहपोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांना बिनतारी संदेशाद्वारे मदतीची याचना केली होती. तथापि, मदत न पाठविल्याची घोडचूक करुन त्यांनी निष्काळजीपणा आणि बेजबाबदारीपणा केल्याचे निष्पन्न झालेले होते. म्हणूनच श्री. राकेश मारिया, सहपोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांनी माहिती नाकारण्याचे आदेश जन माहिती अधिकारी यांना दिले होते. ही बाब आक्षेपार्ह आहे.

३.	प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या दि. २५ मे, २००९ च्या आदेशानुसार अपीलार्थी यांचे प्रतिनिधी **Call logs-written transcripts&audio** शी संबंधित लेखी दस्ताऐवज प्रत्यक्ष पाहण्यासाठी आणि संभाषण प्रत्यक्ष ऐकण्यासाठी गेले असता त्यांना गुन्हे शाखेच्या अधिका-यांनी खोटी कारणे देऊन तपासणी नाकारली. सदर बाब अपीलार्थी यांनी त्यांच्या दि.२८ जानेवारी, २००९ , दि. ९ जून, २००९, दि. २४ जून, २००९ च्या पत्रान्वये पोलीस आयुक्त मुंबई व सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) मुंबई यांच्या नजरेस आणली असता सहआयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांनी त्यांच्या दि. १५/७/२००९ च्या पत्रान्वये अपीलार्थीस किंवा त्यांच्या प्रतिनिधीस मुख्य नियंत्रण कक्षात दि. २० जुलै, २००९ रोजी सकाळी ११ ते दुपारी ५ पर्यंत त्यांच्या सोयीनुसार अभिलेख तपासणीची विनंती केली. तथापि, सदर पत्रात अशी अट घालण्यात आली होती की,

त्यांनी बघितलेल्या किंवा ऐकलेल्या मजकुरापैकी कोणताही मजकुर रेकॉर्ड करु नये किंवा त्याची नक्कल करु नये किंवा त्यातील मुद्दे लिहू नयेत.

४. द्वितीय अपील करण्याचा अपीलार्थींचा हक्क अबाधित ठेवून अपीलार्थींच्या प्रतिनिधींनी दि. २९ ऑगस्ट व ३० ऑगस्ट २००९ रोजी अभिलेखाची तपासणी केली. लिखित मजकुराची तपासणी केल्यावर सदर मजकूर हा एवढा नेटका लिहिलेला आढळला की, त्यामुळे त्याच्या विश्वासार्हतेबाबत संशय निर्माण होतो. त्याशिवाय कॉल लॉग रेकॉर्डची जी ऑडिओ सिडी ऐकविण्यात आली ती दि. २६/११/२००८ किंवा २७/११/२००८ या दिवशी तयार केलेली नसून ती दि. ६ जानेवारी, २००९ रोजी दुपारी १ :३४:३२ वाजता तयार करण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

५. लेखी दस्तऐवजातील कॉल केलेल्या वेळेच्या नोंदी व ऑडिओ कॉल रेकॉर्डस मधील नोंदी यामध्ये तफावत आढळते. दि. २६/११/२००८ रोजी दाखल केलेल्या चार्जशिटमध्ये दर्शविण्यात आलेल्या नोंदी तपासल्या असता त्या तपासणीच्या वेळी दाखविण्यात आलेल्या नोंदीपेक्षा भिन्न होत्या. कांही नस्त्या ज्यावेळेला रेकॉर्ड केल्याचे दर्शविण्यात आलेले आहे त्याच नस्त्या सुमारे तीन तास आधी तयार करण्यात आल्या होत्या असे निदर्शनास आले. आणि यावरुनच कॉल लॉग्समध्ये फेरफार केल्याचे आढळून येते.

६. सहपोलीस आयुक्त (का.व.सु.), मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १५ जुलै, २००९ च्या पत्रात नमूद केल्यानुसार श्री. आर.सी. तायडे, सहायक पोलीस आयुक्त, मुख्य नियंत्रण कक्ष मुंबई यांनी कोणतेही समर्थनीय कारण न देता तपासणीच्या वेळी अपीलार्थीच्या प्रतिनिधींना मूळ (Original) दस्तऐवज उपलब्ध करुन दिला नव्हता.

७. सह पोलीस आयुक्त (का.व.सु.) मुंबई यांनी त्यांच्या दिनांक १५ जुलै, २००९ च्या पत्रात असेहि नमूद केलेले आहे की, अपीलार्थींच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने विधी तज्ञांचा सल्ला घेतला असता मागितलेली माहिती देता येऊ शकेल असे त्यांनी मत व्यक्त केलेले आहे. असे असतांना अपीलार्थींना अभिलेखाची कोणतीही प्रत न देता, कोणतेही

समर्थनीय कारण न देता केवळ तपासणी करण्याचाच अधिकार देऊन माहिती अधिकारापासून वंचित ठेवलेले आहे.

द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळी श्री. मनोहर भोईर (विद्यमान) प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (अभियान) ,मुंबई यांनी असे नमूद केले की, दि. २९/८/२००९ व दि. ३०/८/२००९ रोजी अपीलार्थी यांच्या परवानगीने त्यांचे प्रतिनिधीने उपलब्ध दस्तऐवजाची प्रत्यक्ष पाहणी केली व उपलब्ध रेकॉर्डीग पण ऐकल्या आहेत.

उपरोक्त विवेचन लक्षात घेता मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, श्री. अशोक कामटे आणि इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी ज्यांनी देशासाठी आपल्या प्राणाची आहूती दिली त्यांच्याच कुटुंबातील सदस्याने (प्रस्तूत प्रकरणी वैधव्यग्रस्त पत्नी ) मागितलेली माहिती दिल्यास अपराध्यास अटक करण्यास अडथळा होऊ शकतो अशी सबब सांगणे हे केव्हाही सयुक्तिक होऊ शकत नाही. तसेच आता चार्जशीट दाखल होऊन कोर्ट प्रोसिडींग्जसुध्दा सुरु झालेले आहे. अपीलार्थीस कागदपत्र तपासणीची संधी मिळेल, ऑडियो सि.डी. ऐकता येईल, पण त्याच्या प्रती मिळणार नाही अशी माहिती देण्याची पध्दत "माहितीचा अधिकार " अधिनियमाच्या तरतुदीशी सुसंगत नाही. माहिती एकदा द्यावयाची ठरल्यास ती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात द्यावी लागेल असेच आयोगाचे मत आहे. त्यामुळे मी पुढील आदेश देत आहे -

***---आदेश---***

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**अपीलार्थी यांना हे आदेश पारित झाल्यापासून शक्य तेवढया लवकर व जास्तीत जास्त ३० दिवसांच्या आत त्यांनी दि. ४/३/२००९ च्या माहिती अर्जान्वये मागितलेली सर्व माहिती विनामूल्य देण्यात यावी.**

मिळणा-या माहितीच्या खरेपणाबद्दल संदेह असल्यास अपीलार्थींना योग्य त्या पूराव्यांसह अतिरिक्त मुख्य सचिव (गृह ) मंत्रालय यांचेकडे तक्रार करता येऊ शकेल.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. १५ ऑक्टोंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४०९९१ /अपील क्रमांक ४८३६ /०२**

**श्री. अभिजित बसरकोड -----अपीलार्थी**
**१/५, सचिन सोसायटी, मिठागर रोड,**
**मुलुंड (पूर्व) मुंबई ४०० ०८१.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**इस्टेट विभाग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई.**

**२.जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (इस्टेट)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**इस्टेट विभाग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई.**

***---विवेचन---***

| | |
|---|---|
| माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक | : १८.३.२००९ |
| जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक | : २६/३/२००९ |
| प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. | : ०५.०४.२००९ |
| प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. | : ------ |
| द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक | : ०७.०५.२००९ |
| सुनावणीचा दिनांक | : १५/१०/२००९ |

अपिलार्थी : उपस्थित

जनमाहिती अधिकारी : उपस्थित

अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल : सर्व्हे नं. ९३ , हिस्सा नं.३ सि.टी.एस. क्र. १०९७ चा नकाशा.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर : प्लॉट नंबर व इस्टेटचे नांव तसेच त्या जागेच्या रफ स्केच नकाशा कृपया देण्यात यावा.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश : आदेश निर्गमित केल्याचे दिसत नाही.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : अपीलार्थीस सर्व्हे नं. ९३, हिस्सा नं.३ ,सि.टी.एस. क्र. १०९७ ची माहिती पाहिजे होती. मात्र अपीलार्थींच्या दि. १८ मार्च २००९ रोजीच्या अर्जावर दि. २६/३/२००९ रोजी त्यांना असे कळविण्यात आले की, सदरील जमिनीचे लोकेशन शोधून काढण्यासाठी आणखीन कांही माहिती इस्टेटचे नांव, प्रॉपर्टीचे नांव आणि जमिनीचे निश्चित लोकेशन दाखविणारा कच्चा नकाशा ही माहिती दिल्यास अपीलार्थीस आवश्यक ती माहिती देता येणे सोयीचे होईल. मात्र असे न करता अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलार्थींनी दिलेल्या माहितीच्या आधारावर प्रॉपर्टी शोधून काढता येणार नाही का असे विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलार्थींनी दिलेली माहिती ही अपूर्ण आहे. अपीलार्थींनी जमिनीच्या लोकेशन वगैरेच्या बाबतीत माहिती जन माहिती अधिका-यांना सुनावणी संपताच द्यावी व ७ दिवसांचे आत अपीलार्थीस हवी असणारी माहिती पुरविण्यात यावी असे सर्वसहमतीने निर्देश देण्यांत आले.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. १५ ऑक्टोंबर, २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली
तक्रार .

क्रमांक-मु.मा.आ/४३६११/तक्रार क्रमांक ५४१/०७/०१

श्री. एस.के. नानगिया -----तक्रारदार
७०४/ गोल्डन चॅरिएट सह.गृह.संस्था,
१३३/ सेक्टर ६, चारकोप, कांदिवली (पश्चिम)
मुंबई - ४०० ०६७.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा डेप्यूटी मेट्रोपोलिटन कमिशनर -----उत्तरवादी
मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण,
वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
प्रशासकीय अधिकारी, उपमहानगर आयुक्त आस्थापना,
मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण,
वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व) मुंबई ५१.

*---विवेचन---*

श्रीयुत एस.के.नानगिया यांनी दि. १४ सप्टेंबर, २००९ रोजी आयोगाकडे अशी तक्रार केली की, आयोगाने दि. १०/११/२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांचेकडून रु. ९,५००/- ची शास्ती वसूलीचे आदेश दिले होते त्याची अंमलबजावणी झाली किंवा नाही याची माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि. २६/५/२००९ रोजी वेगळयाने माहितीच्या अधिकारा खाली अर्ज दिला होता. त्यात दिलेले उत्तर समाधानकारक नाही. तसेच आयोगाच्या आदेशाचे पालन न करण्याची प्रवृत्ती वाढीस लागल्याचे दिसून येत आहे अशीही तक्रार अर्जदारांची आहे.

या तक्रारीची सुनावणी दि. १६/१०/२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळेला तक्रारकर्ते, जन माहिती अधिकारी तसेच डेप्यूटी मेट्रोपोलिटन कमिशनर हे उपस्थित होते.

सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, शास्ती वसूल करण्याची व ती शासनाच्या बजेट हेडखाली जमा करण्याची प्रक्रिया ही दि. १७ मार्च २००९ रोजीच पूर्ण करण्यांत आलेली होती. तक्रारदारांना तसे दि. १८/८/२००९ रोजी उत्तर दिलेले आहे त्यात आदेशाची अंमलबजावणी झालेली आहे असे लिहिले आहे. तसेच तक्रारदारांना दिलेल्या कॉम्पेनसेशनच्या बाबतीत चेक नंबर वगैरे विस्तृत माहिती दिलेली आहे. मात्र शास्तीची वसूली शासनाच्या बजेट हेड खाली कोणत्या दिवशी जमा करण्यात आली ही सुध्दा माहिती दिली असती तर ते जास्त योग्य राहिले असते.

तक्रारदारांच्या तक्रारीचा मुख्य रोख हा आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणीविषयी आहे. सदरील केसमध्ये अंमलबजावणी तक्रारदारांचा दि. २६/५/२००९ रोजीच्या अर्जाच्या अगोदरच झालेली आहे असे दिसून येते.

माहिती देतांना सांगोपांग माहिती दिल्यास नवीन अर्जाची गरज राहात नाही ही बाब जन माहिती अधिका-यांच्या निदर्शनास आणून पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश---*

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. १६ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४२९६९ /अपील क्रमांक ४८५८ /०२**

**श्री. मेहरवान रुस्तम इराणी -----अपीलार्थी**
**गर्डा व्हिला, पहिला मजला,**
**४८ हिल रोड, बांद्रा (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) -----उत्तरवादी**
**इंजिनियरिंग सर्व्हिसेस ॲन्ड प्रोजेक्ट इमारत**
**३ रा मजला, ना.म.जोशी मार्ग, भायखळा,**
**मुंबई ४०० ०११.**
**२.जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या)**
**पूर्व उपनगरे, ५ वा मजला, ट्रान्सपोर्ट गारबेज इमारत,**
**पंतनगर, घाटकोपर (पूर्व) मुंबई ४०० ०७५.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्रीयुत मेहरवान इराणी यांच्या दि. ३१/७/२००९ रोजीच्या अपीलाची सुनावणी दि. १६/१०/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस कांही अधिका-यांचे मुंबईतील निवासस्थानाचे पत्ते तसेच मुळ गावातील निवासस्थानाचे पत्ते पाहिजे होते.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, मुंबईतील निवासस्थानाचे पत्ते हे देण्यांत आलेले आहेत. मात्र मुळ शहरातील /गावातील पत्ते देण्यांत आलेले नाहीत. कारण असे पत्ते उपलब्ध नाहीत असे सांगण्यांत आले.

शासन व ब-याच संस्थांमध्ये मुळ गांवी जाण्यासाठी लिव्ह ट्रॅव्हल कन्सेशन देण्याची पध्दत आहे. त्यामुळे प्रत्येक अधिका-याला आपल्या मुळ गावाची माहिती ही द्यावी लागते. त्यामुळे जरी पत्ते नसले तरी मुळ गावाचे नांव हे प्रत्येक अधिका-यांच्या बाबतीत देण्यात यावे.

***----आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
सदरील आदेशाची अंमलबजावणी १५ दिवसाच्या आत करण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. १६ ऑक्टोंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४२९६४ /अपील क्रमांक ४८६१ /०२**

**श्री. डी. राजामनी -----अपीलार्थी**
**फ्लॅट नं. २, शबनम , प्लॉट नं. ७७,**
**टि.व्ही. चिदंबरम मार्ग, सायन (पूर्व)**
**मुंबई ४०० ०२२.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इ.प्र) ----- उत्तरवादी**
**पश्चिम उपनगरे, १ ला मजला, पाटकर मार्ग,**
**वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.**

**२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र)**
**पश्चिम उपनगरे, १ ला मजला, पाटकर मार्ग,**
**वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.**

***---विवेचन---***

श्रीयुत राजामनी यांनी आयोगाकडे केलेल्या दि. १७/७/२००९ रोजीच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. १६/१०/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थीस म्हाडाच्या सुंदर नगर येथील कॉलनीच्या पुनर्विकासाच्या इमारतींच्या बांधकामासंबंधी अनेक मुद्दयांवर माहिती पाहिजे होती. त्यासदंर्भात उपलब्ध करुन देण्यांत

आलेल्या सर्व नस्त्यांची पाहणी करुन आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती अपीलार्थी यांनी घेतलेल्या आहेत. तरी ही त्यांचे कांही मुद्दे अनुत्तरीत राहिल्यामुळे ते समाधानी नाहीत.

जन माहिती अधिका-यांच्या म्हणण्यानुसार सव कागदपत्रे अपीलार्थीस देण्यांत आलेली आहेत. तरीही अपीलार्थींच्या म्हणण्यानुसार त्यांचे ज्या मुद्दयांसंबंधी माहिती मिळून येत नाही त्याची खातरजमा करण्यासाठी दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यांत हाले की, अपीलार्थी हे दि. २६/१०/२००९ रोजी दुपारी ३-०० वाजता जन माहिती अधिका-यांच्या कार्यालयात जातील व त्यांच्या अनुत्तरीत मुद्दयांसंबंधी कांही कागदपत्रे नस्तीमध्ये आहेत किंवा काय यासंबंधी पुन्हा तपासणी करतील. त्यावेळेला विभागाच्या जाणकार अधिकारी/ कर्मचारी यांनी अपीलार्थीस मदत करावी व त्यांना आणखीन कागदपत्रे पाहिजे असतील तर ती त्यांना देण्यांत यावीत.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. १६ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४२९६८ /अपील क्रमांक ४८५९ /०२**

**श्री. राजीव प्रकाश पटेल -----अपीलार्थी**
**५, कविता , पी एम.रोड,**
**सांताक्रुज (पश्चिम) मुंबई ४०० ०५४.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य अभियंता (इ.प्र) -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**पश्चिम उपनगरे (१) एच वार्ड, १ ला मजला,**
**आर.के. पाटकर मार्ग, वांद्रे (पश्चिम) मुंबई ५०**

**२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**पश्चिम उपनगरे (१) एच वार्ड, १ ला मजला,**
**आर.के. पाटकर मार्ग, वांद्रे (पश्चिम) मुंबई ५०**

***---विवेचन---***

**अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता यांच्या दि. ३० मे, २००९ रोजीच्या प्रथम अपिलीय आदेशाच्या संदर्भात द्वितीय अपी दि. २० जुलै, २००९ रोजी करण्यात आले होते. त्याची सुनावणी दि. १६/१०/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते.**

**अपीलार्थीस कविता या बिल्डींगच्या व विशेषेकरुन तळमजल्यावरील फ्लोअर प्लानची माहिती पाहिजे होती. सुनावणीच्या वेळेला असे सांगण्यांत आले की. सदरील**

इमारत ही ५० वर्षे जुनी आहे व त्या इमारतीसंदर्भात जी नस्ती उपलब्ध होती ती अपीलार्थीस दाखविण्यात आलेली आहे. मात्र त्या नस्तीमध्ये बिल्डींग प्लान उपलब्ध नाही.

अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना याबाबतीत काटेकोरपणे शोध घेऊन कागदपत्रे शोधून काढण्याचे निर्देश दिलेले आहेत. तसेच अपीलार्थींनी पाण्याच्या बिलाच्या प्रती देण्याबाबत विनंती केलेली आहे त्या माध्यमातून पाणी विभागाकडून त्यावेळेला जर बिल्डींग प्लान्स , इमारतीच्या बांधकामाचे नकाशे त्या खात्याकडे असतील तर त्या किंवा इतर डिपार्टमेंट कडे सुध्दा शोध घेऊन अपीलार्थीस माहिती द्यावी असे निर्देश दिलेले होते. मात्र आजपर्यंत त्या प्रयत्नांना यश लाभलेले दिसत नाही. तेव्हा येत्या १५ दिवसांत उपमुख्य अभियंता यांनी स्वतःच्या अधिपत्याखाली सदरील इमारतीच्या बांधकामाच्या नकाशासंबंधी शोध घ्यावा व अपीलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचा प्रयत्न करावा व अपीलार्थीस १५ दिवसांत वस्तुस्थितीची माहिती द्यावी.

<u>*----आदेश---*</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. १६ ऑक्टोंबर, २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४२९६७ /अपील क्रमांक ४८६० /०२**

**श्री. देव अे. पाका -----अपीलार्थी**
**४०२, प्रिती डॉक्टर्स सोसायटी,**
**बांद्रा रिक्लमेशन , वांद्रे (पश्चिम) मुंबई ५०**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी**
**औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,**
**५ वा मजला, कॉमर्स सेंटर, ताडदेव,**
**मुंबई ४०० ०३४.**

**२.जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक**
**औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,**
**५ वा मजला, कॉमर्स सेंटर, ताडदेव,**
**मुंबई ४०० ०३४.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ११/७/२००९**
**सुनावणीची तारीख १६/१०/२००९**
**अपीलार्थी, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीनी त्यांचा दि. १४/१/२००९ रोजी जो अर्ज दिला होता त्यातील मुद्दा क्र. ४ व ५ ची माहिती गोपनीय म्हणून देण्यात आलेली नाही. मुद्दा क्र. ४ मध्ये सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांच्याविरुध्द आलेल्या तक्रारी व त्यावर झालेली**

कारवाई याची माहिती अपीलार्थीस पाहिजे होती. तसेच सहसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांच्या बदलीच्या प्रस्तावाबाबतचा कालावधी एप्रिल २००८ ते डिसेंबर २००८ या बाबत बदली प्रस्तावाची माहिती पाहिजे होती. या दोन्ही बाबी एखादया वेळेला कांही विवक्षित कालावधीपुरत्या म्हणजे त्याच्यावर प्रोसेस चालू आहे एवढया कालावधीपुरत्या कदाचित गोपनीय ठरविता येतील. मात्र एकदा यावरील कारवाई पूर्ण झाली की मग त्यात गोपनियता बाळगण्याचे कांही कारण राहात नाही. त्यामुळे मुद्दा क्र. ४ व ५ याबाबतची माहिती व कागदपत्रांच्या प्रती अपीलार्थीस देण्यांत याव्यात.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
अपीलार्थीस १५ दिवसांच्या आंत माहिती देण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. १६ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४२०८५ /अपील क्रमांक ४८६३ /०२**

**श्रीमती. ममता मोतीराम पवार -----अपीलार्थी**
**३३३, तपोवन, सी, सेनापती बापट मार्ग,**
**लोअर परेल, मुंबई ४०० ०१३.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षण निरीक्षक -----उत्तरवादी**
**शिक्षण निरीक्षक नॉर्थ डिव्हीजन,**
**बृहन्मुंबई विभाग, चेंबूर, मुंबई ७१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा शिक्षण उपनिरीक्षक**
**शिक्षण निरीक्षक नॉर्थ डिव्हीजन,**
**बृहन्मुंबई विभाग, चेंबूर, मुंबई ७१.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २६/६/२००९**
**सुनावणीची तारीख १६/१०/२००९**
**अपीलार्थी, व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थींना शिक्षण निरीक्षक उत्तर विभाग यांनी दि. ६/१०/२००८ रोजी जी सुनावणी घेतली होती व जो निर्णय घेतला होता त्याच्यासंदर्भात पुढील कारवाई काय झाली व काय आदेश पारित झाले त्याची माहिती पाहिजे होती.

याबाबतीत अजूनहि अंतिम निर्णय झालेला नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. दि. ६/५/२००९ रोजी श्रीमती. पवार यांनी त्यांच्या कार्यालयाकडेहि अपील

केलेले आहे त्याची सुनावणी ठेवण्यात आली होती.     पण त्या उपस्थित नसल्यामुळे ती सुनावणी पुढे ढकलली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.     ही सुनावणी आता ३ नोव्हेंबर, २००९ रोजी ठेवण्यात आलेली आहे त्यावेळेपर्यंत संपूर्ण केस प्रोसेस करुन व त्यादिवशी त्यांचेहि म्हणणे ऐकून घेऊन त्यादिवशी निर्णय देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक.  २० ऑक्टोंबर, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४२९६३ /अपील क्रमांक ४८६२/०२**

**श्री. उत्तमकुमार वालजी पटेल -----अपीलार्थी**
**पटेल हाऊस, पाद्री मोथी वाडी, टी.एच.के. रोड,**
**पोस्ट ऑफिसमागे, एफ.पी.नं. ९७,**
**ओरिजीनल प्लॉट नं. ९०, टीपीएस II, माहिम, मुंबई १६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता -----उत्तरवादी**
**जी / नॉर्थ वार्ड कार्यालय, हरिश्चंद्र येवले मार्ग,**
**दादर (पश्चिम) मुंबई - ४०० ०२८.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता**
**जी / नॉर्थ वार्ड कार्यालय, हरिश्चंद्र येवले मार्ग,**
**दादर (पश्चिम) मुंबई - ४०० ०२८.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २२/७/२००९**
**सुनावणीची तारीख १६/१०/२००९**
**अपीलार्थी अनुपस्थित जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थीस त्यांच्या दि.११ मे, २००९ रोजीच्या अर्जानुसार फायनल प्लॉट नं. ९६/बी , दिलीप गुप्ते मार्ग, माहिम येथे झोपडपट्टी पुनवर्सन ॲनेक्चर II देण्यांत आलेले आहे किंवा नाही १ वगैरे माहिती विचारली होती.**

प्रथम अपिलीय आदेशात रेकॉर्डला असलेली सर्व माहिती देण्याची तयारी अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी दर्शविलेली आहे. तसेच संपूर्ण नस्तीची पाहणी करु देण्याची तयारी सुध्दा जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी दर्शविलेली आहे.

अपीलार्थींच्या अर्जात ते स्वतः माहिती घेतील असे त्यांनी नमूद केलेले आहे. मात्र अशी तयारी दर्शवून अपीलार्थी माहिती घेण्यास आलेले नाहीत असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तेव्हा अपीलार्थींनी त्यांना आवश्यक वाटल्यास माहितीची तपासणी करावी व त्यांना हव्या असणा-या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घ्याव्यात किंवा विहित शुल्क भरुन जी माहिती जन माहिती अधिकारी देवू करीत असतील ती माहिती स्वतः कार्यालयात जावून प्राप्त करुन घ्यावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २० ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४१८८७ /अपील क्रमांक ४८६४/०२**

**श्री. संदिप दिगंबर ढोबळे -----अपीलार्थी**
**१/६, ॲन्थोनी डिमेलो कॉलनी,**
**गणेशवाडी, कांजूरमार्ग (पूर्व) मुंबई ४०० ०४२.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी**
**सहायक मनपा आयुक्त यांचे कार्यालय,**
**एस विभाग कार्यालय, मंगतराम पेट्रोल पंपाजवळ,**
**एल.बी.एस.मार्ग, भांडूप (पश्चिम) मुंबई ७८.**

**२.जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ निरीक्षक**
**(दुकाने व आस्थापना)**
**सहायक मनपा आयुक्त यांचे कार्यालय,**
**एस विभाग कार्यालय, मंगतराम पेट्रोल पंपाजवळ,**
**एल.बी.एस.मार्ग, भांडूप (पश्चिम) मुंबई ७८.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक ११/६/२००९**
**सुनावणीची तारीख १६/१०/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थीस कार्यकारी अभियंता महावितरण ईश्वरनगर, भांडूप (पश्चिम) येथील कार्यालय दुकान व आस्थापना कायद्यानुसार सुरक्षा, स्वच्छता, कार्यालयीन व्यवस्था या व अशा मुलभूत व अत्यावश्यक बाबींबाबत कायदेशीर निकष पूर्ण करते किंवा कसे याबाबतची माहिती पाहिजे होती.

अपीलार्थींनी मागितलेली माहिती मुदतीत देण्यांत आली. भेट दिली असता मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ च्या तरतुदीनुसार सुरक्षा, स्वच्छता व कार्यालयीन व्यवस्था हया चोख आढळून आल्या आहे असे अपीलार्थीस कळविण्यांत आले. तसेच अपीलार्थींच्या मागणीनुसार ५ वर्षापासून त्या विभागात असलेल्या निरीक्षकांची माहिती सुध्दा देण्यांत आलेली आहे. प्रथम अपीलात यापेक्षाहि अतिरिक्त कांही माहिती असेल तर ती देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत आलेले आहेत. त्यानेहि समाधान न झाल्यामुळे अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये जशी माहिती कागदोपत्री असेल त्याप्रमाणे ती मिळेल. त्यादृष्टीने माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसते. मात्र अपीलार्थींचा उद्देश हा एकूणच कार्यालयीन सोयी-सुविधा मध्ये सुधारणा व्हावी असा आहे व त्यादृष्टीने ते पाठपुरावा करीत असतात.

आता कोणती माहिती द्यावयाची राहिली आहे असे अपीलार्थींना विचारले असता त्यांनी १५ वर्षेपर्यंतच्या निरीक्षकांची नांवे , हुद्दा ही माहिती विचारलली होती. मात्र जन माहिती अधिका-यांनी ५ वर्षांतील निरीक्षकांची नांवे देण्यांत आलेली आहेत असे अपीलार्थींनी सांगितले. तेव्हा उर्वरित माहिती ही अपीलार्थीस त्वरित देण्यांत यावी. तसेच कार्यालयीन दुकाने व आस्थापना कायद्याची योग्यती अमलबजावणी करण्याच्या बाबतीत जन माहिती अधिकारी यांनी ग्वाही दिली.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
उर्वरित माहिती अपीलार्थीस १० दिवसांत देण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २० ऑक्टोंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४१८८९ /अपील क्रमांक ४८६५/०२**

**श्रीमती. रुक्साना ब. शेख -----अपीलार्थी**
**प्लॉट नं. १८, शेड २/१, सि.टी.एस. १९३,१९३/१,**
**कुर्ला इंडस्ट्रियल इस्टेट जवळ,**
**कानजी मानजी इस्टेटच्या मागे, एन.एस.एस.रोड,**
**नारायण नगर, घाटकोपर (पश्चिम) मुंबई ८६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी**
**परिमंडळ ६, चेंबूर, मुंबई ७१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**पूर्व प्रादेशिक नियंत्रण कक्ष, चेंबूर,**
**मुंबई ४०० ०७१.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २९/७/२००९**
**सुनावणीची तारीख १६/१०/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थी यांनी मोहमद याहिया व त्याचे कटुंबिय यांच्याकडून होणारा त्रास व छळ याविरुध्द पोलीस ठाणेस केलेल्या तक्रारीवर काय कारवाई करण्यांत आली याबाबतची माहिती मागितली होती. ही माहिती अपीलार्थीस दि. २/६/२००९ रोजीच्या पत्राने देण्यांत आलेली आहे. मात्र त्यामुळे समाधान न झाल्यामुळे केलेल्या प्रथम अपीलाच्या निर्णयात

अपीलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ६ बाबतची माहिती संबंधितांकडून परत प्राप्त करुन ७ दिवसांचे आत अपीलार्थीस देण्याचे निर्देश अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त यांनी दिलेले होते. त्यानुसार दि. २/६/२००९ रोजी अपीलार्थीस माहिती देण्यांत आलेली आहे.

सुनावणीच्या वेळेले हे स्पष्ट झाले की, रेकॉर्डप्रमाणे माहिती मिळाली असली तरी अपीलार्थी या झालेल्या कारवाईने समाधानी नाहीत. याबाबतीत अशी जर परिस्थिती असेल तर त्यांनी संबंधित वरिष्ठ पोलीस अधिका-यांकडे तक्रार करावी असेहि निर्देश अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आहेत तो मार्ग अपीलार्थींनी स्वीकारायला पाहिजे.
रेकॉर्ड प्रमाणे असलेली माहिती देण्याच्या दृष्टीने कुचराई झालेली दिसून येत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश----***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. २० ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३१९४ /अपील क्रमांक ४८७२/०२

श्री. सोमाभाई का. चौहाण -----अपीलार्थी
१/E, ९५, एकात्मता नगर,
जे.बी. नगर, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०५९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (शिक्षण) -----उत्तरवादी
उप आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालय, ३ रा मजला,
एफ/दक्षिण विभाग कार्यालय, डॉ. आंबेडकर रोड,
परेल, मुंबई १२.

२.जन माहिती अधिकारी तथा शिक्षण अधिकारी
बृहन्मुंबई मनपा शिक्षण विभाग,
दादर (पूर्व) कार्यालय, मुंबई ४०० ०१४.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक २०/८/२००९
सुनावणीची तारीख २०/१०/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला असे स्पष्ट झाले की, अपिलीय अधिका-यांच्या निर्देशाचे पालन झालेले आहे व माहितीच्या गरजेबरोबर अपीलार्थीस रक्कम रु.१,११,५४५/- चे अधिदानहि प्राप्त झालेले आहे व त्याबद्दल अपीलार्थीनी सर्व संबंधितांना धन्यवादहि दिलेले आहेत. कदाचित त्यामुळेच अपीलार्थी सुनावणीस अनुपस्थित राहिले असावेत.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २० ऑक्टोंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४१४५९ /अपील क्रमांक ४८७१/०२**

**श्रीमती. श्रीलता सत्यशिलन** **-----अपीलार्थी**
**६०३ ए, मातोश्री , प्लॉट नं. ६५,**
**टिळक नगर, चेंबूर, मुंबई ४०० ०८९.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सह सचिव** **-----उत्तरवादी**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**२.जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव (माशि २)**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

***---विवेचन---***

| | |
|---|---|
| माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक | : २३.१२.२००८ |
| जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक | : ०९/०१/२००९ |
| प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. | : ०२.०२.२००९ |
| प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. | : २६.०३.२००९ |
| द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक | : ०४.०६.२००९ |
| सुनावणीचा दिनांक | : २०/१०/२००९ |

अपिलार्थी : उपस्थित

उत्तरवादी (१) : उपस्थित

उत्तरवादी (२) : उपस्थित

**विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल :** अनुदानित /विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना मिळणा-या सेवा उपदानाबाबत (ग्रॅज्यूइटी) तसेच एमईपीएस ॲक्ट १९७७ बाबत काही माहिती विचारली होती.

**जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर :** विचारणा केलेली माहिती कलम २ (च) च्या व्याख्येत बसत नसल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नसल्याचे कळविण्यात आले.

**प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश :** सुनावणीस उपस्थित न राहिल्याने प्रथम अपील निकाली काढण्यात आले. सदर आदेश जन माहिती अधिकारी यांच्या सहीने पाठविण्यात आला आहे.

**सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती :** अपीलार्थीच्या अपीलाच्या बाबतीत पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी सादर केले.

१. माहितीच्या अधिकारांतर्गत अर्जदाराने अर्ज केलेला होता तो या कार्यासनास दि. १/१/२००९ रोजी प्राप्त झाला आहे. या अर्जात अर्जदाराने प्रश्नार्थक माहितीची विचारणा केली आहे व तशी माहिती या अधिनियमाखाली देणे अपेक्षित नसल्याने तशी अर्जदाराला कल्पना देवून फेटाळला होता व व्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे ३० दिवसांत अपील करण्याविषयी दि. ९/१/२००९ च्या पत्रान्वये कळविण्यांत आले आहे.

२. त्यावर अर्जदाराने दि. ३/२/२००९ च्या माहिती अधिकाराखाली अपील दाखल केले होते. परंतु सदरचे अपील कार्यासनास दि. २७/२/२००९ रोजी प्राप्त झाले. त्यावर या विभागाच्या दि. १६ मार्च, २००९ च्या पत्रान्वये दि. २१ मार्च, २००९ रोजी सुनावणीस अर्जदारास बोलाविण्यात आले. परंतु त्या या सुनावणीस उपस्थित राहिलेल्या नाहीत.

३. विभागाच्या दि. २६ मार्च, २००९ च्या पत्रान्वये अर्जदारास सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे त्यांचा अर्ज निकाली काढल्याचे कळविले होते. त्याचप्रमाणे या पत्रामध्ये शिक्षण निरीक्षक, चेंबूर यांनी यासंदर्भात अर्जदाराला पत्रान्वये मार्गदर्शन केले असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

४. दरम्यानच्या काळात दि. २५/३/२००९ रोजी अर्जदाराने परत या विषयासंदर्भात एक अर्ज प्राप्त झाला होता. त्यावर विभागाने दि. ६ एप्रिल, २००९ च्या पत्रान्वये त्यांना पुन्हा एकदा दि. १८ एप्रिल, २००९ रोजी सुनावणीस बोलाविण्यात आले होते. परंतु अपिलीय अधिकारी उपस्थित राहू शकणार नसल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे या विभागाच्या दि. ८ एप्रिल, २००९ च्या पत्रान्वये दि. २४/४/२००९ रोजी अर्जदारास सुनावणीस उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली होती. परंतु अर्जदारास सुनावणी पुढे ढकलल्याचे पत्र कदाचित मिळाले नसल्याने ते स्वतः दि. १८/४/२००९ रोजी अपिलीय अधिकारी यांच्याकडे आले होते व त्यांचे निवेदन सादर केले होते.

५. या विभागाच्या अधिपत्याखालील शिक्षण निरीक्षक (उत्तर),बृहन्मुंबई यांनी अर्जदर्झिरला यापूर्वीच समर्पक उत्तर दिलेले आहे. तसेच अर्जदार दोन वेळा सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे आपणांस वस्तुस्थिती प्रत्यक्षात सांगता आली नाही.

६. वास्तविक अर्जदाराने मागितलेली माहितीचा संबंध केंद्र शासनाने सेवा उपदान मंजूर करण्याविषयी जे विधेयक प्रस्तावित होते व मा. सर्वोच्च न्यायालय यांच्याकडील ६३६९/२००१ मधील निर्णयानुसार शिक्षक हे पीजीए ॲक्ट, १९७२ च्या व्याख्येमध्ये येत नसल्याने सेवानिवृत्ती शिक्षकांना सेवा उपदान अनुज्ञेय नाही. तसेच अर्जदार ज्या शाळेमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत होते ती शाळा कायम स्वरुपी विना अनुदानित तत्वावरील असल्यामुळे सदरची सुविधा कार्यरत कर्मचा-यांना द्यावी किंवा कसे हा त्या शाळेचा स्वेच्छाधिकार आहे.

७. उपरोक्त बाबी लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कुठलीही माहिति देण्यास टाळाटाळ किंवा दिशाभूल करणारी माहिति देण्याची बाब तसेच हेतूपुरस्सर दिरंगाई होण्याची बाब घडलेली नाही. ही बाब आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

अपीलार्थीचा अपीलमेमो व जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेले निवेदन लक्षात घेता अपीलार्थीस माहिती व शिक्षण निरीक्षक, चेंबूर यांनी मार्गदर्शन केले असल्याचे दिसून

येते.  त्यामुळे अपील जरी निकालात काढण्यात येत असले तरी कुठचेहि अपिलीय आदेश हे अपिलीय अधिका-यांच्या स्वाक्षरीनेच लिहायला पाहिजेत, जन माहिती अधिकारी यांच्या सहीने नाही.  त्यामुळे अपिलीय अधिकारी यांनी याबाबत नोंद घ्यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक.  २० ऑक्टोंबर, २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४१८९३ /अपील क्रमांक ४८६६/०२**

**श्री. गोपाल शर्मा -----अपीलार्थी**
**फ्लॅट नं. ०९, बी, तळमजला,**
**ओम सतनाम को.ऑप.हौ.सोसा. लि.**
**३ रा रस्ता, खार (पश्चिम) मुंबई ४०० ०५२.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**एच/पश्चिम विभाग, सेंट मार्टिन्स रोड,**
**वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**एच/पश्चिम विभाग, सेंट मार्टिन्स रोड,**
**वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक २९/६/२००९**
**सुनावणीची तारीख २०/१०/२००९**
**अपीलार्थी उपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनपस्थित.**

अपीलार्थीस हवी असणारी माहिती व त्यासंबंधीचे कागदपत्र C.B.I. कडे सुपूर्द केले असल्यामुळे देता येऊ शकत नाहीत असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे होते. अपिलीय अधिकारी यांनी दि. २१/५/२००९ रोजीच्या अपिलीय आदेशात जन माहिती

अधिकारी यांनी दिलेली माहिती बरोबर आहे मात्र पुनःश्च तपासणी करुन अपीलार्थीस त्याप्रमाणे कळवावे असे निर्देश दिलेले आहेत.

**C.B.I.** कडून कागदपत्रे आल्याबरोबर अपीलार्थीस हवी असणारी माहिती त्वरित देण्यात यावी.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी वरिल निर्देशाचे पालन करावे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २० ऑक्टोंबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३९३३/अपील क्रमांक ४८७३/०२

श्री. अर्जूनलाल एम. छाब्रिया -----अपीलार्थी
बेले व्हिस्ता, फ्लॅट नं. १५, ३ रा मजला,
लेक ॲन्ड एल.आय.सी.समोर, एस.व्ही.रोड,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इ.प्र) -----उत्तरवादी
उपमुख्य अभियंता, इ.प्र. पश्चिम उपनगरे १ कार्यालय,
१ ला मजला, आर.के.पाटकर मार्ग, वांद्रे (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
उपमुख्य अभियंता, इ.प्र. पश्चिम उपनगरे १ कार्यालय,
१ ला मजला, आर.के.पाटकर मार्ग, वांद्रे (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १४ सप्टेंबर, २००९
सुनावणीची तारीख २०/१०/२००९
अपीलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थीस हवी असलेली माहिती देण्यांत आलेली आहे. अपीलार्थीला असे वाटले होते की, यासंदर्भात एकापेक्षा जास्त कायदेशीर सल्ले महापालिकेच्या विधी विभागाकडे उपलब्ध असतील. पण याबाबत एकच सल्ल्याची

प्रत आहे व ती अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे.     ही वस्तुस्थिती अपीलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी मान्य केली.   त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २० ऑक्टोंबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३९३४/अपील क्रमांक ४८७४/०२
क्रमांक-मु.मा.आ/४३९३५/अपील क्रमांक ४८७५/०२

श्री. अर्जूनलाल एम. छाब्रिया -----अपीलार्थी
बेले व्हिस्ता, फ्लॅट नं. १५, ३ रा मजला,
लेक ॲन्ड एल.आय.सी.समोर, एस.व्ही.रोड,
वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इ.प्र) -----उत्तरवादी
उपमुख्य अभियंता, इ.प्र. पश्चिम उपनगरे १ कार्यालय,
१ ला मजला, आर.के.पाटकर मार्ग, वांद्रे (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
उपमुख्य अभियंता, इ.प्र. पश्चिम उपनगरे १ कार्यालय,
१ ला मजला, आर.के.पाटकर मार्ग, वांद्रे (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक १४ सप्टेंबर, २००९
सुनावणीची तारीख २०/१०/२००९
अपीलार्थी यांचे प्रतिनिधी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या दोन्ही अपीलांच्या बाबतीत पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी दिलेले आहे.

राज्य माहिती आयुक्त, मुंबई यांचे दि. ६/७/२००९ च्या आदेशानुसार पावसाळा संपल्यानंतर के/पश्चिम विभाग इमारतीच्या सहाव्या माळयावरील उप प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) या खात्यामार्फत वापरात असलेले तात्पुरत्या स्वरुपाचे शेड निष्कासित करण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांच्या दि. ६/७/२००९ च्या द्वितीय सुनावणीदरम्यान जन माहिती अधिका-यांनी आयुक्तांकडे केलेल्या विनंतीप्रमाणे सहाव्या माळयावरील शेड पावसाळयानंतर निष्कासित करण्यात येईल. कारण उप प्रमुख अभियंता (पजबा)हे खाते आपत्कालीन व्यवस्थापन केंद्राशी संबंधित आहे. त्यानंतर आयुक्तांच्या आदेशानुसार पुढील कारवाई करण्यात आली. त्यानुसार मा.आयुक्त (बृहन्मुंबई महानगरपालिका) यांचे आदेश प्राप्त करुन उप प्रमुख अभियंता (पजवा)यांचे कार्यालय अंधेरी (पूर्व) येथे स्थलांतरित करण्यात आले. के/पश्चिम विभागाच्या इमारतीच्या सहाव्या माळयावरील तात्पुरत्या स्वरुपाची शेड पूर्णतः रिकामी करण्यात आली असून निष्कासनाचा कंत्राटदार ठरविण्याकरिता (निविदा मागविण्याकरीता) उप आयुक्त (परि-४) यांचे आदेश घेण्यात आले असून कंत्राटदार नियुक्ती करण्याची कारवाई के/पश्चिम विभागामार्फत सुरु करण्यात आलेली असून दि. १५/११/२००९ पूर्वी सहाव्या माळयातील तात्पुरत्या स्वरुपाची शेड निष्कासित करुन घेण्यात येईल.

वरील संदर्भात संपूर्ण कारवाई राज्य माहिती आयुक्त यांच्या आदेशानुसार करण्यात आलेली आहे.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थी यांच्या प्रतिनिधींनी वरील निवेदनावर समाधान व्यक्त केले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २० ऑक्टोंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४३१८२/अपील क्रमांक ४८७६/०२**

**श्री. सुजीत भिकू सोनावणे -----अपीलार्थी**
**२/७८, बी.डी.डी. चाळ, गणपत जाधव मार्ग,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक -----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई दुध योजना, वरळी यांचे कार्यालय,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**२.जन माहिती अधिकारी तथा दुध प्रापण व वितरण अधिकारी (२)**
**बृहन्मुंबई दुध योजना, वरळी यांचे कार्यालय,**
**वरळी, मुंबई ४०० ०१८.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १ सप्टेंबर, २००९**
**सुनावणीची तारीख २०/१०/२००९**
**अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थीस दुध केंद्र आरे सरिता, एनर्जी केंद्र, अर्धवेळ केंद्र, झेड सेंटर केंद्र वाटपाच्या संदर्भात १९६० सालापासूनची माहिती पाहिजे होती. अपीलार्थीच्या दि. १७/१२/२००८ रोजीच्या अर्जास दि. १९/१/२००९ रोजी माहिती देण्यांत आली आहे व दि.२७/१/२००९ च्या अर्जास दि. ७/३/२००९ रोजी माहिती देण्यांत आलेली आहे.

अपीलार्थीच्या अर्जांची मागणी १९६० सालापासूनच आहे पण तेवढी जुनी माहिती उपलब्ध नसल्यामुळे व जेव्हापासून केंद्र वाटप हे जनतेसाठी खुले झाले तेव्हापासूनची माहिती

देण्यांत आलेली आहे.    तसेच केंद्र मंजूर करण्याचे वाटप समितीचे  सन २००४ सालापासूनचे सर्व मिनीटस् सुध्दा अपीलार्थीस देण्यांत आलेले आहेत.   तसेच अपीलार्थींनी दर्शविलेल्या एका केंद्राच्या  प्रतिक्षा  यादीमधील क्रमांक १ त्यांना कळविण्यांत आलेला आहे. द्वितीय केंद्रासाठी  द्वितीय नंबरवर  व तिस-या केंद्रासाठी तिस-या नंबरवर अशा पध्दतीची माहिती सुध्दा अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे.

रेकॉर्डप्रमाणे माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केलेला दिसतो. अर्थात   अपीलार्थींचे समाधान हे त्यांना प्रत्यक्ष केंद्र मिळण्यानेच होणार आहे.    माहिती देण्यास थोडसा उशीर झाला आहे त्याबाबतची कारणेहि जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे सादर करण्यात आली आहेत.

१.   प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलामध्ये दिलेल्या विहित मुदतीत माहिती देण्यांत आली आहे.   मुळ माहिती अधिकारांतर्गत अर्जाला माहिती देण्यास विलंब झाल्याची कारणे.

अ.   लोकसभा २००९ च्या सार्वत्रीक निवडणुक कामगिरीमुळे कार्यालयात अपुरा कर्मचारी, मनुष्यबल कमी उपलब्ध.

ब.   माहिती अधिकारांतर्गंत माहिती सन १९६० पासुनची  मागणी केल्यामुळे माहिती फारच जुनी असल्याने जन माहिती अधिकारी या नात्याने माहिती देण्याबाबत मनात गोंधळ निर्माण झाला तद्नंतर वरिष्ठांशी चर्चा करुन जुने दप्तर तपासून माहिती देण्यात आली.

क.   दुध प्रापण व वितरण अधिकारी (२)  तथा जन माहिती अधिकारी यांचे अधिपत्याखाली एकच लिपीक कार्यरत असल्याने इतर दैनंदिन काम सुध्दा करणे आवश्यक आहे, त्यामुळे.

वरील कारणे लक्षात घेता शास्तीचे आदेश न देण्याचे आयोगाने ठरविले आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक.  २० ऑक्टोंबर, २००९    राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४३१८५/अपील क्रमांक ४८७८/०२**

**श्री. धिरज एम. मारु -----अपीलार्थी**
**प्रताप पॅलेस, १ ला मजला, रुम नं. १७,१८, व १९,**
**पोस्ट ऑफिस समोर, जे.एन.रोड,**
**मुलुंड (पश्चिम) मुंबई -- ४०० ०८०.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (एस.व टी.विभाग) ----उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**टी वार्ड कार्यालय, लाला देवीदयाळ मार्ग,**
**मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८०.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,**
**टी वार्ड कार्यालय, लाला देवीदयाळ मार्ग,**
**मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८०.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १८/८/२००९**
**सुनावणीची तारीख २०/१०/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थीस त्यांच्या दि. २७/२/२००९ रोजीच्या अर्जानुसार पोस्ट ऑफीससमोरील जे.एन.रोड, मुलुंड (पश्चिम ) चे मालक श्रीयुत प्रताप शहा यांना कलम ३५४ नुसार

दिलेल्या नोटीसीची प्रमाणित प्रत तसेच या नोटीसीला मालकाने दिलेल्या उत्तराची प्रत व यासंदर्भात झालेल्या पत्रव्यवहाराची प्रमाणित प्रती पाहिजे होत्या.

अपीलार्थीस दि. १९/३/२००९ रोजीच्या पत्राने त्यांना हवी असलेली माहिती रु.२/- प्रती पृष्ठ याप्रमाणे शुल्क भरुन घेऊन जावे असे कळविण्यांत आले.

माहिती न मिळाल्यामुळे केलेल्या प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ज्या नोटीसची प्रत व अनुषंगिक माहिती अपीलार्थीस पाहिजे होती ती सहजतेने उपलब्ध होत नाही. तथापि सन २००९ मध्ये नोटीस देऊन त्याची प्रत अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे व यावर जन माहिती अधिकारी यांनी सर्व कागदपत्रांचा कसोशिने शोध घेऊन माहिती देण्याबाबत अपिलीय अधिकारी यांनी निर्देश दिले होते. तरीही माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थीस जी माहिती पाहिजे होती ती सन २००७ साली जी नोटीस दिलेली होती त्यासंदर्भातील आहे. दि. २७/२/२००९ रोजीच्या अर्जाने कोणीही त्या आधीचीच माहिती मागणार. अशी माहिती प्रत्यक्षात उपलब्ध आहे किंवा नाही याची कुठचीही खातरजमा न करता दि. १९/३/२००९ चे पत्र यांत्रिकपणे पाठविलेले दिसते. त्यात २/- रु. प्रती पृष्ठ प्रमाणे पैसे भरावे लागतील असे कळविण्यात आलेले आहे. अपीलार्थीस माहिती मिळण्याच्या दृष्टीने त्यानंतर पुन्हा नोटीस देऊन त्याची प्रत अपीलार्थीस दिलेलली आहे ही गोष्ट वेगळी. मात्र माहितीचा अधिकार अधिनियमानुसार माहिती उपलब्ध आहे याची शहानिशा करुन घेऊनच माहिती तयार असल्याचे व माहितीचे किती पृष्ठे होतात त्याप्रमाणे अपीलार्थीस एकूण किती रक्कम भरावी लागेल हे स्पष्टपणे कळवावयाचे असते. जन माहिती अधिकारी यांनी कुठच्याहि प्रकारे फाईलचा शोध न घेताच व माहिती उपलब्ध आहे किंवा नाही याची खातरजमा न करताच दि. १९/३/२००९ रोजी पत्र पाठविलेले दिसते ही कृती योग्य नाही व त्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना शास्ती होणे आवश्यक आहे.

अपीलार्थीस माहिति मिळविण्यास४/५ ोटेहि घालावे लागले असेहि त्यांनी नमूद केलेले आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर आपले कर्तव्य योग्यप्रकारे पार न पाडल्याबद्दल, जेणेकरुन अपीलार्थीस माहितीपासून वंचित रहावे लागले त्याबद्दल रु.५,०००/-ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्तीची रक्कम जनमाहिती अधिका-यांच्या माहे १ डिसेंबर, २००९ रोजी होणा-या पगारातून महापालिका आयुक्त यांनी वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व तसा शास्ती वसूल केल्याबाबतच्या चलनाच्या प्रतीसह अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांचेवर रु.५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

सदर आदेशाची प्रत महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनाही पाठविण्यांत यावी. त्यांनी सदर शास्तीची रक्कम वसूल झाल्याबाबतच्या चलनाच्या प्रतीसह अनुपालन अहवाल दि. १५ डिसेंबर, २००९ पर्यंत आयोगास सादर करावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २१ ऑक्टोंबर, २००९

राज्य मुख्य माहिति आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४३१८४/अपील क्रमांक ४८७७/०२**

**श्री. संजय आनंदराव कांबळे -----अपीलार्थी**
**द्वारा- श्री.दशरथ पाटील भारत पान बिडी शॉप,**
**३१६ बस डेपोजवळ, पुजारी नर्सिंग होम जवळ,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त झोन ९ -----उत्तरवादी**
**हिल रोड, वांद्रे (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.**
**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त**
**पश्चिम प्रादेशिक नियंत्रण कक्ष, वांद्रे (पश्चिम)**
**मुंबई - ४०० ०५०.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १२/८/२००९**
**सुनावणीची तारीख २०/१०/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपीलार्थींना त्यांच्या अर्जातील सर्व माहिती देण्यांत आलेली आहे. आता कोणती माहिती अजून मिळालेली नाही असे अपीलार्थीस वाटते असे विचारले असता मयत इसमाच्या नातेवाईक पत्नी , सासू, मेहूणा व ते स्वतः यांच्या जबाबाच्या प्रती अजून मिळालेल्या नाहीत असे अपीलार्थी यांनी सांगितले.**

**सुनावणीच्या वेळेस सर्व नस्त्या जन माहिती अधिकारी यांनी बरोबर आणल्या होत्या व सुनावणी झाल्यानंतर लगेचच त्या जबाबाच्या प्रती अपीलार्थीस देण्याचे निर्देश देण्यांत आले.**

***----आदेश---***

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(डॉ.सुरेश वि. जोशी),**
**दिनांक. २१ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४०४२२/अपील क्रमांक ४५२५/०२**

**श्री. हेन्री थॉमस गॉडविन -----अपीलार्थी**
**फ्लॅट नं. १६, ३ रा मजला, युनियन हाऊस नं.२,**
**मोगल लेन, ऑप एल.जे.रोड, माहिम, मुंबई १६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (अभियान) -----उत्तरवादी**
**पोलीस आयुक्त कार्यालय इमारत,**
**क्रॉफर्ड मार्केट समोर, डी.एन. रोड, मुंबई ४०० ००१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (समन्वय)**
**पोलीस आयुक्त कार्यालय इमारत,**
**क्रॉफर्ड मार्केट समोर, डी.एन. रोड, मुंबई ४०० ००१.**

***---विवेचन---***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २७ एप्रिल २००९**
**सुनावणीची तारीख ४/८/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (समन्वय) हे उपस्थित.**

अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (समन्वय) पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडे दि. २/१२/२००८ रोजी अधिनियमाच्या कलम ६ अन्वये अर्ज करुन त्यांनी दि. १५/९/२००५ रोजी तत्कालीन पोलीस आयुक्त अे.एन.रॉय

यांना प्रत्यक्ष भेटून सायन विभागाचे सहायक पोलीस आयुक्त श्रीयुत अरुण देसाई यांच्या विरुध्द योग्य ती कारवाई करण्याचा जो अर्ज केला होता त्यासंदर्भात झालेल्या कारवाईची माहिती मागण्यासाठी अर्ज केला

होता.

अपीलार्थीस दि. १८/१२/२००८ रोजीच्या पत्राने जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय यांनी सदरील अर्ज पोलीस आयुक्त कार्यालयातील कक्ष २, नोंदणी शाखा तसेच पोलीस आयुक्त यांचे स्वीय सहायक यांच्या कार्यालयात तपास केला असता अर्जाची नोंद अभिलेखावरुन मिळून आली नाही असे कळविले. तसेच अपीलार्थीच्या अर्जातील विषय हा सहायक पोलीस आयुक्त, सायन विभाग यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याने तो विभाग ज्या जन माहिती अधिका-यांच्या कक्षेत येतो त्या सहायक पोलीस आयुक्त तथा जन माहिती अधिकारी मध्य प्रादेशिक विभाग मुंबई यांच्याकडे अर्ज माहिती देण्यासाठी दि. १८/१२/२००८ रोजी पाठविला व तसे अपीलार्थीस कळविले.

दि. १३/१/२००९ रोजीच्या पत्राने सहायक पोलीस आयुक्त, सायन विभाग यांनी शासकीय माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त मध्य नियंत्रण कक्ष यांना असे कळविले की, अपीलार्थीस हवी असणारी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध अभिलेखावरुन आढळून आलेली नाही व ही वस्तुस्थिती अपीलार्थीस दि. १४/१/२००९ रोजीच्या पत्राने कळविण्यांत आलेली आहे. सदर वस्तुस्थितीने अपीलार्थीचे समाधान न झ ाल्यामुळे अपीलार्थी यांनी अपिलीय अधिकारी तथा पोलीस आयुक्त (अभियान) यांच्याकडे दि. २१ जानेवारी, २००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपील त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप पोलीस आयुक्त, परिमंडळ ३ यांच्याकडे पुढील कारवाईसाठी पाठविले. अपीलार्थी यांनी मध्य प्रादेशिक विभागाशी माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून देण्यात आलेली आहे व सदरील अपील अर्ज हा प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (अभियान) यांच्याच कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे सदरील अपील पोलीस उप आयुक्त (अभियान) पोलीस आयुक्त कार्यालय यांच्याकडे पुन्हा

परत पाठविले. यावर दि. २७/२/२००९ रोजी पोलीस उपआयुक्त (अभियान) व अपिलीय अधिकारी यांनी असे आदेश दिले की, अपीलार्थी यांनी दि. १५/९/२००५ रोजी तत्कालीन पोलीस आयुक्त यांना केलेल्या तक्रार अर्जाची छायांकित प्रत जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त यांना द्यावी व त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त यांनी सदरील तक्रार अर्जाबाबत पोलीस आयुक्त कार्यालयाकडे विचारणा करुन उपलब्ध माहिती अपीलार्थी यांना तात्काळ द्यावी.

अपीलार्थी यांनी दि. १२ मार्च २००९ रोजी त्यांच्या दि. १५/९/२००५ रोजीच्या अर्जाची प्रत दिल्यानंतर सहायक पोलीस आयुक्त (समन्वय) तथा माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय यांनी अपीलार्थीस असे कळविले की, दि. १५/९/२००५ रोजी पोलीस आयुक्त कार्यालयास केलेला तक्रार अर्ज हा पोलीस आयुक्त यांचे स्वीय सहायक यांनी जावक क्र. ४७६/आ/जन/०५ दि. १९/९/२००५ रोजी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-५ यांच्या कार्यालयाकडे पुढील कारवाईसाठी पाठविलेला आहे. त्यामुळे त्यांचा अर्ज हा संबंधित जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त मध्य प्रादेशिक विभाग यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे असे अपीलार्थीस दि. २३/३/२००९ रोजी कळविले. त्यानंतर माहिती न मिळाल्याने अपीलार्थी यांनी दि. २८/ एप्रिल, २००९ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

अपीलार्थीच्या दि. २/१२/२००८ रोजीच्या अर्जास दि. १८/१२/२००८ रोजीच्या पत्राने अपीलार्थीस दि. १५/९/२००५ रोजीचा तक्रार अर्ज नोंदणी शाखा तसेच पोलीस आयुक्त यांचे स्वीय सहायक यांच्या कार्यालयात आपल्या अर्जाचा तपास केला असता सदरच्या अर्जाची नोंद अभिलेखावर मिळून आलेली नाही असे कळविले. मात्र अपीलार्थीनी त्यांच्या अर्जाची छायाप्रत दिल्यानंतर अपीलार्थीचा दि. १५/९/२००५ रोजीचा अर्ज हा पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविला आहे. व पुढील माहिती देण्याची जबाबदारी मध्य प्रादेशिक विभाग यांचे जन माहिती अधिका-यांवर सोपविलेली आहे. थोडक्यात एवढा सर्व पाठपुरावा केल्यानंतर अपीलार्थीस त्यांचा तक्रार

अर्ज हा पुढील कारवाईसाठी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ यांच्याकडे दि. १९/९/२००५ रोजी पाठविण्यात आलेला आहे एवढीच माहिती उपलब्ध झालेली आहे असे सुनावणीच्या वेळेला दिसून आले. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ५ यांनी त्या अर्जावर काय कारवाई केली याची माहिती जन माहिती अधिकारी, मध्य प्रादेशिक विभाग यांनी हे आदेश मिळताच ७ दिवसांच्या आत अपीलार्थीस द्यावी.

तसेच दि. २३/३/२००९ रोजी दि. १९/५/२००५ चा अर्ज हा त्यांच्याकडे मिळाल्यानंतरहि त्या अर्जावर काय कारवाई केली याची माहिती अपीलार्थीस विवक्षितपणे आयोगाकडील सुनावणीच्या दिवसांपर्यंत न कळविल्याबद्दल त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम १८ अन्वये शास्तीची कारवाई का करु नये याचा खुलासा जन माहिती अधिकारी, मध्य प्रादेशिक विभाग यांनी आयोगास दि. १० नोव्हेंबर, २००९ रोजी सकाळी ११-०० वाजता आयोगाच्या कार्यालयात समक्ष सादर करावा.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
सर्व संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २१ ऑक्टोंबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार .

क्रमांक-मु.मा.आ/४१३३८/तक्रार क्रमांक ३७५/०८/०१

श्री. हेन्री थॉमस गॉडविन -----तक्रारदार
फ्लॅट नं. १६, ३ रा मजला, युनियन हाऊस नं.२,
मोगल लेन, ऑप एल.जे.रोड, माहिम, मुंबई १६.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा उप सहायक पोलीस महानिरीक्षक -----उत्तरवादी
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१.

*---विवेचन---*

तक्रारीचा दिनांक २२ जून, २००९
सुनावणीचा दिनांक १४ जुलै, २००९
तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित.

श्री. हेन्री थॉमस गॉडविन, मुंबई यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे दि. १८ मे, २००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्यासाठी अर्ज सादर केला. श्री. गॉडविन यांनी दि. १५/१२/२००३, १६/१२/२००३ व १/३/२००४ रोजी ज्या तक्रारी दाखल केल्या होत्या त्यावर काय कार्यवाही झाली याबाबतची सविस्तर माहिती त्यांनी मागितली होती. सदरहू अर्ज ४- ५ वर्षे जुने असल्याने व अर्जात ज्या तक्रारींबाबत माहिती मागितली होती त्या तक्रारी पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याचे कारण दर्शवून श्री. गॉडविन यांचा अर्ज पोलीस आयुक्तालयाकडे पाठविण्यात येत असल्याचे श्री. गॉडविन यांना कळविण्यात आले. या

पत्रावर श्री. हेन्री गॉडविन यांच्याऐवजी त्यांचे बंधू श्री. जेम्स गॉडविन यांचे नाव टाकण्यात आले. परंतु पत्ता मात्र श्री. हेन्री गॉडविन यांचाच होता. पोलीस महासंचालक कार्यालयाचे पत्र प्राप्त झाल्यावर तक्रारदारांनी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली व त्यात असे नमूद केले की, त्यांचा माहितीचा मूळ अर्ज कांहीही कारण न देता जन माहिती अधिकारी यांनी परत केला आहे. त्यांना माहिती देण्यास नकार दिला असल्याने संबंधितांविरुध्द अधिनियमातील तरतुदींनुसार शास्तीची कारवाई करण्यात यावी असे तक्रारदारांचे म्हणणे आहे.

तक्रार अर्जावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिक्ारी यांनी त्यांचे दि. १३/७/२००९ रोजीचे लेखी निवेदन सादर केले. सदर निवेदनाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, तक्रारदारांचा माहितीचा मूळ अर्ज पोलीस आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात आला. त्यामुळे मूळ अर्ज तक्रारदारांकडे परत करण्यात आला असे त्यांचे म्हणणे आहे ते बरोबर नाही. तक्रारदारांना पाठवावयाच्या पत्रात श्री. हेन्री गॉडविन यांच्या नांवाऐवजी श्री. जेम्स गॉडविन यांचे नाव अनावधानाने लिहिण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या निवेदनात कबूल केले आहे.

तक्रारदारांच्या माहितीचा अधिकार अर्जात ज्या अर्जदाराने आधी केलेल्या तक्रारीचा उल्लेख केला आहे त्यासंबंधी कुठलेहि कागदपत्र पोलीस महासंचालक कार्यालयात सापडले नसल्याने व त्या तक्रारींचे विषय हे पोलीस आयुक्त कार्यालयाशी संबंधित असल्याने तक्रारदारांचा अर्ज जन माहिती अधिकारी पोलीस आयुक्त, मुंबई या कार्यालयाकडे पाठविणे माहिती अधिकार कायद्याशी विसंगत नाही. माझ्या अर्जाच्या संबंधात माहितीचा अर्ज संबंधित विभागाकडे न पाठविता (या केसमध्ये पोलीस आयुक्त कार्यालय) D.G.P. कार्यालयाने पोलीस आयुक्त कार्यालयाकडून माहिती मागवून घेऊन आपणास द्यावी असा आग्रह तक्रारदारास धरता येणार नाही.

श्री. हेन्री गॉडविन ऐवजी जेम्स गॉडविन लिहिल्याची चुक पोलीस महासंचालक कार्यालयाने प्रांजळपणे कबूल केली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २१ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४३११७/अपील क्रमांक४८८८ /०२**
**क्रमांक-मु.मा.आ/४३११६/अपील क्रमांक ४८८९ /०२**
**क्रमांक-मु.मा.आ/४३११८/अपील क्रमांक ४८९०/०२**

**श्रीमती. लक्ष्मी दिलीप लालका -----अपीलार्थी**
**इंद्रप्रस्थ पार्क, १०१, शिल्पी को.ऑप.हौ.सो. लि.**
**पारिजात इमारतीसमोर, ९० फूट रोड,**
**मुलुंड (पूर्व) मुंबई ४०० ०८१.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इ.प्र) -----उत्तरवादी**
**उपमुख्य अभियंता (BPES-MCGM) इमारत प्रस्ताव**
**पूर्व उपनगरे, राज लिगॅसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड ,**
**एल.बी.एस.मार्ग, विक्रोळी (पूर्व) मुंबई ४०० ०८३.**
**२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र)**
**उपमुख्य अभियंता (BPES-MCGM) इमारत प्रस्ताव**
**पूर्व उपनगरे, राज लिगॅसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड ,**
**एल.बी.एस.मार्ग, विक्रोळी (पूर्व) मुंबई ४०० ०८३.**

***---विवेचन---***

वरील तिन्ही अपीलांचा विषय एकच आहे व निलरेषा को.ऑप.हौ.सोसायटी लि. मुंबई या सोसायटीच्या पुनर्वसन इमारतींचे आराखडे व अनुषंगिक गोष्टी यासंबंधीचे आहेत.

याच विषयावर यापूर्वीहि दाखल केलेल्या अपील क्रमांक ४२८५ मध्ये अपीलार्थीनी संपूर्ण नस्तीची पाहणी केलेली आहे व अपीलार्थीस माहिती सुध्दा दिलेली असल्यामुळे ते निकाली काढण्यात आले होते.

या तिन्ही अपीलांच्या बाबतीत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन आयोगास दिलेले आहे.

" सदर इमारतीचे आराखडे सीई/४९५५/बीपीएस अन्वये तळमजला (स्टिल्ट) अधिक ३ माळयांपर्यंत मंजूर करण्यात आलेले आहेत व बांधकामाचे आरंभ प्रमाणपत्र स्टिल्ट स्लॅब पर्यंत देण्यात आलेले आहे. सदर इमारतीला एफ.एस.आय. एक पर्यंत मंजूरी देण्यात आलेली आहे. म्हणून कुठल्याही प्रकारची खुल्या जागेमध्ये अपूर्णता किंवा त्रुटी नाही. सदर जागेला लागणा-या अनिवार्य खुल्या जागेची कमतरता नसून त्याबद्दल भरावयाचे अधिदानाची गरज नाही. अपीलार्थींनी आतापर्यंत अनेक वेळा संदर्भित फाईलचे निरीक्षण करुन संपूर्ण कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागितल्या व त्या नियोजित रक्कम भरुन देण्यात आलेल्या आहेत.

दि. ११/६/२००९ रोजी सदर नस्ती संदर्भातील अपील निकाली काढण्यात आलेले आहे. "

अपील क्रमांक ४२८५ मध्ये दिलेला निर्णय व वरील निवेदन लक्षात घेता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या तिन्ही अपीलामध्ये दिलेला निर्णय बदलण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

***----आदेश---***

तिन्ही अपीले अमान्य करण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २१ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३४००/अपील क्रमांक४८९१ /०२

श्री. बाळकृष्ण बी. मांढरे/आनंदा लक्ष्मण पवार -----अपीलार्थी
रुम नं.६, सतीश नगर,
मॅच फॅक्टरी लेन, कुर्ला (पश्चिम) मुंबई ७०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) -----उत्तरवादी
तळमजला, टोपीवाला कॉलेज इमारत,
एस.एन.रोड, मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८४.

२.जन माहिती अधिकारी
उप जिल्हाधिकारी (अति/निष्का)
तळमजला, टोपीवाला कॉलेज इमारत,
एस.एन.रोड, मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८४.

---*विवेचन*---

अपीलाचा दिनांक .१०/८/२००९
सुनावणीची तारीख २१/१०/२००९
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी निवडणूकीच्या कामात व्यस्त असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

प्रथम अपीलाच्या निर्णयात अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी यांनी अपीलार्थीनी जो दि. १८/३/२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ अन्वये अर्ज दिलेला आहे त्याची माहिती विनामोबदला ७ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार अति/निष्का कुर्ला यांना दिलेले होते.

या आदेशानुसार दि. ४/६/२००९ रोजी अपीलार्थीस माहिती देण्यात आली.

दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे व अपिलीय अधिका-यांनी स्पेसिफिक डायरेक्शन द्यावेत अशी मागणी असल्यामुळे अपीलार्थीनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमाखालील अपीलार्थीनी माहिती मागतांना जे मुद्दे उपस्थित केले असतील त्यासंदर्भात रेकॉर्डला जशी कागदोपत्री माहिती असेल त्याप्रमाणे ती दिल्या जाते. अपीलार्थीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी उप जिल्हाधिकारी /अति-निष्का कुर्ला यांनी दि. २५/५/२००९ रोजी जे आदेश पारित केलेले होते त्याची प्रत दिलेली आहे. मात्र अपीलार्थी दिलेल्या माहितीने समाधानी नाहीत. अशा परिस्थितीत अपीलार्थीनी जो दि. ३/२/२००९ रोजी अर्ज केला होता त्या अर्जाशी संबंधित जी नस्ती कार्यालयात असेल ती संपूर्ण नस्ती अपीलार्थीस दाखवावी व नस्ती समजून घेण्यास अपीलार्थीस मदतहि करावी व अपीलार्थीस त्या नस्तीतील जे कागदपत्र पाहिजे असतील ते कागदपत्र त्यांना देण्यात यावीत असे निर्देश देण्यात येत आहेत.

अशी कागदपत्रांची तपासणी घेण्यासाठी अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात दि. ६ नोव्हेंबर, २००९ रोजी दुपारी ३-०० वाजता उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअगोदर त्यादिवशी अपीलार्थीस दाखवावयाच्या नस्त्या या तयार ठेवण्यात याव्यात व त्या नस्त्यांचे अपीलार्थींनी अवलोकन करुन त्यांनी मागितलेल्या अतिरिक्त माहितीचे कागदपत्र त्यांना देण्यात यावेत.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व अपीलार्थी यांनी वर दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २१ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४३४०१/अपील क्रमांक४८९२ /०२**

**श्री. आनंदा लक्ष्मण पवार -----अपीलार्थी**
**रुम नं.६, सतीश नगर,**
**मॅच फॅक्टरी लेन, कुर्ला (पश्चिम) मुंबई ७०.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (अति/निष्का) -----उत्तरवादी**
**तळमजला, टोपीवाला कॉलेज इमारत,**
**एस.एन.रोड, मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८४.**

**२.जन माहिती अधिकारी**
**उप जिल्हाधिकारी (अति/निष्का)**
**तळमजला, टोपीवाला कॉलेज इमारत,**
**एस.एन.रोड, मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८४.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १०/८/२००९**
**सुनावणीची तारीख २१/१०/२००९**

**अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी निवडणूकीच्या कामात व्यस्त असल्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत.**

**अपीलार्थी श्रीयुत आनंद लक्ष्मण पवार यांनी दि. १५ एप्रिल, २००९ रोजी अधिनियमाच्या कलम ६ अन्वये अर्ज करुन काळुबाई को.ऑप.सो. लि. व अकॉर्ड बिल्डर्स यांनी जे ॲनेक्चर-II रद्द करण्यासंबंधी अर्ज केला होता त्यासंदर्भात कांही माहिती विचारली होती.**

**सदर माहिती न मिळाल्यामुळे अपीलार्थी यांनी केलेल्या प्रथम अपीलावर दि.**

२०/५/२००९ रोजी आदेश देतांना जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी ७ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश दिलेले होते. त्यानुसार दि. ४/६/२००९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत पारित झालेले ॲनेक्चर II रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयास नाहीत म्हणून आपला अर्ज निकाली काढण्यात आलेला आहे असे अपीलार्थीस कळविण्यात आले. त्या माहितीने समाधान न झाल्यामुळे व अपीलार्थीस जन माहिती अधिका-यांकडून विवक्षित डायरेक्शन देण्यात यावे या मुद्दयांवर अपीलार्थींनी द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीस दिलेल्या माहितीने समाधान होत नाही तेव्हा अपीलार्थीस जो काळुबाई सोसायटीचा दि. २६ डिसेंबर २००८ रोजीचा अर्ज आहे त्या अर्जाशी संबंधित जी नस्ती असेल ती संपूर्णपणे नस्ती अपीलार्थीस दाखविण्यात यावी व नस्ती समजाऊन घेण्यास अपीलार्थीस मदत करण्यात यावी. तसेच या नस्तीतील जे कागदपत्र नोटशिटस्, किंवा इतर कोणतेही कागदपत्र अपीलार्थीस पाहिजे असतील तर त्याच्या प्रती अपीलार्थीस देण्यात याव्यात असे निर्देश सुनावणीच्या वेळेस देण्यांत आले.

विवक्षित मुदतीत कार्यवाही होण्याच्या दृष्टीने अशी तपासणी ही दि. ६ नोव्हेंबर, २००९ रोजी दुपारी ३-०० वाजता ठरविण्यात आलेली आहे. त्यावेळी अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून, जन माहिती अधिकारी यांनी यासंबंधित नस्त्यांचा अभ्यास करुन संबंधित नस्त्या तयार ठेवाव्यात म्हणजे अपीलार्थीस कागदपत्रांची तपासणी घेऊन त्यांना हवी असणारी कागदपत्रे मिळविता येतील.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व अपीलार्थी यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २१ ऑक्टोंबर, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३७८१/अपील क्रमांक४८९३ /०२
क्रमांक-मु.मा.आ/४३७८४/अपील क्रमांक४८९४ /०२

श्री. नामदेव काशिनाथ कांबळे -----अपीलार्थी
रामेश्वर चाळ कमिटी युनिट क्र. १५५९,
संदेश नगर, बैलबाजार, अंधेरी-कुर्ला रोड,
कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त -----उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय,
पी/ दक्षिण वार्ड , मिठानगर म्युनिसिपल शाळा इमारत,
मिठानगर, गोरेगांव (पश्चिम) मुंबई ४०० १०४.
२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (परि)
बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय,
पी/ दक्षिण वार्ड , मिठानगर म्युनिसिपल शाळा इमारत,
मिठानगर, गोरेगांव (पश्चिम) मुंबई ४०० १०४.

३. अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय,
पी/ उत्तर विभाग , मामलतदार वाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड (पश्चिम) मुंबई ६४.
४. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (परि)
बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय,
पी/ उत्तर विभाग , मामलतदार वाडी, लिबर्टी गार्डन,
मालाड (पश्चिम) मुंबई ६४.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ७/८/२००९
सुनावणीची तारीख २१/१०/२००९
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी , पी /दक्षिण विभाग उपस्थित,

**जन माहिती अधिकारी पी/उत्तर विभाग व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी पी/उत्तर विभाग व जन माहिती अधिकारी पी/दक्षिण विभाग यांच्याकडे दोन अर्ज दाखल केले होते. त्यात हवी असणारी माहिती ही एकच आहे. अपीलार्थीस परिरक्षण खात्यामार्फत रोड रिपेअर, ठेकेदार कोण आहेत, त्यांच्या चौक्या कोणकोणत्या ठिकाणी आहेत, चौक्यांचे पत्ते व इतर माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीस हवी असणारी माहिती ही एका अर्जाच्या संदर्भात अपीलार्थीस ९३६६/- रुपये भरावयास सांगितले व दुस-या अर्जाच्या बाबतीत अपीलार्थीनी मागितलेल्या माहितीचे निटसे आकलन होत नाही त्यामुळे प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

माहितीसाठी भरावयाचे शुल्क हे जास्त वाटत असेल तर विस्तृत माहिती विचारण्यापेक्षा ज्या कामाच्या ठेकेदारांच्या चौक्यांविषयी त्यांना माहिती पाहिजे असेल ती कामे विवक्षितपणे नमूद केल्यास त्यासंबंधीच्या नस्त्याहि परिक्षणासाठी उपलब्ध करुन त्यातील जी कागदपत्रे हवी असतील ती कागदपत्रे देता येऊ शकतील. मात्र अत्यंत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली तर ती देणे कार्यालयास अवघड होऊन बसेल.

तेव्हा अपीलार्थीनी विवक्षित कामांची नांवे दिल्यास त्यांना माहिती देणे सोईचे होईल हे जन माहिती अधिकारी , पी/ दक्षिण विभाग यांचे म्हणणे रास्त वाटते. त्याप्रमाणे अपीलार्थी यांनी विवक्षित कामे नमूद केल्यास त्याची माहिती अपीलार्थीस त्वरित देण्यात यावी असे निर्देश देण्यांत आले. अपीलार्थीस हवे असल्यास नस्तीची तपासणीहि त्यांनी करण्यास हरकत नाही.

***---आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २१ ऑक्टोंबर, २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३७६३/अपील क्रमांक४८९५ /०२

श्री. सु दाम बबन सावंत -----अपीलार्थी
रुम नं. ०२, रामचंद्र चाळ,
नवजाला हाजी बापू रोड, मालाड (पूर्व) मुंबई ९७.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त -----उत्तरवादी
परिमंडळ १२, शैलेंद्र नगर, दहिसर (पूर्व)
मुंबई ४०० ०६८.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,
कांदिवली (पूर्व) मुंबई ४०० १०१.

*---विवेचन---*

अपीलांचा दिनांक ३/८/२००९
सुनावणीची तारीख २१/१०/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थी श्री.सुदाम बबन सावंत यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याकरीता जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. १६/४/२००९ रोजी अर्ज केला होता. त्यात त्यांनी दिंडोशी पोलीस ठाणेस दाखल अदखलपात्र गुन्हा क्रमांक ८५७/०९ कलम ३२३, ४२७,५०४ भादवि संदर्भात केलेल्या कारवाईची माहिती विचारली होती. अर्जातील माहिती दिंडोशी पोलीस ठाणेशी संबंधित असल्याने दिंडोशी पोलीस

ठाणेकडून मागविण्यात आली. त्यात सदर प्रकरणाची चौकशी चालू असल्याबाबत अहवाल दिंडोशी पोलीस ठाणेकडून प्राप्त झाला तो अपीलार्थीनी दि. ६/५/२००९ रोजी स्वीकारला.

अपीलार्थीचे दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी व पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १२, मुंबई यांचेकडे अपील दाखल केले. सदर अपीलाची दि. ९/६/२००९ रोजी सुनावणी होऊन त्यात अपीलार्थी यांना चौकशी पूर्ण झाल्यावर माहिती पुरविण्यात यावी असे आदेश पारित करण्यात आले.

वरील आदेशाने समाधान न झाल्यामुळे अपीलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले. सदर अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिंडोशी पोलीस स्टेशनकडून कालच जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्यानुसार अपीलार्थीच्या तक्रारीत तथ्य नसल्याचे निष्पन्न झालेले आहे. अपीलार्थीस ही माहिती सुनावणी संपल्यानंतर लगेचच देण्याचे निर्देश देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २२ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४३८१७/अपील क्रमांक४८९६ /०२**

**मे. श्री जी & लाल, ॲड्व्होकेटस्** **-----अपीलार्थी**
**३३ , ५ वा मजला, कामेर इमारत,**
**३८ कावसजी पटेल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई ४०० ००१.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (सा.प्र)** **-----उत्तरवादी**
**जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.**

**२. जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस**
**जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत,**
**वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.**

***---विवेचन---***

**अपीलांचा दिनांक ७/९/२००९**
**सुनावणीची तारीख २१/१०/२००९**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

जन माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस, जिल्हाधिकारी मुंबई उपनगरे कार्यालय यांना अपीलार्थी यांनी दि. ३१ डिसेंबर, २००८ रोजी अर्ज देऊन दि. ९/४/२००७ रोजी केलेल्या अपीलाच्या सद्य:स्थितीची माहिती विचारली होती. दि.३१/१/२००९ रोजीच्या पत्राने विचारलेली माहिती प्रश्नोत्तरित स्वरुपात असल्यामुळे माहितीच्या अधिकारात येत

नाही.  मात्र प्रश्नाधिन प्रकरणातील उपलब्ध संचिकेची तपासणी अर्जदारास करता येईल असे कळविण्यांत आले.  याविरुध्द केलेल्या दि. १४/२/२००९ रोजीच्या प्रथम अपीलाचे आदेश दि. ७/९/२००९ रोजी देण्यांत आले.  त्यात अंतिम आदेश अर्जदाराला ज्या अपील प्रकरणाची माहिती पाहिजे आहे त्यात अद्याप अंतीम आदेश पारित केले नसल्याचे नमूद केलेले आहे.

अपीलार्थीस सदरचा आदेश प्राप्त होण्याच्या अगोदरच अपीलार्थींनी आयोगाकडे द्वितीय अपील सादर केलेले आहे.  प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यास उशीर लावण्याच्या संदर्भात अपिलीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

"  अपीलार्थी मे. श्री जी ॲन्ड लाल, ॲड्व्होकेटस् यांचेकडून दि. १७/२/२००९ रोजी अपील अर्ज प्राप्त झाला.  परंतु लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत बहुसंख्य अधिकारी/ कर्मचारी व्यस्त असल्याने अपीलार्थी मे. श्री जी. ॲन्ड लाल, ॲड्व्होकेटस् यांनी दाखल केलेल्या अर्जावर विहित मुदतीत निर्णय देता आला नाही.  त्यानंतर तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी हे टी.बी. ने आजारी असल्यामुळे रजेवर होते.  त्यानंतर जून महिन्यामध्ये त्यांची बदली झाली.  सध्याच्या निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास हे प्रकरण आणल्यानंतर तात्काळ दि. ३०/७/२००९ रोजी सुनावणी निश्चित करणेत आली होती. त्याबाबतचे पत्र अपीलार्थी यांना पाठविणेत आले होते.  परंतु प्रत्यक्ष सुनावणीचे वेळी अपीलार्थी अनुपस्थित होते.  त्यामुळे अपीलार्थींना सुनावणीची आणखी एक संधी देण्यासाठी दि. ५/८/२००९ रोजी ठेवण्यात आली.  सदर सुनावणीचे दिवशी मा.महसूल मंत्री यांचेकडे सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी गेलेले असल्याने सुनावणी होऊ शकली नाही.  त्यामुळे अपीलार्थींना दि. ६/८/२००९ ही तारीख देण्यांत आली.  परंतु दि. ६/८/२००९ रोजीच्या सुनावणीस अपीलार्थी पुनःश्च अनुपस्थित राहिले.  त्यावेळी अपीलार्थी यांचेशी संपर्क साधून त्यांना सुनावणीस येण्याबाबत सांगितले असता अपीलार्थी यांनी सुनावणीस येण्याबाबत असमर्थता दर्शविली.  सबब सुनावणीची पुढील तारीख दि. २०/८/२००९ देण्यांत आली.  दि. २०/८/२००९ रोजीच्या सुनावणीस अपीलार्थी उपस्थित

होते. परंतु अपिलीय अधिकारी यांना मा. महसूल मंत्री यांचेकडे सुनावणीसाठी उपस्थित रहावे लागले त्यामुळे सुनावणी होऊ शकली नाही.

तद्‌नंतर दि. २५/८/२००९ रोजी अपिलीय अधिकारी यांनी स्वत: अपीलार्थी यांचेशी दुरध्वनीवरुन संपर्क साधून सुनावणीसाठी बोलाविले असता संध्याकाळी सोयीची तारीख कळवितो असे त्यांनी सांगितले. परंतु अपीलार्थीनी याबाबत कांहीही कळविले नाही. त्यामुळे पुन्हा अपीलार्थी यांचेशी दुरध्वनी वरुन संपर्क साधून दि. २७/८/२००९ ते २९/८/२००९ यापैकी कोणत्या दिवशी सुनावणीसाठी उपस्थित राहणार असे विचारले असता अपीलार्थी यांनी या दिवशी सुध्दा सुनावणीस उपस्थित राहणेबाबत असमर्थता दर्शविली. अखेरीस अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांना सुनावणीची अंतिम संधी देण्यासाठी दि. ७/९/२००९ रोजी सुनावणी निश्चित केली व त्याबाबत त्यांचे कार्यालयाच्या दि. २६/८/२००९ च्या रजिस्टर्ड पत्रान्वये अपीलार्थी यांना दि. ७/९/२००९ रोजीच्या सुनावणीस उपस्थित राहणेच्या सूचना दिल्या. सदर रजिस्टर्ड पत्र अपीलार्थी यांना दि. ३१/८/२००९ रोजी प्राप्त झाल्याची पोचपावती उपलब्ध आहे. मात्र तरीही दि. ७/९/२००९ च्या प्रत्यक्ष सुनावणीस अपीलार्थी उपस्थित राहिले नाहीत. सबब शासकीय माहिती अधिकारी यांचेकडून सदर प्रकरणी स्पष्टीकरण घेऊन आदेश पारित करणेत आला व सदर आदेशाची प्रत अपीलार्थी यांना दि. १०/९/२००९ रोजी रजिस्टर्ड पोष्टाने पाठविणेत आली. सदर रजिस्टर्ड पत्र अपीलार्थी यांना दि. १२/९/२००९ रोजी प्राप्त झाल्याची पोचपावती उपलब्ध आहे. "

अपीलार्थीनी जी माहिती विचारली होती ती माहिती वास्तविक पाहता ती अंतिमत: अपीलार्थीस दि. १६/१०/२००९ रोजीच्या पत्राने कळविलेले आहे. ती माहिती अगदी सुरुवातीलाच दिली असती तर प्रथम अपील व द्वितीय अपील हे सर्व प्रकार टळले असते. आपले कर्तव्य योग्य प्रकारे पार न पाडल्याबद्दल शासकीय माहिती अधिकारी तथा अपर चिटणीस ,मुंबई उपनगर जिल्हा यांना समज देण्यात येत आहे, व त्यांच्या हातून अशा

प्रकारची पुनरावृत्ती झाल्यास त्याची गंभीर दखल घेतल्या जाईल असेहि निर्देश देण्यांत येत आहेत.

अपिलीय अधिकारी यांचा सुनावणीच्या विलंबाबाबतचा खुलासा हा एक अपवादात्मक परिस्थिती म्हणून मान्य करण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. २२ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/३६२२३ /अपील क्रमांक ३७८२/०२

श्री. मानसिंग पटेल -----अपीलार्थी
बी-७, सेवा को.ऑप.हौसिंग सोसायटी,
न्यू लिंक रोड, आदर्श नगर जवळ,
जोगेश्वरी (पश्चिम) मुंबई ४०० १०२.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहमुख्य अधिकारी -----उत्तरवादी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, तिसरा मजला, कलानगर,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक भू व्यवस्थापक (अंधेरी)
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, तिसरा मजला, कलानगर,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

***---विवेचन---***

अपीलाचा दिनांक निरंक
सुनावणीचा दि. १३ फेब्रूवारी, २००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. ८ फेब्रूवारी, २००८ च्या अर्जान्वये एकूण ७ मुद्दयांवर माहिती मागितली.

मुद्दा क्र.१ - त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या सर्व्हे नं. ४९, हिस्सा क्र.६, मधील प्लॉटस्‌चे

क्षेत्रफळ.

मुद्दा क्र.२. वरील प्रत्येक प्लॉटधारकाचे नांव

मुद्दा क्र.३ - वरील प्लॉटस् संबंधित ॲनेक्चर II ची झेरॉक्स प्रत.

मुद्दा क्र.४. - वरील प्लॉट समाविष्ट असलेल्या स्कीमचा आराखडा.

मुद्दा क्र.५ - रायगड मिलिटरी स्कूलला दिलेला प्लॉट व इतर प्लॉटस्च्या जमिनीची किंमत.

मुद्दा क्र.६ - अंधेरी गोरेगांव लिंक रोडच्या लगत असलेल्या प्रत्येक अनधिकृत बांधकामाचे क्षेत्रफळ.

मुद्दा क्र.७ - उपरोक्त जागेचा समावेश असलेल्या जागेचा आर्कीटेक्टने प्रस्तावित केलेला बांधकामाचा नकाशा इत्यादी.

उपरोक्त विषयावरील समाधानकारक माहिती न मिळाल्याने अपीलार्थींनी दि. १०एप्रिल, २००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. या अर्जानुषंगाने अपीलार्थींना दि. २१/४/२००८ रोजी खालील प्रमाणे उत्तर देण्यांत आले.

आपण मुळ माहिती अर्जाच्या प्रती सोबत न जोडल्यामुळे आपणांस हव्या असलेल्या माहितीचा काही बोध होत नाही. यास्तव आपण प्रत्यक्ष कार्यालयात येऊन किंवा अर्जाच्या झेरॉक्स प्रती कार्यालयास पाठवाव्या.

यानंतर प्रथम अपीलावरील सुनावणी दि. २१ मे, २००८ रोजी घेण्यांत आली व दि. २२/५/२००८ रोजी असे आदेशित करण्यात आले की, अर्जदारांना सहायक भू व्यवस्थापक, अधेरी यांनी १५ दिवसांत माहिती द्यावी. परंतु अपीलार्थींनी समर्पक माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले, जे आयोगास दि. १९/११/२००८ रोजी प्राप्त झाले.

यावरील सुनावणीचे वेळी अपीलार्थी हजर नसल्याने त्यांना नेमकी कोणती माहिती हवी आहे याची शहानिशा करता आली नाही. सुनावणीच्या वेळी प्रथम अपिलीय अधिकारी

उपस्थित होते. त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपीलार्थींना माहिती पुरविण्याबाबत दि. २२/५/२००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित नसल्याने त्यांनी अपीलार्थींना माहिती दिली आहे किंवा कसे याची निश्चिती होऊ शकली नाही. तरी सदर प्रकरणी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील मान्य करण्यात येत आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जावर दि. २२/५/२००८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार अपीलार्थींच्या मागणीनुसार त्यांना सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरवावी.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित नव्हते. तसेच त्यांनी अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीस अनुपस्थितीबाबत व माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत त्यांना अधिनियमाच्या कलम २० च्या तरतुदींच्या अधीन राहून दंडित का करण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. २९ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/३९८२२ /अपील क्रमांक ४२५४/०२**

**श्री. राजन रामचंद्र अलीमचंदनानी -----अपीलार्थी**
**४७, बी, व्हीनस सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**डॉ. आर.जी. थडानी मार्ग, वरळी, मुंबई ४०० ०१८.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सह सचिव -----उत्तरवादी**
**महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**२.जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

***---विवेचन---***

**अपीलाचा दिनांक १२ मार्च , २००९**
**सुनावणीचा दि. ४ मे, २००९**
**अपीलार्थी व अपिलीय अधिकारी उपस्थित, जन माहिती अधिकारी अनुपस्थित.**

**अपीलार्थीनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहितीचा अर्ज दि. २७ ऑक्टोबर, २००८ रोजी केला. सदर अर्ज मुद्रांक जिल्हाधिकारी, अंधेरी बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई यांच्या कार्यालयाशी संबंधित असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना दि. २०/११/२००८ च्या पत्रान्वये कळविले.**

**या उत्तराने अपीलार्थींचे समाधान न झाल्यांनी त्यांनी दि. ५/१२/२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर दि. ३०/१२/२००८ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. सुनावणीनंतर**

त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. १२ मार्च, २००९ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी आयोगाच्या असे निदर्शनास आले की, अपीलार्थी यांना माफी योजनेबाबत विभागाकडून सल्ला पाहिजे आहे. माहिती अधिकार तरतुदीनुसार सल्ला देणे हे अभिप्रेत नाही. त्यामुळे माफी योजना लवकरच संपत आहे याची अपीलार्थीस जाणीव करुन देण्यात आली व यासंदर्भात कोठे संपर्क साधण्यांत यावा याचा पत्ताहि देण्यांत आला हे योग्यच आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २९ ऑक्टोंबर, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार .

क्रमांक-मु.मा.आ/३८२३३/तक्रार क्रमांक २७३/०९/०२

श्री.रुद्रप्रताप अग्रवाल -----तक्रारदार
१०७/सी, सोहनी मॅन्शन, ऑगस्ट क्रांती मार्ग,
मुंबई - ४०० ०३६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा पोलीस आयुक्त -----उत्तरवादी
झोन नं.२, सर जे. जे. मार्ग, नागपाडा,
मुंबई ४०० ००८.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे.जे. मार्ग,
नागपाडा, मुंबई ४०० ००८.

*---विवेचन---*

तक्रारीचा दिनांक २/२/२००९
सुनावणीचा दिनांक ९/७/२००९
तक्रारदार व जन माहिती अधिकारी उपस्थित, अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

तक्रारदारांनी दि. २४/१०/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते. त्यावर सुनावणी होऊन आयोगाने आदेश क्र. रामाआ २००८/अपील क्रमांक ३२४४/०२ दि. २३/१२/२००८ अन्वये निर्णय दिला. सदरच्या निर्णयानुसार अपीलार्थींना १० दिवसांच्या आत म्हणजेच दि. ३/१/२००८ पर्यंत त्यांनी मागितलेली माहिती द्यावयाची होती. तथापि

त्याप्रमाणे अपीलार्थींना माहिती न मिळाल्याने त्यांनी दि. २/२/२००९ रोजी आयोगाकडे तक्रार दाखल केली.

तक्रारीवरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आपले दि. ५/७/२००९ रोजीचे लेखी निवेदन सादर केले. त्यानुसार तक्रारदारांस माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी दि. २/२/२००९ व २०/२/२००९ रोजी कळविले होते. तरीही तक्रारदार माहिती घेण्यास आले नाहीत. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलावरील दि. २३/१२/२००८ च्या आदेशानुसार तक्रारदारांस १० दिवसांच्या आत म्हणजेच ३ जानेवारी, २००९ पर्यंत माहिती देणे बंधनकारक होते परंतु तसे झालेले नसल्याने आदेशाचे उल्लंघन झाले आहे. तक्रारदारांच्या घरी निरोप पाठविण्यास अमलदार गेले असता तक्रारदार नव्हते व म्हणून माहिती समक्ष घेऊन जावी असा निरोप ठेवला होता.

तक्रारदारांच्या कलम ६ खाली केलेल्या अर्जात त्यांनी माहिती पोष्टाने पाठवावी असे लिहिले असेल तर जन माहिती अधिकारी यांनी ती त्यांना पोष्टाने पाठवावी. मात्र स्वतः येऊन घेऊन जाईल असे लिहिले असेल तर तक्रारदारांनी ती माहिती स्वतः घेऊन जावी.

*----आदेश---*

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २९ ऑक्टोंबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४१८६९ /अपील क्रमांक ४८३०/०२**

**श्री.इलियास इस्माईल ममदानी** ------- **अपिलार्थी**
**१८/१९, साई दर्शन सोसायटी,**
**एम.एच.बी.कॉलनी, शिया मस्जिदजवळ,**
**दिंडोशी, मालाड (पूर्व) मुंबई ४०० ०९७.**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहायक आयुक्त** ------- **उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ उत्तर विभाग (पी/नॉर्थ)**
**मामलतदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०६४.**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ/का)**
**बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/ उत्तर विभाग (पी/नॉर्थ)**
**मामलतदारवाडी, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम)**
**मुंबई ४०० ०६४.**

***-- विवेचन --***

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : १३.१०.२००८

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनांक : २०.११.२००८

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपिलाचा दि. : ०९.०१.२००९

प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि. : ३१.०१.२००९

द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : ०३.०७.२००९

सुनावणीचा दिनांक : २९/१०/२००९

अपिलार्थी : उपस्थित

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित

अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल : श्री. उमेश गोटेचा यांना पाठविलेल्या ३ नोटिशींबाबत विचारणा केली असून त्यासंबंधी कां कारवाई करण्यात आली नाही, कारवाई कधी होईल इत्यादी प्रश्न विचारले आहेत.

जन माहिती अधिकाऱ्याचे उत्तर : कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दुपारी ३-०० ते ५-०० या वेळेत जन माहिती अधिका-यांना भेटून माहिती घेऊन जावी असे अर्जदारास कळविण्यांत आले.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश : करण्यात आलेल्या कारवाईबाबतचे कागदपत्र विधी विभागाकडून मागवून ते ७ दिवसांच्या आत श्री. ममदानी यांना देण्यात यावेत.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती : प्रथम अपिलीय अधिका-यांच्या आदेशाची अंमलबजावणी झालेली नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी हे कागदपत्र सोबत आणले होते व ते सुनावणी झाल्याबरोबर लगेचच अपीलार्थीस देण्याचे निर्देश देण्यांत आले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना दि. ३१/१/२००९ रोजी माहिती देण्याचे आदेश देऊनहि जुलै मध्ये चार्ज सोडल्याच्या दिनांकापर्यंतहि अपीलार्थीस माहिती न दिल्याबद्दल त्यांच्याविरुध्द अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई कां करण्यात येऊ नये याबद्दलचा लेखी खुलासा आयोगास दि. १० नोव्हेंबर, २००९ रोजी सकाळी ११-०० वाजता येऊन सादर करावा.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.

सदर आदेशाची प्रत  वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही होण्याच्या दृष्टीकोनातून विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी  तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना त्यांचे स्तरावर पाठवावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक.  २९ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/४०३७५/अपील क्रमांक ४९१९/०२**

**श्री.अनिल सदाशिव गोलम ------- अपिलार्थी**
**ब-३१, साईसुमन सोसायटी, साईनाथ नगर,**
**द.ना.म्हात्रे मार्ग, एक्सर तलावजवळ,**
**बोरीवली (पश्चिम) मुंबई ४०० १०३.**

**विरूध्द**

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता ------- उत्तरवादी**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय (इमारत प्रस्ताव)**
**पश्चिम उपनगरे-२, आर विभाग, मुंबई.**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय (इमारत प्रस्ताव)**
**पश्चिम उपनगरे-२, आर विभाग, मुंबई.**

*-- विवेचन --*

**कागदपत्रांच्या त्रुटीची पूर्तता करुन सादर केलेल्या अपीलाचा दिनांक ३/८/०९**
**सुनावणीची तारीख २९/१०/२००९**
**अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

सागर सोसायटी बोरीवली पश्चिम येथील तळमजल्यावर मंजूर आराखडयाप्रमाणे दोन संडास बाथरुमच्या ऐवजी विकासकाने आपले सुसज्ज कार्यालय थाटले आहे याबद्दल केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती.

अपीलार्थीस मंजूर आराखडयात बदल केलेले आढळल्याने संबंधित बांधकाम मालक (सोसायटी) व वास्तु विशारद यांनी मंजूर आराखडयानुसार नसलेले बांधकाम काढून टाकावे वा नियमित करुन घ्यावे असे कळविण्यात आले असून त्यांनी तसे न केल्यास नियमानुसार त्यावर कारवाई करण्यात येईल असे कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे रेकॉर्डप्रमाणे असलेली जरी माहिती दिलेली असली तरी अपीलार्थींचे समाधान हे अनधिकृत वापर बंद होण्यानेच होणार असल्यामुळे महापालिका कायद्याअंतर्गत योग्य ती कारवाई त्वरेने करीत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेस सांगितले.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २९ ऑक्टोंबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली
तक्रार .

क्रमांक-मु.मा.आ/१४४६०/तक्रार क्रमांक१३ /०६/०१

श्री. सुनिल सतपाल जैन -----तक्रारदार
२०७/बी, आराधना अपार्टमेंट, स्प्रींग मिल कंपाऊंड,
जी.डी. अंबेकर रोड, दादर, मुंबई ४०० ०१४.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ०३९.

२.जन माहिती अधिकारी
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ०३९

*---विवेचन---*

तक्रारीचा दिनांक २/११/२००६
सुनावणीचा दिनांक १८/८/२००९
तक्रारदार उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार त्यांना ज्या दि. ९/१०/२००६ रोजीच्या पत्राने माहितीसाठी रु.१००/- शुल्क जमा करावे म्हणजे माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे जे पत्र पाठविले आहे ते पत्र प्रत्यक्षात दि. २३/१०/२००६ रोजी पोष्टात पडले व तक्रारदारांस ते

दि. २७/१०/२००६ रोजी प्राप्त झाले. म्हणून त्यांनी सदरची माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती केलेली आहे, व जन माहिती अधिका-यास शासन करावे अशीही आपल्या तक्रारीत विनंती केलेली आहे.

तक्रारदारांचे म्हणणे दि. १२/८/२००९ रोजी ऐकून घेण्यांत आले. त्यात असे दिसून आले की,

१. दि. ९/१०/२००६ रोजी पत्रावर सही झाल्यानंतर ते पोष्टात जायला २३ तारीख का उजाडावी . याची प्रशासकीय चौकशी करण्यात यावी व ज्यांनी कोणी कुचराई केली असेल त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात यावी.

२. तक्रारदारांस सदरील पत्र निश्चितपणे १ महिन्याच्या आत मिळणे आवश्यक होते, पण तसे त्यांना मिळालेले नाही म्हणून जी कागदपत्रे त्यांना देण्यांत येणार होती ती कागदपत्रे त्यांना दाखविण्यांत यावीत व त्यातील निवड केलेली कागदपत्रे त्यांना विनामूल्य देण्यांत यावीत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीयुत जावळे यांनी आपल्या कार्यालयातील पत्रव्यवहार हा तात्काळ डिस्पॅच होईल याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

*---आदेश---*

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. २९ ऑक्टोंबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३७९४/अपील क्रमांक ४९२०/०२

श्री. दिलीप पी. संपत ------- अपिलार्थी
फ्लॅट नं. १११, बी विंग, १ ला मजला,
२५-२६ मनिष नगर, चारबंगला,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५३.

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता ------- उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम वॉर्ड,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५३.

जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता(इ.व.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम वॉर्ड,
अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०० ०५३.

-- *विवेचन* --

अपीलाचा दिनांक १०/९/२००९
सुनावणीची तारीख २९/१०/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन सादर केले.

" श्री. दिलीप पी.संपत यांनी त्यांच्या दि. १७/६/२००९ च्या अर्जान्वये मनिष सनप-लॉवर, मनिष नगर, चारबंगला , अंधेरी (पश्चिम) येथील फ्लॅट क्र. ९ बी व ११ बी येथे

करण्यात येणा-या कारवाईबद्दल माहिती मागितली होती तथापि, उत्तर विहित वेळेत देणे शक्य झाले नाही. कारण त्याबाबतची सर्व कागदपत्रे वरिष्ठ अधिका-यांकडे अवलोकनार्थ पाठविण्यात आली होती. त्यानंतर दि. २०/७/२००९ रोजी अपीलकर्त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. या अपीलाची सुनावणी दि. ११/८/२००९ रोजी घेण्यांत आली. या सुनावणी आदेशामध्ये जन माहिती अधिका-यांनी ८ दिवसाच्या आत यासंदर्भात अपीलार्थीस उत्तर पाठविण्यास अपिलीय अधिका-यांनी सांगितले. जन माहिती अधिका-यानी दि. २८/८/२००९ रोजी पत्र क्र. सआकेप/११०३४/इवका/दोन अन्वये अपीलकर्त्यास उत्तर पाठविले. सदर प्रकरणात असे नमूद करु इच्छितो की, ओटल्याचा भाग रुममध्ये समाविष्ट करुन करण्यात आलेल्या बांधकामाबाबत अपीलकर्ता यांनी मनपा अधिनियमाच्या कलम ४८८ अन्वये नोटीस देऊन पुढील तोडक कारवाईबद्दल माहिती विचारली.

सदरहू दोन्ही ओटल्याच्या बांधकामावर मनपा अधिनियम कलम ३५१ अन्वये नोटीस बजाविलेली आहे.

नोटीसचा पाठपुरावा करुन यापूर्वी दोन्ही फ्लॅटधारकांवर मनपा अधिनियम कलम ४८८ नुसार नोटीस बजावून फ्लॅट क्र. ९ बी मधील ओटल्याचे बांधकाम दि. ७/११/०८ रोजी निष्कासित केले होते व फ्लॅट क्र.११ बी हा निष्कासनाच्या दिवशी बदल आढळल्याने निष्कासन कारवाई शक्य झाली नाही.

तद्नंतर वरील दोन्ही फ्लॅटधारकाने उप आयुक्त (परि-४) यांची प्रत्यक्ष भेट घेऊन विनंती केली की, बजाविलेल्या नोटीसीतील बांधकाम छोटया स्वरुपाचे असून ते मनपा परिपत्रकानुसार नियमित होण्यासारखे आहे व यापूर्वी त्यांनी मनपा कार्यालयांकडून तशी परवानगी घेतलेली होती असे निदर्शनास आणून दिले होते. त्यावर उप आयुक्त (परि ४) यांनी सदरहू बाबीची तपासणी होणे गरजेचे आहे. शिवाय तशा प्रकारचे परिपत्रक असल्याने तुर्त कारवाई न झाल्यास बरे होईल असे सुचविले होते.

अपीलकर्ता हा वारंवार या कार्यालयाकडे कारवाईबद्दल विचारणा करीत असल्याने या कार्यालयाने सविस्तर अहवाल कार्यकारी अभियंता के/पश्चिम यांना सादर केला होता.

त्यांनी क्र.सीई/४२६१६२/एक/२५.३.७६ हे परिपत्रक सादर करण्यास सांगितले होते व ते सध्या शोधले असून त्यांच्या निदर्शनास वप उपआयुक्त (परि-४) यांच्या निदर्शनास आणून त्यावर आवश्यक ते आदेश घेऊन पुढील कारवाई त्यानुसार करण्यात येईल. याबाबतची माहिती अपीलकर्ता यांना वेळोवेळी ते जेव्हा या कार्यालयात येत असे त्या त्या वेळी त्यांना तोंडी माहिती देण्यात आली होती.

सदरहू प्रकरणात परिपत्रकाच्या आधारे काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने मनपा कलम ४८८ ची नोटीस बजावूनहि बांधकामावर वेळेवर तोडक कारवाई झालेली नाही. परंतु याबाबत पुढे पाठपुरावा करुन आवश्यक ती कारवाई वरिष्ठाच्या आदेश प्राप्त करुन घेण्यांत येईल."

अपीलातील कागदपत्रे पाहिली असता तृतिय पक्षाने जेव्हा अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत हायकोर्टात धाव घेतली होती तेव्हा हायकोर्टाने याबाबतची कागदपत्रे विचारात घेऊन महापालिकेने आदेश द्यावेत असे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे वर दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेऊन व कारवाई करुन अंतिमतः अपीलार्थीस कळवित असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेला सांगितले.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. २९ ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३९७१/अपील क्रमांक ४९२४/०२

श्री. चेतन कोठारी ------- अपिलार्थी
५२, ओशियानिक अपार्टमेंट,
डॉ. राजाबली पटेल लेन, ऑफ बी. देसाई रोड,
मुंबई ४०० ०२६.

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप प्रमुख अभियंता (इ.प्र) ------- उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(इ.प्र)
पश्चिम उपनगरे,
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

*-- विवेचन --*

अपीलाचा दिनांक ४/९/२००९
सुनावणीची तारीख ३०/१०/२००९
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस धर्मनिहाय अनधिकृत बांधण्यात आलेल्या प्रार्थनास्थळासंबंधीची माहिती पाहिजे होती. अपीलार्थींचा दि. २१/३/२००९ रोजीचा मुळ अर्ज हा मुख्यालयाला करण्यात आला होता व त्यांनी ते अर्ज सहायक आयुक्त ए. ते टी विभाग, कार्यकारी

अभियंता (इ.प्र) शहर/पूर्व उपनगरे/ पश्चिम उपनगरे /प्रमुख अभियंता (वि.नि) यांना पाठविला व अपीलार्थीस माहिती देण्यास सांगितले.

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता के/विभाग (इ.प्र) यांनी असे कळविले की, अपीलार्थीस हवी असलेली माहिती ही इमारत प्रस्ताव विभागाकडे नसते. त्यामुळे अशा प्रकारची माहिती देता येत नाही हा प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता यांनी दि. २१ ऑगस्ट २००९ रोजी दिलेले आदेश हा योग्य वाटतो.

अपीलार्थी यांनी असे सांगितले की, त्यांना कांही वॉर्डकडून माहिती मिळालेली आहे व कांही वॉर्डकडून माहिती मिळालेली नाही. ज्या वॉर्डच्या संदर्भात माहिती मिळालेली नाही वा ती समाधानकारक वाटत नाही त्याबाबतीत ते प्रथम अपील व द्वितीय अपील तसेच तक्रार हा मार्ग चोखाळत आहेत.

***---आदेश---***

वर दर्शविलेल्या कारणासाठी अपीलार्थींचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. ३० ऑक्टोंबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०८७ /०२
क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०८८ /०२

श्री.पंडीतराव माधवराव गायकवाड -----अपीलार्थी
२३० साने गुरुजी नगर, मु.पो. ता. नांदगांव,
जिल्हा नाशिक - ४२३ १०६.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी -----उत्तरवादी
नगरपरिषद नांदगांव, जि. नाशिक.

२.जन माहिती अधिकारी
नगरपरिषद नांदव, जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री. श्री.पंडीतराव माधवराव गायकवाडयांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि ४/३/२००९ रोजी द्वितीय अपीले दाखल केली. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि १२/११/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

दि. १८/९/२००८ च्या पत्रान्वये जनहित याचिका व न्यायालयीन कामासाठी रु. ९७,५००/- च्या रक्कमेबाबत कोणतेही कागदपत्र नसतांना वारंवार वसूलीबाबत पत्रव्यवहार

करतात यासंबंधीची कागदपत्रे मागितली होती. जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले

दाखल केली.

रु. ९७,५००/- च्या वसूलीबाबतची कारवाई करण्याची माहितीच्या अधिकार कक्षेत येत नाही. यामुळे माहिती देता येत नाही असे प्रथम अपिलीय अधिकारी/ जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीचे वेळी प्रतिपादन केले. वसूलीच्या यादीतून अपीलार्थीचे नांव वगळण्यात यावे अशी अपीलार्थीची मागणी आहे. अपीलार्थी हे नांदगाव नगरपरिषदेमधून स्वच्छता निरीक्षक पदावरुन सेवानिवृत्त झाले आहेत. लेखा आक्षेपानुसार अपीलार्थीकडून सर्व रु. ९७,५००/- एवढी रक्कम वसूल करावयाची आहे. परंतु अपीलार्थीस न्यायालयीन आदेशान्वये उपदानाची रक्कम दिली असल्याने त्यांचे निवृत्तीवेतन बंद केले. आतापर्यंत दिले गेलेल्या निवृत्ती वेतनाची रक्कम वसूल करण्यात आली. त्यामुळे त्यांना पुन्हा निवृत्तीवेतन चालू करण्याची त्यांची विनंती मान्य करता येण्यासारखी नाही असे सदर प्रकरणी उपसंचालक ,नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे अभिप्राय आहेत. तसेच सदर प्रकरणी न्यायालयीन निर्णयानुसार कार्यवाही झाली असल्याचे उप संचालकांनी दि. २०/७/२००७ च्या पत्रान्वये मा. लोक आयुक्त कार्यालयास लेखी अहवाल सादर केला असल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी आयोगाच्या निदर्शनास आणले.

या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***---आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३०/१०/२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३९७८ /अपील क्रमांक ४९३१ /०२

श्री. दिवाकर आर. कोटियन व इतर -----अपीलार्थी
दुकान नं. ४/१०, महम्मद जान मुनिर चाळ,
साईवाडी, राजर्षि शाहू महाराज मार्ग,
अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०६९.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष) -----उत्तरवादी
झोन- III, बृहन्मुंबई महानगरपालिका के/पूर्व विभाग,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०६९.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका के/पूर्व विभाग,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०६९.

*---विवेचन---*

अपीलाचा दिनांक ११/९/२००९

सुनावणीची तारीख ३०/१०/२००९

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

श्रीयुत दिवाकर कोटियन यांनी दि. १६/५/२००९ रोजीच्या अर्जानुसार अपना घर सहकारी गृहनिर्माण (झो.पु.प्रा.) संस्था या संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेच्या संदर्भात अग्निशमन दल यांच्या कार्यालयाकडून सहायक अभियंता (इ.व.का) महापालिका के/पूर्व विभाग यांना पाठविण्यात आलेल्या पत्राची प्रत व त्यास दिलेल्या उत्तराची प्रत मागितली होती.

यासंदर्भात कुठलीच कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात नाही असे उत्तर अपीलार्थीस देण्यात आलेले आहे. याने अपीलार्थीचे समाधान झाले नसल्यामुळे केलेल्या प्रथम अपीलात ३० जून, २००९ रोजीच्या अर्जाने माहिती दिली नसल्यास ती माहिती ८ दिवसांत देण्यात यावी असे निर्देश देण्यांत आले. पण तरीही माहिती नसल्यामुळे माहिती देण्यांत आली नव्हती.

सुनावणीच्या वेळेला अग्निशमन दलाने लिहिलेल्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांना देण्यांत आली. यावर कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती १५ दिवसांत देण्याचे निर्देश देण्यांत आले.

----*आदेश*---

अपील निकाली काढण्यात येत आहे.

वर निर्देशिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१/१०/२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३९६८ /अपील क्रमांक ४९३२ /०२

श्री. श्रीकांत रामचंद्र रुईया -----अपीलार्थी
२०१/ए, कदमगिरी कॉम्प्लेक्स को.हौ.सो.
हनुमान रोड, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०० ०५७.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (विशेष) -----उत्तरवादी
झोन- III, बृहन्मुंबई महानगरपालिका के/पूर्व विभाग,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०६९.

२.जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका के/पूर्व विभाग,
आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०६९.

---*विवेचन*---

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ५/९/२००९

सुनावणीची तारीख ३०/१०/२००९

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

दि. २० जून, २००९ रोजीच्या आदेशाने अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी जन माहिती अधिका-यांस माहिती देण्यास सांगितले होते. मात्र ही माहिती अजूनहि देण्यांत न आल्याने सदरचे अपील केलेले आहे.

सुनावणीच्या वेळेला ज्यावेळी सदरील इमारतीची पाहणी करण्यात आली होती व सोसायटीकडून इमारतीचे नकाशे वगैरे गोष्टी मागण्यात आल्या होत्या, त्यापैकी पूर्ण नकाशे न मिळाल्यामुळे तसेच नंतर निवडणूकीच्या कामात व्यस्त असल्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात आली नाही व त्यामुळे कुठचीही माहिती देता येऊ शकली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

अपिलीय अधिकारी हे जन माहिती अधिकारी यांचे वरिष्ठ अधिकारी असल्यामुळे यासंदर्भात अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही १० दिवसांचे आत अपीलार्थीस देण्यांत यावी असे निर्देश देण्यांत येत आहेत.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ३१/१०/२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/४३९८८ /अपील क्रमांक ४९३३ /०२

श्री. दिपक महादेव सुर्वे -----अपीलार्थी
सुर्वे निवास, नौपाडज्ञ, राजू बडेकर मार्ग,
विद्याविहार रोड, कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता -----उत्तरवादी
उत्तर मुंबई (सार्वजनिक बांधकाम) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला, अंधेरी (पश्चिम)
मुंबई ४०० ०५८.
२.जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता
कुर्ला (सार्वजनिक बांधकाम) उपविभाग, कुर्ला,
नाझ हॉटेल समोर, अेल.बी.एस. मार्ग,
कुर्ला (पश्चिम) मुंबई - ४०० ०७०.

*---विवेचन---*

श्रीयुत दिपक महादेव सुर्वे यांनी आयोगाकडे दिलेल्या दि. २/९/२००९ रोजीच्या अपीलाची सुनावणी दि. ३०/१०/२००९ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. मात्र अपीलार्थी यांनी सुनावणीस उपस्थित राहिल्याबद्दल स्वाक्षरी करण्यास नकार दिलेला आहे. मात्र असे जरी असले तरी त्यांचा अपीलमेमो विचारात घेऊन व त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन निर्णय देता येईल.

अपीलार्थीस जी माहिती पाहिजे आहे ती माहिती अपीलार्थीस दिलेली आहे असे सुनावणीच्या वेळेस दिसून आले. तसेच यासंदर्भात संपूर्ण नस्तीहि अपीलार्थीस तपासणीसाठी उपलब्ध आहे व ते केव्हाहि त्या नस्त्याचे अवलोकन करुन अतिरिक्त कागदपत्रे प्राप्त करुन घेऊ शकतात. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश----***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

मात्र अपीलार्थीस नस्तीचे अवलोकन करुन इतर कुठच्याहि कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घ्यायची असतील तर त्यांना तशी मुभा आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१/१०/२००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ७५३/०२

श्री. राजेंद्र काळु नानकर -----अपीलार्थी
एन-५३, अे.जे. १/२६/५,
महात्मा फुले नगर, पवननगर,
सिडको, नाशिक -- ४२२ ००८.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा नोंदणी उपमहानिरीक्षक (मुख्यालय) -----उत्तरवादी
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक ,
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय, पुणे- १

२.जन माहिती अधिकारी
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक ,
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय, पुणे- १

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री. राजेंद्र काळू नानकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि २०/१२/२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि २७/०३/२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

श्रीमती प्रज्ञा बढे (मिसाळ), मुद्रांक जिल्हाधिकारी, नाशिक यांचेविरुध्द केलेल्या तक्रार अर्जावरील कारवाईची माहिती मागितली होती. तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हा निबंधक नाशिक यांच्याकडून अहवाल मागविला आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर अवगत करण्यात येईल असे अपीलार्थीस दि. ३/५/२००७ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे दि. २७/५/०७ रोजी अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजि केली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीच्या तक्रार अर्जावर योग्य ती चौकशी होऊन संबंधिताविरुध्द कारवाई केली आहे. तसेच अपीलार्थीस अवगत करण्यात आले असल्याचे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी प्रतिपादन केले. अपीलार्थी सुनावणीस अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे समजून घेता आले नाही. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ३१/१०/२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०९९/०२**

**श्री. दिपेश भाऊराव परदेशी ----- अपीलार्थी**
**२७२/७३, हडको कॉलनी,**
**दत्तमंदिराजवळ, येवला, ता. येवला.जि.नाशिक ४२३ ४०१.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.व.द.) -----उत्तरवादी**
**जिल्हा परिषद नाशिक.**

**२.जन माहिती अधिकारी**
**सार्वजनिक बांधकाम उपविभाग(इ.व.द)**
**येवला, ता. येवला, जि. नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलार्थी श्री. दिपेश भाऊराव परदेशी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि २४/१/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.**

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि १७/०७/२००८ रोजी अर्ज करुन संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना अंतर्गत सन २००६-०८ देबरगाव- पिंप्री रस्त्याची अनुषंगिक १८ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण, चुकीची माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नसल्याने व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

माहितीपोटी शुल्क रु. १३८/- भरण्यास अपीलार्थीस कळविले होते. अपीलार्थीनी शुल्क भरल्यानंतर एकूण ५९ पृष्ठे माहिती अपीलार्थीस दि. २२/८/२००८ रोजी प्रत्यक्ष कार्यालयात देण्यांत आली असल्याचे जन माहिती अधिका-यांनी व्दितीय अपीलाच्या सुनावणीचे वेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ३१/१०/२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ११०५/०२

श्री. सुनिल शिवराम पवार -----अपीलार्थी
घर नं. १३४/१३५ श्री संत गाडगे महाराज धर्मशाळा ट्रस्ट,
जुने नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी -----उत्तरवादी
प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, महानगरपालिका नाशिक,

२.जन माहिती अधिकारी
प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, महानगरपालिका नाशिक,

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री.सुनिल शिवराम पवार यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधि नियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि ५/१/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि २९/०५/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ यांना गाडगे महाराज विद्यानिकेतन म.न.पा. शाळा क्र. १६ बाबत दि. २२/४/०८ रोजी तक्रार अर्ज केला होता. त्या अर्जाची आपण चौकशी केली का१ केली असल्यास त्यात काय निष्पन्न झाले त्याबाबतची माहिती मागितली होती.

माहे मे २००८ मध्ये उन्हाळी सुट्टीचा कालावधी असल्याने शाळेबाबत सविस्तर चौकशी करण्यात आली नाही. शाळा सुरु झाल्यानंतर चौकशी करुन माहिती देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस दि. १२/६/२००८ च्या पत्रान्वये कळविले.

माहिती मिळाली नसल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली . आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती दि. १६/६/२००८ रोजी शाळा सुरु झाल्यानंतर देण्यात येईल असे जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस कळविले. त्यानंतर अपीलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत माहिती पुरवावी. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी स्वतः सुनावणीहि घेतली नाही व आदेशहि पारित केले नाहीत याबद्दल त्यांची विभागीय चौकशी करण्यात यावी.

*----आदेश---*

अपील मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती अधिका-यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

या आदेशाची प्रत उपसंचालक (शिक्षण), नाशिक विभाग यांनाहि प्रथम अपिलीय अधिका-यांविरुध्द कारवाई करण्यासाठी पाठविण्यात यावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ३१/१०/२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १११२/०२**

**श्री. आनंद भिकाजी तारु -----अपीलार्थी**
**इच्छामणी बंगला, पखाल रोड चौफुली,**
**सागर सम्राट स्विटच्या मागे, द्वारका, नाशिक.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक -----उत्तरवादी**
**सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**नाशिक.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहआयुक्त**
**अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,**
**आदिवासी विकास भवन, नाशिक.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. आनंद भिकाजी तारु यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि ६/०३/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि २५/०९/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. श्री.वैभव शकर बच्छाव ,केस नं. NSK/EDN/222/2001/USC दि.२३/१२/२००२

२. श्री.मिलिंद आनंद बच्छाव ,केस नं. NSK/SER/224/2004/ दि.२७/२/२००६

३. श्रीमती. हेमलता दत्तात्रय बच्छाव ,केस नं. NSK/SER/224/106/1997/HDB 250 दि.१०/४/२००६

सदर उमेदवाराचे प्रमाणपत्र ज्या कागदपत्राच्या आधारे समितीने वैध केलेले आहेत त्या संपूर्ण कागदपत्राच्या नस्तीच्या छायाप्रतीची मागणी केली होती.

जन माहिती अधिका-यांनी माहिती दिली नसल्याने अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिका-यांकडे अपील दाखल केले. श्रीमती. हेमलता बच्छाव यांची नस्ती उपलब्ध होताच कागदपत्र देण्यात येतील.

श्री. मिलींद बच्छाव यांच्या कागदपत्रांसाठी रु. ८८/- अधिक टपाल खर्च रु. २५/- इतके शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे दि. २२/१/०९ च्या पत्रान्वये प्रथम अपिलीय अधिका-यांनी अपीलार्थीस कळविले. जन माहिती अधिका-यांनी विहित मुदतीत माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी दि. १८/११/०८ च्या पत्रासोबत श्री. मिलींद बच्छाव व श्रीमती.हेमलता बच्छव्रव यांचे कागदपत्र देण्यासंबंधीचे संमतीपत्र सादर केले. श्री. उमेश बच्छाव यांची कागदपत्रे दिली नाही तरी चालेल असे कळविले. त्यानुसार अपीलार्थीस दि. ५/२/२००९ रोजी श्री. मिलींद बच्छाव व दि. १७/४/०९ रोजी श्रीमती. हेमलता बच्छावची माहिती अपीलार्थीस दिली असल्याचे जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रतिपादन केले.

भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत माहिती पुरविण्याची कार्यवाही न झाल्यास शास्तीची कारवाई करण्यात येईल अशी जन माहिती अधिकारी/ अपिलीय अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक ३१/१०/२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ११०९/०२

श्री. नईम अहमद अब्दुल अजीज ----- अपीलार्थी
रा.घ.नं. ४५२, ग.नं.२, जुनी मशिदजवळ,
बेलबाग मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा प्रशासनाधिकारी -----उत्तरवादी
मालेगांव महानगरपालिका शिक्षण मंडळ,
मालेगांव, जि. नाशिक.
२.जन माहिती अधिकारी तथा प्रशासनाधिकारी
मालेगांव महानगरपालिका शिक्षण मंडळ,
मालेगांव, जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री.नईम अहमद अब्दूल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि ४/०३/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि ६/११/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

१. मालेगांव मनपा शिक्षण मंडळातर्फे झालेल्या शिक्षण सेवक भरती २००७मध्ये किती उमेदवाराकडे खेळाचे प्रमाणपत्र आहे. तसेच त्यात राष्ट्रीय पातळीचे, राज्यपातळीचे व जिल्हा पातळीचे प्रमाणपत्र किती उमेदवारांनी जोडले आहे व कोणा कोणाकडून मिळालेले आहे त्यांची नांवे तपशीलासह देण्याचे करावे व प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रतही देण्याचे करावे.

२. ४०% टक्के गुणांची यादी लागल्यानंतर त्यात दुरुस्ती करण्यासाठी किती उमेदवारांचे अर्ज केले त्यांची नांवे व संख्या मिळणेबाबत.

३. किती उमेदवारांनी एलिमेंटरी व इंटरमिजिरचे प्रमाणपत्र जोडले त्यांची नांवे व प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत देणे

४. खेळाचे प्रमाणपत्रांचे मूल्यांकन कोणत्या विभागात केले जाते त्या विभागाचे नांव आणि पत्ता देण्यात यावा.

माहिती मिळाली नसल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

प्रथम अपीलावर दि. २६/२/२००९ रोजी सुनावणी देऊन आदेश पारित केले. शिक्षण मंडळाकडे भरती प्रक्रीया सुरु असल्याने माहिती दिली नव्हती. आता माहिती देण्यास तयार असल्याचे जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत अपीलार्थीस माहिती द्यावी

***----आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ३१/१०/२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०१४/०२

श्री. गोविंद पर्वतराव मोरे -----अपीलार्थी
रेश-पर्व, आनंदनगर, सोयगांव,
मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा धर्मादाय आयुक्त -----उत्तरवादी
नाशिक विभाग, नाशिक, जि. नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा सेक्रेटरी
अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जळगांव (नि.)
ता. मालेगांव, जि. नाशिक ४२३ २०४.

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री.गोविंद पर्वतराव मोरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि २९/०९/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २६/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि १२/०६/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जळगांव व संस्थेने गोविंदराव पाटील विद्यालयाबाबत एकूण ७ मुद्दयांवर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी मुद्देनिहाय माहिती दि. १९/६/२००८ च्या पत्रान्वये अपीलार्थीस पुरविली. जन माहिती अधिका-यांनी अपूर्ण माहिती पुरविली असल्याच्या कारणावरुन प्रथम
अपील दि. १९/७/२००८ रोजी दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. १६/८/२००८ रोजी आदेश पारित केले. अपीलार्थीस १५ दिवसाचे आत माहिती देणेबाबत जन माहिती अधिका-यांना आदेश दिले.

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी दोघेहि गैरहजर असल्याने व अपीलार्थीस माहिती मिळाली किंवा नाही हे समजून आले नाही. मात्र अजूनहि माहिती मिळाली नसल्यास त्यांनी जन माहिती अधिका-यांस तसे कळवावे व ५ दिवसांत जन माहिती अधिकारी यांनी माहिती द्यावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ३१/१०/२००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०११/०२**

**श्री. जे.एन. लगड -----अपीलार्थी**
**ज्येष्ठ नागरिक, जन.सेक्रेटरी अे-१,**
**पाटील प्राईड, दिपाली नगर, नाशिक- ४२२ ००९.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी -----उत्तरवादी**
**नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**विभागीय कार्यालय, गडकरी चौक, नाशिक (म्हाडा.)**

**२.जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी**
**नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,**
**विभागीय कार्यालय, गडकरी चौक, नाशिक (म्हाडा.)**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. जे.एन. लगड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि ०७/०८/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २६/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि ३०/०४/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

"कनिष्ठ लिपीक" पदास पात्र असतांना मुलाखतपत्र व नियुक्ती पत्र का दिले नाही याचा पूर्ण तपशील व दस्तऐवजाची मागणी केली होती. एकूण २० मुद्दयावर अनुषंगिक माहिती मागितली होती.

अर्जातील एका मुद्दयाची माहिती देण्यांत आली व क्र. १ ते १९ मुद्दयांबाबतची माहिती प्राधिकरण स्तरावरील असल्याने अपीलार्थीचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी प्राधिकरणास पाठविण्यात आला. माहिती अधिकार अधिनियम २००५ चा फलक तात्पुरत्या स्वरुपात सुरक्षित ठेवण्यात आला होता. कारण मंडळात रंगरंगोटी व दुरुस्तीचे काम सुरु असल्याने फलक काढण्यात आला. सदर फलक पुन्हा कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आला आहे असे जन माहिती अधिका-यांनी दि. ८/५/२००८ च्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविले. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही या कारणावरुन अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी न बोलावता आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिका-यांनी दि. ८/५/२००८, ५/६/२००८ व दि. ८/७/२००८ रोजी अपीलार्थीस पत्र पाठवून माहिती दिली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. निवड झालेल्या उमेदवाराबाबत मागितलेली माहिती कार्यालयातहि पाहण्यासाठी उपलब्ध होऊ शकेल असेहि जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविले. सदर प्रकरणी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले. अपीलातील कागदपत्रांची तपासणी केली असता अपीलार्थीस माहिती पुरविण्यात आली आहे. अपीलार्थी त्यांना हवे तर कोणतेहि कागदपत्र स्वतः बघून खात्री करुन घेऊ शकतात. त्यामुळे उत्तरवादींना शास्ती करण्याची अपीलार्थीची मागणी मान्य करण्याजोगी नाही. या परिस्थितीत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक ३१/१०/२००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १००५/०२

श्री. विश्वंभर रमेश श्रीनिवास -----अपीलार्थी
२६१-फ, सुतार लेन, पोष्ट ऑफिसजवळ,
मु.पो. भगूर, ता.जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) -----उत्तरवादी
जिल्हा परिषद नाशिक, जि. नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा सेक्रेटरी
साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ,
नाशिक रोड, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री. विश्वंभर रमेश श्रीनिवास यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि २१/०४/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २६/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि १२/११/२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ (ट्रस्ट) नाशिक रोड बाबत माहिती मागितली होती. अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संबंधित आहे.

संस्थेस कोणतीही शासकीय मदत मिळत नाही. त्यामुळे प्रस्तूत कायद्याच्या तरतुदी संस्थेस लागू होत नाहीत असे संस्थेच्या सचिवांनी अपीलार्थीस दि. १२/१२/२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलार्थींचे समाधान झाले नसल्याने अपीलार्थीनी दि. ७/१/२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले.

संस्था स्तरावरील माहितीसाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे अपिलीय अधिकारी नाहीत. तेव्हा संस्था स्तरावरील माहिती संदर्भात सहायक धर्मादाय आयुक्त, नाशिक हे अपिलीय अधिकारी असल्याने त्यांचेकडें प्रथम अपील दाखल करावे असे शिक्षणाधिका-यांनी अपीलार्थीस कळविले. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सार्वजनिक न्यास नोंदणी यांनी सदर प्रकरणी दि. २१/२/२००८ रोजी सुनावणी आयोजित केली. संस्थेने जन माहिती अधिका-यांची नेमणूक करावी. अपीलार्थीस माहिती पुरवावी असे दि. २७/२/२००८ रोजी आदेश पारित केले. यानंतरही माहिती मिळाली नसल्याने अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी "क" वर्ग कर्मचा-यांची सिनिऑरिटी लीस्ट आणली आहे. तसेच संस्थेच्या अनेक शाळा असल्याने इन्टर-से सिनिऑरिटी सुध्दा देण्याची तयारी संस्थेच्या प्रतिनिधींनी दर्शविली. पण अपीलार्थी माहिती घेत नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलार्थी सुनावणीच्या अगोदर जरी उपस्थित होते व त्यांनी उपस्थितीचा फॉर्म जरी भरला होता तरी नेमक्या सुनावणीच्या वेळी ते नव्हते. त्यांना माहिती पोष्टाने पाठविण्याचे निर्देश देण्यांत आले.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक ३१/१०/२००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०८५/०२

श्री. मधुकर सहादू नितनवरे -----अपीलार्थी
प्रविण टाईपरायटिंग इन्स्टिटयूशन,
शेतकरी संकुल, गाळा क्र.१, सिन्नर फाटा,
नाशिक रोड, नाशिक - ४२२ १०१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहकार आयुक्त व निबंधक -----उत्तरवादी
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ १०१.

२.जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था (आस्थापना) महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ १०१.

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री. मधुकर सहादू नितनवरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि २८/०२/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि २५/०९/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

सहकार विभागातील सरळ सेवेची पदे भरणेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन

अपीलार्थींनी प्रथम अपील दाखल केले. अपीलार्थी प्रथम अपीलावरील सुनावणीकरीता अनुपस्थित होते. अपीलार्थीस अपेक्षित असलेली सर्व माहिती दि. १०/११/२००८ च्या पत्रान्वये दिली असल्याचे नमूद करुन दि. ३/१/२००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थींनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सहकार विभागातील वरिष्ठ लिपीक पदाकरिता उमेदवार निवडपध्दतीत गुणदान करण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यपध्दतीत विसंगती असल्यामुळे उमेदवारास गुण देण्यास अन्याय झालेला आहे. सदर प्रकरणी न्यायालयात दाद मागण्यासाठी उपस्थित केलेल्या मुद्दयावर गुणदान करण्याच्या कार्यपध्दतीसाठी ज्या शासन आदेशाचा आधार घेण्यात आला त्या आदेशाच्या प्रतीची अपीलार्थींनी मागणी केली आहे. मौखिक परिक्षेकरीता गुणदान करण्याकरिता अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस माहिती पुरविली असल्याचे दिसते. परंतु शासन आदेशाच्या प्रती पुरविलेल्या दिसत नाहीत. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, गुणदान करण्यासाठी ज्या शासन आदेशाचा आधार घेतला त्या सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशाच्या प्रती अपीलार्थीस हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत पुरवाव्यात.

*---आदेश---*

अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०६५/०२**

**श्री. पंडित दाजिबा आहेर -----अपीलार्थी**
**मनिषा बंगला नंबर १३, रामदास स्वामी नगर,**
**गांधीनगरच्या मागे, नाशिक, ता.जि. नाशिक ४२२ ००६.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ----उत्तरवादी**
**जिल्हा परिषद नाशिक, नाशिक -- ०१.**

**२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
**(ल.पा.)विभाग पश्चिम, जिल्हा परिषद नाशिक.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. पंडित दाजिबा आहेर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि ३१/०७/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २६/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि १५/०९/२००६ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद नाशिक यांचे गोपनीय पत्र क्र. जिपना/बारवा/लपा/आस्था/१/२७९/९२ दि. २६/३/१९९२ अन्वये मुख्य कार्यकारी

अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांच्याकडे पाठविलेल्या चौकशी अहवालातील विसंगत मुद्दयांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी चुकीची माहिती दिली ती समाधानकारक माहिती नाही. यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. माहिती अपीलार्थीस पुरविण्याबाबत जन माहिती अधिका-यांना प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश दिले. परंतु जन माहिती अधिका-यांनी वर्षभर टाळाटाळ केली व माहिती दिली नाही. जन माहिती अधिका-यांच्या वरील कृतीने व्यथीत होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वृध्दापकाळात बंद केलेले निवृत्तीवेतन सुरु होणेबाबतची माहिती त्वरित द्यावी. अर्जातील लाभार्थ्यांबाबत माहिती द्यावी अशी अपीलार्थीनी सुनावणीचे वेळी मागणी केली. सुनावणकरीता जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित नव्हते. अपीलार्थीनी त्यांचे निवृत्तीवेतनाबाबत माहिती मागितली होती. अपीलार्थींचे निवृत्तीवेतन बंद केले आहे ते चालू करण्याबाबत अपीलार्थीची मागणी आहे. याबाबतची जी नस्ती कार्यालयात उपलब्ध आहे ती अपीलार्थीस दि. १ डिसेंबर, २००९ रोजी सकाळी ११-०० वाजता दाखविण्यात यावी व त्यांना ज्या कागदपत्रांच्या प्रती पाहिजे असतील त्या त्यांना देण्यात याव्यात.

***---आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०२४/०२

श्री. अन्सारी शमसुद्दोहा मो.युसूफ -----अपीलार्थी
रा. ३१२, रविवार वार्ड, किल्ला
मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त ----उत्तरवादी
नाशिक, जि. नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक विभाग, नाशिक.

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. अन्सारी शमसुद्दोहा मो.युसूफ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि ३०/१२/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २६/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि १०/०३/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद माहिती मागितली होती.

अंजूमन मोईनुतुल्ला एफ २५ चे बेकायदेशीर कार्याबाबत एकूण ९ मुद्दयांवर माहिती मागितली होती. माहितीपोटी रु. १२०/- शुल्क भरावे त्यानंतर माहिती देण्यात येईल असे

जन माहिती अधिका-यांनी दि. २६/३/२००८ च्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविले. जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस दि. ११/४/२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली.

जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती समाधानकारक नसल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस दिलेल्या माहितीचे समर्थन करुन प्रथम अपील दि. ४/७/२००८ रोजी आदेश पारित करुन फेटाळले. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

ट्रस्टच्या संदर्भात सार्वजनिक न्यास नोंदणीकरण कार्यालयात असलेली माहिती माहितीचा अधिक्-ार अधिनियम २००५ अन्वये दिलेली आहे. व ट्रस्टस्तरावर असलेली माहिती देण्याचे निर्देश ट्रस्टला देण्यांत आले आहेत. त्याची अंमलबजावणी पब्लिक ट्रस्ट ॲक्ट मध्ये ज्या तरतूदी असतील त्यानुसार सहायक धर्मादाय आयुक्त तथा अपिलीय अधिकारी यांनी करुन घ्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०६४/०२

श्री. फिरोज बादशहा -----अपीलार्थी
६६, गुरुवार वॉर्ड, मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) ----उत्तरवादी
जिल्हा परिषद नाशिक, जि. नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथ्‍ा मुख्याध्यापक
शेख उस्मान हायस्कूल, मालेगांव, जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलाचाचा दिनांक २९/८/२००८
सुनावणीचा दिनांक २६/१०/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. २३/६/२००८ च्या अर्जान्वये जानेवारी २००५ ते आजतागायत या कालावधीची विद्या परिषद, पालक शिक्षक संघ, इत्यादि बाबत एकूण चार मुद्दयांवर माहिती मागितली.

या माहिती अर्जाला दि. २१/७/२००८ रोजी उत्तर देण्यात आले. तथापि या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. २५/७/२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर दि. १८/८/२००८ रोजी सुनावणी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळी अपीलार्थी गैरहजर असल्याने दि. १८/८/२००८ रोजीच्या आदेशान्वये प्रथम अपील फेटाळण्यांत आले.

या आदेशाने व्यथित होऊन अपीलार्थीनी दि. २९/८/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. यावरील सुनावणीचे वेळी आयोगाच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार माहिती देण्यात आली आहे. सबब खालील प्रमाणे आदेश देण्या येतात.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०६१/०२

सौ. रेश्मा भैरवनाथ पवार -----अपीलार्थी
घर नं. ३४४६, चर्मकार लेन, चव्हाटा,
नाशिक- ४२२ ००१.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा आयुक्त ----उत्तरवादी
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
महाराष्ट्र राज्य, राजगड भवन, १ ला मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.

२.जन माहिती अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी)
नाशिक, जि. नाशिक.

---*विवेचन*---

अपीलाचाचा दिनांक २०/५/२००८
सुनावणीचा दिनांक २६/१०/२००९
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. २०/२/२००८ रोजी खालील माहिती मागितली.

१. अंगणवाडी सेविका पदांसाठी किती उमेदवारांचे अर्ज आले.

२. निवड पध्दती कशी अवलंबिली.

३. गुणवत्ता अनुभव यास प्राधान्य दिले काय

४.	निवड झालेल्या उमेदवारांना लावलेला निकष व गुणदान तक्ता.

उपरोक्त माहिती विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने त्यांनी दि. ७/४/२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर दि. ७/५/२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले. यानुसार अपीलार्थींना विनाशुल्क माहिती पुरविण्याचे निर्देश देण्यात आले. तथापि यावर समाधान न झाल्याने त्यांनी दि. २०/५/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमक्ष सादर केले की, अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार माहिती देण्यात आली आहे. याचा विचार करता खालील आदेश देण्यात येतात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०५३/०२**

**श्रीमती. निता सतिष कोठेकर -----अपीलार्थी**
**डी ४६१२, केशर शांती, लक्ष्मण रेखा अपार्टमेंट,**
**जुना आग्रा रोड, पंचवटी, नाशिक.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त ----उत्तरवादी**
**अन्न व औषध प्रशासन, उद्योग भवन,**
**सातपूर रोड, नाशिक.**

**२.जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (औषधे)**
**अन्न व औषध प्रशासन, उद्योग भवन, त्र्यंबक रोड,**
**नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलाचाचा दिनांक २६/१२/२००७**
**सुनावणीचा दिनांक २६/१०/२००९**
**अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.**

अपीलार्थीनी दि. १०/१०/२००९ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

१. औषध विक्री दुकानाच्या परवानगीसाठी नियम/अधिनियमाच्या प्रती.

२. लॅब सुरु करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या नियमाची प्रत.

३. औषध विक्री दुकान मालक आणि लॅबमालक यांचे नियमानुसार शैक्षणिक पात्रता प्राप्त केल्याचे दाखले.

अर्जासोबत माहिती नेमकी कोणाबद्दल हवी आहे याचे विवरण जोडले होते.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. ५/११/२००७ च्या पत्रान्वये उत्तर दिले. परंतु या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १२/११/२००७ रोजी प्रथम अपील केले. यावरील निर्णय दि. २०/१२/२००७ रोजी अपीलार्थीस कळविण्यात आला. यानुसार कागदपत्राच्या प्रतींचे शुल्क व टपाल खर्च असे एकूण रु. ४४/- भरुन त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावयाची होती.

अपीलाचा निर्णय व्यवस्थित दिला नाही तसेच दिशाभूल करणारी माहिती दिली या सबबीखाली त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व उत्तरवादी हजर नव्हते. अपीलासोबतची कागदपत्रे बघता असे दिसते की, अपीलार्थींना शुल्क भरल्यानंतर माहिती देण्याची तयारी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी दाखविली आहे. तरी त्यांनी शुल्काचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०७४/०२

श्री. जमिल अहेमद अब्दूल गफूर -----अपीलार्थी
सर्व्हे नं. ३८/३, प्लॉट नं. १६,
इस्लामपुरा वॉर्ड, मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ----उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
शहरी तथा ग्रामीण विभाग, मोती भवन,
इंडायत मळा, मालेगांव ४२३ २०३.

२.जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
शहरी तथा ग्रामीण विभाग, मोती भवन,
इंडायत मळा, मालेगांव ४२३ २०३.

***---विवेचन---***

अपीलाचाचा दिनांक ३०/९/२००६
सुनावणीचा दिनांक २६/१०/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीनी दि. ३/४/२००६ रोजीच्या अर्जाद्वारे जानेवारी २००४ ते एप्रिल २००६ या कालावधीची एकूण १३ मुद्दयांवर माहिती मागितली. या माहितीत ट्रान्सफॉर्मरची क्षमता, पॉवरलूमसाठी उपलब्ध करुन दिलेला विद्युतपुरवठा, त्यांच्या दि. २६/८/२००५ , ९/१/२००६, १८/२/२००६ च्या अर्जावरील कार्यवाहीचा तपशील, इत्यादिचा समावेश होता. या अर्जाला

जन माहिती अधिकारी यांनी दि. १७/५/२००६ च्या पत्रान्वये उत्तर दिले. परंतु या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. १२/६/२००६ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थींना दि. ५/७/२००६ च्या पत्रान्वये खुलाश्यात्मक उत्तर दिले. तथापि अपीलार्थींचे समाधान झाले नाही.

अपीलार्थींनी चुकीचे व असमाधानकारक उत्तर मिळाले आहे ही कारणे नमूद करुन आयोगाकडे द्वितीय अपील केले. यावरील सुनावणीचे वेळी अपीलार्थी तसेच उत्तरवादी गैरहजर होते. आयोगाकडे सुनावणीसाठी सादर केलेली कागदपत्रे बघता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे माहिती अर्ज व प्रथम अर्जाची वेळीच दखल घेतली आहे. तसेच वस्तुस्थितीवर आधारित माहिती अपीलार्थींना पुरविलेली आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येतात.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०६७/०२

श्री.मोहंमद मुस्तफा पीर मोहंमद -----अपीलार्थी
सिसन ७१७/७५, रविवार वॉर्ड ,
मालेगांव, जि. नाशिक

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त(सामान्य) ----उत्तरवादी
महानगरपालिका मालेगांव, जि. नाशिक

२.जन माहिती अधिकारी तथा आस्थापना पर्यवेक्षक
महानगरपालिका मालेगांव, जि. नाशिक.

---*विवेचन*---

अपीलाचाचा दिनांक ३/८/२००७
सुनावणीचा दिनांक २६/१०/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी दि. २१/५/२००७ च्या अर्जान्वये मागितलेल्या माहितीचा थोडक्यात तपशील खालील प्रमाणे आहे.

" श्री. मनोहर त्रिंबक अहिरे व महादू नथू पगारे या कर्मचा-यांकडे नॅशनल ट्रेड सर्टिफिकेट नसतांना त्यांच्या विरुध्द कारवाई झाली नाही तेव्हा याबाबत कारवाई करण्याची विनंती आहे. "

या अर्जाला उत्तर न मिळाल्याने त्यांनी दि. २७/६/२००७ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन दि. १९/७/२००७ रोजी खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आले.

" अमुक कर्मचा-यावर कारवाई का झाली नाही. अमुक बाबीस जबाबदार कोण आहे असे प्रश्न माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम २(फ) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नाहीत. इतर माहिती अर्जदर्झिंराला दिली आहे म्हणून अपील अमान्य करण्यात येत आहे."

या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थींनी दि. ३/८/२००७ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केले की, जी माहिती देता येणे शक्य आहे ती माहिती अपीलार्थींना दिलेली आहे. संबंधितांविरुध्द काय कारवाई करणार ही माहिती देता येणे शक्य नसल्याने दिलेली नाही. याबाबत आयोगाचे असे मत आहे की, जी कारवाई झ ालेली आहे तेवढी माहिती अपीलार्थींना देण्यात यावी. अपीलार्थींच्या कथनानुसार याआधी U.P.C. द्वारे पाठविलेली माहिती अपीलार्थींना मिळालेली नाही. तेव्हा तीच माहिती पुन्हा एकदा अपीलार्थींना पुरविण्यात यावी.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०६८/०२

श्री.महेमुद शाह हाजी गफुर शाह -----अपीलार्थी
४५, निहाल नगर गट नं. १,
मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी ----उत्तरवादी
शिक्षण मडळ, महानगरपालिका, मालेगांव,
जि. नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा शिक्षण विस्तार अधिकारी
पंचायत समिती मालेगांव, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलाचाचा दिनांक २५/११/२००८
सुनावणीचा दिनांक २६/१०/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीनी दि. २१/६/२००८ च्या माहिती अर्जाद्वारे खालील माहितीची मागणी केली.

१. शालेय पोषण आहार अंतर्गत मालेगाव शहरातील शाळांना पुरविण्यात आलेल्या पोषण आहाराबाबत चौकशी झाली काय १ व झाली असल्यास चौकशीच्या अहवालाची संपूर्ण माहिती.
२. किती शाळांमध्ये आहार दिला नाही याची चौकशी.
३. पोषण आहार न देणा-या शाळांविरुध्द काय कारवाई केली १

४. अशा शाळांसोबत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती.

५. पोषण आहार देणा-या शाळांना भेटी दिल्या असल्यास त्याचा तपशील

६. पोषण आहार न दिल्यामुळे यापासून विद्यार्थी वंचित राहिले यास जबाबदार कोण व त्यावर काय कारवाई केली.

७. तांदुळ व खाद्य वस्तु जप्त केल्या काय १

८. आहार न देणा-या शाळांना नोटीस दिली असल्यास त्याची प्रत.

९. पोषण आहार न देणा-या शाळांविरुध्द काय कारवाई केली.

१०. पोषण आहारासाठी शाळांना देण्यात येणा-या तांदुळ व इतर खाद्य पदार्थांचा तपशील.

यावर समाधानकारक उत्तर न मिळाल्याने त्यांनी दि. ६/९/२००८ रोजी प्रथम अपील केले. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केले की, मुदतीत माहिती उपलब्ध न झाल्याने अपीलार्थींना देता आली नाही. तथापि पुढील आठ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. तरी असे निर्देश देण्यात येतात की, अपीलार्थींना सदर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांचेवर रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरची शास्ती जन माहिती अधिकारी यांच्या दि. १ जानेवारी, २०१० रोजी मिळणा-या पगारातून वसूल करुन ती शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची जबाबदारी प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, मालेगांव महानगरपालिका, मालेगांव यांचेवर राहिल.

त्यांनी  शास्ती वसूलीचा अनुपालन अहवाल  दि. १५/१/२०१०  पर्यंत आयोगाच्या मुंबई कार्यालयात पाठवावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक.  ३१ ऑक्टोबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले
अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०४८/०२

श्री. दादासाहेब निवृत्ती गायकवाड -----अपीलार्थी
३, संतोषी कृपा , आडगांव नाका, पंचवटी,
नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष ----उत्तरवादी
महात्मा गांधी विद्यामंदिर, मालेगांव कॅम्प,
नाशिक, जि. नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
जनता विद्यालय, मानूर, ता. कळवण, जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलाचाचा दिनांक ११/१/२००८
सुनावणीचा दिनांक २६/१०/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थींनी दि. २१/८/२००८ च्या अर्जाद्वारे शाळेच्या शिक्षकांनी सिरोंचा येथे भेट दिल्याचे दाखवून केलेल्या भ्रष्टाचाराबाबत एकूण ५ मुद्दयांवर माहितीची मागणी केली.

माहिती अर्जाच्या उत्तरात जन माहिती अधिकारी यांनी रजा सवलत उपभोगलेल्या शिक्षकांची यादी, रजा प्रवास सवलत घेतल्याचा कालावधी इत्यादी कळविले.

या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थींनी दि. २४/९/२००७ रोजी प्रथम अपील केले. यावर दि. २५/१०/२००७ रोजी खालील निर्णय देण्यात आला.

"माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती योग्य व मुदतीत माहिती दिलेली आहे त्यामुळे अपील नामंजूर. "

या निर्णयाने व्यथित होऊन अपीलार्थींनी दि. ११/१/२००८ रोजी द्वितीय अपील केले. अपीलावरील सुनावणीचे वेळी अपीलार्थी व उत्तरवादी अनुपस्थित होते. अपीलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. अपीलार्थींच्या मूळ माहिती अर्जात त्यांनी भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित केला आहे. प्राप्त माहितीच्या अनुषंगाने ते भ्रष्टाचाराबाबत प्रशासकीय यंत्रणेकडे वेगळी तक्रार करु शकतात. भ्रष्टाचार झाला आहे किंवा नाही हे तपासणे व तसे अपीलार्थीस कळविणे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील "माहितीच्या" व्याख्येत बसत नाही. सबब खालील आदेश देण्यात येतात.

*----आदेश----*

अपील खारीज करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक १०४९/०२

श्री. सावळीराम राजाराम वाघ -----अपीलार्थी
भाग्यश्री कॉलनी, सारजाई बंगला,
जगताप मळा, विशाल हॉटेलच्या पश्चिमेस चर्च,
नामपूर रोड, मालेगांव कॅम्प , जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक ----उत्तरवादी
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण अधिकारी
जुना आग्रा रोड, नाशिक.
जनता विद्यालय, मानूर, ता. कळवण, जि. नाशिक.

*---विवेचन---*

अपीलाचाचा दिनांक ८/१२/२००७
सुनावणीचा दिनांक २६/१०/२००९
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीनी दि. ७/५/२००७ च्या अर्जान्वये उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नाशिक यांनी शिक्षकेतर कर्मचा-यांची अतिरिक्त पदे भरण्याबाबत शासनास पाठविलेल्या पत्राची प्रत मागितली. त्यावर दि. २८/५/२००७ रोजीच्या पत्राने माहिती दिली.

अपीलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. २२/६/२००७ रोजी प्रथम अपील केले. परंतु त्यावर दि. १/८/२००७ रोजीच्या पत्राने सद्यःस्थिती कळविली. यास्तव अपीलार्थींनी आयोगाकडे दि.८/१२/२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीचे वेळी अपीलार्थी व उत्तरवादी अनुपस्थित असल्याने अपीलार्थींनी त्यांच्या मागणीनुसार माहिती मिळाली की नाही याची शहानिशा करता आली नाही. सबब खालील आदेश देण्यात येतात.

१. अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी ते सुनावणीला कां उपस्थित राहिले नाही याचा खुलासा १० दिवसांचे आत आयोगास पाठवावा.

२. अपीलार्थीस सद्यःस्थिती कळविल्यानंतर संचालनालयाचे/ शासनाचे आदेश प्राप्त झ ाले असल्यास त्याच्या प्रती अपीलार्थीस देण्यात याव्यात.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ११२५ /०२**

**श्री. अन्सारी मोहमद गुफरान मोहमद युसुफ -----अपीलार्थी**
**७३६, अन्सार रोड, मालेगांव, जि.नाशिक.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) -----उत्तरवादी**
**जिल्हा परिषद नाशिक.**
**२.जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्य)**
**जिल्हा परिषद नाशिक.**

***---विवेचन---***

**अपीलार्थी श्री. अन्सारी मोहमद गुफरान मोहमद युसुफ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि२/१/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि १७/९/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.**

**१. श्री.शेख मुजीब शेख हारुन यांनी आपल्याकडे माहिती अधिकार अधिनियमानुसार प्रथम अपील दाखल केले असता आपण वरील संदर्भिय पत्रानुसार सुनावणी ठेवली होती. अपीलकर्त्याने मुख्याध्यापक टी.एम.हायस्कूल यांचेकडे पाठविलेला जोडपत्र अ ची प्रमाणित प्रत मिळावी.**

२. जोडपत्र अ  टी.एम.हायस्कूल येथे स्वीकारले गेले त्याच्या पोचची छायांकित प्रत मिळावी.

३. सदर जोडपत्र अ नुसार मुख्याध्यापक टी.एम.हायस्कूल यांनी माहिती दिली नाही. (अपीलकर्त्याच्या म्हणण्यानुसार) म्हणून शेख मुजीब हारुन आपल्याकडे प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलाची व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांची प्रमाणित प्रत मिळावी.

४. वरील विषयात नमूद केलेल्या सुनावणीच्या पत्राबाबत मुख्याध्यापक टी.एम.हायस्कूल मालेगांव यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. माअअ/अपी टीएम/२००८-०९ दि. ०२/९/२००८ रोजी रजि. पोष्टाने आपणास उत्तर दिले. सदर पत्र आपल्या कार्यालयात दि. ६/९/२००८ रोजी प्राप्त झाल्याची पोच शाळेकडे आहे. तसेच दि. ८/९/२००८ रोजी देखिल तेच पत्र आपल्या कार्यालयात प्रत्यक्ष दाखल केल्याची पोच शाळेकडे आहे. सदर पत्रावर आपल्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची प्रमाणित प्रत मिळावी.

५. दि. ८/९/२००८ रोजी सुनावणीसाठी आलो असता आपण दुस-या मिटींगसाठी निघून गेल्यामुळे सुनावणी झाली नाही. अधीक्षक श्री. देवरे यांनी रोजनामा तयार करुन पुढील तारीख दिली. सदर रोजनाम्याची प्रमाणित प्रत मिळावी.

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलार्थीनी दि. १४/११/०८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती तयार असून छायाप्रती देण्याची जन माहिती अधिका-यांनी कबूली दिली. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलार्थीस माहिती द्यावी. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यक ती

कारवाई करण्याची जन माहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी उभयतांना समज देण्यात येत आहे.

---*आदेश*---

अपील मान्य करण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ११३४ /०२**
**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ११३८ /०२**

**श्री. दिलीपकुमार गौरीशाकर अग्रवाल -----अपीलार्थी**
**रा. बोदवड, जिल्हा जळगांव.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.ंप) ---- उत्तरवादी**
**जिल्हा परिषद जळगांव, जि. जळगांव.**

**२.जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.ंप)**
**जिल्हा परिषद जळगांव, जि. जळगांव.**

***---विवेचन---***

**अपीलार्थी श्री. दिलीपकुमार गौरीशंकर अग्रवाल यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि २५/८/२००६ व २८/२/२००८ रोजी द्वितीय अपीले दाखल केली. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपिलीय अधिकारी उपस्थित होते. तसेच अपीलार्थी उपस्थित होते.**

**अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि६/५/२००६ व २०/११/२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.**

ग्रामपंचायत बोदवडचे ठरावाबाबत व आदेशाची अमलबजावणी करण्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी समाधानकारक माहिती दिली नाही. यामुळे अपीलार्थीनी दि.१९/६/२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी मुळ अर्जाप्रमाणे अपीलार्थीस सविस्तर माहिती दिली. पूर्ण माहिती दिली नाही. माहिती देणेस टाळाटाळ केली. कागदपत्राची पूर्तता केली आहे. कायद्याचे कर्तव्य करणे वेगळे व कागदपत्रांची पूर्तता करणे वेगळे. माहिती उशिरा देऊन फसवणूक केली असे मुद्दे उपस्थित करुन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर प्रकरणी अपीलातील कागदपत्रांची तपासणी केली असता असे दिसून येते की, अर्जातील नमूद मुद्दयानुसार जन माहिती अधिका-यांनी कागदपत्रांची पूर्तता केली असल्याची अपीलार्थीनी द्वितीय अपीलात कबूली दिली आहे. परंतु जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती अचुक आहे किंवा कसे याबाबत शंका व्यक्त केली आहे. दिलेली माहिती कार्यालयातील कागदपत्रावरुन तपासणी करुन द्यावी असा मुद्दा माहिती प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीनी उपस्थित केला आहे. अपीलार्थीस माहितीच्या सत्यतेविषयी शंका वाटत असल्यास मूळ कागदपत्रांची ते केव्हांहि तपासणी करु शकतात. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहेत.

***---आदेश---***

दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ११३३ /०२

श्री. जे. एन. लगड -----अपीलार्थी
श्रीराज बंगला नं. २०, मोदकेश्वर इंदिरा नगर,
ता. जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता ----उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक महानगरपालिका,
गांधी भवन, मु.पो.ता.जि, नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक महानगरपालिका,
गांधी भवन, मु.पो.ता.जि, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री. जे.एन. लगड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि २६/८/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते. सुनावणीच्या वेळी उत्तरवादींचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यांत आली.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि २६/५/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

वार्ड क्र. ६४ दिपालीनगर मधील धनसंपदा इमारत ते ब्रम्हांड बंगल्यापर्यंत खडीकाम गंभीर भ्रष्टाचार चौकशी व दस्तऐवज मिळणेबाबत मागणी केली होती. जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस माहिती दिली नाही. यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी आयोजित केली. माहिती दिली नाही. वैयक्तिक क्षमतेमध्ये अर्ज न करता संस्थेच्या नावाने अर्ज केला असून अपीलार्थीनी व्यक्तिगत अर्ज केल्यास पुढील यथायोग्य कार्यवाही करता येईल असे प्रथम अपिलीय अधिका-यांनी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी दिलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता अर्जावर अर्जदारांचे नांव, ज्येष्ठ नागरिक, व सेक्रेटरी ग्राहक पंचायत असे लिहिले आहे. अर्जावर नांव व ज्येष्ठ नागरिक असे स्पष्ट लिहिले आहे त्यामुळे अपीलार्थीनी संस्थेच्या नांवाने अर्ज केला आहे असे गृहित धरुन त्यांनी व्यक्तिगत अर्ज करावा असे सुचविणे अयोग्य आहे. माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाने सुध्दा अपीलार्थीस आवश्यक माहिती अथवा अपीलार्थीचे समाधान होईल असे समर्पक उत्तर द्यावे असे लिहिले असतांना सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी उचित कार्यवाही केलेली नाही. म्हणून माहिती देण्याचे बुध्दीपुरस्सर टाळले आहे असे आयोगास वाटते.

अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती अपीलार्थीस देणे आवश्यक आहे. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसाचे आत अपीलार्थीस माहिती द्यावी. तसेच माहिती देण्यास टाळाटाळ केल्याबद्दल व अपीलार्थीस दिर्घ कालासाठी माहितीपासून वंचित ठेवल्याबद्दल पूर्ण कालावधीची शास्ती न लावता रु. ५,०००/- ची शास्ती जन माहिती अधिकारी यांचेवर लादण्यात येत आहे. सदरची शास्ती ही त्यांच्या १ जानेवारी २०१० रोजी

होणा-या पगारातून वसूल करुन शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची जबाबदारी महापालिका आयुक्त, महानगरपालिका नाशिक यांचेवर सोपविण्यात येत आहे.

<u>*----आदेश---*</u>

अपील मान्य करण्यात येत आहे.

या आदेशाची एक प्रत महानगरपालिका आयुक्त नाशिक यांनाहि पाठविण्यांत यावी. त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर लादलेली रु. ५,०००/- ची शास्तीची रक्कम वसूल करुन तसा अहवाल आयोगाच्या मुंबई कार्यालयात दि. १५/१/२०१० पर्यंत पाठवावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ४१९ /०२
क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ६८९ /०२

श्री. गोविंद पर्वतराव मोरे -----अपीलार्थी
रेश पर्व, आनंदनगर, नववसाहत,
सोयगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सचिव ----उत्तरवादी
नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ,
जळगंव (नि) ता. मालेगांव, जि.नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
गो.य.पा. माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
जळगांव (नि) ता. मालेगांव, जि. नाशिक

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री.गोविंद पर्वतराव मोरे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि २९/९/२००७ व २९/९/२००८ रोजी द्वितीय अपीले दाखल केली. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.४/८/२००७ व ५/४/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

गो.य.पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील कर्मचारी ज्येष्ठ शिक्षिका सौ. प्रमिला मोरे, कनिष्ठ लिपीक श्री एन.एस.शिंदे श्री. रा.मु. आंबेकर तसेच मुख्याध्यापक यांचेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपीले दाखल केली.

दरम्यान जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस दि. १८/८/२००७ रोजी पत्र पाठवून असे कळविले की, अपीलार्थीस हवी असलेली सर्व माहिती ते शाळेत प्रत्यक्ष आल्यास उपलब्ध करुन दिली जाईल असे कळविले. अपीलार्थीनी माहिती टपालाने मागितली होती. म्हणून माहिती स्वीकारण्याकरिता ते शाळेत गेले नाहीत. जन माहिती अधिका-यांनी टपालातून माहिती अपीलार्थीस पाठविली नाही. प्रथम अपिलीय अधिका-यांनी प्रथम अपील अर्ज स्वीकारला नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपीले दाखल केली. उत्तरवादी द्वितीय अपीलावरील सुनावणीस अनुपस्थित होते. उत्तरवादीने प्रत्यक्ष भेटीच्या वेळी माहिती देण्याचे अपीलार्थीस कळविले होते. यावरुन अपीलार्थीस माहिती देणेकरिता तयार असावी असे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी टपालाने अपीलार्थीस हे आदेश मिळाल्यापासून ७ दिवसात माहिती पाठवावी.

तसेच सचिव, नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ यांनी अपीलार्थीचा अर्ज शाळेच्या प्रशासकीय बाबतीत असल्यामुळे त्याची माहिती सुध्दा अपीलार्थीस हे आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांत रजिस्टर्ड पोष्टाने पाठवावी.

----*आदेश*----

दोन्ही अपीले मान्य करण्यात येत आहेत.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले
अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ११४२ /०२

श्री. अब्दुल रहेमान मासुम अली शाह -----अपीलार्थी
सर्व्हे नं. २५, प्लॉट नं.२९, इमदाद नगर,
मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) ----उत्तरवादी
जिल्हा परिषद नाशिक.

२.जन माहिती अधिकारी
शिक्षणाधिकारी (माध्य) कार्यालय,
जिल्हा परिषद नाशिक.

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री.अब्दुल रहेमान मासुम अली शाह यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि १३/३/२००७ व २९/९/२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७/१०/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

श्री. अन्सारी गुफरान मुख्याध्यापक टि.एम. हायस्कूल, मालेगांव जि. नाशिक यांचे गैरकृत्य विरुध्द शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद नाशिक यांनी दि. १/१०/२००६ व दि. १५/२/०७ रोजी पोलीस आयुक्तांकडे तक्रार केली आहे त्याची प्रत व इतर अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल.

अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती उप शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या कार्यकक्षेतील नाही. माहिती कोणत्या कार्यालयाकडून उपलब्ध होईल याबाबत अपीलार्थीस ८ दिवसांत कळविण्यात येईल. याकरिता ८ दिवसांची मुदत द्यावी अशी जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी विनंती केली. तसेच सदर प्रकरणी कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीच्या प्रती देण्याचे कबूल केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी कबूल केल्याप्रमाणे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस द्यावी. इतर मुद्दयाबाबत ज्या कार्यालयाचा संबंध आहे त्या कार्यालयाकडे अपीलार्थीचा अर्ज माहिती पुरविण्याच्या सूचनांसह हस्तांतरित करावा. सदर कारवाई हे आदेश प्राप्त झालेपासून १० दिवसात करण्यात यावी.

## ---आदेश---

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

जन माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील नव्हती तर तो अर्ज त्यांनी तेव्हांच चौकशी करुन ज्या कार्यालयाशी संबंधित होता त्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक होते. असे न केल्याने माहिती देण्याच्या बाबतीत विलंब लावल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांचेवर रु. ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. ही शास्ती जन माहिती अधिकारी यांच्या १ जानेवारी, २०१० रोजी होणा-या पगारातून वसूल करुन

शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी. शास्ती वसूलीची जबाबदारी अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य)जिल्हा परिषद नाशिक यांचेवर सोपविण्यात येत आहे. त्याप्रमाणे त्यांनी शास्ती वसूल करुन अनुपालन अहवाल आयोगाच्या मुंबई कार्यालयास दि. १५/१/२०१० पर्यंत पाठविण्यात यावा.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ११४० /०२

श्री. अन्सारी मो.गुफरान मो.युसुफ -----अपीलार्थी
७३६, अन्सार रोड, मालेगांव,
ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा सचिव ----उत्तरवादी
कर्म.भा. हिरे शिक्षण संस्था, दाभाडी,
द्वारा टि.आर. हायस्कूल ॲन्ड ज्युनि.कॉलेज,
दाभाडी, ता. मालेगांव, जि. नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद, नाशिक.

*---विवेचन---*

अपीलार्थी श्री.अन्सारी मो.गुफरान मो.युसूफ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि १२/२/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२४/११/२००६ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

सन २००५-२००६ व २००६-२००७ या दोन वर्षात नाशिक जिल्हा शिक्षण प्रसारक मंडळातील सर्व शाळा, नाशिक संस्थेच्या सर्व शाळा, माध्यमिक विद्यालय, दिंडोरी वरील सर्व संस्था व शाळांमध्ये दिल्या गेलेल्या मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना दिल्या गेलेल्या वैयक्तिक मान्यता सरळसेवा व मान्यतेबाबत व इतर शाळासंबंधी अनुषंगिक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस दि. ११/१२/२००६ च्या पत्रान्वये सर्व संबंधित शाळा संस्थांचे पत्रव्यवहाराचे पत्ते अपीलार्थीस कळवून संबंधिताकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे अपीलार्थीस कळविले. तसेच अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती अपीलार्थीस परस्पर कळवावी अशा सर्व संबंधित संस्था/ शाळांना कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी सुनावणी घेतली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती संस्थास्तरावरील आहे. म्हणून माहिती संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी असे अपीलार्थीस कळविले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीचे वेळी प्रतिपादन केले. तसेच जन माहिती अधिका-यांनी असे प्रतिपादन केले की, सदर प्रकरणी सर्व संबंधित शाळा/संस्थांची माहिती अपीलार्थीस १५ दिवसात पुरविण्यात येईल. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिका-यांनी कबूल केल्याप्रमाणे अपीलार्थीस १५ दिवसात माहिती पुरवावी.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ७६५/०२
क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ७६७/०२
क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ७६८/०२
क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ७६९/०२

श्री. गोविंद पर्वतराव मोरे -----अपीलार्थी
रेश-पर्व, आनंदनगर, सोयगांव,
मालेगांव, ता. मालेगांव, जि. नाशिक.

विरुध्द

१. अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष -----उत्तरवादी
नाशिक जिल्हा अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ,
जळगांव (नि) ता. मालेगांव, जि. नाशिक.

२.जन माहिती अधिकारी तथा सेक्रेटरी
अहिल्यादेवी शिक्षण प्रसारक मंडळ, जळगांव (नि.)
ता. मालेगांव, जि. नाशिक ४२३ २०४.

*---विवेचन---*

उपरनिर्दिष्ट चार अपीलांच्या बाबतीत संस्थेचे अध्यक्ष व सचिवांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले आहे.

" आमची संस्था राज्य माहितीच्या अधिकाराचे व अधिनियम २००५ चे आदर करीत असून आम्ळी श्री. गो.प.मोरे यांना वेळोवेळी सर्व माहिती (उपलब्ध असलेली) दिलेली आहे. मात्र श्री. गो.प.मोरे हेच कायद्याचे पालन करीत नाही व माहिती मागवितांना रजिस्टर पोस्टाचा खर्च, नक्कल फी, छायांकित प्रतीचा खर्च देत नाही व नंतर माहिती मिळाली नसल्याचा कांगावा करुन अपील करतात. जेणेकरुन माहिती फुकटात प्राप्त व्हावी. श्री.

मोरे हे कधीच टपाल खर्च आगाऊ पाठवित नाही किंवा माहिती प्राप्त झाल्यावर सुध्दा देत नाही. यासंबंधाने आम्ळी आमचे स्पष्ट निवेदन आपणांस व मुंबई येथे पत्र क्र. ८२/०८-०९ दि. २५/८/२००८ नुसार दिलेले आहे व त्यात वस्तुस्थिती नमूद केलेली आहे. सदरहू पत्राची पुन्हा एक छायांकित प्रत आपणांस मागच्या अपीलाच्या वेळेस दि. २५/३/२००९ रोजी समक्ष दिलेली आहे. श्री. गो.प.मोरे हे बडतर्फ मुख्याध्यापक असल्याने निव्वळ त्रास देण्याच्या हेतूने माहिती मागवित असतात. त्यांनी चार्ज अद्यापहि न दिल्याने काही माहिती त्यांना मिळू शकत नाही व त्याला श्री.गो.प.मोरे हे स्वतः जबाबदार आहेत. आम्ही आतापर्यंत श्री. मोरे यांना वेळोवेळी खाली दिलेल्या विवरणानुसार नेहमीच माहिती पाठवित राहत आहे.

१. पत्र क्र. १२/०७-०८, दि. ८/८/०८

२. पत्र क्र. ०८/०७-०८ दि. १८/२/०८

३. पत्र क्र. ५७/०७-०८ दि. ४/३/०८

४. पत्र क्र. ५५/०७-०८, दि. २/५/०८

५. पत्र क्र. ५६/०८-०९, दि. ९/५/०८

६. पत्र क्र. ६४/०८-०९, दि. १९/६/०८

७. पत्र क्र. ७३/०८-०९, दि. २८/७/०८

८. पत्र क्र. ६०/०८-०९, दि. १९/५/०८

९. पत्र क्र. ७९/०८-०९, दि. ७/८/०९

१०. पत्र क्र. ३३/ दि. १९/३/२००८

तसेच

११. पत्र क्र. १२/०७-०८, दि. ८/८/०८

१२. पत्र क्र. ५७/०७-०८, दि. ४/३/०८.

यापैकी एकाही पत्राचे टपाल खर्चाचे RPAD चे पैसे व छायांकित प्रतीचे पैसे पूर्णतः श्री. मोरे यांनी दिलेले नाही, केवळ कायद्याचा मान ठेवून आम्ळी वेळोवेळी माहिती

दिलेली आहे. मात्र काही पत्रात श्री. मोरे धमकीवजा पत्र पाठवून असे का केले १ असे का केले नाही १ असे प्रश्न विचारतात जे नियमबाहय आहे. संस्थेचे सर्व व्यवहार त्यांनी येऊन पहावे आम्ळी अवलोकनार्थ देण्यास तयार आहोत ते प्रथम अपील करतात मात्र प्रथम अपिलीय अधिका-यापुढे कधीच हजर होत नाही. आमच्या मते पैसे न भरता माहिती प्राप्त करुन घेणे व आमचा मानसिक छळ करणे हा ऐकमेव उद्देश त्यांचा आहे असे वाटते. श्री. मोरे जर आकसबुध्दीने कायद्याचा आधार घेऊन छळ करीत असतील तर त्याला आळा घालणे व आम्हास मदत करणे हे कायद्याचे पण कर्तव्य आहे असे आम्हास वाटते.

आम्ही त्यांचे कुठलेच पत्र अस्वीकृत केलेले नाही. एखादे पत्र सचिव बाहेरगावी असल्यामुळे परत गेले असते तर तो अपवाद आहे. मात्र नकार दिलेला नाही.

आम्ळी पुन्हा नम्रपणे नमूद करतो की, अजूनहि त्यांना जी माहिती यदाकदाचित राहून गेली असेल तर ती संकलीत करुन आम्हास कळवावी व योग्य तो खर्च भरावा . माहिती लगेच नियमात बसत असेल तर पुरविण्यात येईल. मात्र प्रश्नवजा माहिती देता येणार नाही. उदा श्री. फसाले यांचा सेवा जेष्ठता क्रमांक ५ आहे तेव्हा त्यांना सेवाजेष्ठता डावलून पर्यवेक्षक नेमण्याचे प्रयोजन काय १ ही अंतर्गत बाब आहे व ज्या काही सेवाजेष्ठ कर्मचा-यांवर अन्याय झाला असेल ते दाद मागू शकतात. आम्ळी खुलासा देऊ. पण श्री. मोरे यांना आम्हास असे प्रश्न करण्याचा अधिकार आहे काय १ असे कित्येक घटना आहेत ज्यात श्री. मोरे यांनी धमकीवजा प्रश्न विचारलेले आहेत. आम्ही वेळोवेळी ही बाब आयोगाच्या (मुंबईपर्यंत) निदर्शनास आणली आहे. मात्र खेदाने नमूद करतो की यावर कुठलेही मार्गदर्शन किंवा कार्यवाही झालेली नाही.

शेवटी पुन्हा एकदा नम्र विनंती की, आपण वस्तुस्थितीचे गांभीर्याने अवलोकन करावे व श्री. मोरे यांनी राहिलेल्या माहितीबद्दल योग्य तपशील द्यावा व पैसे भरावे म्हणजे पुढील कार्यवाही करता येईल व श्री. मोरे यांना योग्यती समज द्यावी व निष्कारण होणारा मानसिक व आर्थिक छळ थांबवावा व संस्थेस न्याय द्यावा ही आग्रहाची व कळकळीची विनंती आहे. "

यावरुन हे स्पष्ट होते की, माहिती दाखविण्यास व ती देण्यास संस्थेची कुठलीहि हरकत नाही व माहिती त्यांनी दिलेली आहे. मात्र अपीलार्थी हे शाळेचे बडतर्फ मुख्याध्यापक आहेत, माहितीसाठी नियमाप्रमाणे ते शुल्क भरत नाही असे त्यांचे म्हणणे आहे.

तेव्हा सदरील अपीलांचा निकाल लावण्याच्या दृष्टीने असे आदेश देण्यात येत आहे की, अपीलार्थी श्री. गोविंद मोरे यांनी संस्थेच्या कार्यालयात दि. ७/१२/२००९ रोजी सकाळी ११-०० वाजता उपस्थित रहावे व अपीलार्थीस माहिती दाखविण्यात यावी व अपीलार्थींनी निवड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती शुल्क भरुन देण्यात याव्यात.

***---आदेश---***

चारहि अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

उपरनिर्दिष्ट आदेशाचे सर्व संबंधितांनी पालन करावे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ७८०/०२**

**श्री.(ॲड्) सुधाकर आर. जाधव -----अपीलार्थी**
**एन- ४१, जेए ३-१२/१ , सावता नगर,**
**४ थी स्कीम, नवीन सिडको, नाशिक.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता ----उत्तरवादी**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर.**

**२.जन माहिती अधिकारी**
**अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर.**

***---विवेचन---***

**अपीलाचाचा दिनांक ६/६/२००८**
**सुनावणीचा दिनांक २७/१०/२००९**
**अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.**

अपीलार्थीनी दि. १०/१२/२००७ च्या अर्जान्वये खालील माहितीची मागणी केली.

१. अधीक्षक अभियंता यांचे पूर्ण नांव, रुजू होण्याची तारीख, रुजू होण्याआधीच्या कार्यालयाचे नांव, मासिक वेतनाचा तपशील इत्यादी.

२. अधीक्षक अभियंता यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यकारी अभियंत्यांची नांवे, कार्यालयाचे पूर्ण पत्ते.

३.	सन २००६-२००७ साली मंजूर अनुदानाचा तपशील.

४.	अधीक्षक अभियंत्यांची ज्या व्यक्तींना/ संस्थांना धनादेश दिले असतील त्याचा तपशील कामांच्या नांवासह.

५.	सन २००७-२००८ मध्ये प्राप्त निधी व त्याच्या विनियोगाचा तपशील.

६.	अपिलीय अधिका-याचे नांव व पत्ता.

७.	अधीक्षक अभियंता यांच्या मासिक समरीच्या झेरॉक्स प्रती.

उपरोक्त माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे त्यांना दि. ५/१/२००८ रोजी कळविण्यात आले. यावर समाधान न झाल्याने त्यांनी दि. २०/३/२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु यावर निर्णय झाला नाही. म्हणून त्यांनी दि. ६/६/२००८ रोजी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. द्वितीय अपीलावर दि. २५/६/२००९ रोजी नाशिक येथे सुनावणी आयोजित केली होती. परंतु या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी गैरहजर होते. यास्तव पुन्हा दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी घेण्यांत आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी असे सादर केले की. अपीलार्थीच्या माहिती अर्जाला वेळेवर उत्तर देण्यात आले आहे व त्याचबरोबर असेही कळविण्यात आले की, त्यांनी कार्यालयात उपलब्ध राहून कागदपत्रे बघावीत व आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती शुल्क भरुन घेऊन जाव्यात. याचा विचार करुन असे निर्देश देण्यात येतात की, अपीलार्थींनी संबंधित कार्यालयात स्वत: जाऊन कागदपत्रे बघावीत व आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती शुल्क भरुन प्राप्त कराव्यात. याकामी कार्यालयाने त्यांना पूर्ण सहकार्य करावे.

*---आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९ 			राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**क्रमांक-मु.मा.आ/नाशिक/सीआर क्रमांक ११२० /०२**

**श्री. पंडितराव माधवराव गायकवाड -----अपीलार्थी**
**२३० साने गुरुजी नगर, मु.पो.ता. नांदगाव,**
**जिल्हा नाशिक.**

**विरुध्द**

**१. अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी -----उत्तरवादी**
**नगर परिषद नांदगाव, जि. नाशिक.**

**२.जन माहिती अधिकारी**
**नगर परिषद नांदगाव, जि. नाशिक.**

***---विवेचन---***

अपीलार्थी श्री. पंडितराव माधवराव गायकवाड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.५/३/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक येथे दि. २७/१०/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपीलार्थी अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि १५/१२/२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

"म. उपसंचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई ३० यांचे पत्र नपप्रस/२/५ एनअे/सेविव २००५/प्र.क्र. १०७/२५ दि. ६/१०/२००५ नुसार त्याच

कार्यालयाचे पत्र क्र. नपप्रस/मनासे/अनुश्रेय लाभ/२००४/प्र.क्र.७५९/५ दि. ०८/०२/२००५ नुसार नांदगाव नगरपालिकेने कोणते नियम नगरपरिषद कर्मचा-यांना लागू केले त्याच्या कागदपत्रांच्या प्रती मिळाव्यात. "

जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस दि. २४/१२/०९ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिका-यांनी चुकीची दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलार्थीनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिका-यांनी दि. ४/२/०९ रोजी सुनावणी आयोजित केली. परंतु प्रत्यक्षात कोणतेही कामकाज केले नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

उपसंचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय ,मुंबई यांच्या दि. ६/१०/२००५ व दि. ८/२/२००५ नुसार नांदगाव नगरपालिकेने कोणते नियम नगरपरिषद कर्मचा-यांना लागू केले त्या कागदपत्राच्या प्रतींची अपीलार्थीची मागणी आहे. नांदगाव नगरपरिषद कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू केले आहेत असे जन माहिती अधिका-यांनी अपीलार्थीस दि. २४/१२/०८ च्या पत्रान्वये कळविले आहे. नांदगाव नगरपालिकेच्या क्र. १६७ च्या ठरावाची प्रत, नगरपालिका प्रशासन संचालनालयाच्या दि. ३०/१०/१९८७ च्या परिपत्रकाची प्रत अपीलार्थीस पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. यावरुन सदर प्रकरणी मागणीप्रमाणे अपीलार्थीस जन माहिती अधिका-यांनी माहिती पुरविली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>*----आदेश----*</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(डॉ.सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक. ३१ ऑक्टोबर, २००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ६८०/०२**

**श्री. राजेंद्र काळु नानकर** **------ अपीलकर्ता**
**एन-५३, अे.अे.१/२६/५,महात्मा फुले नगर,**
**पवननगर,सिडका नविन नाशिक ८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**नोंदणी महानिरिक्षक, कार्यालय, पुणे**

**जन माहिती अधिकारी तथा**
**नोंदणी महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. राजेंद्र काळु नानकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२७.१०.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

"दि.३१.०३.१९९५ ते १९.०२.१९९६ दुय्यम निबंधक सिन्नर

दि.२०.०५.१९९८ ते ११.०७.१९९१ दुय्यम निबंधक सिन्नर

नाशिक शहरात दोन वेळेस सह. दुय्यम निबंधक वर्ग-२ नाशिक-२ एकाच पदावर एकाच जागी कुठल्या आधारे नेमणुक करण्यात आली त्याबाबत शासनाचे आदेशाची प्रत. वरील दोन्ही ठिकाणी दोन वेळेस एकाच पदावर एकाच जागी कुठल्या आधारे नेमणूक करण्यात आली. त्याबाबत शासनाचे आदेशाची प्रत.

एकाच जिल्हयात,एकाच शहरात कार्यकाल किती असावा, एकाच पदावर एकाच जागी दुय्यम निबंधकांचा कालावधी किती असावा त्याबाबत शासनाचे स्पष्टीकरणे व आदेश. एकाच जागेवर परत पोस्टींग करता येते का? त्याबाबत शासकीय व नोंदणी महानिरीक्षक यांचे आदेशाची प्रत.

सलग ८ वर्षे (१९९१ ते १९९८) एकाच पदावर नियुक्ती कोणत्या आधारे केली? त्याचे शासनाचे परिपत्रकाचे आदेशाची कॉपी.

जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.२४.११.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. मागितलेली माहिती मुद्याप्रमाणे नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपिलीय अधिकाऱ्याकडे अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

मात्र अपीलार्थीचे म्हणणे असे की त्यांनी अपील हे औरंगाबाद माहिती आयोगाच्या कार्यालयात केले आहे तेव्हा हे अपील त्याच आयुक्तांनी चालवावे. सध्या नाशिक विभागाचा कार्यभार औरंगाबाद राज्य माहिती आयुक्तांकडे आहे. औरंगाबाद विभागाचा कार्यभार फार अवजड असल्याने नाशिक विभागाच्या कांही अपीलांची सुनावणी स्वतः मुख्य माहिती आयुक्त सर्वांची सोय व्हावी, अपीलार्थी व सरकारी अधिकारी यांचा प्रवास खर्च व वेळ वाचावा म्हणून नाशिकला येऊन सुनावणी घेत असतात. या विशेष सुनावणीत अपीलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पूर्ण संधी देण्यात येते. निकाल आपल्याच बाजूने लागावा अशी मात्र अपेक्षा ठेवणे रास्त नाही. त्यामुळे अपीलार्थीची विनंती अमान्य करण्यात आली.

सहायक दुय्यम निबंधक वर्ग-२ नाशिक एकाच पक्षावर एकाच जागी कुठल्या आधारे नेमणूक करण्यात आली त्या आदेशाची प्रत, एकाच जागी दुय्यम निबंधकाचा कालावधी किती असावा याबाबत शासनाचे आदेश,एकाच जागेवर परत पोस्टींग करता येते की ? इत्यादी माहिती मागितली होती. नाशिक येथील दुय्यम निबंधकाची पदे राजपत्रित करण्यात आली आहेत. सदर पदावर श्री. धिवरे यांना ठाणे येथून पदोन्नतीने नियुक्ती दिली आहे. त्यांचा सेवाकार्यकाल पहावा एका पदावर ३ वर्षापेक्षा जास्त काळ नेमणूक दिलेली नाही असे जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**रेकॉडप्रमाणे माहिती दिली असल्याने**
**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४३९८६/अपील क्र.४९३८/०२**

**श्री. एडविन अल्फान्सो ------ अपीलकर्ता**
**२०१, हेरिटेज, म्हातार पाडा रोड,**
**ऑफ सिझर रोड, अंबोली,**
**अंधेरी (प), मुंबई ४०० ०५८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**उप प्रमुख अभियंता (इ.प्र) पश्चिम उपनगरे -१, बृहन्मुंबईमहानगरपालिका,**
**के वॉर्ड, आर. के.पाटकर मार्ग, वांद्रे (प), मुंबई ४०० ०५०**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (इ.प्र.), पश्चिम उपनगरे, बृहन्मुंबईमहानगरपालिका,**
**के वॉर्ड, आर. के.पाटकर मार्ग, वांद्रे (प), मुंबई ४०० ०५०**

## - विवेचन -

अपीलाचा दिनांक : ०३.०९.२००९

सुनावणीचा दिनांक : ३१.१०.२००९

अपीलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास सी.टी.सी.२५१ च्या व्हिलेज अंबोली च्या विकास प्रस्तावासंबंधी सादर केले गेलेले सर्व डॉक्युमेंट पाहिजे होते. अर्जदारास रेकॉडप्रमाणे माहिती देण्यात आली होती व अर्जदाराने स्वतः नस्तीचे अवलोकन केलेले आहे. अर्जदाराने सदरील प्रापर्टीच्याबाबतीत ज्या पॉवर ऑफ अटर्नी दिल्या गेल्या आहेत पटेल आणि कंपनीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी के वॉर्ड यांनी त्यांच्या लॉ ऑफिसरकडे सुध्दा प्रकरण संदर्भित केले होते व त्यांनी दि.२३.०९.२००९ रोजी दिलेल्या मताची काफपी सुध्दा अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात आली आहे व यासंदर्भात सद्यस्थिती १४ ऑक्टोबर २००९ रोजी कळविलेली आहे. त्यामुळे रेकॉर्डला असलेली सर्व डॉक्युमेंट ही अर्जदारास देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केलेला आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांक: ३१.१०.२००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४३९८०/अपील क्र .४९४०/०२**

**श्रीमती विलासीनी शिवराम पांचाळ ------ अपीलकर्ता**
**आग्रीपाडा, बी.आय.टी.चाळ, १३/१३,**
**माधवराव गांगण मार्ग, मुंबई ४०० ०११**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**विक्रीकर सहा आयुक्त, (मुख्या) १, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई ४०० ०१०**

**जन माहिती अधिकारी**
**ड-४,९ वा मजला, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई ४०० ०१०**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ०१.०९.२००९
सुनावणीचा दिनांक : ३१.१०.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलास अनुसरून पुढीलप्रमाणे निवेदन जन माहिती अधिकारी विक्रीकर आयुक्त यांनी दिलेले आहे.

" १. अर्जदाराने दि.२५.०३.२००९ च्या अर्जानुसार कालबध्द पदोन्नतीचा लाभ दि.१.१२.२००६ या अनुज्ञेय दिनांकापासुन मिळण्याबाबत तसेच सदर अनुज्ञेय दिनांकापासुन वेतननिश्चिती करुन सेवानिवृत्तीनंतर चे लाभ विहीत मुदतीत मिळण्याबाबत माहितीची मागणी केली होती.

२. सदर माहिती मिळण्याकरीता संबंधीत अधिकाऱ्यांकडे दि.३१.०३.२००९ रोजी पत्र पाठविण्यात आले.

१. संबंधित अधिकारी वि.उपा.(आस्ता) ४, म.रा. मुंबई यांनी त्यांच्या दि.२.०५.२००९ च्या पत्रान्वये अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तसेच त्यासंबंधीचे वित्त विभागास पाठविलेल्या पत्राची प्रत देण्यांत आली.

२. सदर पत्रानुसार प्राप्त झालेली माहिती या कार्यालयाच्या दि.२.०५.२००९ च्या पत्रान्वये अर्जादारास पुरविण्यात आली.

३. सदर माहितीच्या विरोधात अर्जदाराने प्रथम अपिलीय अधिकारी,विसआ(मुख्या)१ म.रा.मुंबई यांचेकडे प्रथम अपिल अर्ज विहीत मुदतीत दाखल केला. अपिलकर्ताचा अपिल अर्ज व राज्य शासकीय माहिती अधिकारी यांचे अभिलेख तपासल्यानंतर अपिलीय अधिकाऱ्यांनी अपिलकर्ताने उपस्थित केलेले मुद्दे हे प्रशासकीय विषयांतर्गत असल्याने व माहिती या सदरात येत नसल्यामुळे अपिल अर्ज दि.२०.०६.२००९ रोजी अमान्य केला व राज्य शासकीय माहिती अधिकारी यांचा दि.२.०५.२००९ रोजी दिलेला निर्णय कायम केला.

४. मी नम्र विनंती करतो की वरील निवेदन लक्षात घेऊन अपिलकर्तीचे अपिल खारीज करण्यात याव."

अर्जदार माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमाचा उपगोय त्यांना वाटत असलेल्या व त्यांच्यावर झालेल्या अंन्यायाचे परिमार्जन करुन घेत आहेत असे दिसते. विक्रीकर विभागाने जो त्यांच्या कालबद्ध पदोन्नतीबाबतचा निर्णय घेतलेला आहे त्यासंबंधी सर्व माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच यासंबंधातील कुठच्याही नस्ती त्यांना पाहतायेतील हे त्यांना कळविले आहे त्यामुळे रेकॉडप्रमाणे माहिती देण्याच्या बाबतीत काही कसुर झालेला आहे असे दिसत नाही. अर्जदारास मदत करण्याच्या दृष्टिने राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई यांनी सुध्दा त्यांच्या दि.२०.०८.२००८ रोजीच्या दुसऱ्या एका अपिलाच्या बाबतीत अर्जदाराची केस ही वित्त विभागाकडे पाठवावी असेही निर्देश विक्रीकर विभागाला दिले होते. मात्र माहितीच्या अधिकारामध्ये मुळ नस्तीतील निर्णय बदलून घेणे अभिप्रेत नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/३९९१५/अपील क्र .४९४१/०२**

**श्रीमती विलासीनी शिवराम पांचाळ ------- अपीलकर्ता**
**आग्रीपाडा, बी.आय.टी.चाळ, १३/१३,**
**माधवराव गांगण मार्ग, मुंबई ४०० ०११**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा -------- उत्तरवादी**
**विक्रीकर सह आयुक्त, (मुख्या) १, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई ४०० ०१०**

**जन माहिती अधिकारी**
**ड-४,९ वा मजला, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई ४०० ०१०**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ०७.१०.२००९
सुनावणीचा दिनांक : ३१.१०.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराने जे व्दितीय अपील सादर केलेले आहे त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

संदर्भाधिन पत्रानुसार श्रीमती विलासिनी पांचाळ, अर्जदार यांनी दाखल केलेल्या व्दितीय अपिलाच्या सुनावणीबाबत कळविले आहे. त्याबाबतचा अहवाल मी पुढीलप्रमाणे नम्रपणे सादर करीत आहे.

"१. अर्जदाराने दि.०२.०१.२००९ च्या अर्जानुसार कालबध्द पदोन्नतीचे आदेश काढतांना कोणते निकष लावले होते याबाबतची माहिती विचारली होती.

२. सदर माहिती मिळण्याकरीता संबंधीत अधिकाऱ्यांकडे दि.०३.०१.२००९ रोजी पत्र पाठविण्यात आले.

३. संबंधित अधिकारी वि.उपा.(आस्ता) ४, म.रा. मुंबई यांनी त्यांच्या दि.२.०२.२००९ च्या पत्रान्वये कालबध्द पदोन्नती आदेश काढतांना लावण्यात आलेल्या निकषाबाबत माहिती दिली तसेच त्याच्यापृष्टयर्थ पत्रासोबत शासन निर्णय,व आदेशाच्या प्रती जोडण्यात आल्या होत्या.

४. सदर पत्रानुसार प्राप्त झालेली माहिती या कार्यालयाच्या दिनांक ३.०२.२००९ च्या पत्रान्वये अर्जदारास पुरविण्यात आली.

५. सदर माहितीच्या विरोधात अर्जदाराने प्रथम अपीलीय अधिकारी, विसआ(मुख्या)१,म.रा.मुंबई यांच्याकडे प्रथम अपिल अर्ज विहीत मुदतीत दाखल केला. पदोन्नतीचा दिनांक योग्य आहे. अथवा नाही या निर्णयासंबंधी अपील होते. अपिकर्त्याने अपिल अर्जात उपस्थित केलेले मुद्दे हे प्रशासकीय विषयांतर्गत असल्यामुळे माहिती सदरात येत नसल्यामुळे तसेच राज्य शासकीय माहिती अधिकाऱ्यांनी या विषयी पुरविलेली माहिती योग्य असल्यामुळे अपिल अर्ज दिनांक २७.०२.२००९ रोजी नामंजुर करण्यात आला व दिनांक ३.०२.२००९ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासकीय माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय काय करण्यात आला. दि.२०.०८.२००९ रोजी माहिती अधिकारी यांनी व्दितीय अपिल पारित केला आहे.

६. प्रथम व व्दितीय अपील आदेशाची प्रत देवून संबंधित अधिकाऱ्यांना,प्रकरणातील बाबीचे पुनरावलोकन करुन योग्य ती कार्यवाही करण्याबाबत विनंती आली होती.

७. संबंधीत अधिकारी,विउआ(आस्था)४, म.रा.मुंबई यांनी त्यांचे दिनांक ८.०५.२००९ च्या पत्राव्दारे प्रकरणातील उपस्थित बाबीचा खुलासा केला तसेच अर्जदारास, त्यांचे संबंधित कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची धारीणी निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणार असल्याबाबत कळविले होते. सदर पत्र अर्जदारास दिनांक १५.०४.२००९ च्या पत्रान्वये पाठविण्यात आले व अर्जदार वि.उआ (आस्था)४,म.रा.मुंबई यांचेकडे जावून निरीक्षण करण्याची विनंती करण्यांत आली. वि.उआ (आस्था)४, म.रा. मुंबई यांना निरीक्षण देणेकरीता कळविण्यात आले.

८. मी नम्र विनंती करतो की वरील निवेदन लक्षात घेवून अपिलकर्तीचे अपिल खारीज करण्यांत यावे."

मी नम्र विनंती करतो की वरील निवेदन लक्षात घेऊन अपिलकर्तीचे अपिल खारीज करण्यात यावे. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकुण घेतल्यानंतर व कागदपत्रांचे विवेचन केले असता असे दिसून आले की अर्जदारास माहिती संपुर्णपणे देण्यात आलेली आहे. मात्र अर्जदाराचे समाधान हे त्यांना अभिप्रेत असलेल्या कालबध्द पदोन्नती मिळाल्यानेच होणार आहे. याबाबत राज्य माहिती आयुक्त बृहन्मुंबई यांनी त्यांच्या दि.२८.०८.२००८ रोजीच्या दुसऱ्या एका अपील संदर्भात विक्रीकर विभागाला वित्त विभागाकडे रेफरन्स करण्याचे निर्देश दिले होते व त्याप्रमाणे ते त्यांनी केले.सदरील आता आयोगाकडे जे अपील आहे त्यासंदर्भात मात्र उपलब्ध माहिती ही देण्यात आलेली आहे. अर्जदाराला नस्तीचे अवलोकन करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ३१.१०.२००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४३९८४/अपील क्र .४९४२/०२**

**श्री. अेम.पी.राज ------ अपीलकर्ता**
**पंचकलम,को.हौ.सोसायटी,**
**हिरानगर,नाहूर, गोरेगांव मुलुंड लिंक रोड,**
**मुलुंड (प),मुंबई ४०० ०८०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था-२,पूर्व उपनगरे, २ रा मजला,**
**कोकण भवन,बेलापूर,नवी मुंबई ४०० ६१४**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, टी विभाग,एससी कंपाउंड,**
**जे.एस.डी.मार्ग, मुलुंड (प),मुंबई ४०० ०८०**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ०१.०९.२००९

सुनावणीचा दिनांक : ३१.१०.२००९

अपीलार्थी : अनुपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या अपिलासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे निवेदन दिले.

" ॲडव्होकेट एम.पी.राज यांनी या कार्यालयाकडे दि.६.०४.२००९ रोजी पंचकमल को.हौ.सो.लि.,हिरानगर,गोरेगाव,मुलुंड लिंक रोड,मुलुंड (प) या संस्थेची १ ते २५ या मुद्यांवर माहिती मागितलेली होती. या कार्यालयाकडे संस्थेची मुळ नोंदणी धारिका आणि लगतच्या वर्षातील लेखापरिक्षण अहवाल हिच माहिती उपलब्ध आहे. त्याप्रमाणे श्री.एम.पी.राज यांना दि.२३.०४.२००९ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध असलेली माहिती घेऊन जाण्याविषयी कळविले आहे. त्याची प्रत सोबत जोडलेली आहे.

अर्जदार यांनी मागितलेली मुद्या क्र.३ व १२ (सी) वगळता सर्व माहिती संस्था स्तरावरील आहे. त्यामुळे ती या कार्यालयात उपलब्ध असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा ही

बाब ग्राहय धरलेली आहे आणि श्री.राज यांचे अपील फेटाळलेले आहे. सदर सुनावणीमध्ये सन २००७-०८ चा ऑडीट मेमो आणि - अ धारिकेतील माहिती घेण्याविषयी अर्जदारास सांगितले होते. कारण त्याचे अर्जात त्यांनी समक्ष येऊन माहिती घेऊन जाईल असे नमूद केले आहे.

तथापि सदर माहिती घेण्यासाठी श्री.राज समक्ष कार्यालयात आले नाहीत.

अर्जदार हे संस्थेचे सभासद असल्यास ते सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३२ अंतर्गत संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घेवू शकतात. त्यामुळे सदरचे अपील मान्य करण्यात येवू नये ही विनंती."

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या बाबतीत जन प्राधिकरणात असलेली माहिती अर्जदारास देऊकेलेली आहे व सहकारी संस्था स्तरावरील माहिती ही संस्थेकडूनच घेण्यास सांगितले आहे हे योग्य वाटते. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४३९८३/अपील क्र.४९४३/०२**

**श्री. रमेश केशव केणी ------ अपीलकर्ता**
**ऐ/८,किर्तीदा अपार्टमेंट, अेम.डी.केणी मार्ग, भांडुपगाव,**
**भांडुप (पुर्व),मुंबई ४०० ००२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता/सहायक मनपा आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एस विभाग, ला.ब.शा.मार्ग, मंगतराम पेट्रोल पंपाजवळ,**
**भांडुप,मुंबई ४०० ०७८**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा अभियंता (इ व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग, ला.ब.शा.मार्ग,**
**मंगतराम पेट्रोल पंपाजवळ,भांडुप,मुंबई ४०० ०७८**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०१.०९.२००९
सुनावणीचा दिनांक : ३१.१०.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती.

" तालुका कुर्ला, सर्व्हे नं.७६,हिस्सा नं.६, सीटीएस ३६८,भांडुप गांव, किणी वाडी,शुक्ला भवनाच्या बाजुला,सीएट टायर्स समोर, भांडुप गांव,भांडुप (पश्चिम), मुंबई ७८, येथील जागेवरील अनधिकृत बांधकामाबाबत."

सदरील बांधकामाबाबतची विभागात असलेली सर्व कागदपत्रे अर्जदारास दाखविण्यात आलेली आहेत असे दिसून आले. त्यांना जी कागदपत्रे पाहिजेत ती सर्व घेण्याची मुभा आहे त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४३९९१/अपील क्र .४९४४/०२**

**श्रीमती विजया संतोष कदम** **------ अपीलकर्ता**
**रमजान भटार चाळ, चाळ नं. २६३, डॉ.आंबेडकर चौक,**
**तक्यावार्ड, कुर्ला (प),मुंबई ४०० ०७०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**एस विभाग कार्यालय, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प) मुंबई ४०० ०७०**

**जन माहिती अधिकारी तथा**
**वरिष्ठ निरिक्षक (अनु), बृहन्मुंबई महानगरपालिका,एस विभाग कार्यालय,**
**लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प) मुंबई ४०० ०७०**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ०७.०९.२००९
सुनावणीचा दिनांक : ३१.१०.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराला आनंद गॅस एजन्सी बद्दल हवी असणारी माहिती दि.५.०५.२००९ रोजीच्या पत्राने दिली तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१५.०७.२००९ रोजी दिलेल्या आदेशात अर्जदाराने आवश्यक ती फी व पोष्टल चार्जेस भरावे तेव्हा त्यांना कागदपत्रांच्या प्रती देण्यात येतील असे आदेश दिलेले होते. त्यानुसार अर्जदारास रु.१०/- भरण्यासाठी कळविण्यात आलेले होते पण त्यांनी शुल्क न भरल्यामुळे माहिती दिलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले तेव्हा अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्याशी चर्चाकरुन असे ठरविण्यात आले की अर्जदाराचे प्रतिनीधी दि.५ नोव्हेबर २००९ या तारखेला शुल्क भरतील व माहिती अर्जदाराचे प्रतिनिधींना सूपुर्द करणत यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ७६४/०२**

**श्री. राजेंद्र काळु नानकर ------ अपीलकर्ता**
**एन-५३, अे.अे.१/२६/५,महात्मा फुले नगर,**
**पवननगर,सिडको नविन नाशिक ८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**नोंदणी महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे**

## - विवेचन -

अपीलकार श्री. राजेंद्र काळु नानकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२७.१०.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

"श्री.आर.एल.पाटील,सह दुय्यम निबंधक यांना नाशिक जिल्हयात पदस्थापना दिल्याबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. एकाच जागेवर परत पदस्थापना करता येते की इत्यादी शासन आदेशाच्या प्रतींची मागणी केली होती.

जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.२८.११.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. सविस्तर माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथित होऊन राज्य माहिती आयोगाकडे अपीलकाराने व्दितीय अपील दाखल केले.

श्री.पाटील यांची पदोन्नतीने नेमणूक नाशिक येथे झाली. तत्पूर्वी ते ठाणे येथे होते. त्यांचा सेवा कार्यकाल पहाता त्यांना एकाच पदावर ३ वर्षापेक्षा जास्त काळ नेमणूक दिलेली नाही. एकाच जिल्हयात किती

काळ ठेवावे याबाबत शासनाचे आदेश नाहित असे जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र. ७६३/०२**

**श्री. राजेंद्र काळु नानकर ------ अपीलकर्ता**
**एन-५३, अे.अे.१/२६/५,महात्मा फुले नगर,**
**पवननगर,सिडको नविन नाशिक ८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**जन माहिती अधिकारी तथा**
**नोंदणी महानिरिक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**- विवेचन -**

अपीलकार श्री. राजेंद्र काळु नानकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२८.०३.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

मुद्रांक परवाना नुतनीकरणासाठी ४ महिने एवढया उशिरा मुद्रांक परवाना दिला. याबाबत दि.१७.०७.२००६ रोजी तक्रार अर्ज केला सदर तक्रार अर्जावर कार्यालयाने केलेल्या कारवाईची माहिती मागितली होती.

श्रीमती प्रज्ञा बढे,मुद्रांक अधिकारी, नाशिक यांचेविरुध्द कार्यालयाकडे अपीलकाराने तक्रार केली होती. उक्त तक्रार अर्जाचे अनुषंगाने सह जिल्हा निबंधक, नाशिक यांचेकडून अहवाल मागविला आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर अवगत करण्यात येईल असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलकारास दि.३.०५.२००७ पत्रान्वये कळविले

माहिती प्राप्त झाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथित होऊन अपिलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

श्रीमती प्रज्ञा बढे,मुद्रांक अधिकारी, नाशिक यांनी अपिलकाराचा मुद्रांक परवाना नुतनीकरण करुन देणेसाठी पैशाची मागणी केली होती. परवाना उशिरा नुतनीकरण करुन दिला. याबाबतच्या तक्रारीवरील कारवाईची माहिती अपिलकाराने मागितली होती. सदर तक्रारीबाबत दोन अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्यात आली. श्रीमती बढे यांच्या कामकाजामध्ये दिरंगाई दिसून आली. तसेच पक्षकारांशी सौजन्नयाने वागणेबाबत सक्त ताकीद देऊन त्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात आली असल्याचे प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी अपिलकारास दि.२७.०२.२००८ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी आयोगास सादर करुन प्रतिपादन केले.यावरुन अपिलकाराने मागणी केलेली माहिती पुरविण्यात आली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०२९/०२**

**श्री. जयरामपंत नामदेवराव लगड ------ अपीलकर्ता**
**अे-पाटील प्राईड, दिपाली नगर,**
**नाशिक ४२२ ००९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**विभागीय कृषी सह संचालक, विभागीय कृषी सहसंचालक नाशिक विभाग,**
**नाशिक रोड,नाशिक,जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**अधिक्षक कृषी अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय,**
**नाशिक रोड, नाशिक,जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. जे.एन.लगड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.१२.२००८ रोजी व्दिय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, उपस्थित होते.अपीलकार उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२३.६.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

विभागीय कृषी सह संचालक, नाशिक रोड येथे लिपीक पदासाठी कु.अर्चना लगड यांना पात्र ठरवून नियुक्तीपत्र का देण्यात आले नाही त्याचे दस्तऐवजाची माहिती मागितली होती. एकूण १८ मुद्यांवर अनुषंगीक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.२९.०७.२००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले. माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१४.०८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय

अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केले. शुल्क वसूल करुन अपीलकारास माहिती द्यावी असे दि.१७.०४.२००९ रोजी आदेश पारित केले. अपिलकारास विनाशुल्क दि.२१.०४.२००९ रोजी माहिती पुरविली असल्याचे जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रतिपादन केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी विलंबाने माहिती पुरविली. यामुळे त्यांना उक्त अधिनियमातील कलम २० अनुसार शास्ती लादण्यात यावी असा अपीलकारानी युक्तीवाद केला. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकारी/प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कारवाई करण्याची दक्षता घ्यावी. अशी दोन्ही अधिकाऱ्यांना ताकीद देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र. १०९४/०२**

**श्री. ब्रिआन रॉड्रीग्स** ------ **अपीलकर्ता**
**१ ला मजला, पिंटो आर्केड II,**
**व्हिक्टरी सिनेमा जवळ, इगतपुरी ४२२ ४०३,**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------ **उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (माध्यामिक) जि.प.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपशिक्षणाधिकारी (माध्यामिक)) जि.प.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १.२.२००९
सुनावणीचा दि.२७.१०.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.१२.०८.२००८ च्या अर्जान्वये खालील माहितीची मागणी केली.

"Details of the status and progress of action taken (penal deternt and correction action) against the Head Mistress of Holy fanuly Convent High School, lgatpuri on the basis of his application date २३.०७.२००८"

तथापि अपीलार्थीना माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.१६.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर दि.३.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली. सुनावणीवरील आदेशानुसार तक्रारीवरील केलेल्या कार्यवाहीचा तपशील अपीलार्थींना दि.५.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी कळविला. यावर समाधान न झाल्याने अपीलार्थींनी दि.१.२.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की अपीलार्थींना त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील कळविण्यात आला आहे. आयोगासमोर सादर केलेल्या कागदपत्रांवरून असे दिसून येते की अपीलार्थींना माहिती पुरविण्यात

आली आहे. तक्रारीतील प्रशासकीय बार्बीबाबत अपीलार्थी सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठपुरावा करु शकतात कारण की कार्यवाहीकरण्याची बाब माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतूदींच्या अधिन येत नाही.सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येतात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०९२/०२**

**श्री. विजय पुनम पवार** ------ **अपीलकर्ता**
**गट नं.२१६,प्लॉट नं.१४/१५,**
**रुम नं.०३, स्वामी समर्थ रो हाऊसेस अशोक नगर,**
**सातपूर,नाशिक ०७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता ल.पा.(पश्चिम विभाग) सिंचन विभाग,**
**जि.प.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता ल.पा.(पश्चिम विभाग) सिंचन विभाग,**
**जि.प.नाशिक**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ५.०२.२००९
सुनावणीचा दि. २७.१०.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.०८.०९.२००८ च्या अर्जान्वये खालील माहितीची मागणी केली.

१. अपीलार्थीच्या दि.७.०३.२००८ व ३१.०७.२००९ च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा तपशील.

२. श्री.गवळी शाख अभियंता व श्री.चौधरी,उप अभियंता यांनी केलेल्या कामाच्या चौकशीचा अहवाल.

उपरोक्त माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि.१४.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर निर्णय देतांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमूद केले की संबंधितांनी केलेल्या भ्रष्टाचाराबाबतची चौकशी सुरू आहे तेव्हा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर त्याबाबतची माहिती पुरविण्यात येईल.

या निर्णयाने समाधान न झाल्याने त्यांनी दि.५.०३.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की चौकशी अहवाल प्राप्त झाला

असून त्याबाबत दि.१५.०९.२००९ रोजी अपीलार्थींना अवगत करण्यात आले आहे. याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ४.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०९०/०२**

**श्री. पंडीतराव माधवराव गायकवाड** ------ **अपीलकर्ता**
**साने गुरूजी नगर, रा.नांदगांव,**
**जि.नाशिक ४२३ १०६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**मुख्याधिकारी नगरपरिषद नांदगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रभारी लेखा शाखा नगरपरिषद नांदगांव**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : १९.०१.२००९
सुनावणीचा दि. २७.१०.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.१७.११.२००८ च्या अर्जान्वये नगरपरिषदेच्या सन १९८५-८६ च्या तपासणी अहवालातील परि.क्र.९ मध्ये दिलेल्या प्रकरणाबाबतच्या तपशीलाची मागणी केली. या अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी दि.२९.११.२००८ रोजी परि.क्र.९ची झेरॉक्स प्रत पुरविण्यात आली.

यावर समाधान न झाल्याने त्यांनी दि.१२.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन दि.५.१.२००९ रोजी खालील आदेश पारित करण्यात आले.

१. अपीलार्थीना लेखा आक्षेप क्र.९ ची प्रत विहित मुदतीत देण्यात आली आहे.
२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २(च) अन्वये न्यायालयात दावा दाखल करणे अगर न करणे ही बाब माहितीच्या अधिकाराच्या कक्षेत येत नाही.

प्रथम अपिलावरील निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलार्थींनी दि.१९.०१.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की अपीलार्थींना

नगरपरिषदेकडे उपलब्ध माहिती पुरविण्यात आली आहे. तरीपण त्यांना काही अधिकची माहिती हवी असल्यास त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा जेणेकरुन त्यांना माहिती पुरविता येईल. याचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येतात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०९६/०२**

**श्री. नारायण धनराज मालपाणी** ------ **अपीलकर्ता**
**मु.पो.बेलगाव तऱ्हाळे ता.इगतपुरी, जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**मुख्याधिकारी इगतपुरी नगरपरिषद जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याधिकारी नगरपरिषद इगतपुरी, जि.नाशिक**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २७.०१.२००९
सुनावणीचा दि. २७.१०.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.२७.०८.२००८ च्या अर्जान्वये एकूण ८ मुद्यांवर खालील माहिती मागितली.

१. घर क्र.३९ क च्या बाजूस लावण्यात आलेले लोखंडी पत्रे काढण्यात आले आहेत काय?

२. याची पाहणी अभियंत्यांनी केली आहे काय

३. पाहणीच्या अहवालाच्या प्रती

४. पत्रे काढले नसल्यास संबंधितांवर काय कारवाई केली

५. कारवाईच्या अनुपालन अहवालाच्या प्रती

६. संबंधितांवर कारवाई किती दिवसात करणे अपेक्षित आहे

७. कारवाई झाली नसल्यास दिरंगाई झाली काय

८. आवक जावक नोंदवहीतील साक्षांकित छायाप्रती

या अर्जाला दि.२२.०९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून उत्तर देण्यात आले उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.३१.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपीलावर दि. ५.११.२००८ रोजी खालील निर्णय देण्यात आला.

"अपीलार्थींनी मागितलेली माहिती अवलोकनासाठी १५ दिवसांचया आत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी. "

यावर व्यथित होऊन त्यांनी दि.२७.०१.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की अपीलार्थींना माहिती पुरविण्यात आली आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ४९५०/०२**

**श्रीमती लक्ष्मीबाई वसंत जगदाने** **------ अपीलकर्ता**
**साईज्योत अपार्टमेंट रु.नं.३०३,वीर सावरकर मार्ग विरार (पूर्व),**
**ता.वसई,जि.ठाणे**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------ उत्तरवादी**
**उपनियंत्रक शिधावाटप,"ग" परिमंडळ,कांदिवली हितवर्धक मंडळ,**
**कांदिवली (प),मुंबई ४०० ०६७**

**जन माहिती अधिकारी तथा**
**शिधावाटप अधिकारी,शिधावाटप कार्यालय क्र.४३-ग, राजेंद्रनगर,**
**गृहनिर्माण इमारत क्र.१८,१९,२०, बोरीवली (पुर्व),**
**मुंबई ४०० ०९२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :५.१०.२००९
सुनावणीचा दि.५.११.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती.

" माझे पती श्री.वसंत कि.जगदाने व शिला या बाईने शिधावाटप पत्रीकेमधील माझे नाव लक्ष्मी बदली करुन शिला हे नाव लावून घेतले, त्याचा दि.२९.११.२००९ असा आहे,तसेच पहिले शिाधावाटप पत्रीका हरवले आहे असे सांगून दि.६.१२.२००९ रोजी दुसरे केशरी रंगाचे शिधावाटप पत्रीका मिळविली, यासाठी या दोघांनी आपल्या कार्यालयात जे कागदपत्र सादर केलेले आहेत त्याची छायांकित प्रत किंवा त्याची माहिती मला मिळणेसाठी विनंती आहे."

वरील माहिती तृतीय पक्षाने देण्यास नकार दिल्यामुळे ती माहिती अर्जदारास देण्यात आलेली नाही. अर्जदाराची तक्रार ही त्यांचे नाव अवैध मार्गाने कमी करण्यात आलेले आहे अशी असल्यामुळे त्यांना सर्व कागदपत्र मिळाल्याने त्याबाबतीत त्यांना जर सक्षम प्राधिकाऱ्याकडे दाद मागावयाची असेल तर ती कागदपत्रे

मिळाल्याने चांगल्या रितीने मागता येऊ शकते. त्यामुळे तृतीय पक्षाने घेतलेली हरकत फेटाळून लावून अर्जदारास ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे निर्देश देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**
**जन माहिती अधिकारी यांनी ७ दिवसात माहिती द्यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ५.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ४९४८/०२**

**श्री.रविंद्र भा.भागवत ------ अपीलकर्ता**
**१७/१६-अ,शासकीय अधिकारी वसाहत,**
**हाजीअली,मुंबई ४०० ०३४**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी**
**अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम,मर्झबान रोड, मुंबई ४०० ००१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, मध्य मुंबई विभाग, वरळी,**
**मुंबई ४०० ०१८**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक :५.१०.२००९
सुनावणीचा दि.५.११.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

श्रीयुत भागवत यांनी दि.५.१०.२००९ रोजी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलाची सुनावणी दिनांक ५.११.२००९ रोजी घेण्यात आली. त्या वेळेला अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या निर्णयाप्रमाणे अजून पर्यंत माहिती मिळालेली नाही, असे अपिलार्थी यांच्या म्हणणे आहे.अपिलार्थीस २ दिवसांत माहिती मिळवून देण्याची जबाबदारी प्रथम अपिलीय अधिकरी यांनाच देण्यात आली त्याप्रमाणे त्यांनी अर्जदारास २ दिवसात माहिती मिळेल याची कार्यवाही करावी.

## आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ५.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ४९५२/०२**

**श्री.देबी गोयंका ------ अपीलकर्ता**
**बी-५०२,ग्लेंगेट अजार्टमेंट्स, हिरानंदानी गार्डन्स,**
**पवई,मुंबई ४०० ०७२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी**
**उप प्रमुख अभियंता (इ.प्र) पूर्व उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पेपर मिल कंपाउंड,राज लेगसी जवळ,एल.बी.एस.रोड, विक्रोळी (पूर्व),मुंबई ४०० ०८३**

**जन माहिती अधिकारी तथा**
**(इमारत प्रस्ताव) पूर्व उपनगरे, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**पेपर मिल कंपाउंड,राज लेगसी जवळ,एल.बी.एस.रोड, विक्रोळी (पूर्व),मुंबई ४०० ०८३**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :३०.०९.२००९
सुनावणीचा दि.५.११.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

दोन्ही पक्षांशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की अर्जदार किंवा त्यांचे प्रतिनिधी दिनांक १७.११.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जातील व नस्तींचे निरीक्षण घेतील व कागदपत्रांची निवड करतील. निवडलेल्या कागदपत्रांची संख्या लक्षात घेऊन आवश्यक ते शुल्क भरून शक्य तो त्याच दिवशी किंवा फार झालेतर त्या नंतरच्या २ दिवसात सर्व निवड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती अर्जदारास देण्यात याव्यात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**सर्व संबंधीतांनी वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ५.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९५५/०२**

**श्री.प्रकाश गोविंद नवाथे** **------ अपीलकर्ता**
**२०४,राजबाग,दलुचंद को.हौ.सो.,**
**२७१,सर भालचंद्र मार्ग,माटुंगा, मुंबई ४०० ०१९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------ उत्तरवादी**
**उप प्रमुख अभियंता (इ.प्र) शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**ई विभाग कार्यालय, १० वा साकळी स्ट्रीट,**
**भायखळा, मुंबई ०८**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कार्यकारी अभियंता (इत्रप्र),शहर II, बृहन्मुंबई महानगरपालिका,**
**ई विभाग कार्यालय, १० वा साकळी स्ट्रीट,**
**भायखळा, मुंबई ०८**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :०५.१०.२००९
सुनावणीचा दि.५.११.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या दिनांक २५.०५.२००९ रोजीच्या अर्जानुसार हॅपी व्हॅली रिअल इस्टेट यांनी जे ओ.सी मिळण्यापुर्वी व बी.सी.सी. मिळाल्यावर जे फ्लॅट्स विकले आहे त्या बाबतीत महापालिकेची मान्यता आहे किंवा नाही याबाबत माहिती पाहिजे होती. अर्जदारास हा विषय महापालिकेच्या अखत्यारित नाही असे दिनांक २.०६.२००९ रोजीच्या पत्राने कळविण्यात आले व तोच निर्णय दिनाक १०.०६.२००९ रोजीच्या अपीलाल कायम करण्यात आला. सुनावणीचयावेळेला जन माहिती अधिकारी यानी असे सागितले की इमारत प्रस्ताव तपासणी व अंतिमतः ऑक्युपेशन सर्टिफीकेट हे महापालिकेचे काम आहे. त्यातील गाळयांच्या विक्रीवर

महापालिकेचे नियंत्रण नसल्यामुळे अर्जदारास ही माहिती देता येत नाही व महापालिकेच्या रेकॉर्डला अशी ही माहितीही नाही. जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे संयुक्तिक वाटते त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ५.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९५४/०२**

**श्री.पांडुरंग वासुदेव ढोके ------ अपीलकर्ता**
**३०१/तोरणा,आय.आय.टी. बाँबे स्टाफ को.हौ.सो.,**
**एस.एम.शेट्टी स्कूलजवळ,हिरानंदानी, पवई,**
**मुंबई ४०० ०७६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी**
**पो. उपआयुक्त, परिमंडळ-९, हिलरोड, वांद्रे (प),**
**मुंबई ४०० ०५०**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा.पोलीस आयुक्त, पश्चिम नियंत्रण कक्ष,वांद्रे (प),**
**मुंबई ४०० ०५०**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :०५.१०.२००९

सुनावणीचा दि.५.११.२००९

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी : यांचे प्रतिनिधी उपस्थित

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती.

" पवई पोलीस स्टेशनमध्ये लावण्यात आलेल्या सी.सी.कॅमेरा/टीव्ही मध्ये दि.२ जून २००९ रोजी संध्याकाळी ४.०० ते रात्री १२.०० वा.पर्यंत व दि.३ जून २००९ रोजी सकाळी ८.३० वाजता ते दुपारी १२.३० वाजे पर्यंत रेकॉर्ड (मुद्रांकित) झालेली माहिती सी.डीच्या स्वरुपात मिळण्याबाबत"

जन माहिती अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार सध्याजी फॅसिलीटी आहे त्याच्यानुसार बाहेर काय चाललेले आहे हे कळते मात्र त्याचे रेकॉर्डींग होत नाही. त्यामुळे अर्जदारास आवश्यक असलेली माहिती देता येत नाही. जी माहितीच उपलब्ध नाही ती माहिती देता येणे शक्य नाही. हे म्हणणे मान्य करावे लागेल. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

<u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुंबई,
दिनांकः ५.११.२००९

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९५३/०२**

**श्री.एस.आनंदनटराज** **------ अपीलकर्ता**
**बी-७०६,राजेश्री अपार्टमेंट,महावीर नगर, कांदिवली (प),**
**मुंबई ४०० ०६७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------ उत्तरवादी**
**प्रमुख अभियंता (घ.क.व्य) बृहन्मुंबई महानगरपालिका घनकचरा**
**व्यवस्थापन खाते,छ.शिवाजी महाराज मंडई, माता रमाबाई आंबेडकर मार्ग,**
**पलटन रोड, मुंबई ०१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप प्रमुख अभियंता (घ.क.व्य) २ रा मजला, वरळी गॅरेज बिल्डींग,**
**डॉ.ई.मोझेस रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :०७.०९.२००९

सुनावणीचा दि.५.११.२००९

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास त्यांच्या दिनांक १८.०३.२००९ रोजीच्या अर्जानुसार मेयर, डेप्युटी मेयर, सारख्या पदाधिकाऱ्याच्या स्टेटसबाबत व शासकीय अधिकारी या संज्ञेत येतात किंवा कसे व त्यांना पुरविण्यात येणारी वाहने व आचार संहिता काळात ते काढून घेण्यासंबंधीचे आदेश यासंबंधीची माहिती पाहिजे होती.

अर्जदाराच्या या अर्जास दिनांक १८.०३.२००९ रोजी एका जन माहिती अधिकाऱ्यांनी तसेच दुसऱ्या संबंधीत जन माहिती अधिकाऱ्यंनी दिनांक २.०४.२००९ रोजी माहिती पुरविलेली आहे. मात्र त्यांचे समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी दिनांक २७.०४.२००९ रोजी प्रथम अपील सादर केले. त्या अपीलाची सुनावणी दि.२९.०६.२००९ रोजी घेण्यात येऊन दिनांक ३०.०६.२००९ रोजी आदेश पारित करण्यात आले.यासंदर्भात काही आक्षेप घेऊन अर्जदाराने व्दितीय अपील केलेले आहे.

अर्जदाराचा दिनांक २७.०४.२००९ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्या कार्यालयात दिनांक २९.०४.२००९ रोजी प्राप्त झालेला दिसून येतो. सर्व साधारणपणे दिनांक २९.०५.२००९ पर्यंत व एका महिन्याच्या कालावधीत अपीलाची सुनावणी न घेण्याची कारणे दर्शवून दि.१४.०६.२००९ पर्यंत सुनावणी घेणे आवश्यक होते. पण ही सुनावणी २९ जुन रोजी घेण्यात आली. म्हणजे जवळपास एका महिन्याने घेण्यात आलेली आहे. ही कृती अयोग्य आहे. अपीलीय अधिकारी ३० जुनला रिटायर झालेले आहेत. मात्र सेवानिवृत्तीच्या आदल्या दिवशी का होईना त्यांनी अपीलाचा आदेश दिला आहे. ते सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्यावर कारवाईचे आदेश नाहीत.

अर्जदाराचा आक्षेप अपील दाखल करणे व अपील सुनावणीच्या दरम्यान दिनांक २०.०५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्याच्या अपीलाच्या संदर्भात काही खुलासा प्राप्त झाला आहे. अशा प्रकारचा खुलासा देण्यावर अर्जदाराचा आक्षेप दिसून येतो मात्र अशा प्रकारच्या अपीलातील मुद्यांवर खुलासा देणे काही गैर आहे असे आयोगास वाटत नाही. उलट ते स्वागतार्हच आहे. जेणेकरुन प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकाऱ्यांचे मत हे त्यांना कळालेले असल्यामुळे ते आपले म्हणणे जास्त चांगल्या रितीने मांडूशकतात.

अर्जदाराला हव्या असणाऱ्या माहितीच्या बाबतीत रेकॉडप्रमाणे माहिती दिलेली आहे असे दिसून आले. अर्जदाराच्या अर्जाचा रोख लक्षात घेता मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडून निवडणूकीच्या दरम्यान पदाधिकाऱ्यांकडची वाहने काढून घेण्याबाबत जर काही सुचना आलेल्या असतीलतर त्याच्या प्रती अर्जदारास देण्यात याव्यात वरील कारणामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ५.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९११/०२**

**श्री.प्रकाश के.रंगवाला** ------ **अपीलकर्ता**
**काळुभाई रंगवाला बंगाला,**
**७३ अ,हिराचंद देसाई रोड,**
**घाटकोपर (प),मुंबई ४०० ०८६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------ **उत्तरवादी**
**महाप्रबंधक, उच्च न्यायालय,मुंबई यांचे कार्यालय, मुंबई ४०० ०३२**

**जन माहिती अधिकारी तथा**
**महाप्रबंधक, उच्च न्यायालय,मुंबई यांचे कार्यालय, मुंबई ४०० ०३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :१४.०८.२००९

सुनावणीचा दि.६.११.२००९

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी याचे प्रतिनिधी उपस्थित

अर्जदाराने जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालय यांच्याकडे दिनांक ११.०५.२००९ रोजीच्या अर्जाने मॅजिस्ट्रेट श्रीयुत डी.के.सोनवणे यांच्याबाबत त्यांचे वेतन, ज्युडीशिअल सेवेमध्ये निवड झाल्याचा दिनांक त्यांनी भुषविलेली पदे वगैरेबाबत माहिती विचारली होती.

तसेच दिनांक २५.०५.२००९ रोजीच्या अर्जाने त्यांनी दिनांक १२.०१.२००९ रोजी तक्रार दाखल केली होती व त्याबाबत माहिती विचारलेली होती. अर्जदारास श्रीयुत डी.के.सोणवने हे न्यायीक सेवेमधे आता नाही त्यामुळे त्यांची पोस्टींग,सॅलरी,प्रमोशन वगैरेबाबत माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही तसेच मागितलेली माहिती ही वैयक्तिक व न्यायीक अधिकाऱ्याची वैकक्तिक माहिती आहे त्यामुळे ही माहिती अधिनियमाच्या कलम 8 (1) (j) नुसार देता येत नाही असे उत्तर देण्यात आले. तसेच अर्जदाराच्या दुसऱ्या अर्जानुसार संबंधीत मालमत्तेच्या दुरूस्तीच्या बाबतीत निर्देश मिळण्यासाठी सीटी सिव्हील कोर्टाला सादर करावयाचा रिपोट तयार करण्यात आलेला आहे अशी माहिती देण्यात आली. अर्जदाराने प्रथम अपील न करता आयोगाकडे सरळ व्दितीय अपील केलेले दिसते. अर्जदाराच्या प्रथम अर्जाच्या बाबतीत श्रीयुत सोनवणे यांच्या वैयक्तिक बाबतीत माहिती देण्याने कितपत जनहीत साध्य होईल हे जरी दिसून येत नसले तरी माहितीचा अधिकार अधिनियमानुसार कलम 4(1)(x) नुसार प्रत्येक जन प्राधिकाऱ्याकडून आपल्या ऑफीसर्सचे वेतन हे स्वतः

होऊनच जनतेला उपलब्ध करुन द्यावयाचे असते. त्यामुळे इतर माहिती जरी देय नसली तरी श्रीयुत सोणवने हे न्यायीक सेवेतून बाहेर पडले त्या वेळच्या त्यांच्या वेतनाची माहिती अर्जदारास देण्यात यावी. दिनांक २५.०५.२००९ रोजीच्या अर्जाच्या बाबतीत सद्यस्थितीची अर्जदारास माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या दिनांक ११.०५.२००९ रोजीच्या अर्जास अनुसरुन श्रीयुत सोनवणे यांच्या वेतनासंबंधीची माहिती अर्जदारास द्यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ५.११.२००९**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ २००९/अपील क्र . ४९५७/०२

श्री.सईद दाऊद फिरफिरे ----- अपीलकर्ता
अे.आय. अहमद सेलर हायस्कुल, १२५,डिमटिमकर रोड,
नागपाडा, मुंबई ४०० ००८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी
अध्यक्ष, अंजुमन-इ-इस्लाम स्कुल मॅनेजमेंट
द्वारा ए.आय.अहमद सेलर हायस्कूल, १२५,डिमटिमकर रोड,नागपाडा, मुंबई ४०० ००८

जन माहिती अधिकारी तथा
अंजुमन-इ-इस्लाम स्कुल मॅनेजमेंट
द्वारा ए.आय.अहमद सेलर हायस्कूल, १२५,डिमटिमकर रोड,नागपाडा, मुंबई ४०० ००८

मुमाआ २००९/अपील क्र . ४९९६/०२

श्री.अन्सार मोईन अहमद ----- अपीलकर्ता
ए.आय. अहमद सेलर हायस्कुल, १२५,डिमटिमकर रोड,
नागपाडा, मुंबई ४०० ००८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी
अध्यक्ष, अंजुमन-इ-इस्लाम स्कुल मॅनेजमेंट
द्वारा ए.आय.अहमद सेलर हायस्कूल, १२५,डिमटिमकर रोड,नागपाडा, मुंबई ४०० ००८

जन माहिती अधिकारी तथा
अंजुमन-इ-इस्लाम स्कुल मॅनेजमेंट
द्वारा ए.आय.अहमद सेलर हायस्कूल, १२५,डिमटिमकर रोड,नागपाडा, मुंबई ४०० ००८

मुमाआ २००९/अपील क्र . ४९९७/०२

श्री.अन्सारी अहमद मा.युसुफ ----- अपीलकर्ता
ए.आय. अहमद सेलर हायस्कुल, १२५,डिमटिमकर रोड,
नागपाडा, मुंबई ४०० ००८

विरुध्द

प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी
अध्यक्ष, अंजुमन-इ-इस्लाम स्कुल मॅनेजमेंट
द्वारा ए.आय.अहमद सेलर हायस्कूल, १२५,डिमटिमकर रोड,नागपाडा, मुंबई ४०० ००८

जन माहिती अधिकारी तथा
अंजुमन-इ-इस्लाम स्कुल मॅनेजमेंट

**द्वारा ए.आय.अहमद सेलर हायस्कूल, १२५,डिमटिमकर रोड,नागपाडा, मुंबई ४०० ००८**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक :०९.१०.२००९
सुनावणीचा दि.५.११.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

या तिन्ही अपिलाचा विषय हा एकच आहे अपिलार्थी जरी वेगवेगळे असले तरी अपीलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी एकच आहे व तिन्ही अपिलार्थीचा विषय हा एकच आहे. अर्जदाराच्या तिन्ही अपिलाच्या बाबतीत जन माहिती अधिकारी यांनी पुढील निवेदन सादर केले.

Appeal filed by Shri saeed Dawood Firfiray on 09.10.2009 as under:

Shri Saeed Dawood Firfiray, the Appellant by his application date 14.08.2008 has demanded information from the Public Information Officer, Anjuman-I-Islam group of School Management, Ahmed Sailor High School, Nagpada, Mumbai. Mr.Ansari Ahmed Md.Yusuf and Mr.Ansar Momin Ahe\med had also filed similar applications on the same date before the PIO.Since the information relate to group of Schools managed by Anjuman-I-Islam,the Public Information Officer by his letter AS/06/08 date 10/09/08 forwarded their applications to Anjuman-I-Islam. On receipt of the letter from the PIO,the Director of Education Anjuman-I-Islam sent circulars date 18/09/09 and 19/9/09 to all the concerned Heads of Schools of Anjuman-I-Islam. The information received from the schools was compiled. Since the Appellant desired to collect the information in person and message was given to them, they did not collect We may.for the information of the Commissioner submit that the demand of the Appellant is that he should be promoted in the Graduate Scale. The Appellant is B.A.D.Ed He is eligible for promotion in the graduate teacher category in quota of 25 quotas in the teachers teaching in Standards from V to VII. For the information of the Commission we state that Anjuman-I-Islam has separate Boys and Girls Schools. Normally male teachers working in Boys School and Female teachers working in Girls School are promoted in Boys-Girls Schools respectively. As such if any vacancy arises in the Boys School.the case of the Appellant would be considered on the basis of seniority.

It is humbly submitted that there is no lapse on the part of Appellate Authority and the Honorable Commissioner may not consider imposing any penalty as requested by the Appellant.

त्यामुळे अर्जदारास ती उशिरा का होईना पण माहिती देण्यात आली आहे व अर्जदाराच्या प्रश्नाबाबत मॅनेज मेंटचे धोरण हे सहानुभूती पुर्वक राहील असे ही अपिलीय अधिकाऱ्यांचे निवेदन आहे. रेकॉड प्रमाणे माहिती दिलेली असल्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

## आदेश

**तिन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त]**

**मुंबई,**
**दिनांकः ५.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९११/०२**

**श्री.प्रकाश के.रंगवाला** **------ अपीलकर्ता**
**काळुभाई रंगवाला बंगाला,**
**७३ अ,हिराचंद देसाई रोड,**
**घाटकोपर (प),मुंबई ४०० ०८६**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------ उत्तरवादी**
**महाप्रबंधक, उच्च न्यायालय,मुंबई यांचे कार्यालय, मुंबई ४०० ०३२**

**जन माहिती अधिकारी तथा**
**महाप्रबंधक, उच्च न्यायालय,मुंबई यांचे कार्यालय, मुंबई ४०० ०३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :१४.०८.२००९

सुनावणीचा दि.६.११.२००९

अपीलार्थी व जन माहिती अधिकारी याचे प्रतिनिधी उपस्थित

अर्जदाराने जन माहिती अधिकारी, उच्च न्यायालय यांच्याकडे दिनांक ११.०५.२००९ रोजीच्या अर्जाने मॅजिस्ट्रेट श्रीयुत डी.के.सोनवणे यांच्याबाबत त्यांचे वेतन, ज्युडीशिअल सेवेमध्ये निवड झाल्याचा दिनांक त्यांनी भुषविलेली पदे वगैरेबाबत माहिती विचारली होती.

तसेच दिनांक २५.०५.२००९ रोजीच्या अर्जाने त्यांनी दिनांक १२.०१.२००९ रोजी तक्रार दाखल केली होती व त्याबाबत माहिती विचारलेली होती. अर्जदारास श्रीयुत डी.के.सोणवने हे न्यायीक सेवेमधे आता नाही त्यामुळे त्यांची पोस्टींग,सॅलरी,प्रमोशन वगैरेबाबत माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही तसेच मागितलेली माहिती ही वैयक्तिक व न्यायीक अधिकाऱ्याची वैकक्तिक माहिती आहे त्यामुळे ही माहिती अधिनियमाच्या कलम 8 (1) (j) नुसार देता येत नाही असे उत्तर देण्यात आले. तसेच अर्जदाराच्या दुसऱ्या अर्जानुसार संबंधीत मालमत्तेच्या दुरूस्तीच्या बाबतीत निर्देश मिळण्यासाठी सीटी सिव्हील कोर्टाला सादर करावयाचा रिपोट तयार करण्यात आलेला आहे अशी माहिती देण्यात आली. अर्जदाराने प्रथम अपील न करता आयोगाकडे सरळ व्दितीय अपील केलेले दिसते. अर्जदाराच्या प्रथम अर्जाच्या बाबतीत श्रीयुत सोनवणे यांच्या वैयक्तिक बाबतीत माहिती देण्याने कितपत जनहीत साध्य होईल हे जरी दिसून येत नसले तरी माहितीचा अधिकार अधिनियमानुसार कलम 4(1)(x) नुसार प्रत्येक जन प्राधिकाऱ्याकडून आपल्या ऑफीसर्सचे वेतन हे स्वत:

होऊनच जनतेला उपलब्ध करुन द्यावयाचे असते. त्यामुळे इतर माहिती जरी देय नसली तरी श्रीयुत सोणवने हे न्यायीक सेवेतून बाहेर पडले त्या वेळच्या त्यांच्या वेतनाची माहिती अर्जदारास देण्यात यावी. दिनांक २५.०५.२००९ रोजीच्या अर्जाच्या बाबतीत सद्यस्थितीची अर्जदारास माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या दिनांक ११.०५.२००९ रोजीच्या अर्जास अनुसरुन श्रीयुत सोनवणे यांच्या वेतनासंबंधीची माहिती अर्जदारास द्यावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ५.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९६४/०२**

**श्री.फ्रान्सिस डी.गोन्साल्विस ----- अपीलकर्ता**
**बार्नी व्हिला,नं.३ राजन, ऑफ कार्टर रोड, बांद्रा (प),**
**मुंबई ४०० ०५०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/ पश्चिम विभाग कार्यालय,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प) मुंबई ४०० ०५०**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहा. अभियंता (इ.व का.), बृहन्मुंबई महानगरपालिका,एच/ पश्चिम विभाग कार्यालय,**
**सेंट मार्टिन्स रोड, बांद्रा (प) मुंबई ४०० ०५०**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :१२.१०.२००९
सुनावणीचा दि.६.११.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराला सी.टी.एस./१५१७, सी.टी.एस./१५२१, सी.टी.एस./१५२० मधील कव्हरींग पॅसेज कुंपण करणे,शेड बांधणे हे अधिकृत आहे किंवा कसे व त्याची असेसमेंट याची माहिती पाहिजे होती. ही माहिती अर्जदारास देण्यात आलेली आहे व सदरील शेडसाठी कुठच्याही प्रकारे परवानगी देण्यात आलेली नाही अशी माहिती अर्जदारास देण्यात आलेली आहे. अर्थात अर्जदाराचे समाधान हे ते शेड काढुन टाकल्याची कारवाई करुनच होणार आहे यासंदर्भात महापालिका कायद्यानुसार योग्य ती कारवाई करीत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ६.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९६०/०२**

**श्री.साजिद मरधुब अन्सारी ----- अपीलकर्ता**
**न्या.बंदी क्र.९५०८/०९, द्वारा अधीक्षक,**
**मुंबई मध्यवर्ती कारागृह, ऑर्थर रोड,**
**मुंबई ४०० ०११**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी**
**पोलीस उपआयुक्त (प्रतिबंधक), गुन्हे शाखा, गु.अ.विभाग,**
**छा.शिवाजी मंडई, माता रमाबाई मार्ग,**
**मुंबई ४०० ००१**

**जन माहिती अधिकारी (गुन्हे) तथा**
**सहायक पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय,**
**क्राफर्ड मार्केट,मुंबई ०१**

**- वि वे च न -**

पुर्तता करुन सादर केलेल्या अपीलाचा दिनांक : ०५.१०.२००९
सुनावणीचा दि.६.११.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास त्याच्या दिनांक २२.०१.२००८ रोजीच्या अर्जानुसार ए ते ई या मुद्यांवर माहिती पाहिजे होती. त्यातील डी व ई मुद्यांवरील माहिती अर्जदारास देण्यात आलेली आहे असे सुनावणीच्या वेळेला दिसून आले. मात्र ए,डी व सी या मुद्यांची माहिती ही देण्यात आलेली नाही असे दिसून आले. ही माहिती का देता आली नाही यासंबंधी विचारले असता पुढीलप्रमाणे निवेदन सादर करण्यात आले.

" दिनांक १७.०७.२००६ ते ३१.७.२००६ या कालावधीत या कक्षाचे जूने बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे तोडण्यात आलेले होते. त्यावेळी कक्षात असलेले कागदपत्र मा.सहायक पोलीस आयुक्त, डी-१ (पुर्व) यांचे कार्यालयातील उपलब्ध असलेल्या अपुऱ्या जागेत तात्पुरते ठेवण्यात आलेले होते. अर्जदारांनी मागणी केलेल्या अर्जात नमुद तारखेच्या ठाणे दैनंदिनीचा व पो.नि.कांबळे व पो.नि.काळे यांया कर्तव्याच्या इन-आऊट नांदी बाबत अभिलेखाचा शोध घेण्यात आला परंतू त्या कालावधीत ठाणे दैनंदिनी तसेच इतर काही नोंद वहया मिळून आलेल्या नाहीत. त्याचा अद्याप पर्यंत शोध घेण्यात आलेला आहे परंतू तो अभिलेख मिळून

आलेला नाही. कदाचीत सदरचा अभिलेख गहाळ झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरच्या अभिलेखाचा शोध घेण्यात येत असून तो प्राप्त होताच तसा हवाल सादर करण्याची तजविज ठेवलेली आहे."

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की ७/११ रोजी रेल्वे बॉम्ब स्फोट केस संदर्भातीत गुन्हयाचा तपास एटीएस ब्रँच तर्फे करण्यात आलेला आहे. क्राईम ब्रँच तर्फे नाही व प्रयत्न करुनही त्यासंबंधी कागदपत्र उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती आहे. अशा परिस्थितीत अर्जदारास हवी असलेली माहिती देता येत नाही हे मान्य करावे लागेल. मात्र या वस्तुस्थितीची नोंद पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांनी घेण्यासाठी या आदेशाची प्रत त्यांनाही पाठविण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ६.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९६८/०२**

**श्री.लालजीसिंग,वर्सोवा ज्युल** **----- अपीलकर्ता**
**को.ऑ.हौ.सोसायटी, चार बंगला,**
**अंधेरी,(प),मुंबई ४०० ०५३**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------ उत्तरवादी**
**महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, लोटस हाऊस,**
**३३ अ सर विठ्ठलदास ठाकरशी, मार्ग,न्यु मरीन लाईन्स मुंबई ४०० ०२०**
**जन माहिती अधिकारी (गुन्हे) तथा**
**महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ, लोटस हाऊस,**
**३३ अ सर विठ्ठलदास ठाकरशी, मार्ग,न्यु मरीन लाईन्स मुंबई ४०० ०२०**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २९.०९.२००९
सुनावणीचा दि.७.११.२००९
अपीलार्थी : उपस्थित (दोन्ही पक्षाचे म्हणणे एकूण घेतले)
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराच्या अपील अर्जाबाबत महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून आलेला खुलासा पुढीलप्रमाणे आहे

" उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रासोबत श्री लालजी सींग यांनी आपल्या कार्यालयात सादर केलेल्या दि.२२.०७.२००९ च्या व्दितीय अपिलाची प्रत प्राप्त झाली. आपल्या पत्रातील सूचनेनुसार दि.७.११.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. मुख्य आयुक्तांच्या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली आहे.

पत्रातील मुद्या क्र.३ नुसार श्री.लालजी सिंग यांना त्यांचे दि.२२.०७.२००९ रोजीच्या अपिलासंबंधी महामंडळाने दि.४.११.२००९ रोजीचे पत्राव्दारे खुलासा करण्यात आलेला आहे. सदर पत्राची प्रत सोबत आपल्या माहितीसाठी सोबत जोडली आहे. तसेच सुनावणीचे वेळी सादर करावयाच्या खुलाशासंबंधी खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

I) जन माहिती अधिकारी

१. श्री लालजी सिंग यांनी सादर केलेल्या दि.५.२.२००९ च्या मुळ अर्जास महामंडळाने पत्र क्र Pers/RTI/१४०६ दि.२५.०२.२००९ व्दारे माहिती/कागदपत्रे तयार असल्याबाबत कळविले होते. (अर्जदाराने सदरची माहिती/कागदपत्रे प्रत्यक्ष दि.५.०३.२००९ रोजी व्यक्तीशः गोळा केलेली आहे.) अशाप्रकारे अर्जदारास माहिती/कागदपत्रे देण्यास विलंब झालेला नाही.

२. उक्त अधिनियमाच्या कलम २० (१) अन्वये शास्तीकरणाचा प्रश्न उदभवत नाही.

II) प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यासाठी

अपिलार्थीचे म्हणण्यानुसार त्यांने दि.१६.४.२००९ रोजी अपिल सादर केले त्यास उत्तर देण्यात आलेले नाही. याबाबत महामंडळातर्फे खुलासा करण्यात येतो की-

अ) ज्याअर्थी अर्जदारास त्याच्या मुळ अर्जाप्रमाणे ३० दिवसांचे आंत माहिती कागदपत्रे सादर करण्यात आली होती. त्यानुसार वियमाप्रमाणे ३० दिवसांचे आंत अर्जदाराने अपील दाखल करणे जरुरी होते.परंतु अर्जदाराने मुदतीत अर्ज अथवा अपील दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरचे पत्र अपील म्हणून दाखल करण्यात आलेले नाही.

ब) श्री.लालजी सिंग यांनी त्यांचे दि.१६.०४.२००९ चे पत्रात महामंडळाने त्यांच्या दि.१८.०३.२००९ च्या पत्रास उत्तर दिले नसल्याबाबतचा खुलासा चुकीचा आहे. महामंडळाने दि.१८.०३.२००९ च्या पत्रास दि.२४.०३.२००९ रोजीचे पत्राव्दारे उत्तर पाठविलेले आहे. त्यानुसार प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असे त्यांना कळविलेले आहे.

क) श्री.लालजी सिंग यांनी त्यांचे दि. १८.०३.२००९ व दि.१६.०४.२००९ च्या पत्रात केलेला खुलासा हा त्यांनी महामंडळाविरुध्द दाखल केलेल्या दिवाणी दावा क्र.४२६/२००१ याच्याशी संबंधित असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये कलम क्र.८ नुसार न्यायालयीन दाव्यासंबंधीची कागदपत्रे देण्याचे बंधनकारक नाही. तरीही महामंडळाने अर्जदरास संबंधित कागदपत्रे पुरविली आहेत.

ड) श्री.लालजी सिंग यांच्या दि. १८.०३.२००९ व दि.१६.०४.२००९ रोजीच्या पत्रांचे अवलोकन केले असता त्यांनी कोणतीही विशिष्ट माहिती मागितली असल्याचे दिसून येत नाही. तसचे या दोन्ही पत्रांचा मजकुर सारखाच असल्याने व दि.१८.०३.२००९ रोजीच्या पत्रास अगोदरच उत्तर दिलेले असल्याकारणाने दि.१६.०४.२००९ च्या पत्रास उत्तर देणे संयुक्तिक वाटले नाही.

सदरनहू पत्र प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या मंजूरीनंतर निर्गमित करण्यात येत आहे."

आयोगास हा खुलासा समर्पक वाटतो व अर्जदारास माहिती देण्यात आलेली आहे असे आयोगाचे मत आहे त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ७.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९६९/०२**

**संचालक, राजवाणी प्रॉपर्टीज प्रा.लि.** **----- अपीलकर्ता**
**७३, जय हिंद मार्केट, डॉ.सी.जी.मार्ग,चेंबुर कॉलनी,**
**मुंबई ४०० ०७४**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------ उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका डी वॉर्ड कार्यालय,**
**नाना चौक,जोबनपुर,ग्रँट रोड (प)**
**मुंबई ४०० ००७**

**जन माहिती अधिकारी (गुन्हे) तथा**
**सहायक अभियंता, (इ व का), बृहन्मुंबई महानगरपालिका डी वॉर्ड कार्यालय,**
**नाना चौक,जोबनपुर,ग्रँट रोड (प)**
**मुंबई ४०० ००७**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ०३.१०.२००९
सुनावणीचा दि.७.११.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदाराने त्यांच्या दि.२४.०३.२००९ रोजीच्या अर्जाने इ.स.२००७-०८ व २००८-०९ या सालात कलम ३५१ व ३४७ डी मुंबई महापालिका कायदा तसेच एमआरटीपी ॲक्ट अंतर्गत अनधिकृत वापर बदलाच्या बाबतीत नोटीसेस इश्यु केल्या असतील त्या नोटीसेसमधील सर्वांची नावे, या तिन्ही कलमांचा वापर करण्याच्याबाबतीत असलेला निष्कर्ष व सद्यस्थिती याबाबत माहिती विचारली होती.

अर्जदारास प्रथमतः ही माहिती रु.२/- प्रती पेज या प्रमाणे देण्यात येईल असे कळविण्यात आले.अर्जदाराने त्याच्या पत्रात माहितीसाठी अनेक हेटे घालावे लागले असे लिहीले आहे व प्रथम अपीलाच्या निर्णयात अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास नेमकी रक्कम कळवावी असे निर्देश दि.३.०७.२००९ रोजीच्या आदेशाने दिले आहे. त्यास अनुसरून दि.१७.०७.२००९ रोजी रु.२७९०/- भरावे लागतील असे अर्जदारास कळविण्यात आलेले आहे. त्या विरुध्द सदरचे अपील.

अर्जदाराची मुख्य तक्रार प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी एका महिन्यापेक्षा जास्त कालावधी अपिलाचा निर्णय द्यावयास लावला ही आहे. अर्जदाराने प्रथम अपील हे दिनांक २१.०५.२००९ रोजी सादर केले जे दि.२१.०६.२००९ पर्यंत सर्व साधारण परिस्थिती व ६ जुलै पर्यंत उशीराची कारणे देऊन प्रथम अपीलाचा निर्णय लावायचा होता. याबाबत अपिलीर्थीच्या विनंतीनुसार अपील ६ दिवस पुढे ढकलण्यात आले असे जरी असले तरी अपीलाचा निर्णय देण्यात दिरंगाई झालेली आहे अशी दिरंगाई पुढे होऊ नये याची काळजी प्रथम अपीलीय अधिकारी

यांनी घ्यावी. अर्जदाराने त्यांना हवी असणारी माहिती वाटल्यास प्रत्यक्ष पाहून व कागदपत्र निवडून व शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी मात्र जो दिवस व तारीख जन माहिती अधिकारी देतील या दिवशी विवक्षितपणे त्याच दिवशी अर्जदारास माहिती मिळेल याची व्यवस्था करावी. अपीलार्थी स्वतः उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे एकूण घेता आले नाही तरीपण त्यांचा अपील मेमो विचारात घेण्यात आलेला आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ७.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९७० व ४९७१/०२**

**श्री. कल्पेश संघवी ----- अपीलकर्ता**
**डापमंड क्वीन इमारत, २ रा मजला, कार्यालय क्र.२०८,**
**१९८ राजाराम मोहन रॉय मार्ग,**
**मुंबई ४०० ००४**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी**
**मुख्य अभियंता, मुख्य अभियंता (डेव्हलपमेंट प्लॉन) ४ था मजला, अनेक्ट इमारत, मुंबई महानगरपालिका मुख्यालय,महापालिका मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१**

**जन माहिती अधिकारी (गुन्हे) तथा**
**उप मुख्य अभियंता, मुख्य अभियंता (डेव्हलपमेंट प्लॉन) ४ था मजला, अनेक्ट इमारत, मुंबई महानगरपालिका मुख्यालय,महापालिका मार्ग,फोर्ट,**
**मुंबई ४०० ००१**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २५.०९.२००९
सुनावणीचा दि.७.११.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

या दोन्ही अपीलातील मुळ अर्ज हे एकच आहे व या अर्जानुसार विशेष करुन बिल्डींग परमिशन/रिपेअर्स परमिशन देत असतांना बालकणीच्या बाबतीत असलेल्या धोरणाबाबतची अर्जदारास माहिती पाहिजे आहे. जरी अर्जदाराचा मुळ अपील अर्ज हा महापालिका आयुक्त कार्यालय यांच्याकडे पाठविला होता व तो त्यांनी दिनांक ३ वेगवेगळया जन माहिती अधिकाऱ्यांकडे पाठविला होता तरी अर्जदारास समाधान कारक माहिती मिळालेली नाही म्हणूण त्यांनी ही अपीले केलेली आहे. सुनावणीच्या वेळेला इमारत प्रस्ताव विभागाचे प्रमुख अभियंता उपस्थित होते. त्यांना असे निर्देश देण्यात आले की बालकनीच्या बाबतीत जी डी.सी.रुग्युलेशन/आदेश/परिपत्रक असतील त्याची प्रत अर्जदारांना पाठविण्यात यावी. इतर मुद्यांच्या बाबतीत बालकनीच्या बाबतीतील प्रस्तावाचा गोषवारा वेगळयाने ठेवण्यात येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले अशी जर माहिती वेगळयाने ठेवण्यात येत नसली व अर्जदाराने विवक्षित केसबाबत माहिती मागितली तर त्यांना देण्यात यावी. अर्जदारास आवश्यक असणारी माहिती ही १५ दिवसात त्यांना पोहचेल यांची व्यवस्था

मुख्य अभियंता यांनी करावी . अर्जदारास हे स्पष्ट करण्यात येत आहे की सुनावणीचा उद्देश त्यांनी दिलेल्या अपीलातील मुद्दे स्पष्ट करुन सांगण्याची त्यांना संधी मिळते हाच असतो. तेव्हा त्यांनी उपस्थित राहावयास हवे.

**आदेश**

**दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ७.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०१७ व १०२२/०२**

**श्री. अन्सारी इजाझ अह.मो.फारुक, ------ अपीलकर्ता**
**सर्वे.नं७४४,घर नं.६३, अन्सार कॉलनी,**
**महाराष्ट्र सिझी्र जवळ,जुना आग्रा रोडा, ता.मालेगांव,**
**रा.मालेगांव जि.नाशिक ४२३ २०३**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**सहायक धर्मदाय आयुक्त,नाशिक विभाग, व्दारका सर्कल,नाशिक,जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सचिव,अे.टी.टी. मालेंगां, व्दारा मुख्याध्यापक,अे.टी.टी.**
**हायस्कूल ॲण्ड जुनिअर कॉलेज, मालेगांव,ता.मालेगांव, जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. अन्सारी इजाझ अह.मो.फारुक, यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१४.११.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.अपीलकार उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.७.०६.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

अंजुमन तरक्की-इ-तलीम या संस्थेची वैयक्तिकरित्या तपासणी करण्यास अजेंडा बुक व इतिवृत बुक परवानगी मागितली होती. तपासणी केल्यानंतर मागणीप्रमाणे आवश्यक कागदपत्राच्या छायाप्रती देण्याची मागणी केली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा कायदा विश्वस्त मंडळास लागू होत नाही असे संस्थेच्या सचिवांनी अपीलाकारास दि.६.०७.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांनी दि.२८.०८.२००८ रोजी सुनावणी आयोजित विश्वस्त संस्थेने जन माहिती अधिकारी

नेमणूक करावी. अपीलकारास १५ दिवसाचे आत संबंधीत कागदपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी. तसेच मागणीप्रमाणे आवश्यक कागदपत्रांच्या छायाप्रती पुरवाव्यात असे दि.२९.०९.२००८ रोजी आदेश पारित केले. यानंतरही माहिती मिळाली नसल्याने व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

विश्वस्त मंडळाने जन माहिती अधिकारी नेमणूक करण्याची आवश्यकता नाही. विश्वस्त मंडळ माहितीच्या अधिकार कक्षेत येत नाही असा मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी याचिका क्र.५२९४/ २००८ मध्ये निर्णय दिला आहे. असे जरी असले तरी दि.२९.०९.२००८ रोजीच्या सहायक धर्मदाय आयुक्त नाशिक विभाग यांनी दिलेले आदेश माहितीचा अधिकार तसेच त्यांना दी बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अन्वये कागदपत्रांची तपासणीबाबत त्यांना आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढलेले दिसतात. म्हणून संस्थेने त्या आदेशाची अंमलबजावणी करावी.

**आदेश**

**दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १३३५/०२**

**श्री. पोपट मुरलीधर शेंदळ** ------ **अपीलकर्ता**
**रा.भेंडी, ता.कळवण,जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**पोलीस अधिक्षक (ग्रामिण), नाशिक ग्रामिण,नाशिक,जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उपविभागीय पोलीस अधिकारी,कळवण, ता.कळवण, जि. नाशिक**

## - वि वे च न -

अपीलकार श्री. पोपट मुरलीधर शेंदळ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.११.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.६.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

भेंडी ता.कळवण जि.नाशिक येथील श्री.केशव त्र्यंबक मोरे यांची दारु प्याल्यानंतरच केलेला वैद्यकीय तपासणी व अहवाल त्यांच्यावर केलेल्या कारवाईच्या कागदपत्रांच्या प्रती दि.१५.०६.२००७ रोजी कळवण पोलीस स्टेशनने केलेला पंचनामा. सदर दोन्ही भावानी खेडे गावामध्ये दगडफेक,धींगाणा घालून घराची नासधुस केली. याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती अयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकारास, पोलीस निरीक्षक कळवण येथील पोलीस ठाणे यांनी ८ प्रती रु१८/- एवढे शुल्क घेऊन माहिती दिली आहे. अपीलकाराच्या फिर्यादीवरुन कळवण पोलीस ठाणेकडे अर्जातील मुद्दा क्र.१,२ व ४

बद्दल प.ना.का.रजि.क्र.२४६/२००७ भा.द.वि.क.३२३,५०४,५०६,४२७ प्रमाणे अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला. अदखलपात्र गुन्हयाचा पंचनामा होत नाही. याबाबत अर्जदारास दि.४.०७.२००७ च्या पत्रान्वये कळविले. गैरअर्जदार श्री.केशव त्र्यंबक मोरे व श्री.रामराव त्र्यंबक मोरे यांचेविरुध्द चॅप्टर केस क्रमांक १५८/२००७ सिआर पी.सी.क्र१०७ प्रमाणे प्रतिबंध कारवाई करण्यात आलेली आहे. त्यानंतर अ.नं. २ यांच्या ब्राँड रद्य करणेबाबत मा. कार्यकारी दंडाधिकारी कळवण यांना लेखीपत्र दिले आहे. पोलीस ठाणेत दारु पिऊन आल्याने श्री.केशव मोरे यांचेवर केस न्यायालयात पाठविण्यात आली. मा. न्यायालयाने त्यास रु.२००/- दंड केला दि.१३.१२.२००८ राजी केशव मोरे यंनी कर्जास कंटाळून गळफास घेऊन तो मयत झालेला आहे असे जन माहिती अधिकारी तथा सहायक पालीस अधिक्षक मालेगाव ग्रामिण विभाय यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवल सादर करुन प्रतिपादन केले. यवरुन अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यांनी आवश्यक कारवाई केली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०३८/०२**

**श्री. सुधीर यशवंतराव पाटील ------ अपीलकर्ता**
**प्लॉट नं. १, उदयनगर कॉलनी लेन नंबर १, गंगापूर रोड,**
**नाशिक-१३, नाशिक ४२२ ०१३**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**सहसंचालक,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,**
**नविन शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सामनगांव रोड, नाशिक रोड, नाशिक ४२२ १०१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्राचार्य,अमृत वाहिनी तंत्रनिकेतन, अमृतनगर,पो.संगमनेर भाग साखर कारखाना,**
**घुलेवाडी,ता.संगमनेर,जि.अहमदनगर ४२२ ६०८**

## - वि वे च न -

अपीलकार श्री. सुधीर यशवंतराव पाटील यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०१.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.७.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

माझे सन १९९६ पासून ते आजपर्यंतचे प्रत्येक महिन्याचे पगार पावती तसेच माहे नोव्हेबर डिसेंबर १९९६ व जानेवारी १९९७ चे सॅलरी सर्टिफिकेट (एकूण ३ महिण्याचे) पुर्ण पगाराचे आकडेमोड व त्याचे सरकारी पुरावे पत्र सर्व साक्षाकित प्रत मध्ये देणे सर्व स्पष्ट सरकारी नियमाप्रमाणे देणे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती अयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकार अमृतवाहीनी शेती व विकास संस्थेच्या अमृतवाहिनी तंत्रनिकेतन मध्य शिक्षक म्हणून नोकरीस होते. त्यांनी नोकरीच्या काळात केलेल्या गैरवर्तनामुळे संस्थेने त्यांना नोकरीतून काढून टाकले अपीलकाराने सोलापूर येथील मा.शाळा न्यायाधिकरण यांचेकडे अपील क्र.९४/२००७ दाखल केले. सदर अपीलाचे काम चालू असल्याने संस्थेच्या वतीने लीगल ऑफीसर यांनी आयोगास व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी लेखी अहवाल सादर करुन सर्व कागदपत्रे न्यायधिकरणाकडे दिली असल्याचे प्रतिपादन केले. सुनावणीकरीता अपीलकार अनुपस्थित होते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०३९/०२**

**श्री. अशोक बिहारीलाल मोहारे** **------ अपीलकर्ता**
**रा.२१७९ ब पिंजार लेन, येवला, जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**ज.मा.अ.मुख्याधिकारी,नगरपरिषद,येवला,ता.येवला,जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**ज.मा.अ.मुख्याधिकारी,नगरपरिषद,येवला,ता.येवला,जि.नाशिक**

## - वि वे च न -

अपीलकार श्री. अशोक बिहारीलाल मोहारे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०२.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी उपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.११.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

येवले जि.नाशिक येथील एकूण ७ खाजगी रुग्णालयातील झालेल्या बाळंतपणाबाबत सोनोग्राफी,गर्भलिंक चिकित्सा,सिझरींग याबाबत माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिली. यामुळे समाधान न झाल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दि.२७.०१.२००९ रोजी आदेश पारित करुन प्रथम अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती अयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

खाजगी हॉस्पीटलमध्ये माहे जाने ०८ ते डिसेंबर ०८ पावेतो जन्माच्या नोंदी घेणेबाबत आलेल्या फॉर्मच्या छायाप्रती एकूण १४४९ अपीलकारास दि.२३.०१.२००९ च्या पत्रानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास उपलब्ध करुन दिल्या. शहरातील खाजगी रुग्णालय हे शासकीय प्राधिकरण होऊ शकत नाही

असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी मत व्यक्त केले. खाजगी रुग्णालयाकडील पावत्याच्या प्रती अपीलकाराने मागीतल्या होत्या. सदर माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी उपलब्ध माहिती दिली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०९५/०२**

**श्री. नारायण धनराज मालपानी** ------ **अपीलकर्ता**
**मु.पो.बेलगाव तऱ्हाळे, ता.इगतपुरी,**
**जि.नाशिक पिन.४०० ४०३**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**मुख्याधिकारी,नगरपरिषद,इगतपुरी, जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याधिकारी,नगरपरिषद,इगतपुरी, जि.नाशिक**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २.०२.२००९

सुनावणीचा दिनांक : २७.१०.२००९

अपीलार्थी : अनुपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपिलार्थींनी दि.५.११.२००९ च्या अर्जान्वये श्री.अशोक पाटील यांनी घर क्र.३९ ड मध्ये केलेल्या बांधकामाच्या संबंधात एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितली. माहिती उपलब्ध असल्याबद्दल तसेच त्यासाठीचे शुल्क रु.२२/- भरण्याबाबत दि.२७.११.२००८ रोजी अपीलार्थीस कळविण्यात आले. तथापि यावर समाधान न झाल्याने त्यांनी दि.११.१२.२००८ रोजी प्रथम अपील केले.परंतु यावर निर्णय न झाल्याने त्यांनी दि.२.०२.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

यावरील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले की अपीलार्थींना याआधी माहिती पुरविण्यात आली आहे. याच्या पुष्टयर्थ त्यांनी त्यांचे दि.२७.१०.२००९ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर केले. यावरुन असे दिसते की अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार माहिती पुरविण्यात आली आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येतात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०४४/०२**

**श्री. दत्ता संपत निकम** **------ अपीलकर्ता**
**२५,मेघदूत,सि.बी.एस.समोर,**
**जि.नाशिक पिन.४२२ ००२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,सारडा सर्कल,उर्दू शाळेजवळ,नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**कृषी उत्पन्न बाजार समिती, कॅम्प रोड,नाशिक**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २१.१०.२००८
सुनावणीचा दिनांक : २६.१०.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थींनी दि.९.०५.२००८ च्या अर्जान्वये माहिती मागविल्याचे दिसून येते. परंतु त्यांच्या माहितीच्या अर्जात कोणती माहिती त्यांना हवी आहे याचा स्पष्ट उल्लेख आढळत नाही. तथापि त्यांना टाकळी मंजूर संस्थेची माहिती हवी असल्याचे दिसते. अपीलार्थीस माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी दि.२३.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील दि.२९.०८.२००८ च्या आदेशान्वये फेटाळण्यात आले. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदी विचारात घेता त्यांना उपनिबंधक सहकारी संस्था,मालेगांव यांच्याकडे प्रथम अपील दाखल करण्यास सांगण्यात आले. यावर समाधान न झाल्याने त्यांनी दि.२२.१०.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित होते अपीलार्थींनी आयोगासमोर सादर केले की, त्यांना कोणत्याही प्रकारे माहिती दिली नाही. याचा विचार करता असे निर्देश देण्यात येतात की अपीलार्थींना त्यांनी मागितलेली माहिती सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत विनाशुल्क पुरविण्यात यावी. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या अनुपस्थितीचा खुलासा १५ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा तसेच अपीलार्थींना विहित मुदतीत माहिती न पुरविल्याच्या कारणास्तव

अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे टपाली सादर करावा.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०२५/०२**

**श्री. अमोल दगडु जुंद्रे** **------ अपीलकर्ता**
**पोलीस हेडक्वार्टर,लाईन नं.४, रुम नं.१७८,**
**नाशिक-२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी** **------- उत्तरवादी**
**एस.एस.डी.जे.कॉलेज ऑफ फार्मसी निमीनगर,चांदवड,**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**एस.एस.डी.जे.कॉलेज ऑफ फार्मसी निमीनगर,चांदवड,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २५.०८.२००८
सुनावणीचा दिनांक : २६.१०.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थीनी दि.१४.२.२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

" १. कॉलेज तर्फे कॉलेजच्या स्थापनेपासून गुणपडताळणी अर्ज विद्यापीठाकडे पाठविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या

२. गुण वाढवून मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या.

३. किती विद्यार्थ्यांना गुण पडताळणीसाठी भरलेले शुल्क परत करण्यासाठी विद्यापीठाने रक्कम कॉलेजकडे पाठविली. या विद्यार्थ्यांची नावे व पत्ते.

माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दि.२७.०६.२००८ रोजी प्रथम अपील केले. परंतु यावर निर्णय झाला नाही. यास्तव त्यांनी दि.२५.०८.२००८ रोजी व्दितीय अपील केले.

अपीलावरील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की आमची संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त न्यास अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीक.त आहे. अशा शैक्षणिक संस्थाना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही. अर्जदाराने मागितलेली माहिती ही महाविद्यालयाला मागितलेली आहे. ट्रस्टला नाही. त्यामुळे माहिती देणे आवश्यक ठरते. गुणपडताळणी हा विद्यापीठ-कॉलेज यांनी हाताळण्याचा विषय आहे व यासदंर्भात विद्यापीठाने पध्दती निश्चीत केलेली असते. मात्र माहिती मागत असतांना अर्जदाराने हि विवेकपणे वागणे आवश्यक आहे. कॉलेजच्या स्थापनेपासूनची माहिती द्या असे म्हणणे हे Untrstsblr आहे.पण कॉलेज ज्या पध्दतीने गोषवारा ठेवीत असेल त्या गोषवाऱ्याच्या दोन वर्षाच्या प्रती देण्यात याव्यात अर्जदार जी माहिती मागतात ती कॉलेज प्रशासनाकडे नसेल तर त्यांनी ते स्पष्ट करावे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**
**कॉलेज प्रशासनाने कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०४७/०२**

**श्री. विष्णू विठ्ठल साबळे** **------ अपीलकर्ता**
**मु.पो.विंचूर,ता.निफाड,जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**प्रादेशिक सहसंचालक (साखर) अहमदनगर**

**जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी सांचालक निफाड सहकारी साखर कारखाना पिपळस,**
**पो.भाऊसाहेब नगर,ता.निफाड, जि.नाशिक**

**- विवेचन -**

अपीलाचा दिनांक : ३१.०७.२००८
सुनावणीचा दिनांक : २६.१०.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

अपीलार्थीनी दि.१०.७.२००७ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

" १. सन २००४ ते २००६ या कालावधीच्या ऑडीट रिपोटस ची छायांकित प्रत.

२. लेखा परीक्षकाचे नांव

३. या कालावधीतील संचालकांची नावे व कार्यकाल."

यावर जन माहिती अधिकारी यांनी खालील उत्तर दिले.

" माहितीबाबतची कागदपत्रे चौकशीकामी निफाड पोलीस स्टेशन मध्ये नेलेली आहेत. कागदपत्रे उपलब्ध झाल्यानंतर माहिती दिली जाईल.

या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.६.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपीलावरील सुनावणीचे आदेश दि.२.१.२००८ रोजी पारित करण्यात येऊन अपीलार्थीच्या मागणीनुसार कागदपत्रे मिळाली असल्याने अपील खारीज करण्यात आले.

यावर समाधान न झाल्याने अपीलार्थीनी दि.३१.०७.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. यावरील सुनावणीच्या वेळी असे निदर्शनास आले की अपीलार्थीना माहिती मिळाली आहे परंतु ती उशीराने मिळाली

आहे. पोलीसांनी चौकशीसाठी रेकॉड जप्त केल्याने माहिती देण्यास विलंब झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. माहिती देण्यास झालेल्या विलंबाचे कारण रास्त असल्याचे आयोगाचे मत असल्याने विलंबासाठी दंडात्मक कारवाई करण्याची आवश्यकता नाही असे मत आहे. सबब खालील आदेश देण्यात येतात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०९१/०२**

**श्री. विजय पुनम पवार ------ अपीलकर्ता**
**गट क्र.२१६,प्लॉट नं.१४/१५, रुम नं.३, स्वामी समर्थ रो.हाऊसेस,**
**अशोक नगर, सातपूर,नाशिक ०७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, जि.प.लघुपाटबंधारे विभाग,पं.स.दिंडोरी,**
**जि.प.नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी सांचालक निफाड सहकारी साखर कारखाना पिपळस,**
**उप अभियंता, जि.प.लघुपाटबंधारे विभाग,पं.स.दिंडोरी,**
**जि.प.नाशिक**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : ०५.०२.२००९
सुनावणीचा दिनांक : २७.१०.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दि.०८.०९.२००८ च्या अर्जाव्दारे उप अभियंता व शाखा अभियंता यांची सन २००३ पासूनची खालील माहिती मागितली

" १. प्रत्येक महिन्याच्या पगाराच्या पत्रकाची प्रत.

२. रहिवासाचा पत्ता (घरमालकाचे नांव व पत्यासह)

३. गावतळयाचे काम ज्या शेतकऱ्यांच्या शेतात झाले आहे त्यांच्या संमती पत्राची प्रत.

४. कामाच्या मागणीाबाबतच्या पत्राची प्रत.

५. आज प्रत्यक्ष दिसत असलेल्या गावतळयाच्या कामाचा तपशील (अंदाज पत्रक,मोजमाप, पुस्तिका,खर्चाची रक्कम इत्यादी)

६. कामाच्या पूर्वत्वाच्या दाखल्याच्या प्रती.

७. गावतळयाच्या कामावर असलेल्या अल्पभूधारक शेतकरी,दारिद्रय रेषेखालील,मजूरांची नावे, त्यांना अदा केलेली मंजूरी इत्यादी तपशील.

८. कामावरील मजूरांना पुरविण्यात आलेल्या सुविधांचा तपशील.

९. हजेरी पत्रकाच्या पृष्ठांचे क्रमांक, दिलेल्या धान्याचा तपशील.

माहिती अर्जाला उत्तर न मिळाल्याने त्यांनी २०.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि.२०.११.२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले. यानुसार अपीलार्थीनी मागणी केलेल्या सर्व मुद्यांवर चर्चा झाली व अपीलार्थीनी कामाचा उल्लेख करुन माहिती मागवावी असे ठरले.

या निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलार्थीनी दि.५.०२.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केले की अपीलार्थींना प्रथम अपीलावरील सुनावणीच्या वेळी स्पष्ट करण्यात आले की, त्यांना बांधकाम निहाय माहिती मागितल्यास ती त्यांना देता येणे शक्य आहे व ती तशी त्यांनी मागितल्यास त्यांना पुरविण्यात येईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०४२/०२**

**श्री. एम.एस.शेख** **------ अपीलकर्ता**
**सर्व्हे नं.२०६/१, घर नं. ५४ अमनपुरा मालेगांव,**
**जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नाशिक,**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, नाशिक,**
**जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. एम.एस.शेख यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.१२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१६.१०.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

शैक्षणिक वर्षे १९९५ ते २००८ पर्यंत माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची मान्यतेसाठी आलेले प्रस्तावावर केलेली कार्यवाही व कागदपत्र मिळणेबाबत अनुषंगिक एकूण ११ मुद्यांवर माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलर्काईंास माहिती दिली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकारास जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. माहिती दिली नाही. सदर दोन्ही अधिकाऱ्यांची कृती निश्चीतच योग्य नाही. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की जन माहिती अधिकाऱ्यांनी

हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती पुरवावी. सदरप्रकरणी जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नवसल्याने याबाबत त्यांना जबाबदार धरुन त्यांच्या विरुध्द रु.१०००/- इतकी शास्ती लादण्यात येत आहे. शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या डिसेंबर २००९ या महिन्याच्या वेतनातुन वसूल करावी. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांची सदर प्रकरणी सुनावणी आयोजित केली नाही. भविष्यात माहितीच्या अधिकारातील प्रथम अपीलावर वेळीच आवश्यक ती कारवाई करण्याची प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३०.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०९३/०२**

**श्री. ब्रिआन रॉड्रिक्स** ------ **अपीलकर्ता**
**१ ला मजला,पिंटोज आर्केड II, व्हिक्टरी सिनेमा जवळ,**
**इगतपुरी,जि.नाशिक ४२२ ४०३,**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नाशिक,**
**जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**गट शिक्षणाधिकारी, प.स. इगतपुरी, जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :२०.०१.२००९
सुनावणीचा दिनांक : २७.१०.२००९
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दि.२०.०८.२००८ च्या अर्जान्वये खालील माहिती मागितली.

" Details of status and progress of action taken against the H.M. of tloly family Covent High School, Igatpuri for violating safety norms and for not providing basic and infrauctural facilities to students"

या अर्जाच्या उत्तरात दि.१९.०९.२००८ रोजीच्या पत्रान्वये शाळेच्या मुख्याध्यापिकेचा खुलासा त्यांच्याकडे पाठविण्यात आला. परंतु या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि.१.१०.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन दि.६.११.२००८ खालील निर्णय देण्यात आला.

गट शिक्षणाधिकारी यांनी शाळेस भेट द्यावी. पालकांचा मेळावा घ्यावा. यात श्री. रॉड्रिक्स यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत त्यावर चर्चा घडवून आणावी. श्री. रॉड्रिक्स यांनाही सभेसाठी बोलवावे. सभेत झालेले निर्णय अपीलार्थीना अवगत करुन द्यावे व त्यांचे समक्ष ते निकाली काढावे.

यावर समाधान न झाल्याने अपीलार्थीनी दि. ७.०२.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. यावरील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले की अपीलार्थीना त्यांच्या अर्जानुसार चौकशी करुन माहिती दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२०.१०.२००९ रोजीचे त्यांचे लेखी

निवेदन आयोगास सुनावणीचे वेळी सादर केले. त्याचे अवलोकन करता असे दिसून येते की अपीलार्थींच्या माहितीच्या अर्जानुसार, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्यांनी मागितला होता. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि.६.११.२००८ च्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थींना पाठविला किंवा कसे याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांना अवगत करण्यात आलेले नाही. याचा विचार करुन असे निर्देश देण्यात येतात की जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थींना अवगत करावे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०७८/०२**

**श्री. जे.एन.लगड** ------- **अपीलकर्ता**
**बंगला नं.२०,मोदकेश्वर,इंदिरानगर,**
**ता.जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता,वि.वितरण कंपनी (ग्रामिन विभाग),औरंगाबाद**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप कार्यकारी अभियंता म.रा.विद्युत वितरण कंपनी (ग्रामिण)**
**एस.टी.स्टँडच्या पूर्वेस**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :०३.०२.२००९
सुनावणीचा दिनांक : २७.१०.२००९

अपीलार्थीनी दि.२.०८.२००८ च्या माहितीच्या अर्जान्वये खालील माहितीची मागणी केली.

" अवैध मार्गाने घरगुती वीज मीटर श्री.विलास ना.लगड यांना दिल्याच्या प्रकरणी तत्कालीन कनिष्ठ अभियंता ता.गंगापूर यांना विलंबित करुन ते वीज मीटर जप्त करुन,गुन्हा दाखल करणे व माहितीचे सर्व दस्तऐवज साक्षांकित करुन मिळणे.

माहिती अर्जाला उत्तर न मिळाल्याने त्यांनी दि.१६.०९.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी घेऊन दि.३१.१०.२००८ च्या पत्रान्वये प्रथम अपीलाचा निर्णय अपीलार्थीना कळविण्यात आला. या आदेशाविरुध्द त्यांनी दि.३.०२.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी आयोगाच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, घरगुती मिटर देतांना नियमानुसार कार्यवाही केली जाते व तशी सदर प्रकरणी करण्यात आली आहे. ही बाब विचारात घेऊन असे निर्देश देण्यात येतात की अपीलार्थीच्या अर्जाला जन माहिती अधिकारी यांनी समर्पक उत्तर दिलेले आहे. याऊपर अर्जदाराला मीटर बसविण्यासंबंधी तक्रार असल्यास ते त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याकडे तक्रार दाखल करु शकतात व त्यासंबंधाची कागदपत्रांची आवश्यकतेनुसार माहिती अधिकाराअंतर्गत मागणी करु शकतात. कर्मचारी/अधिकारी यांना निलंबीत करण्याची मागणी माहितीच्या अधिकाराअंतर्गत मोडत नाही.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०५०/०२**

**श्री. दत्तात्रय रामचंद्र ठाकुर** ------ **अपीलकर्ता**
**रा.१४/२८,संगमेश्वर,मालेगांव,जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**पोलीस उप अधिक्षक,मालेगांव कॅम्प,उपविभाग, मालेगांव,नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**अपर पोलीस अधिक्षक,मालेगांव,नाशिक**

## - वि वे च न -

अपीलकार श्री. दत्तात्रय रामचंद्र ठाकुर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार उपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.३.०९.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" १. सर्वे नं.१४ प्लॉट नं.२५/२६/२७ येथे होणाऱ्या ध्वनी प्रदुषणाबाबत शासनाने आपणास दिलेल्या यंत्र सामुग्री व्दारे तपासणी करुन त्याची अहवाल प्रत मिळावी.

२. वरील भुखंडावर दि.६.०५.१९८४, दि.२.०४.१९८६,दि.१४.०४.१९९० दि.८.०४.१९९९ अशा अनेक वेळा भिषण आगी लागल्या आहेत पुरावा अर्जासोबत सादर करत आहोत. भविष्यात होणाऱ्या अर्जासोबत हानीबाबत कोण जबाबदार असेल याची माहिती मिळावी."

जन माहिती अधिकाऱ्याने दि.१४.१०.२००७ च्या पत्रान्वये दिलेल्या उत्तराने समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.२९.१२.२००७ रोजी सुनावणी आयोजित केली. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २(च)(झ) अन्वये सदरची बाब माहितीच्या

व्याख्येत मोडत नाही. त्यामुळे माहिती पुरविण्याचे बंधन नाही. अपील अर्जातील मुद्दे समर्थनिय नाहीत. म्हणून अपीलकाराने अपील उक्त अधिनियमातील कलम १९ (घ) अन्वये फेटाळण्यात आले.

ध्वनी प्रदुषण व सुरक्षा हे महत्वाचे नियम आहे अर्जदाराचा मूळ अर्ज येऊनहि २ वर्षे होऊन गेली आहेत. तेव्हा जी कार्यवाही करण्यात आली आहे तिची माहिती अर्जदारास १५ दिवसात देण्यात यावी. जर काहीच कारवाई केली नाही असे म्हणणे असेल तर अर्जदारास तशी माहिती द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**
**जन माहिती अधिकारी यांनी अपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०५१/०२**

**श्री. विजय रामराव शिंदे** **------ अपीलकर्ता**
**मु.पो.सायाले,ता.सिन्नर,जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**धर्मदाय उपायुक्त,नाशिक,जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**अध्यक्ष,श्री.संत जनार्धन स्वामी मौनगीरी महाराज समाधीस्थान**
**श्री.काशी विश्वनाथ महादेव शैक्षणिक व गोपालन ट्रस्ट बेट,कोपरगांव,**
**ता.कोपरगांव,जि.अहमदनगर.**

## - वि वे च न -

अपीलकार श्री. विजय रामराव शिंदे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०८.२००६ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.०२.२००६ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" श्री.संत जनार्दन स्वामी यांचे उत्तराधिकारी पदाबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे व्यथित होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले."

श्री.संत सद्‍गुरु जनार्दन स्वामी मंदिर (काशी विश्वनाथ ट्रस्ट) कोपरगांव बेटमध्ये जुना आखाडा संत महंत काशी (वाराणशी) मा.श्री.मोहनराव पिशजी चव्हाण यांचे उपस्थितीत समाधी पुजनाच्या वेळेस श्री.शांतीगिरी महाराजांची उत्तराधिकारी म्हणून झालेली नेमणूक काळाच्या ओघात रद्द झाले. सदर प्रकरणात

दिशाभूल करणारी व अपूर्ण माहिती दिली असल्याचा अपीलकाराने व्दितीय अपीलात मुद्या उपस्थित केला आहे.

श्री.संत जनार्दन स्वामी यांचे उत्तराधिकारी म्हणून कोणाचीही नियुक्ती नाही. तसा ठराव नाही. तसे रेकॉर्ड नाही. कोणीही उत्तराधिकारी नाही असा मा.सीव्हील कोर्टाने निर्णय दिला आहे. लेखा परिक्षण अहवाल धर्मादाय आयुक्तांकडे जातो. प्रकरणा मा.उच्च न्यायालयात दाखल असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी सुनावणीचे वेळी प्रतिपादन केले. जन माहिती अधिकाऱ्यांकडे असलेली सर्व माहिती अर्जदारास दिलेली आहे. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९५९/०२**

**श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज** ------ **अपीलकर्ता**
**घनश्यामदास चाळ,रुम.क्र.२, संत रोहीदास मार्ग,**
**काळा किल्ला,धारावी,मुंबई ४०० ०१७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**पोलीस उपायुक्त-परिमंडळ-३**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहाय्यक पोलीस उपायुक्त**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक :१२.१०.२००९
सुनावणीचा दिनांक : ०६.११.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास त्यांच्या दिनांक ३.०७.२००९ रोजीच्या अर्जानुसार पुढील माहिती देण्यात आली.

| माहितीचे वर्गीकरणी | तपशील |
|---|---|
| १) शिल्पा गावी गेल्यानंतर तीन-चार दिवसानंतर सौ.शिल्पा यांनी जॉनसीच्या लॅन्डलाईन फोन क्र.२४०८५४४७ नुसार सांगितले की,मी आणि माझा भाऊ राजेश (उत्तरप्रदेश) या ठिकाणी सुखरुप पोहच्याबाबत सांगितले. या नुसार पोलीसांनी शिल्पा गावी पोहचल्याचे जबाबानुसार खात्री पटवली आणि तपास बंद करण्यात आला? नंतर पोलीसांच्याआजपर्यंत तपासानंतर व चौकशीनुसार जॉनसी यांनी दिलेली जबाबानुसार माहिती खरी आहे की खोटी याबाबत साक्षांकित माहिती मिळण्याबाबत. | अर्जदाराची पत्नी सौ.शिल्पा ही सुखरुप तिचे माहेरी उत्तरप्रदेश याठिकाणी पोहोचली याबाबत धारावी पो.ठाणेकडून फोनव्दारे तसेच उत्तरप्रदेश येथे व्यक्तीशः सौ.शिल्पा यांची भेट घेऊन त्याबाबत खात्री केलेली आहे. याबाबत अर्जदारास वेळोवेळी माहिती पुरविण्यात आलेली आहे. |

सदरील माहितीने अर्जदाराचे समाधान झाले नव्हते व प्रथम अपिलात सुध्दा दिलेली माहिती बरोबर आहे असे निर्णय मिळाल्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे दि.१२.१०.२००९ रोजी अपील केलेले आहे. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला सविस्तर खुलासा पुढील प्रमाणे आहे.

"अपीलार्थी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अंतर्गत कलम (३) माहिती मिळण्याकरीता दिनांक ३.०८.२००९ रोजीचा मुळ अर्ज दिनांक ३.०८.२००९ रोजी या कार्यालयात सादर केला होता. सदर अर्जामध्ये अर्जदार यांनी त्यांची पत्नी नामे शिल्पा सरोज ही गावी गेल्यानंतर ३ ते ४ दिवसांनी त्यांचे

शेजारी राहणारी श्रीमती जॉनसी जॉन कुत्तूर यांचे घरातील दुरध्वनीवर अर्जदार यांची पत्नी हीने तिचा भाऊ राजेश याचे समवत उत्तर प्रदेश या ठिकाणी सुखरुप पोहचल्या बाबत कळविले होते असे धारावी पोलीस ठाणे, मुंबई येथील अधिकाऱ्यांनी नोंदविलेल्या जबाबवरुन अर्जदार यांना माहिती दिली हाती. सदर बाबत अर्जदार यांनी माहितीच्या अधिकाराखाली केलेल्या अर्जान्वये सदरचा जबाब हा खरा किंवा खोटा याबाबतची माहिती मिळविण्यासाठी अर्ज केला होता.

त्यानुसार अर्जदार यांचा अर्ज हा पुढील कार्यवाहीकरीता या कार्यालयाजा जा.क्र.३८१५/१२७२/सपोआ/माहिती/मनिक/०९,दिनांक २७.०८.२००९ अन्वये धारावी पोलीस ठाणे येथे पाठविण्यात आला होता. सदर बाबत धारावी पोलीस ठाण्याचा जा.क्र.७१६८/२००९,दिनांक २.०९.२००९ अन्वये अर्जदार यांनी मागितलेली माहिती प्राप्त झाली. सदर प्राप्त माहितीमध्ये अर्जदार यांची पत्नी नामे सौ.शिल्पा ही तिचे माहेरी उत्तर प्रदेश येथे सुखरुप पोहचली असल्याबाबत धारावी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी यांनी स्वतः उत्तरप्रदेश येथे जाऊन सौ.शिल्पा सरोज याची समक्ष भेट घेऊन तिचा लेखी जबाब नोंदवून खात्री केलेली आहे. याबाबत अर्जदार यांनी माहितीच्या अधिकारा अंतर्गत या पुर्वी केलेल्या अर्जान्वये त्यांना धारावी पोलीस ठाण्याकडून वेळोवेळी माहिती पुरविण्यात आली होती. प्राप्त झालेली माहिती या कार्यालयाचा जा.क्र.३९००/१२७२/सपोआ/माहिती/मनिक/०९,दिनांक २.०९.२००९ अन्वये अर्जदार यांना त्यांचे भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधून प्राप्त माहिती घेऊन जाण्याबाबत कळविल्याने अर्जदार हे दिनांक ८.०९.२००९ रोजी स्वतः या कार्यालयात येऊन शासनाची पावती क्रमांक ९०५७२८६ अन्वये शुल्क रु.२/- भरुन दिनांकित स्वाक्षरी करुन प्राप्त माहिती घेऊन गेले.

सदर प्राप्त माहितीने अर्जदार यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक १४.०९.२००९ रोजी मा.प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-३,यांचे कार्यालयात केंद्राची माहितीची अधिकारी अधिनियम-२००५ रोजी झालेल्या अपील सुनावणीचे वेळी अपील दाखल केले होते. दिनांक २५.०९.२००९ रोजी झालेल्या अपील सुनावणीचे वेळी शासकिय माहिती अधिकारी यांचेवतीने पो.उ.नि.बागडे व अपीलार्थी हे हजर होते. अपीलार्थी यांना प्रथम अपीलीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक,धारावी पोलीस ठाणे यांनी जा.क्र.७५६७/०९,दिनांक २३.०९.२००९ अन्वये दिलेली माहिती योग्य असून अपीलार्थी यास देण्याचे आदेश दिले व अपील निकाली काढले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, धारावी पोलीस ठाणे यांचेकडून प्राप्त झालेली माहिती ही दिनांक ३.१०.२००९ रोजी यु.पी.सी पोष्टाव्दारे अर्जदार यांचे निवासस्थानी पाठविण्यात आलेली आहे. आपल्या अवलोकनार्थ पत्राची छायांकित प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.

सदर माहितीने अपीलार्थी यांचे समाधान न झाल्याने त्यांनी आपल्या कार्यालयात व्दितीय अपली अर्ज दाखल केलेला आहे. सदर व्दितीय अपीलाच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक धारावी पोलीस ठाणे यांच्याकडून जा.क्र.९६२०/०९,दिनांक ३.११.२००९ अन्वये प्राप्त झालेली माहिती पृष्ठ १ ते १४ अन्वये या सोबत जोडण्यात आलेली आहे.सदर प्राप्त माहितीमध्ये अर्जदार यांची पत्नी नामे-सौ.शिल्पा ही तिचे मुळ गावी उत्तररप्रदेश याठिकाणी सुखरुप पोहचली असल्याबाबतची माहिती प्रथम जॉनसी कुत्तर यांचेकडून समजली यातील पुढील चौकशीमध्ये ती उत्तरप्रदेश येथे तिचे वडीलासोबत पोहोचली असलेबाबत जबाबात नमुद केलेले आहे. अर्जदार/अपीलार्थी श्री. रामशंकर अयोध्याप्रसाद सरोज यांची पत्नी सौ.शिल्पा हि सज्ञान असल्याने ती घरातील कोणाबरोबर गेली हा मुद्या गौण असून ती माहेरी सुखरुप पोहोचली याबाबत पोलीसांनी स्वः उत्तरप्रदेश येथे जाऊन खात्री केलेली आहे. जॉनसी हिचा नोंदविलेला जबाब तिने सांगितलेल्या मजकुरासह खरा आहे. तसेच आपल्या कार्यालयाकडून संदर्भ क्र.रामाआ-४४६१९/अपील क्र.४९५९/का.०२,दिनांक २७.१०.२००९ अन्वये प्राप्त झालेल्या व्दितीय अपीलामधील मुद्या क्र.३ बाबतची माहिती व्दितीय अपीलाचे सुनावणीचे अगोदर अपीलार्थीस देण्याबाबत आदेशीत केले होते. सदर बाबत धारावी पोलीस ठाणेचे वतीने पोलीस उप-निरीक्षक महाजन यांनी अपीलार्थीस धारावी पोलीस ठाणे येथे दिनांक ३.११.२००९ रोजी बोलाविले व सदरची माहिती त्यांना दिली असता अर्जदार/अपीलार्थी यांनी सदरची माहिती वाचून पाहिली व पत्र घेण्यास नकार देऊन सही केली नाही याबाबत धारावी पोलीस ठाणे येथे ठाणे दैनंदिनी क्रमांक ४१/०९,दिनांक ३.११.२००९ अन्वये नोंद घेण्यात आलेली असून त्याची साक्षांकित प्रत आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडण्यात आलेली आहे."

वरील खुलाशावरुन व सर्व कागदपत्रे पाहिल्या नंतर असे दिसून आले की अर्जदारास खात्री करुनच सर्व माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ०६.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९७८/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे** **------ अपीलकर्ता**
**२०४,राजबाग,दलुचंद का.ऑ.हौ.सोसायटी लि.**
**२७१,सर भालचंद्र मार्ग,माटुंगा, मुंबई ४०० ०१९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका,इ विभाग कार्यालय,**
**भायखळा, मुंबई ४०० ००८**

**जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी अभियंता (इ.प्र), बृहन्मुंबई महानगरपालिका,इ विभाग कार्यालय,**
**भायखळा, मुंबई ४०० ००८**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ३१.०८.२००९
सुनावणीचा दिनांक : १०.११.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती.

" पुनर्विकसीत इमारतीमधील नवीन गाळे विकण्यासंबंधी जे नियम आहेत त्या नियमांची माहिती देण्यात यावी सदर माहिती धारीणीमध्ये नाही."

या अगोदर अर्जदाराने केलेल्या दुसऱ्या अर्जामध्ये व या अर्जामध्ये अर्जदारास पुनर्विकास बांधकामाचा जो सेल कंपोनंट असतो त्यातील गाळे विकण्यासंबंधी महापालिकेचे कुठचेही नियम नाहीत. त्यामुळे यासंबंधी संबंधीत फाईल मध्ये कुठच्याही प्रकारची माहिती असणे हे अपेक्षित नाही. फ्लॅटच्या विक्रीसंबंधी महापालिकेचा संबंध नाही त्यामुळे नस्ती मध्ये त्यासंबंधी माहिती नाही हे म्हणणे पटण्यासारखे आहे.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: १०.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र . ४९७७/०२**

**श्री. प्रकाश गोविंद नवाथे ------ अपीलकर्ता**
**२०४,राजबाग,दलुचंद का.ऑ.हौ.सोसायटी लि.**
**२७१,सर भालचंद्र मार्ग,माटुंगा, मुंबई ४०० ०१९**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**उप मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगरपालिका,इ विभाग कार्यालय,**
**भायखळा, मुंबई ४०० ००८**

**जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी अभियंता (इ.प्र), बृहन्मुंबई महानगरपालिका,इ विभाग कार्यालय,**
**भायखळा, मुंबई ४०० ००८**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : ३१.०८.२००९

सुनावणीचा दिनांक : १०.११.२००९

अपीलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती.

" वरील विषयांकीत शेवटच्या बेसमेंट फ्लोअर प्लॅनमध्ये दोन्ही पॅसेंजर लिफ्टचे पीट बेसमेंट खाली दाखवण्यात आले आहेत. फायर ब्रिगेडच्या FBM/५०१/३५३/dt.११.०३.२००२ या एन.ओ.सी.प्रमाणे दोन पॅसेंजर लिफ्ट बेसमेंटपर्यंत जाणे आवश्यक आहे. परंतु तशी रचनाही करण्यात आलेली नाही. प्रत्यक्षात पीटमधली स्लॅब पीटमध्ये नसून बेसमेंटमध्ये जमिनीपासून चार सहा फुट उंचीवर आहे.

अशा बेकायदेशीर,धोकादायक,मंजुर प्लॅनप्रमाणे नसलेल्या बांधकामाबाबत कोणती कारवाई होणार याची माहिती देण्यात यावी. अशी परिस्थितीत राजबागला बी.सी.सी कसे देण्यात आले याची माहिती देण्यात यावी. "

उपप्रमुख अभियंता इमारत प्रस्ताव शहर यांनी अर्जदारास अशी माहिती दिलेली आहे की विषयांकीत प्रस्तावाचा दाखला मंजूर आराखडयाप्रमाणे काम पुर्ण झाल्याची खात्री केल्यानंतर व मुंबई अग्नीशमन दलाचे नाहरकत

प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच स्विकारण्यात आलेला आहे. त्यामुळे रेकॉडला असलेली स्थिती ही अर्जदारास देण्यात आलेली आहे त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १०.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १११४/०२**

**श्री. प्रमोद दत्तात्रय कुलकर्णी ------ अपीलकर्ता**
**७,आशिष अपार्टमेंट अल्को मार्केटच्या मागे,राजीव नगर,**
**नाशिक,मु.ता.जि.नाशिक,**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**उपविभागीय अधिकारी,अमळनेर भाग,अमळनेर, ता.अमळनेर,जि.जळगांव**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तलाठी,मौजे गळवाडे,ता.अमळनेर,जि.जळगांव**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. प्रमोद दत्तात्रय कुलकर्णी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०२.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, अनुपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१५.१०.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

"म.दुय्यम निबंधक अमळनेर यांचे कडील अ.नं.३१ दि.८.०१.१९७६ ची सुची क्र.२ ची छायाप्रत दिली आहे. मौजे-गळवाडे बु.ता.अमळनेर येथील गट नं. १३८ प्लॉट नं.१ क्षेत्रुफळ २८१ चौरस मीटर सौ.रुक्मीणीबाई भ्रा.श्रीकृष्ण ब्रम्हे यांचे स्पेशन मुखत्यार श्रीकृष्ण मार्तड ब्रम्हे यांचे कडून अ.न.३१ दि.८.०१.१९७६ रोजी १) प्रमोद दत्तात्रय कुलकर्णी २) सुलभा भ्रा.प्रमोद कुलकर्णी यांनी रु.७५०/- व खरेदीने घेतला आहे. तरी मला आपलेकडून खालीलप्रमाणे माहितीची आवश्यकता आहे. १) वर वर्णन केले प्रमाणे अ.न.३१ दि.८.०११९७६ चे खरेदीखताचे एस.आर (अनुकमांक) आपणांस कधी प्राप्त झाले.२) सदर खरेदीखताप्रमाणे मौजे गळवाडे बु.ता.अमळनेर येथील गट नं.१३८ प्लॉट नं. वर १) प्रमोद दत्तात्रय कुलकर्णी २)

सुलभा श्रा.प्रमोद कुलकर्णी यांची नावे दाखल असलेला गट नं. ३८ प्लॉट नं.१ चा सातबाराचा उतारा मिळावा "

जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.६.११.२००८ च्या पत्रान्वये माहिती दिली. जन माहिती अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले.४४ प्लॉट धारकाने एकाच प्लॉटची विक्री दोन वेगवेगळया गृहस्थांना केल्यामुळे अपीलकाराची फसवणूक झालेली आहे. हक्कपत्री सन १९७६ मध्ये नोंद न झाल्याने वाद उद्‌भवला आहे. नोंदणीकृत खरेदी दस्तऐवजानुसार अपीलकाराने दिवाणी न्यायालयातून न्याय मिळवून घेणे उचित राहील असे दि.७.०१.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. सदर प्रकरणी अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यांनी समर्पक उत्तर दिले आहे. यामुळे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.७.०१.२००९ रोजी सदर प्रकरणी पारित केलेल्या आदेशात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ७००/०२**

**श्री. सुधाकर आर.जाधव/ ------ अपीलकर्ता**
**श्री.नरेंद्र मधुकर लचके, एन-४१,जेए-३-१२-१,**
**सावतानगर,४ थी स्कीम,नवीन सिडको,**
**नाशिक-८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.मर्या.**
**चाचणी नि.अ.उ.दा. (संवसु) विभाग,एमआयडीसी,मिरजोळे, रत्नागीरी,जि.रत्नागीरी**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कं.मर्या.**
**चाचणी नि.अ.उ.दा. (संवसु) विभाग,एमआयडीसी,मिरजोळे, रत्नागीरी,जि.रत्नागीरी**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. सुधाकर आर.जाधव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.६.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, अनुपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२४.०१.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" कार्यकारी अभियंता,उप अभियंता यांचे नाव,शेवटची Posting कार्यालयाचे नाव,दूरध्वनी क्रमांक,भ्रमणदूरध्वनी,फॅक्स नं.पहिला नेमणूकीचा दिनांक, दरमहाचे वेतन (३ वर्षाची वेतनाची रक्कम) सद्याचे मासिक वेतन इत्यादी अनुषंगीक माहिती मागितली होती.माहिती संचालकाचे काम चालू असून माहिती संकलीत झाल्यानंतर पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.६.०२.२००८ च्या पत्रान्वये कळविले. माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदरप्रकरणी जन माहिती अधिका/प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती दिली नाही. सुनावणी आयोजित केली नाही. सदर दोन्ही अधिकाऱ्यांची कृती निश्चीतच योग्य नाही. राज्यात केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. या परिस्थीतीत मी असे आदेश देतो की जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ११३२/०२**

**श्री. छबु किसन गुंबाडे, ------ अपीलकर्ता**
**बंगला नं.७३, आशा कंस्ट्रक्शन, धात्रक फाटा,आळगांव,**
**नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी,नाशिक विभाग,नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी,नाशिक विभाग,नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. छबु किसन गुंबाडे यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.९.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, अनुपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०५.०४.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" जेष्ठतासुचिनुसार वेळोवेळी कर्मचाऱ्यांना दिलेल्या बढतीबाबत अ,ब,क मुद्यानुसार अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी चुकीची दिशाभूल करणारी माहिती दिली. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीलकाराचे समाधान न करता प्रथम अपील फेटाळले असता अपीलकाराने व्दितीय अपीलात मुद्या उपस्थित केला आहे.

अपीलकारास पदोन्नती नाकारण्यात आली असल्याबाबत त्यांनी अनुषंगीक माहिती मागितली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दिलेल्या माहितीची प्रत अपीलातील कागदपत्रावर नसल्याने त्याची तपासणी करता आली नाही. एकदा पदोन्नती

नाकारल्यानंतर पुन्हा पदोन्नती देता येते का?किंवा बढती देऊ नये असे नियम आहेत का? अशी प्रश्नोत्तर स्वरुपात अपीलकाराने माहिती मागितली असल्याचे दिसते अपीलकार प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी कार्यालयातून "मंजूर" म्हणून सेवानिवृत्त झाले आहेत. अपीलकाराच्या सेवापुस्तकात चुकीच्या वेतन निश्चीतीची नोंद घेतली. त्यामुळे चुकीचे निवृत्तीवेतन मिळत असल्याची अपीलकाराने खंत व्यक्त केली आहे.याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास सविस्तर माहिती हे आदेश प्राप्त झालेपासून १५ दिवसाचे आत पुरवावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १११६/०२**

**श्री. अन्सारी इजाज अहमद मोहम्मद फारुकी ------ अपीलकर्ता**
**व्दारा,सन ७४/४, प्लॉट नं ६३, अन्सार कॉलनी,जुना आग्रा रोड,**
**महाराष्ट्र जिनिंग जवळ,मालेगांव,**
**जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**सहायक धर्मादाय आयुक्त,जानकी प्लाझा, व्दारका सर्कल,नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सचिव,अंजुमन तराकी ई तलीम, मालेगांव,व्दारा-मुख्याध्यापक,**
**अे.टी.टी. हायस्कुल व जुनीअर कॉलेज,मालेगांव,ता.मालेगांव,जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. अन्सारी इजाज अहमद मोहम्मद फारुकी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१६.०२.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, अनुपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०१.०९.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" मालेगाव येथील अंजूमन तारक्की-ई-तल्लीम या संस्थेने अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त केला आहे का ? सक्षम प्राधिकरणानी तसे प्रमाणपत्र दिले असल्यास त्या प्रमाणपत्राची छायाप्रतीची मागणी केली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ विश्वस्त मंडळास लागू नाही असे संस्थेच्या सचिवांनी दिनांक ९.०९.२००८ च्या पत्रान्वये अपीलकारास कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली दि.२९.१२.२००८ रोजी आदेश पारित करुन अपील फेटाळले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

विश्वस्त मंडळास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नसल्याबाबत मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ उपनगर यांनी याचिका क्र.५२९४/२००८ मध्ये निर्णय दिला आहे. यामुळे अपीलकाराने विश्वस्त संस्थेकडे मागणी केलेली माहिती अपीलकारास देणे बंधनकारक नाही. मात्र या ट्रस्टला शासनाची भरीव मदत मिळते म्हणून हा ट्रस्ट "सार्वजनिक प्राधिकरण " या संज्ञेत येतो असे जर अर्जदारास वाटत असेल तर त्यासंबंधी अर्जदाराने त्यांचेकडे जी काही माहिती असेल ती सहायक धर्मादाय आयुक्तांना द्यावी. म्हणजे सहायक धर्मदाय आयुक्त सदरील ट्रस्ट "सार्वजनिक प्राधिकरण" आहे किंवा नाही याबाबत निर्णय घेतील व ट्रस्ट सार्वजनिक प्राधिकरण आहे असे ठरल्यास माहिती देण्याबाबत निर्देश देतील.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ७२१/०२**

**श्रीमती रंजना पोपटराव भानसी** ------ **अपीलकर्ता**
**७ ब केतकी हौसिंग सोसायटी, म्हसरुळ,**
**नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**अपर आयुक्त आदिवासी विभाग, नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक आयुक्त, अपर आयुक्त आदिवासी विभाग, नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्रीमती रंजना पोपटराव भानसी यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०८.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, अनुपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१६.०६.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" सन २००८ या शैक्षणिक वर्षाच्या आरंभी म्हणजे मे २००८ आज अखेर करण्यात आलेल्या आदिवासी विकास अपर आयुक्तांच्या अधिपत्याखालील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत १) प्रशासकीय बदल्या करतांना ज्या नावांचा विचार केलेला आहे त्यांची नावे,पदनाम, कार्यालय/वसतीग,ह/आश्रमशाळा,तेथील कालावधी (तारखेसह पासुन ते पर्यंतचा) संबंधीत कर्मचाऱ्यांने बदलीची मागणी केली असल्यास त्याबाबतचा उल्लेख,२)बदली मागणी नसतांनाही विनंती बदली प्रस्तावित केली असल्यास कशाच्या आधारे विनंती बदली केली त्याबाबतचा सबळ पुरावा.३) संबंधीत कर्मचाऱ्यांविरुध्द तक्रार असल्यास त्या तक्रारीची चौकशी केली असल्यास त्याबाबतचे कागदपत्र. यौकशी केली सल्यास चौकशी न करता बदली करण्यामागचे कारण. ४) मा.मंत्री /राज्यमंत्री/आदिवासी विकास व अन्य विभागाचे मंत्री/लोकसभा/विधानसभा/विधानपरिषद सदस्य/शासन/आयुक्त,आदिवासी विकास यांचे कडून काही बदल्या

प्रस्तावित केल्या असल्यास त्याबाबतच्या पत्रांच्या प्रती,५) वरील १ ते ४ प्रमाणे करण्यात आलेल्या बदल्यांच्या आदेशाच्या सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांना पाठविण्यात आलेल्या आदेशाच्या कर्मचारी निहाय प्रती.

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.२२.०७.२००८ च्या पत्रान्वये एकूण ५ मुद्यांवर १७४ व सीडी अशी माहिती दिली. दरम्यान माहिती मिळाली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१६.०७.२००८ रोजी प्राम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी आदेश पारित केले नाहीत. अपूरी माहिती मिळाली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकार तसेच उत्तरवादी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अनुपस्थित होते. अपीलातील कागदपत्रांच तपासणी केली असता अपीलकाराने आदिवासी विकास विभागातील सन २००८ मधील बदल्याबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती एकूण १७४ पाने तसेच सीडी उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येते. यावरुन सदरप्रकरणी अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यांनी आवश्यकती कारवाई केली असल्याचे दिसते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ११३९/०२**

**श्री. सुधाकर आर.जाधव/** ------ **अपीलकर्ता**
**श्री.नरेंद्र मधुकर लचके, एन-४१,जेए-३-१२-१,**
**सावतानगर,४ थी स्कीम,नवीन सिडको,**
**नाशिक-८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य**
**अपंग वित्त व विकास महामंडळ मर्या. खोली नं.-७४,म्हाडा,बांद्रे (पू),मुंबई ४०० ०५१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ**
**मर्या. खोली नं.-७४,तळमजला,म्हाडा,बांद्रे (पू),मुंबई ४०० ०५१**

## - वि वे च न -

अपीलकार श्री. सुधाकर आर.जाधव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, अनुपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०९.०६.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" नवीन सिडको नाशिक४२२ ००८ अपीलीय अधिकाऱ्यांचे नाव व पत्ता फोन नं. कळवावा.

अपंग वित्त महामंडळ मुंबई यांचे वतीने श्री वाहयाळ (Vayhal) यांना कर्ज देऊन Pick up ही चार चाकी गाडी घेऊन दिलेली आहे. सदरील गाडीचा नंबर MH12/9545 असा आहे. सदरील कर्जास सुमारे २ ते ३ वर्ष झालेले आहेत.

सदरील गाडीसाठी कर्ज देतांना आपण महामंडळाच्या नियमानुसार कर्जदाराकडून कागदपत्र घेतलेली आहे त्या सर्व कागदपत्रांची यादी मला कळवावी.

अपंग वित्त महामंडळाची स्थापना झाल्यापासून ते मार्च २००७ पर्यंत नाशिक जिल्हयातुन चार चाकी वहाने घेण्यासाठी किती लोकांना आपल्याकडे कर्चाचे अर्ज केलेले आहेत. त्यापैकी किती लोकांचे कर्ज मंजुर झालेले आहेत नावे द्यावीत तसेच किती लोकांचे नामंजूर झालेली आहेत त्याची नावे व नामंजुरीची कारणे द्यावीत "

जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.७.०९.२००७व दि.२२.०८.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास माहिती दिली असल्याने अपील निकाली काढण्यात येत आहे असे प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी अपीलकारास कळविले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी पुरविलेली माहिती संशयास्पद व दिशाभूल करणारी वाटते असा मुद्या उपस्थित करुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी, अपीलकार अनुपस्थित होते. अपीलातील कागदपत्रांची तपासणी केली असता जन माहिती अधिकाऱ्यांनी दि.७.०९.२००७ व २२.०८.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास माहिती दिली असल्याचे दिसून येते. संशयास्पद व दिशाभूल करणारी माहिती दिली असे का वाटते याचे कुठलेही विवेचन अपीलार्थीने दिलेले नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ६७९/०२**

**श्री. राजेंद्र काळु नानकर ------ अपीलकर्ता**
**एन-५३, अे.जे.१/२६/५,महात्मा फुले नगर, पवननगर सिडको,**
**नविन नाशिक-८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद पुणे,पुणे**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद पुणे,पुणे**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. राजेंद्र काळु नानकर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२५.०७.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, अनुपस्थित होते.अपीलकार उपस्थित होते. सुनावणीचे वेळी अपीलकाराचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२०.०२.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" डॉ.डी.पी.काटकर अतिरक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग जिल्हापरिषद, पुणे येथे आधी कार्यरत होते त्या संदर्भात सविस्तर माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

मात्र अपीलार्थीचे म्हणणे असे की त्यांनी अपील हे औरंगाबाद माहिती आयोगाच्या कार्यालयात केले आहे तेव्हा हे अपील त्याच आयुक्तांनी चालवावे. सध्या नाशिक विभागाचा कार्यभार औरंगाबाद राज्य माहिती आयुक्तांकडे आहे. औरंगाबाद विभागाचा कार्यभार फार अवजड असल्याने नाशिक विभागाच्या कांही अपीलांची सुनावणी स्वतः मुख्य माहिती आयुक्त सर्वांची सोय व्हावी, अपीलार्थी व सरकारी अधिकारी यांचा प्रवास खर्च व वेळ वाचावा म्हणून नाशिकला येऊन सुनावणी घेत असतात. या विशेष सुनावणीत अपीलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पूर्ण संधी

देण्यात येते. निकाल आपल्याच बाजूने लागावा अशी मात्र अपेक्षा ठेवणे रास्त नाही. त्यामुळे अपीलार्थीची विनंती अमान्य करण्यात आली.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हापरिषद पुणे यांनी अपीलकारास खालीलप्रमाणे दि.२९.०४.२००८ च्या पत्रानुसार डॉ.डी.पी.काटकर यांचेबाबत माहिती दिली.

"१. डॉ.श्री. डी.पी.काटकर, हे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी या पदावर आरोग्य विभाग, जिल्हापरिषद, पुणे येथे दिनांक ३०.०६.२००३ पासून दि.३०.११.२००५ पर्यंत कार्यरत होते.

२.डॉ.श्री. डी.पी.काटकर, हे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी या पदावर कार्यरत असताना दिनांक ३०.०६.२००३ ते ३०.११.२००४ या कालावधीत शासकिय निवासस्थानामध्ये राहत होते. त्यावेळी त्यांना घरभाडे भत्ता देणेत आलेला नाही.दिनांक १.०४.२००४ ते दिनांक ३०.११.२००५ या कालावधीत ते शासकीय निवासस्थानामध्ये राहत नसल्याने त्यांना शासकीय नियमाप्रमाणे घरभाडे भत्ता देणेत आलेला आहे.

३.डॉ.श्री. डी.पी.काटकर, हे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे बद्दल शासकिय कर्मचारी,नागरिक,राजकिय पक्षाच्या कडून तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या नाहीत.

४. डॉ.श्री. डी.पी.काटकर, हे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.पुणे येथे कार्यरत असताना त्यांचेकडे इंडो जर्मन प्रकल्प या विभागाचा पदभार होता.

५. डॉ.श्री. डी.पी.काटकर, हे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.पुणे यांना शासकीय नियमानुसार घरभाडे भत्ता दिला जात होता."

अपीलकाराने मागणी केलेली माहिती, प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी वर नमुद केल्यानुसार दिली आहे. यावरुन सदर प्रकरणी आवश्यकती कार्यवाही पुर्ण झाली असल्याचे दिसून येते. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ७०१/०२**

**श्री. सुधाकर आर.जाधव/** ------ **अपीलकर्ता**
**श्री.नरेंद्र मधुकर लचके, एन-४१,जेए-३-१२-१,**
**सावतानगर,४ थी स्कीम,नवीन सिडको,**
**नाशिक-८**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**व्यवस्थापकीय संचालक ,महाराष्ट्र राज्य, अपंग व वित्त विकास महामंडळ मर्यादित.,**
**खोली क्रमांक ७४, तळमजला,म्हाडा,बांद्रे (पूर्व),मुंबई ५१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य, वित्त विकास महामंडळ मर्यादित.,**
**खोली क्रमांक ७४, तळमजला,म्हाडा,बांद्रे (पूर्व),मुंबई ५१**

## - वि वे च न -

अपीलकार श्री. सुधाकर आर.जाधव यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.१२.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, अनुपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२९.०८.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" आपल्या महामंडळातील चार चाकी वाहने घेण्यासाठी नाशिक जिल्हयातील १६ अपंग लाभार्थींना कर्ज मंजुर करण्यात आलेले आहेत. त्या सर्व कर्जमंजुरीच्या फाईल्स ज्यामध्ये कर्जमंजुर करतांना जी कागदपत्रे घेतलेली आहेत ती सर्व कागदपत्रे ठेवलेली आहेत. अशा सर्व फाईल्स आम्हाला आपल्या बांद्रे या ऑफीसमध्ये बघावयाच्या आहेत त्यामुळे सदरील फाईल आपण जेथे असतील तेथुन आपल्या कार्यालयात मागवून ठेवण्यात व उपलब्ध झाल्यानंतर आम्हाला बदलण्यासाठी तारीख व वेळ द्यावी. आपण म्हटलेले आहे की मार्च २००७ पर्यंत नाशिक जिल्हयातून ८१ लोकांनी अर्ज केलेले असून त्यापैकी १६ लाभार्थींना कर्ज मंजुर करण्यात आलेले आहे व इतर अर्ज विचाराधीन आम्ही आपण सदरील अर्ज किती वर्ष विचाराधीन ठेवू शकतात ते कळविणे."

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.९.१०.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली. यामुळे समाधान झाले नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास विहित मुदतीत उत्तर दिले असल्याने प्रथम अपील निकाली काढले असल्याचे दि.६.११.२००७ च्या पत्रान्वये अपीलकारास प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी कळविले. दिशाभूल करण्यात येत असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी उत्तरवादी तसेच अपीलकार अनुपस्थित होते. अपीलकाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. ९.१०.२००७ च्या पत्रान्वये दिली असल्याचे दिसून येते. यावरुन सदरप्रकरणी अर्जावर जन माहिती अधिकाऱ्यांनी समर्पक उत्तर दिले असल्याने प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयात कोणताही फेरबदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढयात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०६०/०२**

**श्रीमती जुबैदा मर्दजमाल** ------ **अपीलकर्ता**
**मुसलिम नगर,सर्व्हे नं. १५९,घ.न.१०/१,**
**मेराज ब्रिस्सीवाले यांच्यासमोर, मालेगांव,**
**जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**उप विभागीय अधिकारी मालेगांव,जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**धान्य वितरण अधिकारी धान्य वितरण कार्यालय,मालेगांव शहर,**
**मालेगांव**

**- वि वे च न -**

अपीलार्थींनी दि.२६.०८.२००८ रोजी अर्ज सादर करुन खालील माहिती मागितली.

" दि.१४.०८.२००७ रोजी पिवळे रेशन कार्ड मिळण्यासाठी अर्ज केला होता त्यावर केलेल्या कार्यवाहीचा तपशील देण्यात यावा."

उपरोक्त माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि. २६.०९.२००८ रोजी खालील प्रमाणे उत्तर देण्यात आले.

या कार्यालयासाठी देण्यात आलेला इष्टांक पूर्ण झालेला असल्याने पिवळे रेशन कार्ड देता येत नाही.

या उत्तराने व्यथित होऊन त्यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केला. यावर दि.१९११.२००८ रोजी खालील आदेश पारित करण्यात आलेत.

जन माहिती अधिकारी तथा धान्य वितरण अधिकारी यांनी अर्जदारांना शासन निर्णयाची प्रत ७ दिवसात उपलब्ध करुन द्यावी.

परंतु माहिती न दिल्यामुळे त्यांनी दि.११.१२.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. यावरील सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर होते. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीसाठी हजर नसणे गंभीर बाब आहे. तरी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या गैरहजेरीबाबतचा खुलासा सदर आदेशाच्या दिनांकापासून

१५ दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्देशिलेली माहिती त्यांना या अगोदर पुरविली नसल्यास विना विलंब पुरविण्यात यावी.

**आदेश**

**अपील निकाली काढयात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०६६/०२**

**श्री.अर्जुन नामदेव सोनवणे ------ अपीलकर्ता**
**जानकी बंगला, गंधर्वगरी उत्सव मंगल कार्यालय,**
**नाशिक रोड,नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**सह आयुक्त अनुसूचित जमाती प्रमाण पत्र समिती नाशिक विभाग, नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**अनुसूचित जमाती प्रमाण तपासणी समिती,**
**नाशिक विभाग,आदिवासी विकास भवन, नाशिक**

## - वि वे च न -

अपीलार्थीनी दि.०७.१२.२००६ रोजी अर्ज सादर करुन खालील माहितीची मागणी केली.

" १. समिती कार्यान्वित होण्यापूर्वी वैधता प्रमाणपत्र देण्यात येत नव्हते नवीन अर्ज करणाऱ्यास वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी कोणते निकष लावण्यात आले.

२. समितीच्या स्थापनेपासून धुळे,नंदुरबार,जळगांव जिल्हयातील किती लोकांना टोकरे कोळी जमातिची वैधता प्रमाणपत्र देण्यात आली.

३. उपरोक्त जिल्हयातील किती लोकांना शाळेच्या व इतर दाखल्यात हिंदु कोळी/कोळी नोंद असलेल्यांना वैधता प्रमाणपत्र देण्यात आलीत.

या व्यतिरिक्त इतर काही मुद्यांचा खुलासा अर्जदारांनी मागितला होता.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.१.२००७ रोजी अर्जदारास उत्तर देण्यात आले. त्यानुसार माहिती संकलित करण्याचे कामी वेळ लागणार असल्याने माहिती संकलित झाल्यावर देण्यात यावयाची होती.

या उत्तराने समाधान न या उत्तराने समाधान न झाल्याने व माहिती प्रण प्राप्त न झाल्याने त्यांनी दि.१३.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपीलावरील सुनावणी होऊन समितीकडे उपलब्ध असलेली वैधता प्रमाणपत्राची यादी त्यांना पुरविण्यात आली. इतर माहिती स्पष्टीकरण स्वरुपाची असल्याने ती देण्याची पुर्तता करु शकत नाही असे अपीलार्थीस दि.२.०२.२००८ रोजी कळविले आहे.

यावर अपीलार्थींनी दुसरे अपील आयोगाकडे दाखल केले. अपीलावरील सुनावणीच्यावेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सादर केले की जी माहिती समितीकडे उपलब्ध होती ती त्यांना पुरविण्यात आली आहे.अर्जदाराच्या दुसऱ्या मुद्यांबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे प्रतिपादन केले.

" सुनावणीच्या वेळेस त्यांनी या कार्यालयातील सर्व नस्त्या अवलोकन करुन त्यांना हवी असलेली सर्व कागदपत्रे देण्याची व्यवस्था केली जाईल असे सांगितले असता नस्त्या अवलोकन करण्यातस त्यांनी नकार दिला. तसेच कार्यालयानेच नस्त्या शोधुन अवलोकन करुन त्यांना हवी असलेली माहिती तयार करुन देण्याचा आग्रह धरला. सध्या या कार्यालयात निर्णयीत ७०००० ते ८०००० नस्त्या आहेत. हया नस्त्यांमधुन टोकरे कोळी या विशिष्ट जातीच्या उमेदवारांच्या नस्त्या शोधणे, नस्त्या शोधल्यानंतर प्रत्येक नस्तीतुन श्री सोनवणे यांनी मागणी केलेल्या माहिती प्रमाणे अर्जदाराच्या दाखल्यात वडिलांच्या,आजोबांच्या दाखल्यात हिंदु कोळी अशी नोंद आहे ते शोधणे, त्यानुसार नावाप्रमाणे माहिती तयार करुन देणे,उमेदवारांचा हुद्दा,वंशावळ शोधणे,एकाच कुटुंबातील किती उमेदवारांना वैधता/अवैध प्रमाणपत्र दिले ते शोधुन माहिती तयार करुन देण्याचा श्री सोनवणे यांनी सुनावणीच्या वेळेस आग्रह धरला."

जळगाव व नंदुरबार हे जिल्हे समितीच्या कक्षेत येत नसल्याने जिल्हयाची माहिती त्या जिल्हयाच्या समितीकडून घ्यावी लागेल अशा प्रकारे माहिती करुन द्यावयाची झाली तर कार्यालयाच्या मनुष्यबळावर अवाजवी ताण पडेल व इतर हि महत्वाची कामे राहू न जातील हे म्हणने मान्य करण्यात येत आहे.जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निवेदनाचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

**अपील अमान्य करण्यात येऊन निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०७३/०२**

**श्री.अन्सारी शसुद्दोहा मो. युसुफ ---- अपीलकर्ता**
**३१२, रविवार वॉर्ड,किल्ला,मालेगांव ४२३ २०३, जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी**
**सचिव, अंजुमन माईनुत तुलबा,स.नं.१६८/१,**
**रौनकाबाद,नयापूरा वॉर्ड, मालेगांव,ता.मालेगांव,जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**मुख्याध्यापक,अंजुमन माईनुत तुलबा,मालेगांव संचलित,**
**मालेगांव हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज,रौनकाबाद, मालेगांव,ता.मालेगांव,जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलार्थींनी दि.२७.११.२००७ ज्या माहिती अर्जान्वये संस्थेबाबत व संस्थेच्या सभासदांबाबत एकूण १० मुद्यांवर माहिती मागितली.सदर अर्जातील माहिती अंजुमन माईनुत तुलबा, मालेगांव या संस्थेशी संबंधीत असल्याने त्यांचा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत संस्थेच्या सचिवांकडे वर्ग केला व तसे केल्याचे अपीलार्थीस दि.३.१२.२००७ च्या पत्रान्वये कळवले. परंतु त्यांच्या माहिती अर्जाला उत्तर प्राप्त न झाल्याने त्यांनी दि.१२.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. पंरतु यावर सुनावणी झाली नाही. यास्तव त्यांनी दि.१६.०४.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील

दाखल केले.

व्दितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी अपीलार्थी गैरहजर होते. परंतु त्याचा लेखी खुलासा सादर केला जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सादर केले की अपीलार्थींना यापुर्वी माहिती दिलेली आहे. तसेच दिनांक २३.१०.२००९ रोजी पुन्हा रजिस्टर डाक नोंदीने माहिती पुरविली आहे. त्यांनी अपीलार्थींनी दिलेली पत्राची प्रत सादर केली. यावरुन असे दिसते की अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार माहिती पुरविण्यात आली आहे. सबब खालील आदेश पारित करण्यात येतात.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०५७/०२**

**श्री.अन्सारी इजाज मो.फारुकी** **---- अपीलकर्ता**
**सर्व्हे नं.७४/४,प्लॉट नं.६३,अन्सार कॉलनी,**
**महाराष्ट्र सायझिंग जवळ, मालेगांव**
**जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------ उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**मानद सचिव,ए.टी.टी. १५०३,इस्लामपुरा, किडवाई रोड,**
**मालेगांव**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : १२.०९.२००८

सुनावणीचा दिनांक : २६.१०.२००९

अपीलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : अनुपस्थित

प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दि.०७.०६.२००८ च्या माहिती अर्जान्वये सन २००६ ते २००८ या कालावधीच्या संस्थेच्या सभांचे " Agenda Book" व " Minute Book" निरीक्षणाची मागणी केली. परंतु त्यांना निरीक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली नाही. यास्तव त्यांनी दि.१५.०७.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर सुनावणी होऊन अपील मान्य करण्यात आले. यानुसार अपीलार्थींना माहिती उपलब्ध करुन द्यावयाची होती.

तथापि अपीलार्थींना माहिती न मिळू शकल्याने त्यांनह दि.१२.०९.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले की अपीलावरील सुनावणीच्या वेळा पर्यंत अपीलार्थींना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अपीलार्थींना " Agenda Book" व " Minute Book" चे निरीक्षण हवे होते. ट्रस्टस हे माहितीचा अधिकार अधिनियम प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण नाहीत असा निर्णय नुकताच हायकोर्ट नागपूर खंडपीठाने दिलेत. त्यामुळे माहिती देणे बंधनकारक नाही. असे ट्रस्टचे म्हणणे आहे. मात्र या ट्रस्टला शासनाची भरीव मदत मिळते म्हणून हा ट्रस्ट "सार्वजनिक

प्राधिकरण " या संज्ञेत येतो असे जर अर्जदारास वाटत असेल तर त्यासंबंधी अर्जदाराने त्यांचेकडे असलेली माहिती सहायक धर्मादाय आयुक्तांना द्यावी. म्हणजे सहायक धर्मादाय आयुक्त सदरील ट्रस्ट सार्वजनिक प्राधिकरण आहे किंवा नाही. याबाबत निर्णय घेतील ट्रस्ट सार्वजनिक प्राधिकरण आहे असे ठरल्यास माहिती देण्याबाबत निर्देश देतील.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०७७/०२**

**श्री. ब्रियान रॉड्रीक्स** **---- अपीलकर्ता**
**१ ला माळा, पिंटो आर्केड II, व्हिक्टरी सिनेमाजवळ,**
**इगतपुरी,जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------ उत्तरवादी**
**मुख्याधिकारी नगरपरिषद इगतपुरी, जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी**
**इगतपुरी नगरपरिषद,इगतपुरी,जि.नाशिक ,**

## - वि वे च न -

अपीलाचा दिनांक : २२.१२.२००८
सुनावणीचा दिनांक : २६.१०.२००९
अपीलार्थी : अनुपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थीनी दि.०५.०५.२००८ च्या माहिती खालील माहितीची मागणी केली.

" Will Full neglect of the dutes/responsibilities of the chief officer, Who has not taken adequate and appropriate action on the Wrong-doers who continue to cause dangerous seepages/leakages which endanger the life, health safety of the building and its residents" या सोबत त्यांन १२ मुद्यांचे ४ पाने सविस्तर विवरण जोडले होते.

या अर्जाला दि.५.०६.२००८ च्या पत्रान्वये सविस्तर उत्तर देण्यात आले. परंतु हे पत्र अपीलार्थींना दि.९.०७.२००८ रोजी मिळाले असे त्यांचे म्हणणे आहे. माहिती अपूर्ण आहे व विहित मुदतीत मिळाली नाही या कारणास्तव दि.१०.०७.२००८ रोजी त्यांनी प्रथम अपील केले. अपीलावर सुनावणी होऊन अपीलार्थींच्या मागणीनुसार सर्व माहित अपीलाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दि.७.०८.२००८ रोजी पारित करण्यात आले. यानंतर त्यांना दि.१३.०८.२००८ रोजी पत्र देऊन माहिती अवलोकनार्थ उपलब्ध असल्याचे कळविण्यात आले. उपलब्ध कागदपत्रांनुसार असे दिसते की अपीलार्थींच्या प्रथम अपीलावर पुन्हा दि.२०.०८.२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले व त्यानुसार त्यांना ७ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावयाची होती.

या आदेशाने समाधान न झाल्याने त्यांनी दि.२२.१२.२००८ रोजी व्दितीय अपील दाखल केले. अपीलावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या दि.२६.१०.२००८ च्या लेखी निवेदनाचे अवलोकन करता असे दिसते की अपीलार्थींना माहिती देण्यात आली आहे. सबब खालील आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १०७५/०२**

**श्री. रमेश बाबुराव बोडके** ------ **अपीलकर्ता**
**मु.मोह,पो.चिंचोली,ता.सिन्नर,**
**जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**उपविभागीय अधिकारी,उपविभागीय अधिकारी कार्यालय,निफाड,**
**ता.निफाड,जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तहसिलदार,तहसील कार्यालय, सिन्नर,ता.सिन्नर,जि.नाशिक**

## - वि वे च न -

अपीलकार श्री. रमेश बाबुराव बोडके यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०६.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, अनुपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१३.११.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

मौजे मोह,पो.चिंचोली,ता.सिन्नर,जि.नाशिक येथील शेतमालक कै.श्री. रामनाथ कृष्णा दराडे यांच्या गट नंबर ४४३,क्षेत्र हे.०-२१ आर., कुळ कायदा क्र.४३ नियंत्रित सत्ता प्रकार विक्री परवानगी प्रकरण २०८६/२००० दाखल दिनांक १७.११.२००० उपविभागीय अधिकारी, निफाड विभाग यांच्या कार्यालयाकडून जावक क्रमांक कु.का./का.वि/१५०७/२००१ दि.१.११.२००१ रोजी आपल्या पाठविले होते. पुढे मा. जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातून मा.तहसिलदार,सिन्नर यांच्या कार्यालयात पाठविले होते. आपल्या कार्यालयातून पत्र क्र.कुळकायदा/का.वि/५९४/०३ दिनांक १४.११.२००३ अन्वये मंडळ अधिकारी,पांढुर्ली

यांच्याकडे मूळ संचिका पाने १ ते ७७ व इतर सह चौकशीकामी पाठविण्यात आले होते. त्या प्रकरणातील सर्व कागदपत्रांच्या नक्कलांच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत "

जन माहिती अधिकाऱ्यांनी अर्जदारास संपूर्ण चुकीची व अपूर्ण माहिती दिली असल्याच्या कारणावरुन अपीलकाराने प्रथम अपील दि.१०.०१.२००८ रोजी सादर केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.५.०२.२००८ रोजी सुनावणी आयोजित करुन आदेश पारित केले. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

माहिती उशिरा दिली. प्रत्यक्ष दिलेल्या नक्कलेपेक्षा जास्त नक्कलाची व जास्त नक्कलाची व जास्त दराने फी आकारणा केली. प्रमाणित केलेल्या शुल्का पेक्षा वाढीव घेतलेले शुल्क परंत करण्याची अपीलकाराची मागणी आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी उपलब्ध माहिती पुरविली आहे. पुरविलेली माहिती संपूर्ण चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचा मुद्या अपीलकाराने व्दितीय अपीलात उपस्थित केला. या परिस्थितीत मी असे आदेश दतो की जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास कार्यालयातील संबंधीत कागदपत्र तपासणीकरीता प्रथम उपलब्ध करुन द्यावीत. अपीलकाराने कार्यालयात उपस्थित राहून कागदपत्रांची तपासणी करावी व दिलेली माहिती रेकॉर्डप्रमाणेच आहे याची खात्री करुन घ्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**मुमाआ २००९/४४६०७/तक्रार/ ५७६/०१**

**श्री.सुधाकर पांडुरंग महाडिक ------- तक्रारदार**
**चंद्रेश रेसीडन्सी,२०४/जी विंग, लोधा कॉम्लेक्स,मिरा रोड,(पूर्व)**
**जि.ठाणे**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा -- उत्तरवादी**
**मा.व्यवस्थापक, दि सिटी को.ऑ.बँक लि.मुंबई पदमावती दर्शन,**
**पहिला मजला,दिपक टॉकीजच्या समोर, एन.एस.जोशी मार्ग,लोअर परेल,मुंबई ४०० ०१३**

## - वि वे च न -

श्री.सुधाकर पांडुरंग महाडीक, राहणार मिरा रोड (पूर्व),जि.ठाणे यांनी माहितीच्या अधिकारात मा. .व्यवस्थापक, दि सिटी को.ऑ.बँक लि.मुंबई यांजकडे दिनांक २१ जुलै २००९ रोजी माहिती अर्ज सादर करुन सदर बँकेची घटना आणि नियम व नियमावलीची प्रत, बँकींग व्यवसाय करण्यास राज्य व केंद्र,आर.बी.आय आणि इतर यांनी दिलेले परवाने, कर्ज वसूलीची पध्दत, सन २००१ ते २००९ दरम्यान बँकेने केलेले कर्जवाटप, त्यांच्याकडून स्विकारलेले कागदपत्र,किती जणांनी कर्ज बुडविले, किती जणांनी कर्ज फेडले इत्यादी एकूण ६ मुद्यांची माहिती मागितली होती. सदर माहिती अर्ज सिटी को.ऑप.बैंकेस दिनांक २७.०७.२००९ रोजी प्राप्त झाल्यावर त्यांच्यावतीने त्यांचे वकील अँड श्री.किशोर व्ही. टेंबे यांनी श्री.सुधाकर पां.महाडीक यांना असे उत्तर पाठविले की, मा.उच्च न्यायालय, मुंबई च्या नागपूर खंडपीठाकडून न्यायमुर्ती मा.जे.एच.भाटीया यांनी रिट याचिका क्र.५६६६/२००७ वर दिनांक १३.०१.२००९ रोजी जो निर्णय दिलेला ओ तो लक्षात घेता को-ऑप.सोसायटीत या माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २ (एच) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत येत नसल्याने सदर कांयद्याच्या सतूतदी त्यांना लागू होत नाहीत. त्यामुळे मागितलेली माहिती देता येऊ शकत नाही.

सिटी को.ऑप.बँक लि.,मुंबई यांच्यावतीने अँड श्री.किशोर व्ही.टेंबे यांनी दि. २७.०७.२००९ रोजी पाठविलेल्या उत्तराने व्यथित होऊन श्री.सुधाकर पां.महाडीक,तक्रारदार यांनी उत्तरवादी बँके विरुध्द आयोगाकडे दि.११.०९.२००९ रोजी तक्रार अर्ज सादर केला.

तक्रारदाराने सादर केलेला तक्रारअर्ज व त्या सोबतची कागदपत्रे या सर्वांची छाननी करता तसेच मा.उच्च न्यायालय,मुंबई च्या नागपूर खंडपीठाने रिट याचिका क्रमांक ५६६६/२००७ चा निकाल देताना मा. राज्य माहिती

आयुक्त,विदर्भ विभाग,नागपूर यांनी डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँक लिमिटेड,अमरावती यांना व्दितीय अपील प्रकरणी माहितीच्या अधिकारात माहिती देण्याबाबत दिलेले आदेश रद्दबादल केल्याचे लक्षात घेता उत्तरवादीतर्फे माहिती न देण्याबाबत घेतलेली भूमिका मान्य करणे क्रमप्राप्तच आहे.

आवश्यक वाटल्यास मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी पारित केलेल्याआदेशांची माहिती www.bombay highcourt.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द होत असल्याने अधिक माहितीसाठी तक्रारदाराने सदर संकेतस्थळास भेट द्यावी.

**आदेश**

**तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४३८०९/अपील/४९०१/०२**

**श्रीमती अल्पा हेमांग छेडा ------ अपीलकर्ता**
**परबानदास कॅस्टल, २ रा माळा, अे ब्लॉक, ३ रा पास्ता लेन,**
**कुलाबा, मुंबई ४०० ००५**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**पोलीस उपआयुक्त परिमंड-६, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-६,**
**यांचे कार्यालय,चेंबुर मुंबई ०१**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सहायक पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,नियंत्रण कक्ष, चेंबुर, मुंबई ७१**

**- वि वे च न -**

अपीलार्थी,श्री.अल्पा हेमांग छेडा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ८.०९.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दिनांक २१.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीच्यावेळी अपिलार्थी उपस्थित होत्या.श्री.अ.भा.डुम्बरे,जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग हे उपस्थित होते. प्रथम अपीलीय प्राधिकारी हे अनुपस्थित होते.

अपिलार्थी,श्रीमती अल्पा हेमांग छेडा यांनी दिनांक ३.०६.२००९ रोजी घाटकोपर पोलीस ठाणेस माहिती अर्ज करुन गुन्हा रजिस्टर क्रमांक १४०/२००९ बाबत एकूण १० मुद्यांवर माहिती मागितली होती. विहित मुदतीमध्ये माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त (परि-६) यांजकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये दि.१४ जुलै २००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिनांक ४.०८.२००९ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आदेश पारित केला. अपीलार्थीच्या दिनांक ३.०६.२००९ च्या माहिती अर्जातील मुद्या क्रमांक १,२,३,७ व ८ या मुद्यांची माहिती ही पोलीस ठाणेच्या अभिलेखावरच उपलब्ध नसल्याने ती देता येऊ शकत नाही, मुद्या क्रमांक ६,९ व १० याबाबतची माहिती संबंधीत गुन्हयाचा तपास चालु असल्याने माहिती अधिकार अधिनियम २००५च्या कलम ८ (१) (ज) अन्वये देय नाही, असा निर्णय प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी घेतला. उर्वरित मुद्या क्रमांक ५ ची माहिती आदेशामध्येच नमूद करुन मुद्या क्रमांक ४ ची माहिती मा.न्यायालयाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस देण्याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक,घाटकोपर पोलीस ठाणे यांना आदेशीत करण्यात आले. अशाप्रकारे अपिलार्थी यांचे प्रथम अपील अंशतः मान्य करुन निकाली काढण्यात आले.

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार मा.महानगर दंडाधिकारी,४९ वे न्यायालय, विक्रोळी,मुंबई यांचे कार्यालयातून मुद्या क्रमांक ४ बाबत कागदपत्रे प्राप्त करण्यात येऊन सदरमाहिती स्विकारण्यासाठी अपीलकर्ता यांना दिनांक ७.०७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी पत्र पाठविले तथापि त्यांनी माहिती अद्याप स्विकारलेली नाही ती आत अपिलार्थीस देण्यात येत आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी निदर्शनास आणले. यामुळे अंतिमतः माहिती देण्यात आली आहे असे निष्पन्न होते.सुनावणीच्यावेळी अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी यांनी मांडलेले त्यांचे म्हणणे व लेखी जबाब यांचा साकल्याने विचार केल्यावर असे दिसून येते की मूळ माहिी अर्ज घाटकोपर पोलीस ठाणे यांचेकडे दिनांक ३.०६.२००९ रोजी किंवा त्यानंतर एक,दाने दिवसात प्राप्त झ ााल्यावर तो जन महिती अधिकारी तथा सहायक पो.आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग,चेंबुर मुंबई यांचजकडे हस्तांतरित करायला दिनांक २९.०७.२००९ ही तारीख उजाडली. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनुसार सहायक माहिती अधिकाऱ्याने त्याला माहिती अर्ज प्राप्त झाल्यापासून जास्तीत जासत ५ दिवसांच्या आत संबंधीत जन महिती अधिकाऱ्याकडे पाठविणे अत्यावश्यक आहे.

दिनांक ३.०६.२००९ चा माहिती अर्ज जन माहिती अधिकाऱ्याकडे पाठविण्यास झालेल्या दिरंगाईची चौकशी प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी करुन त्याबाबतचा अहवाल आयोगास स्वतः दि.४ डिसेंबर २००९ रोजी ११.३० वाजता सादर करावा. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ११२६/०२**

**श्री. अन्सारी मोहमद गुफरान मो.युसूफ** **------ अपीलकर्ता**
**अध्यक्ष,मायनॉरिटी सेल,महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघ (फेडरेशन)**
**७३६,अन्सार रोड,मालेगांव,ता.मालेगांव,जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. अन्सारी मोहमद गुफरान मो.युसूफ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०१.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी, उपस्थित होते.अपीलकार उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२२.०९.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" श्रीमती अन्सारी जकीया मो.मुस्तफा यांना संस्था/शाळेने नोकरीतून कमी केल्याने सदर शिक्षिकेने शाळा न्यायाधिकरण नाशिक यांचेकडे अपील दाखल केले असता शाळा न्यायाधिकरणाने श्रीमती अन्सारी जकीया यांचे बाजूने निकाल दिला. संस्थेने सदर निकाला विरुध्द उच्च न्यायालयात ३९३/०७ मुंबई याचिका दाखल केली असता मा.उच्च न्यायालयाने श्रीमती जकीया यांना देय असलेले थकीत वेतन कोर्टात जमा करुन न्यायाधिकरणाच्या निकालाला स्थगिती दिली आज देखील सदर बाब न्यायप्रविष्ट आहे, आणि स्वतः शिक्षणाधिकारी(माध्य) हे या याचिकेत पार्टी आहेत. मात्र संस्था/शाळेने सदर न्यायप्रविष्ट पदावर प्रथमतः एक शिक्षक श्री.साजीद अहमद अब्दुल गफूर यांची नियुक्ती करुन तसा ठराव व नियुक्ती आदेश देखील कोर्टात

दाखल केलेला आहे. परंतु संस्था/शाळेने आता एका दुसऱ्या व्यक्तीस-श्रीमती आशा एकबाल अहमद यांना नियुक्त करुन वैयक्तीक मान्यता मिळविली आहे सोबत मान्यतेची छायांकित प्रत जोडली आहे.१. सदर न्यायप्रविष्ट पदावर नियुक्ती देणेकरीता वर्तमान पत्रात जाहिरात देण्यासाठी आपल्या कार्यालयाकडून देण्यात आलेल्या परवानगी पत्राची प्रमाणित प्रत मिळावी.२. वैयक्तीक मान्यता घेणेकरीता शाळेने आपल्या कार्यालयात दाखल केलेला प्रस्तावाची प्रमाणित प्रत मिळावी.३. सदर प्रस्तावानुसार आपल्या कार्यालयात तयार करण्यात आलेल्या टिप्पणी/नस्तीची प्रमाणीत प्रत मिळावी.४. शाळा न्यायाधिकरण नाशिक व मुंबई उच्च न्यायालयात आपल्या कार्यालयामार्फत दाखल करण्यात आलेल्या जबाबाची प्रमाणित प्रत मिळावी."

जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दि.१४.११.२००८ रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

डायमंड गर्ल्स हायस्कूल मालेगांव या शाळेचे न्यायप्रविष्ट न्यायप्रविष्ट बाब असतांना देण्यात आलेल्या श्रीमती आसेफा एकबाल अहमद यांचे वैयक्तीक मान्यतेबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास विनाविलंब माहिती देण्याची तयारी दर्शवीली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलकारास माहिती द्यावी. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कारवाई करण्याची दक्षता घ्यावी. अशी जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी यांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील मान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ११२४/०२**

**श्री. अन्सारी मोहमद गुफरान मो.युसूफ ------ अपीलकर्ता**
**अध्यक्ष,मायनॉरिटी सेल,महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघ (फेडरेशन)**
**७३६,अन्सार रोड,मालेगांव,ता.मालेगांव,जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद,नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**मुख्याध्यापक,टी.आर.हायस्कूल अँड ज्यूनिअर कॉलेज,दाभाडी,**
**ता.मालेगांव,जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. अन्सारी मोहमद गुफरान मो.युसूफ यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२१.०१.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, उपस्थित होते.अपीलकार उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१९.०७.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" १. टी.आर.हायस्कूल व ज्युनि.कॉलेज दाभाडी या शाळेच्या कर्मचाऱ्यांचे वेतन मागील तीन वर्षात किती वेळा बंद / गोठविण्यात आले त्याचा कालावधी व त्यासंदर्भात शाळेला शिक्षणाधिकारी (माध्य) कार्यालयाकडून आलेल्या पत्रांची प्रमाणित प्रत मिळावी. २. पगार पुन्हा सुरू करण्यासाठी शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून शाळेला प्राप्त झालेल्या पत्रांची प्रमाणित प्रत मिळावी. ३. श्री.बी.पी.बागुल यांना मुख्याध्यापक म्हणून दोन वेळेला सहयांचे अधिकार मिळाले आहेत. सदर दोन्ही पत्रांची प्रमाणित पत मिळावी.४. शाळेच्या २००५ पासून आजपावेतो वर्ष निहाय कर्मचारी मान्यता सुचींची प्रमाणित प्रत मिळावी.५. शाळेची बिंदू नामावली पडताळणीची अद्ययावत प्रमाणित प्रत मिळावी.६.दि.१० जून २००८ रोजीच्या सकाळ वृत्तपत्रात

देण्यात आलेल्या जाहिरातीसाठी शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून घेण्यात आलेल्या परवानगी पत्राची प्रमाणित प्रत मिळावी. ७. सौ.सूमती निकम व कोमल मानकर यांना शाळेत रुजू करण्याबाबत शिक्षणाधिकारी (माध्य) व शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून प्राप्त झालेले पत्र नोटीसांची प्रमाणित प्रत मिळावी. ८. श्री.एन.के.दिनकर यांना शाळेकडून देण्यात आलेल्या मागील तीन वर्षाचे आयकरचे फॉर्म नं.१६ व त्यासोबत दिलेला गोषवारा याची प्रमाणित प्रत मिळावी. ९. सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मागील एक वर्षाच्या पगारपत्रकाची प्रमाणित प्रत मिळावी. १०. शाळेतील कर्मचारी हजेरी पुस्तकाची सन जानेवारी २००६ पासून आजपावेतो प्रमाणित प्रत मिळावी."

जन माहिती अधिकाऱ्यांनी मागितलेली माहिती विहित कालावधीत दिली नाही. यामुळे अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. माहिती दिली नाही. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

व्ही.आर.हायस्कूल आणि कनिष्ट महाविद्यालय दाभाडी ता.मालेगांव या शाळा व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्याबाबत एकूण १० मुद्यांबाबत अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी अर्जातील मुद्या क्रमांक १,२,३,४,५,८ व ९ बाबत माहिती अपीलकारास दिली. मुद्या क्रमांक६,७ व १० ची माहिती १० दिवसाचे आत देण्याची जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी कबूली दिली. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की जन माहिती अधिकाऱ्यांनीहे आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाचे आत अपीलकारास उर्वरित मुद्याबाबतची माहिती पुरवावी. भविष्यात माहितीच्या अधिकारातील अर्जावर विहित कालावधीत आवश्यकती कारवाई करण्याची जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी अशी उभयतांना समज देण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १११९/०२**

**श्री.पंडीतराव माधवराव गायकवाड ---- अपीलकर्ता**
**२३० साने गुरुजी नगर, मु.पो. ता.नांदगांव, जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी**
**मुख्याधिकारी, नगरपरिषद, नांदगाव,जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**नगरपरिषद, नांदगाव,नांदगाव,जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.पंडीतराव माधवराव गायकवाड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, उपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.०४.१२.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

उप संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई यांचेकडील पत्र क्र.नपप्रस/२/५एनओ/सेविवे २००५/६८७/२५ दि.९.१०.२००६ नुसार मुद्या क्रमांक १ ते ७ च्या माहितीच्या अहवालाच्या छायाप्रतीची मागणी केली होती. नगरपरिषदेचे संबंधीत कागदपत्र पहाता अहवाल आढळून येत नाही असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.२४.१२.२००८ च्या पत्रान्वये कळविले. यामुळे अपीलकाराने दि.२९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.२२.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली. परंतु प्रत्यक्षात कोणतेही कामकाज केले नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

उपसंचालक, मुंबई यांनी दि.९.१०.२००६ च्या पत्रान्वये नांदगाव नगरपरिषदेकडे बाब क्रमांक १ ते ७ मुद्यावर अहवाल मागितला होता. सदर प्रकरणी पाठविलेल्या अहवालाच्या प्रतीची अपीलकाराने मागणी केली आहे. सर्व संबंधीत कागदपत्र तपासले असता उप संचालक, मुंबई यांचेकडे नगरपरिषद नांदगाव यांचेकडून

अहवाल पाठविल्याचे आढळून आलेले नाही असे जन माहिती अधिकारी,प्रथम अपीलीय अधिकारी यांनी व्दितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. तसेच सदरबाब अपीलकारास दि.२४१२.२००८ च्या पत्रान्वये अवगत केल्याचेही आयोगाच्या निदर्शनास आणले. नगरपालिकेतील संबंधीत कागदपत्र अपीलकारास तपासणीकरीता उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ११२१/०२**

**श्री.पंडीतराव माधवराव गायकवाड ---- अपीलकर्ता**
**२३० साने गुरुजी नगर, मु.पो. ता.नांदगांव, जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------ उत्तरवादी**
**मुख्याधिकारी, नगरपरिषद, नांदगाव,जि.नाशिक**
**जन माहिती अधिकारी, तथा**
**नगरपरिषद, नांदगाव,ता. नांदगाव,जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री.पंडीतराव माधवराव गायकवाड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०४.०३.२००९ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२६.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपिलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, उपस्थित होते.अपीलकार अनुपस्थित होते.

अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.११.११.२००८ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

नांदगाव नगरपरिषद पत्र क्र.१००१/दि.१९.०९.२००३ नुसार मला महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२ प्रमाणे रु.३३,३६०/- उपदान व रुपये १,००,०००/- निवृत्ती वेतन फरक देणेत आला होता. परंतु या रक्कमा सन २००२ नंतर लेखा विभागाने ॲवार्डच्या रकमा असून मी दुहेरी फायदा घेतलेचे खोटे कळवून माझे पेन्शन बंद केले आहे.

सदर ॲवार्ड रकमा असले बाबत/शासन वरिष्ठांच्या पत्रव्यवहार,आदेश,कार्यालयीन टिप्पणी मंजुरी यांच्या झेरॉक्स प्रती देणेत याव्यात.

तसेच माझे २६.०९.२००८ चे पत्राप्रमाणे १. दुरुस्त फेर अहवाल २. खोटे अहवाल न पाठविणेबाबत कार्यवाही ३. उर्वरित रकमा मिळणे ४. निवृत्ती वेतन चालू करणे या मागण्यांचे कागदपत्रांसह अन्य सर्व मुद्यावरील पुर्ततेचा तपशील व कागदत्र याच्या प्रती.नियमभंग व खोटे अहवालाबाबत संबंधिताबाबत कार्यवाहीचे कागदपत्रांसह संपुर्ण कागदपत्रांच्या प्रति देणेत याव्यात."

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास दि.१९.११.२००८च्या पत्रान्वये उत्तर दिले. अपीलकारास कोणतीही माहिती हवी असल्यास नगरपरिषद कार्यालयात समक्ष येऊन संबंधीत कागदपत्राची तपासणी करु

शकतात.निवडक कागदपत्रांच्या छायाप्रती शुल्क भरुन घेऊन जाऊ शकतात असेही जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास वरील पत्रान्वये कळविले होते.

जन माहिती अधिकारी कोणतीही कागदपत्र देत नसल्याच्या कारणावरुन अपीलकाराने दि.१५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.१२.०१.२००९ रोजी सुनावणी आयोजित केली सुनावणीचे काम झाले नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी सुनावणी आयोजित करुन सुनावणी घेतली नाहृ दुसरे काम करित बसले. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर सुनावणीबाबत अपीलकाराने विचारले असता नंतर कधी तरी बघू असे अपीलकारास उत्तर दिले. अपीलकाराची टिंगल-टवाळी,मस्करी करण्यात आली असा व्दितीय अपीलात मुद्दा उपस्थित केला आहे. अपीलकाराच्या माहिती मागणी संदर्भात संदिग्धता आहे. अर्जदारानी माहिती समक्ष घेऊन जावी कार्यालयाचे संपुर्ण सहकार्य राहील असे जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकाऱ्यानी व्दितीय अपीलावरील सुनावणीचेवेळी प्रतिपादन के`.

अपीलकारास उपदान व निवृत्तीवेतन फरकाची रक्कम अदा केली. १) परंतु या रकमा सन २००३ नंतर लेखा विभागाने अवार्डच्या रकमा असून अपीलकाराने दुहेरी फायदा घेतल्याचे खोटे कळवून अपीलकाराची पेन्शन बंद केली.२) सदर अवार्ड रकमा असलेबाबत शासनाचा पत्रव्यवहार,आदेश,कार्यालयीन टिपणी,मंजूरी याबाबतच्या छायाप्रती अपीलकारास द्याव्यात.३) अपीलकारास उर्वरित रकमा मिळण्याची मागणी तसेच निवृत्ती वेतन चालू करण्याच्या मागणीबाबत अपीलकारास माहिती पुरविली असल्याचे अपीलातील कागदपत्रावरुन दिसून येत नाही. सदर प्रकरणी अपीलावर अन्याय झाल्याची भावना निर्माण झाल्याचे दिसते. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की अर्जदाराने ते स्वतः या नगरपालिकेच्या सेवेत होते,तेव्हा जन माहिती अधिकाऱ्यांच्या कार्यालयात जाऊन सर्व कागदपत्रांचे अवलोकन करावे व जी कागदपत्रे त्यांना पाहिजे असतील त्याच्या प्रती त्यांना त्याच दिवशी देण्यात याव्यात.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ४२७/०२**

**श्री.भामरे केवल कडू/श्री.भामरे हिरामण कडू व इतर ------ अपीलकर्ता**
**रा.पिंपळेकोठे, ता.बागलाण,जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**महाराष्ट्र राज्य, इलेक्ट्रीक बोर्ड सहाणा,जि.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**महाराष्ट्र राज्य, इलेक्ट्रीक सिटी बोर्ड सहाणा,जि.नाशिक**

## - वि वे च न -

अपीलकार श्री.भामरे केवल कडू/श्री.भामरे हिरामण कडू व इतर यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०९.२००७ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, उपस्थित होते.अपीलकार उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७.०५.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

" आम्ही आपल्याकडे परीपुर्ण अर्ज जानेवारी/फेब्रुवारी २००३ मध्ये दाखल केला व त्यानंतर असे तीन अर्ज बोर्डाकडुन हरवल्यामुळे दाखल केलेत व त्यानंतर त्यांच्या पत्राव्दारे फोनव्दारे प्रत्यक्ष पाठपुरावा केला. प्रत्यक्ष इनवर्ड ऑफीस डिपार्टमेंट रिसीव्हीड हा शेरा घेऊन दाखल केलेत"

जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलाकारास दि.१५.०६.२००७ रोजी उत्तर दिले. गट क्र.४५५ येथील जमीनीचे मालक असलेले श्री.हिरामन कडू भामरे यांचे स्टँमपेपरवर अपीलकारास विद्युत जोडणी देण्याबद्दल हरकत नसल्याचे संमतीपत्र,विभागीय कार्यालयास सादर करावे. या कारणास्तव आपले प्रकरण मंजूरीचे काम प्रलंबित आहे असे जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास कळविले होते. त्यानंतरही विद्युत जोडणी मिळाली नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली

नाही. आदेश पारित केले नाहीत. प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी दि.८.०८.२००७ रोजी दिलेल्या उत्तराने व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलकाराने वेळोवेळी पाच वर्षापासून लेखी/तोंडी दुरध्वनीवरुन संपर्क साधूनही इलेक्ट्रीसीटी बोर्डाने अपीलकाराच्या प्रकरणाबाबत कुठलाही पत्रव्यवहार केला नाही. अथवा कागदपत्रांची मागणी केली नाही. प्रकरणाची प्रगती कळविली नाही. सर्व कागदपत्रांची पुर्तता केली. तरी पुन्हा कागदपत्रांची मागणी केली आहे. हेतुपुरस्सर अथवा व्यक्तीगत स्वार्थापोटी हे प्रकरण राखून ठेवण्यात आले असावे असे अपीलकाराने व्दितीय अपीलावरील सुनावणीच्यावेळी प्रतिपादन केले. या परिस्थितीत मी असे आदेश देतो की, विद्युत जोडणी मिळण्याबाबत दिर्घकाळापासून अपीलकार पाठपुरावा करत आहे. सदर प्रकरणी विद्युत मंडळाने केलेल्या कारवाई संबंधीची माहिती अपीलकारास हे आदेश प्राप्त झाल्यापासून अर्जदाराच्या प्रकरणासंबंधी सर्व कागदपत्रांच्या प्रती विनामुल्य रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सुनावणीच्या वेळी हे स्पष्ट झाले की ज्या वेळेत हे कनेक्शन पाहिजे होते त्यावेळी ते मिळाले असते तर उद्योजकाचा डाळींब प्रक्रीयेचा निर्यातक्षम उद्योग साकार झाला असता. आता बदललेल्या परिस्थितीत हा उपक्रम फीझीबल होत नाही. मात्र विद्युत बोर्डाच्या अधिकाऱ्यांनी वेळीच कार्यवाही न केल्याचा सल अर्जदारांच्या मनात आहे. आता माहिती द्यावी पण माहिती देऊन काही फारसा उपयोग नाही अधिकाऱ्यांनी उद्योजकाच्या प्रश्नासंबंधी Proactive असावे एकदा जरी धडा घेतला तरी पुरे.

**आदेश**

**अपील अंशतःमान्य करण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/४१५४७/अपील क्र .४६६२/०२**

**श्री.निलेश मुगुटराव जाधव** **------ अपीलकर्ता**
**ब-२३६/५, शासकीय वसाहत,बांद्रे (पूर्व),मुंबई ५१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,बँक ऑफ इंडिया इमारत ,**
**३ रा मजला, हुतात्मा चौक, मुंबई ३२**

**जन माहिती अधिकारी तथा**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,बँक ऑफ इंडिया इमारत ,**
**३ रा मजला, हुतात्मा चौक, मुंबई ३२**

**- वि वे च न -**

अपीलार्थी श्री.निलेश मुगुटराव जाधव, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५.०५.२००९ रोजी व्दितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दिनांक १०.०९.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीच्यावेळी/श्री.प्र.ई.घबाले विद्यमान प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग व अपीलार्थी उपस्थित होते. जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते.

अपीलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १३.१०.२००८ रोजीच्या माहिती अर्जान्वये पोलीस उपनिरीक्षक /विक्रीकर /सहायक परीक्षा,२००५/२००६ बाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पुढील मुद्यांवर माहिती मागितली होती :-

ए) पो.उ.नि./वि.नि./सहायक परीक्षा २००५/२००६ च्या पूर्व परीक्षेचा निकाल महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने तिन्ही पदांसाठी एकत्रित लावला व मुख्य परीक्षेचा निकाल पदनिहाय वेगवेगळा लावला. अशा पध्दतीने निकाल लावण्याची पध्दती विहित नियमानुसार आहे काय? निकाल कसा लावावा याबाबतची कार्यपध्दती विहित केलेली असल्यास त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना/परिपत्रकाची प्रत.

बी) पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षांसाठी वेगवेगळे तत्व वापरले गेले तरी या परीक्षेबाबतच्या धारिणीवर चर्चा / टिप्पणी नमूद केलेली असल्यास त्याची प्रत.

सी) ही पध्दत यापूर्वी घेतलेल्या परीक्षेमध्ये वापरीली गेली नव्हती यावेळीच अशी पध्दत वापरावी असे कोणत्या नियमानुसार केले गेले याबाबतचा तपशील, ही पध्दत वापरणे नैसर्गिक न्यायाला धरुन आहे काय ? निकाल लावण्याबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिध्द केल्या असल्यास त्याची प्रत.

डी ) पूर्व व मुख्य परीक्षेचा निकाल वेगवेगळया तत्वानुसार घेण्यासंदर्भात सदर परीक्षेच्या धारिणीवर समर्थनार्थ मुद्दे नोंदविले गेले असल्यास त्याची प्रत.

इ) शासनाकडून विक्रिकर निरीक्षक/सहायक व राज्यसेवा पदांसाठी मागणीपत्र प्राप्त झाले आहे काय ? (ज्याची जाहीरात येणे बाकी आहे ) व ज्याची जाहिरात अद्याप देण्यात आलेली नाही,अशी मागणीपत्रे असल्यास ती आयोगास केव्हा प्राप्त झाली

| अ.क्र. | पदे | शासनाकडून मागणीपत्र प्राप्त झाल्याचा दिनांक व एकूण जागा | सध्या काय कार्यवाही चालू आहे. |
|---|---|---|---|
| १. | विक्रीकर निरीक्षक/सहायक | | |
| २. | राज्य सेवा पदे ( उप जिल्हाधिकारी/उप पोलीस अधिक्षक / विक्रीकर अधिकारी/तहसीलदार इत्यादी) | | |

एफ) वि.नि./सहायक/पो.उ.नि.पूर्व/मुख्य परीक्षा व राज्य सेवा (पूर्व) परीक्षामध्ये किती प्रश्न रद्द झाले तरी परीक्षेवर काही परिणाम होणार नाही याबाबत मा.उच्च न्यायालय/मा.सर्वोच्च न्यायालयाचे काही आदेश आहेत काय? असल्यास त्याची प्रत. आयोगाने काही मार्गदर्शक सूचना तयार केल्या असल्यास त्याची प्रत.

अपीलार्थींच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६.११.२००८ च्या पत्रान्वये उत्तर दिले. परंतु सदर उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलार्थी यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ )१) अन्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अपीलीय अधिकाऱ्याकडे अपील केले,ज्यावरदिनांक २९ डिसेंबर २००८ रोजी सुनावणी झाली. अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती माहिती दिलेली आहे असा निष्कर्ष काढून अपिलकर्त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांप्रमाणेच श्री.इंद्रजित चौहान यांना दाखल केलेल्या न्यायलयीन प्रकरणी जो निकाल न्यायालयाने दिलेला आहे त्याची प्रत अपिलकर्त्यांना देण्यात यावी असे आदेश पारित केले.

सदर आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७.०२.२००९ च्या पत्रान्वये संबंधीत न्यायालयीन निकालाची प्रत अपिलकर्त्यास पाठविलेली आहे.

अपीलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलात प्रामुख्याने पुढील मुद्दे उपस्थित केले आहे:-

जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६.११.२००८ च्या पत्रामध्ये नमूद केले आहे की,१९९९ च्या परीक्षेचा अपवाद वगळता इतर वेळी २००५ सारखीच पध्दत वापरील आहे. तरी त्याच्या पृष्ठयर्थ जन माहिती अधिकारी यांनी मागील ३-४ परीक्षांचे तिन्ही पदांचे वेगवेगळया दिवशी लावलेले निकाल द्यावेत.

अपिलार्थी यांनी व्दितीय अपीलाव्दारे उपस्थित केलेला मुद्दा किंवा अपेक्षिलेली माहिती मुळ माहिती अर्जामध्ये केलेली नसल्याने त्याबाबत राज्य माहिती आयोगाकडून वेगळे आदेश देता येऊ शकत नाही. त्यासाठी अपिलार्थीस माहितीच्या अधिकारात नव्याने माहिती अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

तसेच अपीलार्थीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगकडून घेण्यात येणाऱ्या परीक्षा पध्दतीबाबत आक्षेप असल्यास त्याचे निवारण करण्याची बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कार्यकक्षेत येत नसल्याने राज्य माहिती आयोग त्याबाबत आदेश देऊ शकत नाही. सबब मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील फेटाळण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . १११८/०२**

**श्री. संतोष नामदेव बोराडे** **------ अपीलकर्ता**
**मु.पो.कोठुरे,ता.निफाड, जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप विभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, निफाड**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :०४.०६.२००८

सुनावणीचा दिनांक : २७.१०.२००९

अपीलार्थी : उपस्थित

जन माहिती अधिकारी : उपस्थित

प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थींनी दि.२१.११.२००७ च्या अर्जान्वये त्यांनी दि.१२.१२.२००५ पासून सिटी सर्व्हे क्र.६७३ घरासमोरील अतिक्रमण उठविण्याबाबत केलेल्या कारवाईचा तपशील मागितला. परंतु त्यांना तो पुरविण्यात आला नाही. म्हणून त्यांनी दि.१७.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. यावर दि.२८.०३.२००८ रोजी आदेश पारित करण्यात आले. यानुसार त्यांना १० दिवसांच्या आत माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावयाची होती. पंरतु त्यांना दिलेल्या १० दिवसांच्या मुदतीत माहिती पुरविण्यात आली नाही या कारणास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सादर केले की अपीलार्थींना दि.९.४.२००८ रोजी माहिती दिलेली आहे. तथापि अपीलार्थींचे यावर असे म्हणणे आहे की त्यांची

अपेक्षा अतिक्रमण काढून टाकण्याची आहे. म्हणजेच कागदपत्रांबरोबर त्यांना कृतिची अपेक्षा आहे. उपलब्ध कादगपत्रे देण्यात आली आहे. कृतिच्या बाबतीत कायदेशीर कार्यवाही अपेक्षित.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ११२७/०२**

**श्री. अन्सारी मो.रमझान मो.मक्की ------ अपीलकर्ता**
**११२,मो.मक्की मंझिल,राजानगर, मालेगांव,जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**सरदार प्रायमरी स्कूल सिटिझन कॉम्प्लेक्स,इस्लाम नगर, मालेगांव, जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक :०१.०१.२००९
सुनावणीचा दिनांक : २७.१०.२००९
अपीलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी : अनुपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

अपीलार्थींनी दि.०६.१०.२००८ च्या अर्जान्वये खालील माहितीची मागणी केली.

" १. Certified copy of recognition of Sardar Primary School.

२. Certified copy of written permission from Government of Maharashtra.

३. Certified copies of appointment letters of all staff.

४. Certified copies of joining reports.

५. Certified copy of approval of all staff.

६. Copies of salary sheets, seniority list professional qualification etc."

माहिती अर्जाला अनुसरुन माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.७.११.२००८ रोजी प्रथम अपील केले.त्यांचा प्रथम अपील अर्ज शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी संस्थेचे अध्यक्ष प्रथम अपीलीय अधिकारी

असल्याने त्यांचेकडे दिनांक १२.११.२००८ रोजी पाठविला. यावर सुनावणी झाली नाही व माहिती मिळाली नाही या कारणास्तव त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

यावरील सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी गैरहजर होते. उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की अपीलार्थींना सुनावणीच्या तारखेपर्यंत माहिती मिळालेली नाही. अपीलार्थीच्या मूळ अर्जाची तारीख विचारात घेता त्यांना दि.५.११२००८ पर्यंत ३० दिवसांच्या विहित मुदतीत माहिती मिळावयास हवी होती. माहिती देण्यास अक्षम्य विलंब झाल्याचे दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना झालेल्या विलंबासाठी शास्ती लावणे क्रमप्राप्त ठरते. सुमारे (६.११.२००८ ते २०.१०.२००९ ) ३४० दिवसांचा विलंब सदर प्रकरणी झालेला आहे याचा विचार करता अधिनियमाच्या कलम २० (१) रु.२५,०००/- इतकी शास्ती जन माहिती अधिकारी यांच्यावर का लादण्यात येऊ नये? याचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत आयोगास सादर करावा तसेच सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत अपीलार्थींना त्यांच्या मागणीनुसार माहिती व कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनाशुल्क पुरवाव्या.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांक: ३१.१०.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/नाशिक/सीआर अपील क्र . ४३६/०२**

**श्री. एकनाथ पांडूरंग दौड ------ अपीलकर्ता**
**रा.कोऱ्हाटे, दिंडोरी, जि.नाशिक**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**उपविभागीय अधिकारी नाशिक**

**जन माहिती अधिकारी तथा**
**तहसील कार्यालय दिंडोरी,जि.नाशिक**

**- वि वे च न -**

अपीलकार श्री. एकनाथ पांडूरंग दौड यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२२.०५.२००८ रोजी व्दितीय अपील सादर केल. सदर अपीलावर विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय,नाशिक येथे दि.२७.१०.२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता प्रथम अपीलीय अधिकारी तसेच जन माहिती अधिकारी, उपस्थित होते.अपीलकार उपस्थित होते.

अपीलार्थीनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.२६.१२.२००७ रोजी अर्ज करुन खालील नमूद केलेली माहिती मागितली होती.

दिंडोरी तहसील कार्यालयातील दप्तरावरून,तालुक्याची पीक परिस्थिती,तालुक्याची सांपत्तीक/स्थिती,शेतकऱ्याची परिस्थिती,तालुक्याच्या विकासाचा प्रवास इत्यादी अनुषंगीक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी उपलब्ध माहिती दिली. अपीलकाराच्या अर्जातील मुद्यांपैकी मुद्या क्र.१(३) ते मुद्या क्रमांक १(५) ची माहिती तालुका निरीक्षक भुमी अभिलेख दिंडोरी कार्यालयाशी संबंधीत असल्याने अपीलकाराचा अर्ज त्या कार्यालयाकडे हस्तांतरीत केला. अर्जदारास परस्पर माहिती पुरविण्याबाबत दि.८.०१.२००८ च्या पत्रान्वये तालुका निरीक्षक भुमी अभिलेख कार्यालयास कळविले. तसेच सदरबाब अपीलकारास अवगत केली. अर्जातील मुद्या क्रमांक ४ (६) ची माहिती दुय्यम निबंधक श्रेणी दिंडोरी यांचेशी संबंधीत असल्याने अर्जाची प्रत त्या कार्यालयाकडे हस्तांतरीत अपीलकारास माहिती पुरविण्याबाबत कळवुन तसे अपीलकारास अवगत केले. अर्जातील मुद्या क्र.६ ते ९ व मुद्या

क्र.२(१) ते २ (६) तालुका कृषी अधिकारी,दिंडोरी यांचेकडे अर्जाची प्रत पाठवून अपीलकारास माहिती देणेबाबत कळविले. यामुळे समाधान झाले नसल्याने अपीलकाराने प्रथम अपील दाखल केले.प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली नाही. आदेश पारित केले नाहीत. यामुळे व्यथीत होऊन अपीलकाराने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

जन माहिती अधिकाऱ्याकडे प्राप्त झालेल्या अर्जातील माहिती किंवा माहितीचा भाग अन्य सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत असेल तर तो अर्ज माहिती अधिकाऱ्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) अन्वये कोणत्याही परिस्थितीत ५ दिवसात त्या संबंधीत प्राधिकरणाकडे हस्तांतरीत कराव व अर्जदारास तत्संबंधी सूचना द्यावी. कलम ६ (३) मध्ये अन्य प्राधिकरण (Anather Public Authority) याबाबत असणारा उल्लेख एकवचनी आहे. जेथे अर्जातील माहिती एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणाशी संबंधीत असेल तेथे अशा एकापेक्षा अधिक सार्वजनिक प्राधिकरणाकडे अर्जाच्या प्रती हस्तांतरीत करणे आवश्यक नाही. अशा प्रकरणी ज्या माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झालेला आहे,त्यांनी मुद्यासंदर्भात संबंधीत प्राधिकरणाकडे वेगळे अर्ज करण्याचे सुचवावे,अशा आशयाचे मार्गदर्शन केंद्र शासनाच्या मिनीस्ट्री ऑफ पर्सोनेल,पब्लिक ग्रिव्हन्सेस अँड पेन्शन्स डिपार्टमेंट आफ पर्सोनेल अँड ट्रनिंग यांच्या कार्यालयीन ज्ञापन क्र.१०.०२.२००८ आय.आर, दि.१२.०६.२००८ अन्वये प्रस्तुत करण्यात आले आहेत.सदर प्रकरणी जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले आहे. त्यामध्ये बदल करण्याची अधिकाऱ्यांनी अपीलकारास समर्पक उत्तर दिले आहे. त्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. अर्जदारानी सुनावणीच्या वेळी केलेली सद्‌भावना लक्षात घेता त्यांना तालुका पातळीवरचा रेकॉर्ड दाखवून त्यांना हवी असलेली अतिरिक्त माहिती द्यावी कृषी विषयक माहिती अर्जदारांनी तालुका कृषी अधिकारी यांचेकडे अर्ज करुन घ्यावी. या परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १३.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ २००९/अपील क्र /०२**

**श्री. अशोक रेड्डी उर्फ मुरली, UT No ३४७८, ------ अपीलकर्ता**
**अंडा बैरक,नागपूर मध्यवर्ती कारागृह-नागपूर-२०**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा ------- उत्तरवादी**
**पोलीस अधिक्षक,गोंदीया**

**जन माहिती अधिकारी तथा**
**उप विभागीय पोलीस अधिकारी, आनगांव,जि.गोंदिया**

**- वि वे च न -**

श्री.के.अशोक रेड्डी यांनी आयोगाकडे दि.१६.९.२००८ रोजी अधिनियमाच्या कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील सादर केले आहे.

प्रथम अपील क्र.१५/२००८,दि.२३.०५.२००८ च्या निर्णयावत अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती देण्यात यावी असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना दिलेले आहेत.

मात्र त्याचे पालन झाले नाही म्हणन आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी यांना असे आदेश देण्यात येत आहे की, त्यांनी वरील आदेश मिळाल्यापासून १० दिवसात प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी निर्देशिलेल्याप्रमाणे माहिती द्यावी.

जन माहिती अधिकारी यांना असेहि निर्देश देण्यात येत आहेत की, त्यांनी अर्ज मिळाल्यानंतर तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्देश देवूनही अपीलार्थीस माहिती दिलेली नाही. यास्तव त्यांचेवर अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई कां करु नये याचा खुलासा हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत करावा.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**
**संबंधितानी उपरिनिर्दीष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १३.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले तक्रार.**

**मुमाआ अपील क्रं. ४९८५/२००९**

**श्री. भूषण पांडुरंग माळगांवकर** **------ अपीलकर्ता**
**१२२,रुम.नं. ३०२,मुकेश अपार्टमेंट,**
**नाडकर्णी मार्ग,वडाळा (पूर्व) मुंबई ३७**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**अध्यक्ष,बार कॉन्सील ऑफ महाराष्ट्र अँड गोवा,२ रा मजला,**
**उच्च न्यायालय विस्तार इमारत, फोर्ट,मुंबई ३२**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**सचिव, बार कॉन्सील ऑफ महाराष्ट्र अँड गोवा,२ रा मजला,**
**उच्च न्यायालय विस्तार इमारत, फोर्ट,मुंबई ३२**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २१.०९.२००९
सुनावणीचा दिनांक: १८.११.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारी: उपस्थित

अपिलार्थीच्या अर्जानुसार त्यांनी जे वेळोवेळी बार कौन्सीलकडे अर्ज दिलो होते व बार कॉन्सीलला माहितीचा अधिकार लागू नाही म्हणून ज्यांची माहिती देण्यात आलेली नव्हती, पण आता राज्य माहिती आयोगाने असा निर्णय दिलेला आहे की बार कॉन्सील हे जन प्राधिकरण आहे त्यामुळे सर्व अर्जाचा बार कौन्सीलला निर्णय घ्यावा म्हणून त्यांनी नमूद केलेल्या ९ अर्जाच्या बाबतीत असलेल्या सद्यस्थितीची माहिती विचारली आहे. त्यांना कुठचेही उत्तर न दिल्यामुळे त्यांनी अंतिमतः आयोगाकडे धाव घेतलेली आहे. सुनावणी दिनांक १८.११.२००९ रोजी घेण्यात आली अपिलार्थी व जन माहिती अधिकारी बार कौन्सील यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जुन्या सर्व अर्जाचे काम एकदम येऊन पडल्यामुळे अर्जाची त्वरिने निर्गत झालेली नाही असे प्रतिनिधींनी सांगितले मात्र अशा सर्वच अर्जाची निर्गत एक

महिन्याच्या आत करावी तसेच अर्जदाराने जो अर्ज दिलेला आहे त्या अर्जाची माहिती ही दहा दिवसांच्या आत अर्जदारास देण्यात यावी असे निर्देश देण्यात आले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १८.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले तक्रार.**

**मुमाआ २००९/४१३८८/अपील क्रं. ४८६९/०२**

**श्रीमती हेमंतीबेन आर.शाह** ------ **अपीलकर्ता**
**३९,सिल्व्हर गोल्ड, एस.व्ही.पी.रोड,**
**युनियन बँकेसमोर,बोरीवली (प),**
**मुंबई ९२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**पालीस,उपआयुक्त,परिमंडळ-१२,शैलेंद्र नगर, दहिसर (पू),मुंबई ६८**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**सहायक पोलीस आयुक्त,उत्तर नियंत्रण कक्ष, ठाकूर व्हिलेज,कांदिवली (पू),मुंबई**

**- वि वे च न -**

श्रीमती हेमंतीबेन आर.शोह, यांनी दि. ३.०४.२००९ रोजी सहायक पोलीस आयुक्त, उत्तर नियंत्रण कक्ष यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ मधील तरतुदीनुसार माहितीचा अर्ज सादर केला. त्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १३.०४.२००९ रोजी समर्पक असे उत्तर दिलेले आहे. त्या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी दि. २४.०४.२००९ रोजी प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोली उपआयुक्त परिमंडळ १२ यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्या अपीलाच्या अनुषंगाने प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दि.२.५.२००९ रोजी आदेश पारित केलेले आहेत.

प्रथम अपीलीय प्राधिकारी यांचे आदेशाने व्यथीत होऊन अपीलार्थीने दि.२९.०५.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी दि.२०.१०.२००९ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्या सुनावणीस जन माहिती अधिकाऱ्यासह अपीलार्थी उपस्थित होते.

श्रीमती हेमंतीबाई आर.शाह यांनी दाखल केलेल्या व्दितीय अपीलाची पडताळणी केली असता असे दिसून येते की, त्यांनी मागणी केलेली माहिती ही एस.बी.आय.लाईफ इन्शुरन्स कंपनी संदर्भात असून त्यामध्ये

एसबीआय लाईफ इन्शुरन्स कंपनीच्या पॉलीसीमधील लाभार्थी व्यक्तीस मिळणारा लाभ, टक्केवारी,प्रिमीयम इत्यादीबाबत आहे.

श्रीमती शाह यांनी एसबीआय लाईफ इन्शुरन्स कंपनीचे एकूण विमा पॉलीसीमध्ये एकूण रु.४७/-लाख इतकी गुंतवणूक केली असून गुंतवणूक सदर कंपनीचे एजंट श्री.गौतम वकील व शाखा अधिकारी आशिष पांडे यांचेमार्फत केली असल्याचे नमूद केलेले आहे. स.बी.आय.लाईफ इन्शुरन्स कंपनीचे एजंट श्री.गौतम वकील यांनी त्यांची फसवणूक केली म्हणून अपीलार्थीने बोरीवली पोलीस स्टेशनमध्ये त्यांचे विरुध्द गुन्हा नोंद केला आहे. त्या गुन्हयासंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे अपीलार्थीस देण्यात आलेली आहेत. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून मा.न्यायालयामध्ये दोषारोप पत्र देखील दाखल करण्यात आलेले आहे.

अपीलार्थीने दाखल केलेल्या अपीलातील मुद्दे विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेशी संबंधित असलेली सर्व माहिती अपीलर्थीस दिल्याचे दिसत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी देखील त्यास दुजोरा दिलेला आहे. अद्यावत माहिती दिल्याचे दिसून येत असल्याने पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १८.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले तक्रार.**

**मुमाआ अपील क्रं. ४९९३/२००९**

**श्री. मानिकनंदन पी.नायर** ------- **अपीलकर्ता**
**८३/१४९२,समतानगर, कांदिवली (पू),मुंबई -४०० १०१**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**उपनिबंधक,सहकारी संस्था यांचे कार्यालय,**
**गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,मुंबई - ५१**

**जन माहिती अधिकारी, तथा**
**उपनिबंधक,सहकारी संस्था यांचे कार्यालय,**
**गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,मुंबई - ५१**

**- वि वे च न -**

अपीलाचा दिनांक : २८.०८.२००९
सुनावणीचा दिनांकः १८.११.२००९
अपिलार्थी : उपस्थित
जन माहिती अधिकारीः उपस्थित

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अर्जदारास हवी असणारी माहिती ही सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे उपलब्ध असणारी आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था हया माहितीचा अधिकार अधिनियम कायद्याखाली जन प्राधिकरणे नाहीत. मात्र कोणच्याही गृहनिर्माण संस्थेचे सदस्य हे संस्थेकडून माहिती सहकारी संस्था कायद्यांतर्गत घेऊ शकतात. जर त्यांना तशी माहिती संस्थेने दिली नाही तर उपनिबंधकांकडे तक्रार करु शकतात जेणेकरुन उपनिबंधक त्यांना माहिती देण्याची व्यवस्था करु शकतात. अर्जदाराने या पध्दतीने कार्यवाही करण्याचे मान्य केले.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १८.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले.**

**मुमाआ २००९/४३८१३/अपील क्र. ४८९९/०२**
**मुमाआ २००९/४३८१४/अपील क्र. ४९००/०२**

**श्री. मोईन अख्तर कुरेशी** ------ **अपीलकर्ता**
**५८३,तळमजला, जेएसएसरोड,**
**चिरा बाजार,मुंबई ०२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** ------- **उत्तरवादी**
**उप मुख्य अभियंता, (इ/प्र) उप मुख्य अभियंता यांचे कार्यालय,**
**(इ./प्र) शहर,३ रा मजला, इ वार्ड कार्यालय,साकळी स्ट्रीट,भायखळा,मुंबई ०८**

**जन माहिती अधिकारी**
**कार्यकारी अभियंता (इ.प्र), शहर - ३ उप मुख्य अभियंता यांचे कार्यालय,**
**(इ./प्र) शहर,३ रा मजला, इ वार्ड कार्यालय,साकळी स्ट्रीट,भायखळा,मुंबई ०८**

**- वि वे च न -**

श्री. मोईन अख्तर कुरेशी यांनी दिनांक ४.०४.२००९ रोजी दोन स्वतंत्र माहिती अर्ज करुन अनुक्रमे १) श्री.एस.एन.शिंदे, सहायक अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर III व २) श्री.व्ही.आर.कोरान्ने,कार्यकारी अभियंता (इमारत प्रस्ताव) शहर III यांच्याशी संबंधित सेवाविषयक नस्ती (Service File), इमारत प्रस्ताव विभागात असताना त्यांच्याविरुध्द किती तक्रार अर्ज प्राप्त झाले, त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरू केली असल्यास त्याची सद्यस्थिती इत्यादी बाबत माहिती मागितली होती त्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या प्रकरण दाने मधील कलम ८ (१) चा उल्लेख करुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २८.०४.२००९ च्या पत्रान्वये (दोन) माहिती नाकारली. जन माहिती अधिकारी यांच्या आदेशाविरुध्द अपीलार्थी यांनी कलम १९ (१) अन्वये उपरोक्त प्रथम अपिलीय प्राधिकारी यांजकडे दिनांक ११.०५.२००९ या एकाच दिवशी दोन स्वतंत्र प्रथम अपीले दाखल केले. त्यावर सुनावणी घेऊन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी दिनांक ७.०७.२००९ रोजी दोन स्वतंत्र आदेश पारित करुन जन माहिती अधिकारी यांच्याप्रमाणेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या प्रकरण २ मधील कलम ८(१) चा उल्लेख करुन अपिले निकाली काढण्यात आली.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या दिनांक ७.०७.२००९ च्या दोन्ही आदेशांविरुध्द अपीलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपीले दाखल केली, ज्यावर दिनांक २१.१०.२००९ रोजी दुपारी ४ व ४.३० वाजता

सुनावण्या आयोजित केल्या होत्या. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व श्री. सं.पां.दराडे,विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र) हे उपस्थित होते. प्रथम अपिलीय प्राधिकारी मात्र अनुपस्थित होते.

सुनावणी दरम्यान दोन्ही बाजूंनी मांडलेले मुद्दे तेसच लेखी जबाब लक्षात घेता एक गोष्ट स्पष्ट करण्यात येते की माहिती अधिकार अधिनिमयाच्या सर्वसाधारण कल हा माहिती देण्याकडे आहे. या अधिनियमाच्या कलम ८ मध्ये कोणती माहिती देता येणार नाही याची स्पष्ट मांडणी केलेली आहे. या अपवादांच्या शिवाय उर्वरित सर्व माहिती नागरिकांना देणे अधिनियमानुसार अभिप्रेत आहे. माहिती नाकारताना प्रकरण दोन मधील कलम ८ च्या पोट कलम (१) अंतर्गत (क),(ख),(ग),(च) . . . . . .(ञ) असे जी उप कलमे दिलेली आहेत त्यापैकी निश्चित कोणत्या उपकलमान्वये माहिती नाकारलेली आहे हे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशावरुन तसेच जन माहिती अधिकारी यांच्या उत्तरावरुन स्पष्ट होत नाही.

अपिलकर्ता यांच्या माहिती अर्जातील अनुक्रमांक १ व २ येथील माहिती कार्यालयीन अभिलेखाचा भाग असला तरी वैयक्तीक स्वरुपाची माहिती असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ मधील तरतुदीनुसार स्वयंप्रेरणेने घोषित करावयाच्या माहितीपैकी जेवढी माहिती प्रसिध्द करणे आवश्यक आहे ती वगळून इतर वैयक्तीक माहिती देण्याबाबतचा निर्णय हा जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत व्यक्तींना कलम ११ अन्वये नोटीस देऊन घेणे आवश्यक आहे. अपिलकर्ता यांच्या माहिती अर्जातील अनुक्रमांक ३ येथील माहिती अपीलकर्त्यास हे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात जन माहिती अधिकारी यांनी द्यावी.

**आदेश**

**अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.**

**जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल आयोगास १५ दिवसात पाठवावा.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १९.११.२००९**

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपीले.**

**मुमाआ २००९/४१५४०/अपील क्र . ५००६/०२**

**श्री. रिध्दी राजेंद्र पाताडे** **------ अपीलकर्ता**
**अ/२८,ओम अमेय सीएचएस लि.,**
**लोक प्रिय पार्क,भांडूप (पूर्व), मुंबई-४२**

**विरुध्द**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा** **------- उत्तरवादी**
**उप संचालक शिक्षण, उप संचालक शिक्षण जवाहर बाल भवन,**
**मरीन ड्राईव्ह,चर्णी रोड, मुंबई-०४**

**जन माहिती अधिकारी**
**उप संचालक शिक्षण, उप संचालक शिक्षण जवाहर बाल भवन,**
**मरीन ड्राईव्ह,चर्णी रोड, मुंबई-०४**

## - वि वे च न -

अपिलार्थी श्रीमती रिध्दी पाताडे यांनी काही विद्यार्थ्यांच्या घरचे पत्ते तसेच दुध्वनीक्रमांक, इयत्ता ११ वी व १२ वी चे हजेरी पत्रकाची छायांकित प्रत,इयत्ता १२ वी च्या गुणपत्रकांची प्रत, जनरल रजिस्टर क्रमांक अशी माहिती अपीलार्थीस पाहिजे होती. घरचे पत्ते व दुरध्वनी क्रमांक ही वैयक्तीक माहिती असल्यामुळे देण्यात आलेली नाही. इयत्ता १२ वींच्या हजेरीपत्रकाची प्रत ही इ.स.२००६-०७ व २००७-०८ आहे तसेच या नोंद वहयांना वाळवी लागल्यामुळे ती देता येऊ शकत नाही. जनरल रजिष्टर क्रमांक देण्यात आला आहे. माहिती न मिळाल्यामुळे अंतिमतः आयोगाकडे अपील दाखल केले आहे. सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी सागितले की अपिलार्थी श्रीमती पाताडे यांना कॉलेजच्या नोकरीतून काढून टाकण्यात आले आहे. त्यामुळे त्या कधी स्वतःच्या नावावर तर कधी इतरांच्या नावावर माहितीच्या अधिकारात अर्ज करीत असतात. रु.१६,०००/- शुल्क भरुन होणारी माहिती तयार ठेऊन ती माहिती देण्यात आलेली नाही असे निदर्शनाला आणले. मात्र आयोगाने या अपील पुरतेच लक्ष केंद्रीत करण्याचे ठरविले आहे. विद्यार्थ्यांच्या घरचे पत्ते ही बाब वैयक्तीक असल्यामुळे ती न देण्याचा निर्णय योग्यच. इयत्ता १२ वीच्या मार्कशीट हया प्रती शाळेत ठेऊन देत नसल्यामुळे ही माहिती उपलब्ध नाही. उपसंचालक माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२(११) आणि ८३ तसेच जोडपत्र १५(१७) मधील तरतूदी लक्षात घेता अपीलाबाबत नोंदवहया ठेवणे आवश्यक आहे. अर्जदाराने पोलीसांमध्ये काही क्रिमीनल तक्रार केलेली आहे व त्यांना तक्रारीच्या दृष्टीने आवश्यक वाटलेतर या

विद्यार्थ्यांचे पत्ते, कॉलेजचे प्रशिक्षण त्यांना देऊ शकता. इ.स.२००६-०७ व २००७-०८ या वर्षाचे रेकॉड हे वाळवी लागल्याने खराब झाले असल्यामुळे ते देता येऊ शकत नाही ही गोष्ट योग्य नाही. आपले रेकॉर्ड सुरक्षित रहावे याबाबत प्रशासनाने लक्ष देणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येतो.

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

**मुंबई,**
**दिनांकः १९.११.२००९**